चरित्र
१३६९

काशन पुष्प १०वे

जगद्गुरु आद्य

# श्री शंकराचार्य



शंकराचार्याः सन्तु जन्मनि जन्मनि ॥

REFBK-0015249

सात रुपये

कै. विद्वद्रत्न रा. गो. कोलंगडे.

16 MAY 1975

20 DEC 1975

१३०३
परिग.
३०-२-६७
परिग
१३६६

योगीश्वर प्रकाशन पुष्प १० वे.

श्रीमद्‌जगद्गुरु आद्य

# श्री शंकराचार्य

लेखक

कै. सा[...] कोलंगडे

योगीश्वर [...], ऋग्वत्न

भांडा [...] बुद्ध,

श्री[...], महर्षी

झोराष्टर इ. ग्रंथांचे कर्ते

REFBK-0015249

मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई

दा. क्र. ९५२८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम २९३८३ दि: ........

क्रमांक १३५८ ........

वैशाख शु. ५, १८८८ ★ १९६६ ★ किंमत

२५-४-१९६६ सात रुपये

★ प्रकाशकः—
मा. रा. कोलंगडे
नवरे बंगला,
शीव, मुंबई.

☆

☆ सर्व हक्क प्रकाशकानी
★ आपलेकडे राखून ठेविले आहेत.

☆

★ मुद्रक :—
श्री. डी. आर्. ऊर्फ बाबुराव ठाकुर
प्रोप्रा. तरुण भारत मुद्रणालय.
बेळगांव.

# अर्पण पत्रिका

धर्मश्रद्धा, वैदिक धर्माभिमान, उद्योगशीलता,
दानशूरता, कर्तव्यदक्षता, सात्विक साधेपणा,
गुणसंपन्नता, इत्यादी उच्चगुणानी
ज्यानी अलौकिक लोकप्रियता संपा-
दून अखिल कर्नाटकात अमर कीर्ती
मिळविली त्या थोर व्यक्तीस

**श्रीमंत राघवेशराव वेंकटराव शिरूर**

याना हा पवित्र ग्रंथ
आदर पूर्वक अर्पण
करीत आहे.

मा रा. कोलंगडे
प्रकाशक

# प्रस्तावना

हुबळी येथील नाणावलेले विद्वान कै. रा. गो. कोलंगडे यानी श्रीशंकराचार्य हा ग्रंथ लिहून मराठी चरित्र-वाङ्मयात चांगल्यापैकी भर टाकली आहे. श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य यांची अनेक चरित्रे आहेत व मराठी भाषेतहि चांगल्यापैकी चरित्र कै. बोडस यानी लिहिलेले उपलब्ध आहे. श्री कोलंगडे यांचे चरित्र शंकर दिग्विजय, व्यासावलकृत शकरविजय आनंद-गुरु व त्याचप्रमाणें माधवाचार्य यांनी लिहिलेल्या शंकर विजयावरून लिहिले आहे. या ग्रंथात श्रीमत् शंकराचार्यांच्या जन्मापासून त्यांच्या निर्याणापर्यंत त्यांच्या ऐहिक जीवनाची जशी हकिकत दिलेली आहे, त्याचप्रमाणें त्यांच्या तत्त्वज्ञान विषयक गोष्टीचाहि प्रपंच केलेला आहे. जुन्या पद्धतीचे हे चरित्र असल्याने त्यांत अद्भूत गोष्टींचा साहजिकच समावेश झालेला आहे. लेख-काची प्रेरणा ही चरित्रविषयक व्यक्तीवरील पूर्ण श्रद्धा ही आहे. आणि त्यामुळे आजच्या आधुनिक मनाला यात लिहिलेल्या कांहीं गोष्टी खटकतात. तथापि या पुस्तकाकडे आधुनिक दृष्टीने लिहि-लेले चरित्र असे पाहून चालणार नाहीं.

लहान वयांत श्रीशंकराचार्यांची बुमद्धित्ता किती प्रगल्भ होती, त्यांचे हृदय किती औदार्य युक्त होते याचे उदाहरण एका गरीब शेळीला त्यानी लक्ष्मीची स्तुती करून संपत्ती देवविली यावरून दिसते.

कलये मम हृदये तव सदये पद युगलम् ।<br>
धरणीरथ तरुणीश्वरि करिणी मणि गमने ।।

पूर्णा नदीला त्यानी आपल्या घराकडे वळवून आणली याची हकीकत आजच्या जगात कोणाला खरी वाटणार नाहीं. पण असे घडले आहे असेहि दाखले देता येतात. मगरीचे उदाहरणहि तीच गोष्ट दर्शविते पण त्यामध्यें एक नाटच प्रसंग समाविष्ट झालेला आहे. मुलाने संन्यास घेण्याबद्दल परवानगी मागितली ती मातेला देववत नव्हती आणि म्हणून मुलाने मगरीचे नाटक निर्माण करून ती मिळविली. "कसाहि असो, कोठेहि असो, सुखी असो" ही मातृत्वाची युगायुगाची अिच्छा व भावना याचे सुंदर वर्णन या ग्रंथात केलेले आहे. आईची इच्छा स्वतःच्या ज्ञानयुक्त श्रद्धेला विसंगत असताना सुद्धा शंकराचार्यांनी पुरविली व पुरविण्याचे वचन दिले यांत शंकराचार्यांची श्रेष्ठता व मानवतेचा श्रेष्ठ धर्म मानण्याची तत्परता दिसून येते. न्या. रानडे यांनी जे आपल्या द्वितीय विवाहाचे बाबतीत केले त्यातील त्यांची भूमिका हीच होती, हे मर्मज्ञ वाचकाला कळून येण्यासारखे आहे. "मी संन्यास घेतला तरी व मी कोठेहि असेन तरी तू माझे स्मरण कर आणि त्या वेळी मी हजर होओीन."

पश्यामि तव समयं सकलविहाय।
विश्वासमाप्नुहि मृतावपि संकरिष्ये ॥

हेच ते वचन शंकराचार्यांनी दिले व ते पुरे केले. अवघ्या ७ वर्षांचे असताना ज्ञानाचे शोधार्थ स्वगृह त्याग केला आणि उत्तर दिशेला यात्रा सुरूं केली. आणि नर्मदा तीरी भगवतपाद गोविंदाचार्य यांचे शिष्य झाले. अध्ययन केले आणि गुरुदक्षिणा म्हणून जगभर अद्वैत मताचा प्रचार करण्याची जबाबदारी स्वीकारली. या वयातच त्याना साक्षात्कार झाला होता. गोविंद-

नाथानी तूं कोण कोठला हे मुलाखतीत विचारले आणि बालशंकराने सांगितले:-

स्वामिन्नहं न पृथिवी न जलं न स्पर्शनो न
गगनं नच तद् गुणावा। तेजोनापीन्द्रियाण्यपि
तु विद्धि ततोऽवशिष्टे। यः केवलोऽस्ति परमः
स शिवोऽ हमस्मि ॥

आणि ज्ञानोत्तर त्या पदवीला पोचण्यापूर्वीच त्या पदवीची पात्रता त्यांच्या अंगात होती. गोविंदाचार्यांकडे यथासमय ज्ञान-प्राप्ती व अध्ययन करून आशिर्वाद घेऊन त्यांनी अद्वैत धर्माच्या प्रचाराला सुरुवात केली. काशी येथे कांही काळ काढला त्या काळात त्याचा व चांडाल यांच्या भेटीचा घडलेला प्रसंग या चरित्रात मोठ्या सुंदर रीतीने चित्रित केलेला आहे.लौकिक धर्माने शंकराचार्य वागत होते. चांडाल त्याना अलौकिक तत्वज्ञान सांगत होता. "आत्मवस्तु जो आहे तो सर्व विश्वात सर्वत्र सारखोच आहे. सर्व स्थावर वस्तुतहि आहे. माझ्यात आहे, तुमच्यात आहे. ती भेदरहित आहे. ती नित्य आहे. शुद्ध आहे. तिला जवळ व दूर असे कांहीं नाहीं. सदैव शुद्ध, बुद्ध, मुक्त अशीच आहे. तुम्ही ब्राम्हण आणि मी चांडाल हे असूच शकत नाहीं. अद्वैत वादाला हे कसे शोभते ?" आणि मग हे त्याचे भाषण ऐकून आचार्यांना वस्तुस्थितीचे ज्ञान झाले आणि त्याला आचार्य म्हणाले:-

ब्रम्हैवाहमिदं जगत्व सकलं चिन्मात्र-विस्तारितम् ।
सर्व वैतदविद्या त्रिगुणया शेषंमया कल्पितम् ॥

तूं माझा गुरू आहेस, असे म्हणून त्याला नमस्कार केला. नंतर भारतभर यात्रा केली. ग्रंथरचना केली. ब्रम्हसूत्रावर अनेक भाष्ये असून सुद्धा स्वतःचे असे भाष्य लिहिले. या भाष्यासुद्धा बरीचशी माहिती व त्यातील तत्त्वज्ञानाचा सारांश प्रस्तुत पुस्तकामध्यें दिला आहे. ४ अध्यायात ब्रम्हसूत्रांत काय सांगितले आहे त्याचा अध्यायवार विचार करून त्याचे सार श्री. कोलंगडे यानी सहज व सुलभ शद्वात सांगितले आहे. विद्वानांशी त्यानी वाद-विवाद केला, कुमारील भट्टाशी वाद केला, मोठ मोठाली विद्यापीठे व विद्या केंद्रें याना त्यानी भेट दिली. मंडन मिश्राशी वाद केला. आणि मंडन मिश्राच्या भोवतालची परिस्थिति कशी होती याचे सुंदर वर्णन शंकर दिग्विजयात आहे. ते वाचनीय आहे. मंडनाचा वाडा कोणता हे ओळखण्याची खूण-

स्वत: प्रमाणं परत: प्रमाणं
कीरांगना यत्र गिरं गिरंन्ति
द्वारस्थ नीडान्त सन्नि सद्धा
जानीहि तन्मडनपंडितौक :।।
पनलप्रदं कर्मं पनलप्रदोत :
कीरांगना यत्रगिरं वदन्ति
द्वारस्थ नीडांतर सन्नि सद्धा
जानीहि तन्मंडन पंडितौक: ।।

भावार्थ:- वेद हे स्वत: प्रमाणे आहेत. सुखदु:खात्मक फळ कर्मं देते का ओश्वर देतो, या प्रश्नाची चर्चा ज्याच्या दारावर बांधलेल्या पिंजऱ्यातील पोपट, मैना पक्षी हे आपआपसात करतात,तोच मंडनाचा वाडा समजा; असे सांगून त्या दासी आपल्या

रस्त्याला लागल्या. अर्थात त्या स्त्रिया मंडनाच्या घरच्या दासी होत्या, अशी माहिती दिलेली आहे.

वादविवादाची हकिकत प्रकरण २० मध्ये दिली असून ती अत्यंत वाचनीय आहे. परकाया प्रवेशासंबंधीचे वर्णनहि वाचनीय आहे. आणि योगशास्त्राचा आश्रय करून त्यानी मग कामविषयक वादविवादामध्ये यश मिळविले. तात्पर्य यात असे आहे कीं ज्ञान अनुभवा अभावी अपूर्ण राहते आणि विद्यमान जगातहि श्रेष्ठ अनुभवा अभावी ते श्रेष्ठ अगर अभिजात होऊ शकत नाहीं. याचा अर्थ प्रत्येक साहित्यिकाला प्रत्येक क्षेत्रात तसा अनुभव आलाच पाहिजे अगर त्याने घेतला पाहिजे असे नव्हे.

२७ व्या प्रकरणांत सरस्वती व आचार्यांचा संवाद दिलेला आहे. आचार्यांनी अद्वैत धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कसे संघटन केले याची हकीकत २७ व २८ या प्रकरणात आहे. हस्तामल-काला त्यानी कसा निवडला, किंबहुना चारहि श्रेष्ठ विद्यार्थ्यांना कसे निवडले ही मनोरंजक कथा आपल्याला या पुस्तकात वाचा-वयाला मिळते.भारतभर त्या काळात त्यानी यात्रा केली.चार धाम स्थापले. बद्रीपासून शृंगेरीपर्यंत, द्वारकेपासून पुरीपर्यंत आणि पुन्हा एकदा वैदिक धर्माची पताका जगभर त्यानी फडफडविली. ३० व्या प्रकरणात मृत्युशय्येवर माता आहे हे मनाने जाणताच कालटी येथे ते आले आणि सनातनी ब्राम्हणाना न जुमानता त्यानी आपल्या मातेची इच्छा पुरी केली. रानावनातून काष्ठे आणून तिची अंत्यक्रिया केली. मृत्यूपूर्वी ते हजर झाले. तिला भगवंताचे दर्शन पाहिजे होते. तेहि त्यानी घडविले. आपल्या तपश्चर्येच्या जोरावर !

शंकराचार्यांचा लौकिक– जीवनाचा हा चरित्र ग्रंथ वाचनीय आहे. त्याहीपेक्षा त्यांच्या तत्वज्ञानाचा विचार जो यात केलेला आहे तो मराठी वाचकाना थोडक्यात पाहावयास मिळेल. शंकराचार्य हे अद्वैतवादी वेदान्त जाणणारे,साक्षात ज्ञान सदेह झालेले त्यांच्या रूपाने असे मानले जाते. त्यांचें देव भाषेवरील म्हणजे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व अनुपमेय आहे. त्यांची स्तोत्रे हीं जितकी ललितपूर्ण तितकेच त्यांचे कांही ग्रंथ विवेक चुडामणी, ब्रम्हसूत्रावरील भाष्ये विदग्ध ज्ञानाचे नमुने आहेत शंकराचार्यांनी बुद्ध धर्माने हिंदूधर्मावर अगर वैदिक धर्मावर जो आघात केला होता, जो हल्ला चढविला होता त्याचा मुकाबला केला, आणि त्यांच्या प्रभावी साहित्याने, प्रचाराने पुन्हां वैदिक धर्माभिमानाची लाट निर्माण झाली. सर्वत्र ज्ञानयुक्त भक्तीचे वातावरण झाले आणि दक्षिणेत उत्पन्न झालेली भक्ती कर्नाटकात समृद्ध झालेली भक्ती मराठी संतानी कृष्णा गोदावरीच्या दुआबात विमल व विशाल केली. पांच शतकापर्यंत हा भक्तीचा मळा मराठी साहित्यात अमापपणी पिकत होता. शंकराचार्यांच्या कर्तृत्वाची ही एक निशाणी होती. आज शंकराचार्यांच्या चरित्राबाबत नवीन पिढीला फार थोडी माहिती आहे. आणि या दृष्टीने कै. कोलंगडे यांचे चरित्र त्यांचे चिरंजीव श्री. माधवराव कोलंगडे यानीं छापून मराठी भाषेवर एक कृपाच केलेली आहे. भाषा सुबोध व प्रसादयुक्त आहे. आणि मला वाटते कीं मराठी वाचक या ग्रंथाचे स्वागतच करील.

न. वि. गाडगीळ

## हुबळीचे नामवंत उद्योगपती
## श्रीमंत राघवेशराव वेंकटराव शिरूर यांचा अल्प परिचय

# कुलवृत्त

आमचे चरित्र नायक श्रीमंत राघवेशराव वेंकटराव शिरूर यांचे मूळ घराणे कुमठ्याचे. हें घराणे एक नामवंत घराणे म्हणून प्रसिद्ध आहे. कुमठा हे गांव कारवार जिल्ह्यांत आहे. यांच्या आजोबांचें नांव नारायणराव. नारायणराव क्रिस्टल आणि कं. (इंग्लंड) या कंपनीच्या कुमठा शाखेचे मॅनेजर होते. त्याना दोन मुलगे व दोन मुली होत्या. दत्तात्रेय नि वेंकटेश आणि अंबाबाई व शांताबाई. कै. नारायणराव आपल्या कर्तबगारीने क्रिस्टल् आणि कं. चे भागीदार झाले व कालांतराने कंपनीच्या बेंगळूर, हुबळी, गिरण्यांची व्यवस्था (मॅनेजिंग एजन्सी) आपणास मिळावी म्हणून कंपनीशी करार करून घेतला. पुढे या दोन्ही गिरण्याची व्यवस्था त्यांच्यावर येऊन पडली. काही वर्षानंतर नारायणरावानी आपल्या ज्येष्ठ चिरंजिवाकडे बेंगळूर गिरणीची व्यवस्था नि तेथील आस्ती सोपविली आणि श्री. वेंकटराव यांचेकडे हुबळी गिरणीची ग्यारंटी नोकरावर व्यवस्था व स्थावर आस्ती सोपविली. श्री. वेंकटरावांचे लग्न कारवारचे रामराव भटकळ यांची कन्या मित्राताई इजशी झाले.

### जन्म व बाळपण

श्री. राघवेशराव यांचा जन्म १९०६ साली हुबळी येथे झाला. त्यांचे लालन पालन त्यांच्या पूज्य मातोश्री सौ. मित्राबाई

यांच्या प्रेमळ नि मायाळू छायेखाली झाले. सौ. मित्राबाई या स्वभावाने अत्यंत प्रेमळ नि सात्त्विक प्रवृत्तीच्या. धार्मिक ग्रंथांची त्याना फार आवड. त्या रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा वाचण्यात व पठण करण्यात दररोज बराच वेळ घालवीत असत. पुढे पुढे तर जपतप, अनुष्ठानात मग्न होऊ लागल्या. याचा परिणाम श्री. राघवेशराव यांचेवर झाल्याशिवाय राहिला नाही. तीच प्रवृत्ती त्यांच्यात दिसून येऊ लागली.

## विद्या साधन

राघवेशराव सहा वर्षाचे असतानांच शाळेला जाऊ लागले. या महाराष्ट्रीय घराण्याची मातृभाषा मराठी असल्यामुळ त्यानी साहाजिकच म्युनिसिपल मराठी शाळा नं. २ मध्ये प्रवेश केला. श्री. राघवेशराव कुशाग्र बुद्धीचे असल्यामुळे हुशार विद्यार्थी म्हणून ते चमकले. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यावर त्यानीं माध्यमिक शिक्षणाकरिता लॅमिंगटन इंग्लिश हायस्कूल मध्ये प्रवेश केला. १९२५ साली ते मॅट्रिकच्या परिक्षेत उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाले. पुढे उच्च शिक्षणाकरिता ते कर्नाटक कॉलेजला जाऊ लागले. एफ्. वाय. परीक्षेत पास झाल्यानंतर कॉमर्सच्या अभ्यासाकरिता ते मुंबईला गेले. सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्समध्यें त्यांनीं प्रवेश मिळविला. दोन वर्षांचा अभ्यासक्रम संपवून बी. कॉमच्या वर्गात शिकत असताना, त्यांचे वडील फार आजारी असल्याचे पत्र त्यांना मिळाले. पत्र वाचून त्यांच्या अंतःकरणावर आघात झाला. क्षणभर मन गोंधळले. काहीच कळेनासे झाले. त्याच अवस्थेत ते घरी आले. याच सुमारास त्यांचे धाकटे

बंधू सौमित्रराव हे उद्योगधंद्याच्या निमित्ताने मुंबईसच आले होते. आपल्या भावाशी विचार विनिमय करून त्यानी अखेर हुबळीला जाण्याचे ठरविले. मुंबई सोडली नि दुसरेच दिवशी स्वगृही दाखल झाले.

## उद्योगधंद्यात प्रवेश व प्रगति

निरलस अंतःकरणाने आपल्या पूज्य वडिलांची सेवा करीत असता हळूहळू उद्योग धंद्याची सूत्रे अपल्या हातात घेऊ लागले. पुढे काही महिन्यातच श्री. राघवेशरावांची बहीण कु. मिराताई हिचे लग्न मंगळूरचे प्रसिद्ध कानडी साहित्यिक श्री. मंगेशवार पंजे याचे सुपूत्र श्री. गोपाळराव यांचेशी ठरले. लग्न झाले. काही महिन्यानंतर मुलीला घरी बोलावून आणणे करिता श्री वेंकटराव मगळूरला गेले व आपल्या मुलीला घेऊन परत हुबळीला येताना वाटेतच पूज्य पिताजींचे प्राणोत्क्रमण झाले.

श्री. राघवेशरावांच्या हळूवार मनावर जबरदस्त आघात झाला. लहान वयातच सारी जबाबदारी त्यांचेवर येऊन पडली. बाकी पुष्कळ पडली होती, पण वसूली मात्र अत्यंत असमाधान कारक,यामुळे ३-४ लाखाची वसूली थकून राहिली,याचा परिणाम त्यांच्या उद्योग धंद्यावर झाला. पुढे पुढे श्री राघवेशराव यानी आपल्या कुशल कर्तृत्वाने व धैर्याने आस्ते आस्ते प्रगती करीत १९३६ साली पुन्हां पूर्ववत् स्थितीला आले.

आपल्या प्रभावी कर्तृत्वाने व अत्यंत जागरुकतेने उद्योग धंद्यात पुढे पुढे पाऊल टाकताना त्यांचा नावलौकिक साऱ्या

कर्नाटकात पसरू लागला. याच सुमारास त्यांचा विवाह महाबळेश्वरचे सुप्रसिद्ध डॉ. नायमपल्ली यांची कन्या कु. सीताताई इजशी १९३२ साली झाला. सौ. सीताबाई यांचे इंटर आर्टस पर्यंतचे शिक्षण बडोदे व मुंबई येथे झाल्यामुळें श्री. राघवेशरावाना योग्य अशीच पत्नी लाभली.

जसजसा उद्योग धंद्याचा पसारा वाढत चालला तसतसे श्री. राघवेशराव यानी आपले बंधू श्री. भालचंद्रराव, श्री. गोविंदराव, श्री. मोहनराव तसेच आपल्या आप्तइष्टांच्या नि मित्रांच्या सहकार्याने मोग्गोरा कॉस्मिक् प्रा.लि.,कॉटम्याक प्रा.,लि , सिबेला प्रा. लि., मिवेन् इंजिनिअरिंग वर्कस् या प्रमाणे कंपन्या स्थापून मुंबई, बेंगळूर, दावणगेरी, चित्रदुर्ग, औरंगाबाद इ. अनेक ठिकाणी उपशाखा काढून औद्योगिक जगतात अविस्मरणीय अशी कामगिरी बजावली.

## सामाजिक कार्याची आवड नि उदार सहाय्य

कर्नाटक चेंबर ऑफ कॉमर्स आणि इंडस्ट्रीज या संस्थेची मुख्य कचेरी बागलकोट येथें होती.संस्थेचे कार्य समाधान कारक चालेना असे दिसून येताच संस्थेचे स्थलांतर हुबळीला करण्यात आले व श्री. राघवेशराव यानी संस्थेची सर्व सूत्रे आपल्या हाती घेऊन कुशल रीतीने संघटना करून संस्थेचे कार्यदर्शी म्हणून चौदा वर्षाच्या कारकीर्दीत सतत प्रयत्न करून अखिल कर्नाटकात एकमेव अशीं प्रातिनिधिक संस्था करून ठेवली. या संस्थेचे त्यानी दोनवर्षे अध्यक्षपद भूषविले होते.

दुसरी भरीव अशी कामगिरी त्यानी बजावली ती व्यापाऱ्यांना जागा मिळवून देण्याचे बाबतीत. गांवाबाहेर कॉटन् मार्केटचे स्थलांतर करण्याचे म्युनिसिपालिटीने ठरविले. पण जागेचा प्रश्न उभा राहिला. श्री.राघवेशराव यानी त्या वेळचे म्युनिसिपल प्रशासक श्री. बेण्णी यांचेशी पत्रव्यहार करून सरकारशी वाटाघाटी करून सोईची अशी जागा मिळविली व अल्प किंमतीत वखारी बांधणें करिता व्यापाऱ्याना, दलालाना प्लॉटस् देवविले. या अमूल्य कामगिरीमुळें त्यांचा लौकिक चोहोकडे पसरला.

तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी सामानांची ने आण करण्यास वॅगन्सची तीव्र टंचाई भासत होती. यामुळे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली. अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली तेव्हां सर्व व्यापाऱ्यानी या कामगिरीवर श्री. राघवेशराव यांची निवड करून आपले निस्सीम प्रेम व विश्वास प्रकट केला ही कामगिरी अत्यंत चिकाटीने प्रयत्न करून शिष्ठमंडळ नेऊन रेल्वे बोर्डाशी, भारत सरकारशी पत्र व्यवहार करून अखेर त्यानी यश संपादन केले. दररोज ५ वॅगन्सचा पुरवठा करण्याविषयीचा हुकूम श्री. राघवेशराव शिरूरनी सरकारकडून मिळविला व व्यापाऱ्यांचे वाममार्गाने होणाऱ्या लाखो रुपयांचे नुकसानीपासून बचाव केले. रामनगर वसाहत मंडळाचे ते कैक वर्षे अध्यक्ष होते. श्री. सिद्धारूढमठाचे ते एक विश्वस्त असून हुबळी अर्बन को. ऑपरेटिव्ह बँकेचे ते बरीच वर्षे डायरेक्टर आहेत. तसेच ते कॉटन मर्चंटस व दलाल असोशिएशनचे डायरेक्टर आहेत.

शैक्षणिक नि सार्वजनिक सस्थाना व इतर उपयुक्त कार्याला श्री. राघवेशरावानी सढळ हाताने देणग्या देऊन आपल्या जीवनात भरीव असे कार्य केले आहे. भगिनी मंडळ शिशु विहारा करिता १०,००० रु., हुबळीच्या कॉमर्स कॉलेजला ५००० रु., कॉटन मर्चंटस दलाल्स अशोसिएशन इमारत निधीला ८००० रु. कुमठा कॉलेजला १००० रु., महाराष्ट्रमंडळास १००० रु., मिशन हायस्कूल हुबळी १००० रु, कर्नाटक विश्व विद्यालय धारवाड ३००० रु, अशा अनेक संस्थाना देणग्या दिल्या असून हुबळीच्या सेंट्रल लायब्ररीस हजार एक मौलिक ग्रंथांची मदत केली आहे अशा दानशूर थोर व्यक्तीस हा ग्रंथ अर्पण करणेचा सुयोग आम्हास लाभला याबद्दल आनंद वाटतो.



ग्रंथकर्ता

# निवेदन

हिंदू! मग तो जातीने कोणीही असो, ज्याला आपल्या धर्माची ओळख नाही तो हिंदू कसला! अखिल विश्वात आपला वैदिक धर्म सर्व श्रेष्ठ असून तो समजून घेण्याची जिज्ञासा पाश्चात्यांना लागून राहिली असताना, धर्माचे नांव घेताच आपल्या मस्तकात तिडीक निर्माण होते हे आमचे दुर्दैव नव्हे तर काय? गेल्या दोन तीनशे वर्षांत पाश्चात्यांच्या शिकवणुकीने आम्ही नाममात्र हिंदू बनलो आहो. धर्माच्या अज्ञानामुळे आज आम्ही हतबल व हतप्रभ झालो असून या शोचनीय स्थितीचा फायदा इतर धर्मियांनी घेऊन कुणीही आमच्यावर हात टाकावा, आमची कत्तल करावी, आमच्या आयाबहिणीना पळवून न्यावे संपत्तीची लूट करावी आम्हास सळो की पळो करून सोडावे, ही सारी कशाची लक्षणे! आमचे रक्षण आम्ही करण्यास असमर्थ असताना, राष्ट्राचे रक्षण आम्ही कसे करू शकतो? याला कारण धर्माचे अज्ञानच! वैदिक धर्माचे बाळकडू आमच्या रक्तांत, नसा-नसात भिनले असून शतकानुशतके मर्दुमकी गाजवून दिमाखाने मिरविलेला हा हिंदु, हा सिंहाचा छावा! त्याची आज कोण शोचनीय स्थिती झाली आहे? ही शोचनीय स्थिती जावी, आम्ही पूर्वीप्रमाणे सुखमय जीवन कंठावे असे वाटत असेल तर हिंदू धर्माची, वैदिक धर्माची ओळख करून घेतल्याशिवाय, त्याचें मर्म समजून घेतल्या-शिवाय गत्यंतर नाही. आजचा मानव, धर्मापासून दूरवर फेकला गेला असून, नैतिक बंधने झुगारून देऊन असहिष्णुतेनें, अविवेकाने, स्वार्थांधतेनें, आसुरी लालसेने पछाडला गेल्याने पशुसमान वागत आहे दुष्ट प्रवृत्तींचा थयथयाट चोहोकडे चालला असून भितीचे,

दुःखाचे, कष्टाचे वातावरण निर्माण झाले आहे अघोरी, आत्मघातकी रोगाला एकच एक उपाय ! आणि तो म्हणजे, धर्माची शिकवण ! हें जहरी औषध प्राशन केल्याशिवाय जडलेला महाभयंकर रोग हटणार नाही. हे जाणून आमचे पूज्य पिताजी कै. विद्वद्रत्न रामचंद्र गोविंद कोलंगडे यांना गेली २५ वर्षे अव्याहत परिश्रम घेऊन, कष्टनष्ट सहन करून अनेक संकटाना तोंड देऊन,प्राचीन धर्मग्रंथ संशोधनपूर्वक साध्या नि सोप्या भाषेंत लिहून व प्रसिद्ध करीत असता, साहित्यमंदिरांत श्री शारदांबेची पवित्र अंतःकरणाने सेवा करीत असता तारीख २१ एप्रिल १९६२ साली निर्घृण काळाने त्यांचेवर झडप घालून त्याना आमचेतून नेले आहे. त्यांच्या निधनाने आमचेवर झालेला वज्राघात सहन करून त्यांचे अर्धवट कार्य पुढे चालविण्याचा संकल्प आम्ही केला असून त्यांचे मरणानंतर हा दुसरा ग्रंथ आपल्या हवाली करताना आम्हास अत्यानंद होत आहे.त्यांच्या ग्रंथाविषयीं नामवंत संशोधक, शिक्षणतज्ञ व अखिल भारतीय नेते, यांनीं प्रसंशोद्गार काढले असून त्यांच्या कार्याचे महत्व ओळखून भारत सरकार, महाराष्ट्र सरकार, मुंबई विश्वविद्यालय, बुद्ध जयंती सिलेब्रेशन्स (मुंबई कमिटी) यांचेकडून आर्थिक मदत मिळाल्यामुळें भरीव असे कार्य त्यांचेकडून झाले.या कार्याला अनेक दानशूर धनिकांनी सढळ हाताने मदत केली असून, पार्शीपंचायत व प्रॉपर्टीज लि. मुंबई, सर रतन टाटा ट्रस्ट मुंबई, निझाम धर्मादाय ट्रस्ट हैद्राबाद, लक्ष्मीबाई फडके ट्रस्ट वसई, या संस्थांच्या ट्रस्टीकडून अमौल्य असे सहाय्य लाभल्यामुळे अल्पावधीतच आम्हास बरेचसे यश मिळाले या हाती घेतलेल्या संशोधन कार्याचे महत्व ओळखून रेल्वे बोर्डाने या संशोधन कार्याकरिता आम्हास ३-४ वर्षे पहिल्या

वर्गाचे दोन व एक तिसऱ्या वर्गाचा पास देऊन प्रोत्साहन दिलें आहे. एवढे भरीव यश इतर लेखलाला मिळाले आहे कीं नाही याची शंकाच आहे असो.

या पवित्र भारतीय सांस्कृतिक कार्यास भरीव असे आर्थिक सहाय्य लाभल्यामुळें आम्ही महाराष्ट्र व भारत सरकार, मुंबई विश्वविद्यालय, रेल्वे बोर्ड, धर्मादाय संस्थांचे विश्वस्त, दानशूर धनिक, यांचे आम्ही ऋणी आहो.

या ग्रंथास आपला अमौल्य वेळ खर्च करून उद्बोधक प्रस्तावना लिहिल्यामुळे महाराष्ट्राचे थोर पुढारी, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. न वि.उर्फ काकासाहेब गाडगीळ यांचे आम्ही अत्यंत ऋणी असून आभार मानतो. आम्हास मिळालेले यश व झालेला गौरव हा आमचा नसून, कै. श्रीमंत अण्णासाहेब नवरे शीव ( मुंबई ) नामदार स. का. पाटील, श्री. रंगराव दिवाकर, डॉ., एन्. बी. उर्फ नानासाहेब पुरंदरे (मुंबई), डॉ. वसंत कुमार पंडित (मुंबई), श्री. नानासाहेब मोडक स्पेशल इंजिनिअर (मुंबई कॉर्पोरेशन), तर्कतीर्थ पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई, न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद पुणे, डॉ डी. के. सोनटक्के हुबळी, श्री. राघवेशराव शिरूर या थोर व्यक्तीनाच आहे.

हा ग्रंथ सुबक रीतीने छापून दिल्याबद्दल तरुण भारत छापखान्याचे मालक श्री. बाबूराव ठाकूर बेळगांव यानी काळजीपूर्वक प्रूफ तपासून व जातीने लक्ष दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहो. जाता जाता आमच्या प्रिय वाचक वर्गानी आमच्या ग्रंथाचे गोड अंतःकरणाने व उत्साहाने स्वागत केल्याबद्दल त्यांचे आभार मानून लेखणीला विराम देतो.

—— ०☆० ——

# अनुक्रमाणिका


| प्रकरण | विषय | पृ. नं |
|---|---|---|
| १ | कुलवृत्त | १ |
| २ | विद्याधिराज तनय शिवगुरु | ४ |
| ३ | शिवगुरु स्वप्न | ९ |
| ३ (अ) | दृष्टांत रूपावली | १५ |
| ४ | तारा चमकला | १८ |
| ५ | शंकर पूर्व भारत | २२ |
| ६ | बाळपण | ३६ |
| ७ | गुरूकुलात विद्यासाधन | ३९ |
| ८ | स्वगृही वास | ४६ |
| ९ | ऋणी संदर्शन | ५४ |
| १० | प्राणावर बेतले | ५८ |
| ११ | गुरूचा शोध | ६२ |
| ११ (अ) | गुरुदेवाचे संदर्शन | ६८ |
| १२ | काशीवास | ७७ |
| १३ | शंकर चांडाल भेट | ८१ |
| १४ | विश्वेश्वराचा आचार्यास आदेश | ८७ |
| १५ | भाष्य रचना | ९२ |
| १६ | व्यास दर्शन | ०५ |

| | | |
|---|---|---|
| १७ | भट्टपाद उर्फ कुमारिल् भट्ट | ११२ |
| १८ | कुमारिल व शंकराचार्य | १२७ |
| १९ | मंडन मिश्र | १३० |
| २० | पहिली सलामी झडली | १३४ |
| २१ | शंकर मंडन प्रतिज्ञा | १४१ |
| २२ | मंडन शंकराचार्य वाद संग्राम | १४५ |
| २३ | मंडन भार्या सरस्वतीचे आव्हान | १६४ |
| २४ | परकाया प्रवेश | १७३ |
| २५ | राज भुवनात | १८० |
| २६ | पुनश्च पूर्व देहांत | १८८ |
| २७ | सरस्वती सत्य लोक गमन | १९५ |
| २८ | तीर्थ यात्रा | २०१ |
| २९ | पद्मपादाचे तीर्थाटन | २१० |
| ३० | मृत्युशय्येवरील मातृदर्शन | २४१ |
| ३१ | मृतमातृ-संस्कार | २२१ |
| ३२ | दिग्विजय | २२५ |
| ३३ | गौडपाद-संदर्शन | २४१ |
| ३४ | पीठारोहण | २४७ |
| ३५ | कैलासाधिरोहण | २५४ |



आद्य श्री शंकराचार्य, पान नंबर ५१

क्र. १५२४९

श्रीमज्जगद्गुरु

# श्री शंकराचार्य

## प्रकरण १ लें

### कुलवृत्त

कश्चित्तदभ्याशगतोऽग्रहार :
कालटचभिख्योऽस्ति महान्मनोज्ञ : ॥ २–३ ॥
कश्चिद्द्विपश्चिदिह निश्चलधीर्विरेजे :
विद्याधिराजइति विश्रुतनामधेय : ।
रुद्रो वृषाद्रिनिलयोऽवतरीतुकामो
यत्पुत्रमात्मपितरं समरोचयत्स : ॥ २–४ ॥
(शं. दि. २–३ ते ४)

केरळ देश ! निसर्गदेवतेच्या मोठ्या कृपेंतला सुसंपन्न देश ! विविध सृष्टिसौंदर्यानें नखशिखांत अखंड नटलेला मोठा रमणीय प्रदेश ! जणु कांहीं भारत भू-देवीचें दक्षिणेकडचें तें नंदनवनच ! येथील सृष्टिशोभा कांहीं अपूर्वच आहे ! नारळ, पोफळी, केळी यांचें जणु कांहीं महाआगरच ! फणस,

आंबे, काजू यांची गर्दी तरी किती! हिरवागार गालीचा आंथरल्याचा भास करून देणारीं तीं भाताचीं हिरवीगार सुपीक शेतें! आणि वड, साग, पिंपळ व विविध वन्यवृक्ष इत्यादि गगनचुंबित विशाल वृक्षांनी व बांबूच्या निबिड बेटांनी आणि वेलींनी व झुडपांनीं गजबजलेलें तें घनदाट महारण्य! त्या गर्द व किर्र झाडीमध्यें यथेच्छ विहार करणारे हत्ती, वाघ, चित्ते, लांडगे, डुकर, हरीण, सारंग इत्यादि वन्य पशूंचें जणुं कांहीं तें माहेरघरच! मधून मधून उंच डोकावणारे तें गगनचुंबी डोंगर व जेथें तेथें पसरून राहिलेल्या लहान मोठ्या टेंकड्या व त्यांचे वृक्षाच्छादित विशाल देह! आणि त्या गर्दीतूनच संथ वाहणारा तो पूर्णानदीचा नागमोडी प्रवाह! फल, पुष्प, लतादिकांनी नटलेला हा ' सस्यश्यामल ' सुंदर केरळ प्रांत--याचें वर्णन काय व किती करावें!

अशा निसर्गरम्य प्रशांत प्रदेशांत पूर्णानदीच्या शेजारी कालटी नांवाचा एक लहानसा गांव होता व तो आजहि आहे. तेथील निसर्गशोभा फारच रमणीय. नारळ, पोफळी, केळी, फणस, आंबे, काजू इत्यादि फलवृक्षांनी तेथील आसमंतातील प्रदेश चिकार गजबजून गेलेला. नदीच्या दोन्ही तीरांवर पसरलेल्या नारळ, पोफळी, केळीच्या मोठमोठ्या रमणीय बागा, आंब्याच्या विस्तीर्ण रायी, काजू, फणस इत्यादिकांची माजलेली ही गर्दी, आणि मधून मधून गांवाच्या सभोवती पसरलेली ती हिरवीगार भातशेती-केवढें हें निसर्गरमणीय नयनमनोहर सुंदर दृश्य!

असा हा सस्यफलादिकांनीं उदंड नटलेला लहानसा नयनमनोहर गांव केरळ नरेश राजशेखर यानें सुविद्य व तपोनिष्ठ ब्राह्मणास अग्रहार म्हणून इनाम घालून दिला होता. शेजारींच वृष नांवाचा एक पर्वत असून, त्या पर्वत शिखरावर केरल नरेशानें चंद्रमोळी महादेवाचें एक सुंदर देऊळ बांधून, त्यांत चंद्रमोळीश्वर लिंगाची स्थापना केली होती. आणि तो गांव त्या देवाच्या

पूजाअर्चादिकासाठीं म्हणून ब्राह्मणांस दान करून दिला होता. जेथें ब्राह्मणांचीच प्रामुख्याने वस्ती असते, त्यास अग्रहार असें म्हणतात. येथें जे ब्राह्मण होते, ते सर्व वेदाभ्यासरत व कर्मनिष्ठ असे विद्वान व आचारसंपन्न ब्राह्मण होते.

येथें जी ब्राह्मणवस्ती होती, ती नंबुद्री ब्राह्मणांची होती. ही जात केरळ देशचीच रहिवासी पण यांचे आचार विचार कांहीं विलक्षण होते. आतांहि तेथें हेच ब्राह्मण आहेत. प्रथम सांगावयाचें ह्मणजे हे नंबुद्री ब्राह्मण मोठे निष्ठावंत, वेदाध्ययनसंपन्न, सदाचारवंत, कर्मानुष्ठानशील, वेदाभ्यासरत व वेदांतप्रेमी असे असून, आजहि त्यांचा लौकिक फार मोठा आहे. सबंध भारतवर्षात हाच तेवढा एक प्रांत आहे कीं, जेथें आजहि प्राचीन विद्येचें व शास्त्राचें मोठ्या हिरीरीनें अध्ययन करण्याची चुरशीची अहमहामिका चाललेली असते. जसा विद्येंत तसा वेदोक्त आचरणांतहि त्यांच्या तोडीचा देश नाहीं. पांचव्या वर्षीं उपनयन होऊन पुढें गुरुगृहीं वास व वेदाभ्यास चालत असल्याचें दृश्य आजहि तेथें प्रत्यक्ष पहावयास मिळतें.

मात्र यांच्या कांहीं आचार–व्यवहारादिकांत मोठा विचित्रपणा आढळून येतो. सर्व आचारांत विवाह हा एक तेथें विचित्र प्रकार आहे. त्यांच्यांतला जो ज्येष्ठपुत्र असेल, तोच तेवढा पैतृक संपत्तीचा वारस व मालक होतो व हाच तेवढा नंबुद्री ब्राम्हण कन्येशी विवाह करूं शकतो. इतर पुत्र नंबुद्री ब्राम्हण कन्येशी विवाह करूं शकत नाहींत. तर ते नायर स्त्रीशी विवाह करूं शकतात, व त्यांची संतति नायर जातींतच गणली जाते. ही नायर जात म्हणजे धड ब्राम्हणांतहि मोडत नाहीं व धड शूद्रांतहि मोडत नाहीं. ब्राम्हण व शूद्र यांचे तें गंगाजमनी मिश्रण आहे. यांची कन्या बहु पति करूं शकते, व ती पैतृक जमीन जुमला व इतर जिंदगी यास उत्तर अधिकारीण बनते. अशा अनेक सामाजिक विचित्र रूढी या जमातींत

आहेत. तशांत नंबुद्री ब्राम्हणांत नंबुद्रीपाद नांवाची एक पोटशाखा असून, ती सर्वांत श्रेष्ठ मानली जाते. आमचे चरित्र नायक आचार्य श्रीशंकराचार्य यांचा जन्म या नंबुद्रीपाद ब्राम्हण कुलांतच झाला.

या कालटी ग्रामांत विद्याधिराज नांवाचा सदाचारसंपन्न, सत्कर्म-निष्ठ, वेदविद्या--पारंगत असा एक तैत्तिरीय शाखेचा ब्राम्हण होता. त्याचा लौकिक चांगला असून तो घरचा खाऊन पिऊन सुखी व संपन्न होता. त्याची शेती मोठी असून, नारळ, आंबे, फणस यांच्या अनेक बागा होत्या. घरांत गायी गुरांचा मोठा गोठा असून, धनधान्यसमृद्धि विपुल होती. तो धार्मिक वृत्तीचा व उदार स्वभावाचा असल्यामुळें गांवांत तो चांगला प्रतिष्ठित गणला जात असे.

## प्रकरण दुसरें

## विद्याधिराज तनय शिवगुरु

पुत्रोऽभवत्तस्य पुरात्तपुण्यैः
सुब्रम्हतेजाः शिवगुर्वभिख्यः ।
ज्ञाने शिवो यो वचने गुरु-
स्तस्यान्वर्थनामा कृतलब्धवर्णः ।।

( शं. दि. २--५ )

या विद्याधिराजाला एक मुलगा झाला. त्याचें नांव शिवगुरु असें ठेवण्यांत आलें. पुढें नांवाप्रमाणेंच तो मोठा हुशार निघाला. पांचव्या वर्षी त्याचें उपनयन करून विद्याध्ययनास त्यास गुरुगृहीं नेऊन ठेवण्यांत आलें.

तेथें गेल्यावर तो पाठ घेऊन झपझप शिकूं लागला व पाठ शिकून झाल्यावर आश्रमोक्त इतर कर्तव्यें बजावण्यांत तत्पर राहूं लागला. पहाटेस उठून शौचमुखमार्जनादि प्रातर्विधि आटपून गुरुसेवा, अध्ययन, अग्निपरिचर्या, भिक्षाटण इत्यादि आश्रमोक्त कर्तव्यें यथाकाल चोख बजावण्यांत तो दक्ष असे. त्याची पठणशक्ति मोठी तीक्ष्ण असल्यामुळें अध्ययनांत त्याची प्रगति झपझप होऊं लागली. वेदाध्ययन संपल्यावर वेद-वेदांगाचें अर्थज्ञानहि तितकेंच महत्वाचें असल्यामुळें, तें ज्ञानहि पुढें त्यानें करून घेतलें.

याप्रमाणें गुरुगृहीं राहून आश्रमकार्य संपूर्ण झाल्यावर गुरुदेव त्यास जवळ बोलावून घेऊन म्हणाले:-- बा! शिष्यवर्या! माझें जवळ राहून तूं वेदाचे व तसेंच शिक्षा, कल्प, व्याकरण, छंदादिकाचें ज्ञानहि संपूर्ण करून घेतलें आहेस. आतां तुझें येथील आश्रमकार्य--अध्ययनकार्य--पूर्ण झालें असून, तूं कृतविद्य झाला आहेस. तर तूं आतां घरीं जा व योग्य वधूशीं विवाह करून गृहस्थाश्रमी बन. तुझे आईबाप तुझे दोन्हीचे चार हात करण्यास उत्सुक झाले असतील. कृतविद्य मुलाचें लग्न करून त्यास संसारास लावणें हें मातापितरांचें कर्तव्यच आहे. तूं कृतविद्य झाला असलास तरी तूं अजून पूर्ण झाला नाहींस. अपूर्णच आहेस. लग्न करून पत्नी मिळवशील, तेव्हांच तूं पूर्ण होशील व तेव्हाच तुला कर्मानुष्ठानाचा अधिकार प्राप्त होईल. तर आतां घरीं जाऊन, पुढील कर्तव्यास लाग.

गुरुदेवाचें हें निरोपवजा भाषण ऐकून शिवगुरु हात जोडून नम्रतेनें म्हणाला:-गुरुदेव!

गुरु- काय बेटा!

शिवगुरुः- आपण केलेला उपदेश सत्य आहे. तो नियम खरा आहे. ब्रम्हचर्य संपल्यावर गृहस्थाश्रमी बनावें ही वेदाज्ञाहि मान्य आहे. पण-

गुरुः- पण काय? संशय कसला आला तुला?

शिवगुरुः-- पण ब्रम्हचर्याश्रमांतच जो पूर्ण वैरागी बनतो, प्रापंचिक सुखाला विटतो, त्यांला तो नियम लागू नाहीं, असं मला वाटतं.

गुरुः-- हें तुझं वाटणं खरं नाहीं. प्रथम प्रपंच करावा जागतीक सुखाचा अनुभव घ्यावा. ऋणत्रयातून मुक्त व्हावें. यज्ञयागादि करून, देवतानुग्रह मिळवावा.

शिवगुरुः-- ज्याला ऐहिक व पारलौकिक दोन्ही सुखांची इच्छा नाहीं, जो वैराग्यशील आहे, जो निरीच्छ आहे अशा विरक्त मनुष्याला प्रपंचांत गोडी लागत नाहीं.

गुरुः-- शिवगुरो ! अजून तूं लहान आहेस. तूं अजून स्वतंत्र नाहींस. तुझ्यामागें कांहीं कर्तव्यें आहेत. तीं पार पाडल्याशिवाय तुला मुक्त होतां येत नाहीं.

शिवगुरुः-- पण गुरुदेव ! प्रपंचाकडे माझें मन घेत नाहीं ना ! त्याला मी काय करूं ? जो विरक्त असतो, तो विवेकी बनतो. सारासार--नित्यानित्य-वस्तूंचें तारतम्य समजून घेण्याची त्याची प्रवृत्ति बळावते. तो शमदमादिकानें संपन्न असतो. असा सत्त्वशील पुरुष संसारांत न पडतां--जागतिक जंजालांत न शिरतां एकदम ब्रम्हचर्याश्रमांतून चतुर्थाश्रमांत पदार्पण करण्यास तयार असतो. गुरुदेव ! मला या आश्रमांत जाण्याची इच्छा आहे. गृहस्थाश्रम मला तितकासा मनोज्ञ वाटत नाहीं. म्हणून नैष्ठिक ब्रम्हचारी राहून अवशेष आयुष्य सत्यान्वेषणांत व तत्त्वचिंतनांत व सेवासुश्रुषेंत वेंचावें, असें माझें मन घेतें.

गुरुदेवः- हे तुझे विचार ठीक आहेत. पण ते तुला झेंपणार नाहींत. तें मोठें कठीण व्रत आहे. मोठमोठे योगी तेथें फसले आहेत. म्हणून सांगतो की, विवाह करून सुखी हो !

शिवगुरुः- विवाह केला तर काहीं काळ सुखाचा जातो. पण तो चिरकाल टिकत नाहीं. जोपर्यंत त्यांत सुखानुभव येतो, तोपर्यंत त्याची

गोडी टिकते. पण पुढें असा काल येतो कीं, पुढे तो सुखाचा आश्रम विषतुल्य वाटूं लागतो. त्यावेळीं मनुष्य प्रापंचिक जीवनाला कंटाळतो. त्याला त्याचा वीट येतो. विरस वाटतो. मन अस्वस्थ होतें. आणि बुद्धि आंबून जाते. अशी गोष्ट चतुर्थाश्रमाची नाहीं. तेथें सर्व भल्याबुऱ्या कर्मांचा-विचाराचा-वासनांचा-नाश होऊन, मनुष्य कायमचा सुखी व आनंदी बनतो! अर्थात् दुःख-मुक्त होऊन तो मोक्ष मिळवितो! ही गोष्ट गृहस्थाश्रमांत शक्य नाहीं.


याप्रमाणे गुरुशिष्यांचा संवाद चालला असतां अकल्पितपणें शिवगुरुचा पिता विद्याधिराज तेथें प्राप्त झाला. अर्थात् तो संवाद तेथेंच विराम पावला, हें निराळें सांगणे नकोच. विद्याधिराज तेथें आला होता, तो शिवगुरुचा विद्याभ्यास परिपूर्ण झाला असल्यास त्यास घरीं नेण्याच्या उद्देशानेंच आला होता. तो आतां वृद्ध झाला असून, संसाराचा भार मुलावर सोंपवून आपण त्या दगदगींतून मुक्त व्हावें, ही इच्छा त्याच्यात मधुन मधून डोकावत होती. त्यानें आपला आशय गुरुदेवांपुढें ठेऊन मुलास आश्रमांतून निरोप देऊन, घरीं पाठवून देण्याविषयीं त्यांची विनयपूर्वक सम्मति मागितली व गुरुदेवानें ती खुषीनें दिली. आश्रमातून बाहेर पडतांना सांप्रदायाप्रमाणें मुलाकडून गुरुदक्षिणा म्हणून उदार हस्तानें पुष्कळ धनसंपत्ति गुरुदेवास देववून, त्यांस खुष केलें. गुरुदेवांनी नंतर शिष्यास 'सत्यंवद,' धर्मं चर' इत्यादि सदुपदेश देऊन, त्यास शुभाशीर्वाद दिला व पित्याबरोबर हा कृतविद्य झालेला शिवगुरु आचार्यदेवास वंदन करून घराकडे निघाला.

शिवगुरु हा कृतविद्य होऊन सुखरूप घरीं आलला पाहून, मातेला जें आनंदाचें भरतें आलें, तें कोण वर्णूं शकणार! प्रेमाची माय माउली ती! फार दिवस तिला त्या पाडसाचें दर्शन नव्हतें! ती फार बेचैन झाली होती! तिचा लाडका शिवगुरु तिला आता दिसला! चातकावर अमृतवृष्टि

झाली ! मोराला मेघदर्शन झालें ! गरीबाला कामधेनु भेटली ! आणि गायीला पाडसाचें दर्शन झालें ! ! या मातृपुत्रभटचिा आनंद यथार्थतया कोण वर्णू शकणार ! तेथें शद्बसृष्टि खरोखर असमर्थ आहे ! ! मातेचें अंतःकरण पुत्रदर्शनासाठीं किती उत्सुक असतें, हें फक्त तें मायाळू मातृहृदयच जाणे ! ! तें शद्बानें सांगून अगर लेखणीनें लिहून दुसऱ्यास कळवितां येणें शक्य नाहीं.

शिवगुरु गुरुगृहाहून घरीं आल्याची बातमी गांवांत पसरतांच, त्याचे स्नेही सोबती, भाऊबंद, आप्तइष्ट इत्यादि लोक त्याला भेटण्यासाठीं सारखी गर्दी करूं लागले. शिवगुरु त्यावेळीं विद्यातेजानें सूर्यासारखा तेजस्वी व चमकदार दिसत होता ! त्याला पाहून भेटण्यास आलेले सर्वजन आनंद-भरित होत्साते, त्यानीं त्याचें मुक्तकंठानें अंतःकरणपूर्वक अभिनंदन केलें. शिवगुरुहि आदरपूर्वक नमस्कार करून त्यांचा धन्यवाद घेण्यास चुकला नाहीं.

घरीं आल्यावर आपला मुलगा गुरुगृहीं राहून विद्येंत कसा तयार झाला आहे, याची थोडीशी चुणूक पहावी, म्हणून बापानें त्यास जवळ बोलावून घेवून, त्यास वेद-शास्त्रांत कांहीं प्रश्न विचारले. त्याचप्रमाणें भट्ट पादाच्या मीमांसांतर्गत कांहीं सिद्धांताविषयीं, कणादाच्या तत्त्वज्ञानाविषयीं, गौतमच्या सांख्यज्ञानाविषयी मुलाची किती प्रगति झाली आहे, हें अजमावून पाहण्यासाठीं त्याने त्या त्या विषयातील कांहीं प्रश्न विचारले व मुलानें त्या सर्वांस सरळ व समाधानकारक उत्तर दिलें. या प्रश्नोत्तरांत स्वमताचें समर्थन व परमताचें खंडण करण्याचें त्याचें चातुर्य पाहून बापास परमसंतोष झाला. आणि कोणत्या, बापाला होणार नाहीं ? त्यानें शिवगुरु हें नांव ठेवलें, तें खरोखर सार्थच होतें. तो ज्ञानांत शिवासारखा ज्ञानी व बोलण्यांत बृहस्पतीसारखा बोलका निघाल्यामुळें शिवगुरु हें नांव त्याला साजेसेंच होतें. ' ज्ञाने शिवो यो वचने गुरुस्तस्यान्वर्थनाम कृतलब्धवर्णः ' असें शंकरदिग्विजयांत त्याचें वर्णन करण्यांत आलें आहे, तें योग्यच आहे.



ब्रम्हकुंड, पान न.१३

शिवगुरु गुरुकुलांतून विद्याभ्यास आटपून घरीं आल्यावर त्याच्या विद्वत्तेची कीर्ति हळुहळूं गांवभर व गांवाबाहेरहि पसरूं लागली व त्याला मुली घरापर्यंत सांगून येऊं लागल्या. देशांतील मोठमोठ्या श्रीमंत घराण्यातील कन्याहि त्याला सांगून आल्या. पण विद्याधिराजानें तिकडे काणाडोळाच केला. श्रीमंतीकडे अगर संपत्तीकडे लक्ष न देतां कुलीन व सद्वृत्त घराण्याकडे नजर देऊन, गरीब पण कुलीन घराण्यातील मुलीला प्राशस्त्य देण्याकडे त्याचा कल वाहूं लागला. श्रीमंत आईबापांनी आपली मुलगी शिवगुरुच्या गळ्यात बांधावी म्हणून पुष्कळ पैसे, शेतीभाती, वतनवाडी देण्याचें आभिष दाखवून, वर वारीलेबाजीचाहि प्रयोग करून पाहिला. पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. अखेर शेजारच्या गांवातील माघ पंडिताची सुशील व सुस्वरूप अशी आर्यांबा नांवाची कन्या पसंत करून, शुभमुहूर्तावर तिच्याशी शिवगुरुचा विवाहहि करून टाकला.

## प्रकरण ३ रें

## शिवगुरु स्वप्न

**देवः कृपापरवशो द्विजरूपधारी**
**प्रत्यक्षतां शिवगुरुंगत आत्तनिद्रम् ।**
**प्रोवाच भो किमभिवाञ्छसि किं तपस्ते**
**पुत्रार्थितेति वचनं स जगार विप्रः ॥**

(२–५१ शां. दि. ८ व्यासाचल कृत शंकर विजय. ४–५)

शिवगुरु आतां गृहस्थाश्रमी झाला होता. पुढे लवकरच त्याचा बाप विद्याधिराज हा कालवश झाला आणि संसाराचा सर्व भार त्याच्यावरच

येऊन पडलो. शिवगुरु हा वेदाध्ययनसंपन्न असून स्वभावानें भाविक व धार्मिक होता. सुदैवानें घरची सांपत्तिक स्थितीहि चांगली मातब्बर होती. गायीगुरें, धनधान्य, वस्त्रप्रावरण व इतर प्रापंचीकोपकरणें यांचा त्या काळच्या मानानें घरांत विपुल संग्रह होता. कोणत्याहि गोष्टीची ददात म्हणून वाटत नव्हती. या दृष्टीने शिवगुरु हा मोठा भाग्यवानच म्हटला पाहिजे. या सर्व गोष्टींची पूर्ण अनुकूलता होती, तरी त्या नादांत त्याला धर्माचरणाचा विसर पडला-असें कधीं झालें नाहीं. पुष्कळ द्रव्य खर्चून त्याने अनेक याग केले. देवताराधनहि त्या मानानें नित्य चाललेंच होतें. अतिथि–अभ्यागताचा आदरसत्कार व आल्यागेल्या पैपाहुण्यांचा पराशर्म घेण्यांत कधी कसूर करण्यांत आली नाहीं. आप्तइष्ट, भाऊबंद, स्नेहीसोबती, शेजारीपाजारी यांच्याकडेहि त्याची उदार दृष्टि होती. गोरगरीब, भिकारी–बेकारी, चाकर–नोकर यांवरहि कृपादृष्टि होती. दैनंदिन धर्मकृत्यांत व व्यवहारांत कसलाहि व्यत्यय म्हणून पडत नव्हता. याप्रमाणें प्रपंचाचा गाडा सुरळीत व सुसूत्र चालला होता.

अशारीतीनें शिवगुरूचा प्रपंच सर्वांगपरिपूर्ण होता. छे, पण चुकलो. एका गोष्टींत तेथें व्यंग होतें. ती तेवढीच गोष्ट त्यास बेचैन करीत होती. भरलेलें घर खरें पण तें ओकें ओकें दिसत होतें. सर्व कांही होतें, पण कुलदीपक तेवढा नव्हता! त्याला पुत्रसंतान नव्हतें! तेवढें एकच गालबोट त्याच्या सुखी संसाराला लागलें होते. सती आर्यांबा याबाबतींत फारच बेचैन होती. काय करील बिचारी! तिच्या हातांतली थोडकीच होती ती गोष्ट! ईश्वराची देणगी ती! सर्वांनाच लाभते असें नाहीं. पण स्त्रीहृदय कांही निराळेंच असतें. घरीं अठराविश्वे दारिद्र्य असलें, तरी पुरवलें. पण मांडिवर लडिवाळपणे खेळणारा गोजिरवाणा राजहंस नसला तर कुबेराचें ऐश्वर्य असूनहि तें तिला कांहींच नव्हे! संततिहीन स्त्रीचें जीवन हें खरोखर निःसारच! ही गोष्ट त्याकाळची हो! आज पुत्रकामेष्टीचें युग नसून, संतति

नियमनाचें नि कुटुंब नि योजनाचें- आहे. धर्म-प्रजा-रत्यर्थेंहि विवाहः' हा मनु आतां बदलला असून, 'रत्यर्थोंहि विवाहः' एवढाच त्याचा अर्थ बाकी राहिला आहे! केवळ इंद्रियतर्पणापलीकडे विवाहाची दृष्टि आधुनिक जगाची राहिली नाहीं!! 'कालायतस्मैनमः'!! असो.

तो प्राचीन काल 'धर्म-प्रजा-रत्यार्थोंहि विवाहः' याचा चालता काळ होता. मातृहृदयाचा ध्यास आर्यांबेला रात्रंदिवस सतावीत होता. गोष्ट खरीच आहे. फूल नसलेली बाग, कमळ नसलेलें सरोवर, चंद्र नसलेली निशा, देव नसलेलें देऊळ, तिलक नसलेली स्त्री आणि पुत्र नसलेलें घर, या सर्व गोष्टी अनुकंपनीय आहेत. शिवगुरूचें घर म्हणजे लक्ष्मीचें माहेरघर, पण तेथें कुलदीपक नसल्यामुळें त्याला उदास कळा आली होती. एवढाच काय तो दोष.

दिवसामागे दिवस जाऊं लागले. आणि वर्षांमागें वर्षे लोटत चाललीं, पण आशेला कोठें थारा मिळेना. देवधर्म, नेमकर्म, व्रत-उपवास सर्वांची पाठ राखली. पण कांहींच नवसास पावण्याचा रंग दिसेना. पुढें पुढें शिवगुरूच्या वयांत उतारपणाची चिन्हेंहि डोकावूं लागलीं. उतरत्या वयोमानाबरोबर त्यांचें अंतःकरण दिवसेंदिवस उदास व उद्विग्न बनत चाललें. दिवसा चैन पडेना व रात्रीं झोप येईना. रात्रंदिवस सारखा ध्यासच ध्यास. एकच ध्यास! पुत्रप्राप्ति कशी होईल? पुत्र नसल्यामुळें वंशविस्तार तर खुंटणारच, पण तेवढ्यावरच भागतें तर गोष्ट कांहीं निराळी होती. पण पुढचा प्रश्न राहतो, त्याला तोड काय? निपुत्रिकाला मरणोत्तर सद्गति नाहीं, हा पेंच कसा सुटावयाचा व कसा सोडवावयाचा? शिवगुरूची स्थिति मोठी चमत्कारिक झाली. त्याला पुढें कांहीं सुचेनासें झालें. तो मोठ्या विवंचनेंत पडला.

पुढें एके दिवशीं त्यांनी पत्नीला हाक मारून तिच्याजवळ आपली मनःस्थिति उघड केली. बिचारी आर्यांबा ! ती तरी काय सांगणार ? क्षणभर ती गप्प बसली. पुढें तिला काय वाटलें कोण जाणे, सहज ती म्हणाली-- ' मला एक युक्ति सुचते. पहा, आपल्यास पसंत असेल तर. ' असें म्हणून शेवटचा उपाय म्हणून चंद्रमौळीश्वर श्री शंकराची उपासना करून पहावं, ही सूचना तिनें पुढें ठेवली. जवळच वृषपर्वत असून तेथील चंद्रमौळीश्वर श्री शंकराचें स्थान जागृत असल्याची ख्याति होती. तेथें जाऊन आराधना केल्यास इष्टहेतु साध्य होईल, असें सुचविल्यावरून शिवगुरूच्या डोक्यांत चटकन् प्रकाश उजळून ती कल्पना त्यास पसंत पडली. आणि तेवढा एक निर्वाणीचा उपाय करून पाहण्याचें त्यानें निश्चित केलें.

मग आतां विलंब कसला ! सर्व कांही अनकूल होतेंच. घरदार आप्तावर सोंपवून ईश्वराराधनासाठी शिवगुरू वृषपर्वतावर जाण्यास निघाला· बरोबर आर्याम्बा होतीच, हें निराळें सांगावयास नकोच. पुत्रप्राप्तीसाठी तपश्चर्या करावयास म्हणून तें जोडपे भक्तकामकल्पद्रुम श्री चंद्रमौळीश्वराच्या जागृत स्थानाकडे चाललें. तेथें आल्यावर कडक व्रत धारण करून अनन्य-भावपूर्वक चंद्रमौळीश्वर शंकराची आराधना करण्यास त्यानीं प्रारंभ केला. अहो-रात्र भक्तकामकल्पद्रुम श्री शंकराच्या सेवानुष्ठानांत, पूजा–अर्चेत, जपतपांत तत्पर राहून शंकरास प्रसन्न करून घेणेचा उद्योग चालविला. सकाळीं पहाटेस उठून, नदीवर जाऊन, स्नान वगैरे आटपून, दोन प्रहरपर्यंत देवाची पूजाअर्चा, मंत्रपाठ, स्तुतिस्तोत्र इत्यादि विधि उरकून, दोन प्रहरी कंद-मूलादिकांचा अल्पोपहार घेऊन, पुनः एकाग्रचित्तानें जपध्यान करण्यांत निमग्न झाले. याप्रमाणे ते जायापती उमामहेश्वराच्या उपासनेंत मग्न होऊन राहिले. अहोरात्र एकच ध्यान ! ' शिवहरशंकर ' हें एकच ध्यान ! ईशचिंतनांत ते इतके मग्न झाले कीं, त्यांना जगाचा आता संपूर्ण विसर

पडला ! याप्रमाणें ईशसेवेंत व ईशोपासनेंत दिवसामागें दिवस जात चालले. पुढें ते ईशचिंतनांत इतकें रंगले कीं, त्यांचें मन जवळ जवळ शिवरूपच बनलें ! !

भक्तदयाघन, भक्तकामकल्पद्रुम, भोळा शंकर तो ! शिवगुरूचें व आर्याम्बेचें तें कडक व्रतानुष्ठान व अनन्यभक्ति पाहून भोलानाथ श्रीशंकर-देव प्रसन्न झाले व शिवगुरूची मनीषा पूर्ण करावी म्हणून एके दिवशीं रात्रीं ब्राम्हणाचें रूप धारण करून झोंपी गेलेल्या शिवगुरूच्या स्वप्नांत प्रगट होऊन त्यास म्हणाले-- शिवगुरो !

शिवगुरु :- काय, द्विजवर्य ?

ब्राम्हण :- कशासाठी आहे व्रताचरण हें तुझें ?

शिवगुरु :- संतान नाहीं.

ब्राम्हण :- संतान नाहीं ?

शिवगुरु :- नाहीं, द्विजवर्य !

ब्राम्हण :- मग काय अपेक्षा आहे तुझी ?

शिवगुरु :- संतान पाहिजे मला.

ब्राम्हण :- त्यासाठीं आहे काय व्रत हें तुझें ?

शिवगुरु :- होय, त्यासाठीं मी हें व्रत करीत आहे.

ब्राम्हण :- ठीक, मुलगी कां मुलगा ?

शिवगुरु :- मुलगा हवा.

ब्राम्हण :- किती ?

शिवगुरु :- आपण कृपा कराल तितके.

ब्राम्हण :- एक अट आहे.

शिवगुरु :- अट ? ती काय ?

ब्राम्हण :- पुष्कळ पुत्र पाहिजे असतील तर.

शिवगुरु :- तर काय देवा ?

ब्राम्हण :- ऐक पुढें. पुष्कळ पुत्र पाहिजे असतील तर ते तुला मिळतील. पण ते सगळे मूर्ख असतील. एकापेक्षा एक दुष्ट-दुर्गुणी असतील.

शिवगुरु :- असले मूर्ख व दुर्गुणी पुत्र घेऊन काय करू मी ?

ब्राम्हण :- मग ती आशा सोड. एकच पुत्र मागून घे.

शिवगुरु :- एकच ?

ब्राम्हण :- होय, एकच. पण तो बृहस्पतीसारखा सर्वज्ञ असेल. सद्गुणी असेल. प्रतिभासंपन्न व प्रभावशाली असेल ! धर्म क्षेत्रांत जगज्जेता होईल तो ! !

शिवगुरु :- तर तोच द्या मला. एकच असला तरी चालेल.

ब्राम्हण :- पण शिवगुरो ! तो अल्पायुषी असेल. चालेल तुला ? पुनः सांगतो, तो अल्पायुषी असला तरी मोठा चमकदार निघेल ! मोठा तत्त्वज्ञानी होईल ! तुझ्या कुलाचा उद्धार करील ! चांगला नांवलौकिक मिळवील !

शिवगुरु :- द्विजवर्य ! द्यायचा देऊन असला अल्पायुषी का ? कृपा करा व दीर्घायुषी द्या की !

ब्राम्हण :- विधिसंकेत आहे तसा. ज्ञानी पण दीर्घायुषी मिळणार नाही. तसा पुत्र हवा असेल तर तो मूर्ख मिळेल. दोहोंतून कोणता तरी एक पसंत कर !

शिवगुरु :- मग मला सुविद्य व सद्वृत्त असा एकच द्या ! मग तो एकच असला तरी चालेल. मात्र तो कुलदीपक असावा.

नक्षत्रासारखा चमकदार असावा. शंभर मूर्ख मुलांपेक्षां एकच पण सर्वज्ञ व सद्गुणी पुत्र मी पसंत करतो. द्विजवर्य ! तोच द्या मला ! तोच मी पसंत करतो.

ब्राम्हण :- तथास्तु. तुला लवकरच पुत्रदर्शन होईल. चिंता करूं नकोस. तो सूर्यासारखा तेजस्वी निघेल ! चंद्रासारखा आल्हाद--दायक होईल ! आणि बृहस्पती सारखा महाज्ञानी निपजेल ! महायुगपुरुष होईल तो ! ! कल्याणमस्तु !

असें सांगून तो ब्राम्हण अंतर्धान पावला.

## प्रकरण ३ रें (अ)

## दृष्टांत रूपावला

कालाटाख्ये ग्रामवर्थे केरलालंकृतीकृते ।
विद्याधिराजतनयः प्राज्ञश्शिवगुरुर्बभौ ।।

ततस्सदाशिवश्शम्भुर्लोकानुग्रहतत्परः ।
तपोमहिम्ना तत्पत्न्यांप्रविवेश स्वतेजसा ।।

सा दाधार सती गर्भमादित्यसमतेजसम् ।
व्यजायत शुभेकाले पञ्चोच्चग्रहसंयुते ।।

( आनंदगिरि )

गर्भं दधार शिवगर्भमसौमृगाक्षी
गर्भोप्यवर्धात शनैरभवच्छरीरम् ।

**तेजोतिरेकविनवारितदृष्टिपात**
**विश्वं रवेर्दिवसमध्य इवोग्रतेजः ॥**

( माधवाचार्यकृत शंकरदिग्विजय २--५७ )

मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शिवगुरूच्या स्वप्नातील सुवार्तेनें अपत्यदर्शनासाठीं हपापलेलें आर्याम्बिचें स्त्रीहृदय आनंदानें व उल्हासानें हेलकावे खाऊं लागलें, हें निराळें सांगावयास नकोच. होय, त्या आनंदापुढें स्वर्ग देखील तिला ठेंगणाच वाटूं लागला, यांत नवल तें काय ! तुम्ही कांहीहि म्हणा, घरांत गजांत लक्ष्मी असो, रहावयास कुबेराचा वाडा नि भोगावयास इंद्राचें ऐश्वर्य लाभो, सुखसाधनांची डोंगराएवढी रास पडो, पण त्यानें स्त्रीहृदयाची तहान भागली, रुखरुख शमली व अंतरीची टोंचणी राहिली, हें कदापि घडून येणार नाहीं ! अपत्यहीन स्त्रीचें जिणें हें तसें म्हटलें तर नीरस--अगदी नीरसच--म्हटलें पाहिजे.

अपत्यलाभ हा निसर्गदेवतेचा स्त्रीजातीला दिलेला एक महान् दिव्य वर असून, तो महाप्रसाद ज्या स्त्रीच्या ओटीत पडला नाहीं अगर पडत नाहीं, त्या अभागी स्त्रीचें विलासी जिणें सगळें व्यर्थच ! काय असूनहि नसल्यासारखेंच ! स्त्रीजन्माचें–नव्हे, स्त्रीहृदयाचें–नितांत सुखनिधान म्हणजेच तिच्या कुशींत जन्म घेऊन, तिच्या मांडीवर निजून चिमुकले हातपाय हलवीत व नाचवीत हंसऱ्या मुखानें तिच्या तोंडाकडे टक लावून पाहणारा तो चिमुकला गोंडस राजहंस ! तिच्या आनंदसागराला भरती आणणारा–अंतःकरणांत गुदगुल्या करून तें थै थै नाचविणारा तो पौर्णिमेचा पूर्ण चन्द्रच ! या शिवाय स्त्रीमनाला पटणारा दुसरा समर्पक दृष्टांत कोणता आहे ?

स्वप्नातील ब्राम्हणाच्या शुभसंदेशाप्रमाणें पुढें लवकरच आर्याम्बेची मासिक पाळी टळून, तेव्हापासून दिवसामागून दिवस, आठवड्यामागून

आठवडे आणि महिन्यामागून महिने लोटत चालले. सती आर्याम्बेचा आतां कोण आनंद! केवढा उल्हास! व काय मनोराज्य! आपण आतां लवकरच तें दिव्य मातृपद गांठणार, हा विचार कोणत्या स्त्रीला सुखवीत व रिझवीत नाहीं? आर्याम्बा तर दिव्य मनोराज्यांत सुखाचे हेलकावे खात होती असें सांगितल्यावर ती अतिशयोक्ति होईल काय? भगवान श्री चंद्र-मौळीश्वर शंकराचें मंगल वरदान आतां सत्यसृष्टींत तिच्या पवित्र उदरांत साकार होऊं पाहत होतें. अर्थात् आर्याम्बेला दिवस गेले व गर्भिणीचिन्हें अंगावर उमटूं व विलसूं लागलीं. तिच्या पवित्र कुशींत उमामहेश्वर कैलास-नाथाची या मृत्युलोकीं अवतार धारण करण्याची जय्यत तयारी चालली होती व त्याप्रमाणे हळुहळु डोहाळेहि डोकावूं लागले.

गरोदर स्त्रीचे डोहाळे म्हणजे भावी संततीच्या लक्षणांचीं पूर्व चिन्हेंच समजलीं जातात. आर्याम्बामध्येंहि तीं दृश्यें हळुहळूं उमटूं लागली. तिची शरीरकांति दिनेदिने उजळत चालली. मुखश्रीवर दिव्य कळा झळकूं लागली. मनांत सुखदायक असे तऱ्हतऱ्हेचे विचार तरंगूं लागले. अंतःसृष्टींत मधुर वासना व गोड भावना अंकरूं लागल्या. तिचे डोहाळे हे सामान्य स्त्रियांसारखे नसून त्यांत विलक्षणपणा व विचित्रपणा भासमान होता.

ते डोहाळे म्हणजे हे असे- काषायवस्त्रें धारण करण्याची तिची हौस जोरावत चालली. ती इच्छा तिनें शिवगुरूजवळ अनेकवेळां बोलून गेली. पण तिकडे विशेष लक्ष न देण्याचा त्याने तिला सल्ला दिला असला तरी वारंवार ती बोलून दाखवी कीं तशीं वस्त्रें धारण करावींत, असेंच मनांत भरून येतें व त्यापासून मला आनंद होतो. दररोज तीनवेळां स्नान करावें, मंत्रघोष करावा, ध्यानधारणा करावी, सोवळें रहावें, वादविवाद करावा, तीर्थक्षेत्रें हिंडावींत, देवदेवतांचें दर्शन घ्यावें, धर्मप्रसार करावा,

एकांतांत बसून ब्रम्हचिंतन करावें, असे व या ठशाचे विचार नेहमी तिच्या मनांत गर्दी करीत होते व त्यापासून तिला सुखानंद व शांतिसमाधान यांचा मोठा लाभ होई. तसें ती सांगत असे. अर्थात गर्भिणीस्त्रीच्या डोहाळ्यांत कांही तरी अर्थ गर्भित असतो ही वैदिकांची भावना निराधार म्हणतां यावयाची नाहीं. हे डोहाळे म्हणजे भावी संततीचें लक्षणात्मक एकापरी भविष्य कथनच म्हटलें तरी चालेल. असो. एकंदरींत सांगावयाचें तात्पर्य काय, तर स्वप्नातील ब्राम्हणाचें भविष्यकथन साकार बनण्याच्या मार्गास लागलें.

---

## प्रकरण ४ थें

## तारा चमकला

लग्ने शुभे शुभयुते सुषुवे कुमारम् ।
श्री पार्वतीव सुखिनी शुभवीक्षितेच ।
जायासतो शिवगुरोर्निजतुंगसंस्थे ।
सूर्ये कुजे रविसुते च गुरौ च केंद्रौ ।।
( शं. दि. २-७१ )

प्रासूत तिष्यशारदामतियातवत्या–
मेकादशाधिक–शतोन–चतु:सहस्त्याम् ।।
संवत्सरे विभवनाम्नि शुभेमुहूर्ते
राधे, सिते शिवगुरोर्गृहिणी दशम्याम् ।।
( नीलकंठभट्टकृत शंकरमंदारसौरभ )

नवाधिकाशीति युताष्टशत्या ।
युक्ते सहस्रातुतये व्यतीते ॥
कलेः समानां विभवाद्वराधा ।
सिते दशम्यामुदभून्महेशः ॥
( त्रिविक्रम मनीषिकृत शंकराभ्युदय )

निधिनागेभवन्ह्यद्बे विभवे मासि माधवे ।
शुक्ले तिथौ दशम्यांतु शंकरार्योदयः स्मृतः ॥
( यज्ञेश्वरशास्त्रीकृत आर्यविद्यासुधाकर )

वसंते माधवे मासे दशम्यामिन्दुवासरे ।
आर्याम्बा सुषवे पुत्रं शंकरं लोकशंकरम् ॥

आर्याम्बा गर्भिणी झाल्यावर तिचा गर्भ दिवसे दिवस वाढीस लागला. दिवस जातील तशी त्याची हालचाल तीव्र होऊं लागली. असें होता होतां नऊ महिनेहि उलटून गेले आणि दहावा लागला. ज्ञानरवीचा उदयकाळ समीपला. शकाद्ब ७१० उजाडला. विभवनाम संवत्सर, वसंत-ऋतु, वैशाखमास शुद्ध दशमी, आणि वार सोमवार.

यादिवशीं सूर्य मेष राशीत, चंद्र मकरांत, मंगल तुळेंत, व गुरू केंद्रस्थानी असतांना ती सती आर्याम्बा सुखरूप प्रसूत झाली. तिला सूर्या-सारखा तेजस्वी, मदनासारखा सुंदर, बृहस्पतीसारखा मेधावी व चंद्रासारखा आल्हादजनक असा पुत्र झाला ! ! शिवगुरूची तपस्या फळास आली आणि आर्याम्बेचा भाग्यरवि उदय पावला ! तो त्यांचा आनंदाचा क्षण म्हणजे प्रत्यक्ष स्वर्ग सुखालाहि लाजाविणारा असून, शेषाला देखील, त्याचें वर्णन करणें मोठें जडच जाईल, असे म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति मुळींच होणार नाहीं.

केवळ तें दम्पतीच नव्हे तर सृष्टिदेवता देखील त्या आनंदोत्सवांत सामील झाली. विविध वेली नाना पुष्पांनी प्रफुल्ल फुलून राहिल्या. वृक्षादिक फुलांनी डवरले. नद्या मधुर उदकांनी तुडुंब वाहूं लागल्या. वारा सुगंध, सुमधुर, व सुशीतल असा सुखकर वाहूं लागला. दशदिशा उजळून प्रसन्न दिसूं लागल्या. पक्षी झाडावर बसून मधुर व मंजुळ कूजन करूं लागले. पशु नैसर्गिक वैरभाव विसरून एकमेकांशी प्रेमानें वागडूं लागले आणि स्वर्गांतील देव देखील आनंदभरित होऊन अकाशांतून पुष्पवृष्टि करूं लागले! असा परमानंदकारी मंगल दिवस होता तो सोमवार! कैलासनाथ पार्वतीरमण श्रीशंकर देवच जगदुद्धारार्थ या मर्त्यलोकीं प्रत्यक्ष शुभावतार धारण करते झाले!

पुढें बारावा दिवस उजाडला. बारशाचा म्हणजे मुलाचें नामकरण करण्याचा दिवस तो. त्यादिवशीं भारतीयांचें घर म्हणजे आनंदोत्सवानें जसें कांहीं फुलून व खुलून गेलें असतें. अर्थात् असाच प्रकार शिवगुरूच्या घरीहि साजरा झाला, हें निराळें सांगावयास नकोच. तोरणें, केळीचे स्तंभ नारळाचें झाप, फुलाच्या माळा यांनीं सगळे घर शृगारण्यांत आलें. मधुर सनईचा मंजुळ असा मंगल ध्वनि तेथील वातावरण खुलवू लागला. लहान थोर स्त्रीवर्गाची वर्दळ हळुहळूं जमत चालली. पाकशाळेंत सुग्रास भोजनाची एकच धांदल उडाली. एकूण तेथील आनंद, उत्साह, व गडबड यांच्या तपशीलांत खोल न शिरतां फक्त इतकेंच सांगतो कीं तेथें प्रत्यक्ष आनंदोल्हासाचा त्यादिवशी प्रत्यक्ष इंद्राचा स्वर्गच उतरला होता!

संध्याकाळीं बाळाला मोठ्या समारंभानें पाळण्यांत घालण्यांत आलें व ईश्वराच्या वरप्रसादानें झालेले मूल म्हणून त्यांचें नांव शंकर असेंच ठेवण्यांत आलें आणि तें एकापरीनें अन्वर्थकच होते. कारण जे जे त्या बाळाला पाहण्यास म्हणून येत, त्यांना त्यांना त्याचें दिव्य व गोजिरवाणें

रूप पाहून सुखानंदाच्या लहरी उठल्याशिवाय राहत नसत! इतकें सुंदर व मनोहर बालक होतें तें! तें शंकरबाळ!! त्या अर्थानें देखील-पाहणाऱ्यांना आनंदलहरी उठविणाऱ्या त्या बाळाला-शंकर (सुखं करोतीति शंकरः) हें नांव अन्वर्थकच होतें. नव्हें काय?

शिवगुरूनी त्यादिवशी ब्राह्मण भोजन घालून झाल्यावर त्यांपैकी ज्योतिषांना बाळाचें भविष्य कथन करण्याची विनंति केली. त्याप्रमाणें त्यानी मुलाचा जन्मकाल विचार करून, एकांतात जाऊन आपापसांत विचार विनिमय करून कांहीं वेळानें बाहेर येऊन त्यास बोलावून ह्मटलें-शिवगुरो! तुझें हें बालक सामान्य नाहीं. तें लोकोत्तर आहे! तें सर्वज्ञ आहे! स्वतंत्र शास्त्र निर्माण करणारें आहे! मोठ मोठ्या जाड्या पंडितांशीं वाद करून जय प्राप्त करून घेणारे असें आहे! तें जगज्जेता होईल आणि जोपर्यंत ही पृथ्वी अस्तित्वांत आहे, तोपर्यंत त्याची कीर्ति सर्वत्र दुमदुमून राहील!! त्याच्या आयुष्याविषयी शिवगुरूनें प्रश्न केला नाहीं व त्या ज्योतिषांनीहि कांही सांगितलें नाहीं. जे शुभज्ञ ज्योतिषी आहेत ते अशुभ गोष्टींचें कथन करीत नाहींत.

हें झाल्यावर पुढें सामुद्रिकांना बोलावून मुलाचें लक्षण सांगण्यास त्यांना विनंति करण्यांत आली. तेव्हां त्यानी बालकाच्या सर्व शरीराचें सूक्ष्म अवलोकन करून लक्षण सांगितलें ते असें:- बालकाच्या उरावर नागाचें चिन्ह आहे. त्याचप्रमाणें पायावर चामराचें, मस्तकावर बालेंदूचें, हातावर चक्रादिकांचें, कपाळावर त्रिशूलाचें, चिन्ह असून, त्याचें सर्वांग रेखीव व अत्यंत सुकोमल आहे. हें लक्षण ऐकून शिवगुरूस मोठा आनंद झाला, हें उघड सांगावयास नकोच.

---

# प्रकरण चौथे
# शंकरपूर्व भारत

भारताचा आद्य धर्म म्हणजे वैदिक धर्म. तो पौरुषप्रधान-कर्मप्रभव-धर्म असून, त्याचें प्राबल्य बुद्धपूर्व काळीं सर्व भरतखंडभर प्रस्थापित होतें. पण इ. स. पूर्व पांचव्या शतकांत त्याला एक प्रबल प्रतिस्पर्धी जन्मास आला तो म्हणजे बुद्धोक्त बौद्धधर्म. त्याचें वैशिष्टय हें होतें कीं तो कर्मविन्मुख व संन्यासप्रवण धर्म असून, त्याची मांडणी सामान्य जनतेस मानवण्यासारखी अशी साधी व सोपी होती. शिवाय त्याची शिकवण देशी भार्षेत देण्यांत येत असल्यामुळे लोकांना तो फार आवडू लागला व बहुजन समाज हळु हळु तिकडे आकर्षित चालला. याच सुमारास जैन धर्मानेंहि डोकें वर काढलें. महावीर त्याचा मुख्य प्रचारक व प्रसारक असून, हे दोन्ही धर्म वैदिक धर्मास डिवचूं लागले. त्यात जैनापेक्षां बौद्धांची चळवळ अधिक बोचक व अधिक आक्रमक अशी होती. यामुळें त्या दोहोंत चुरस व संघर्ष उत्तरोत्तर वाढत चालला. पण बौद्धास म्हणण्यासारखा जोरकस राजाश्रय नव्हता.

**मौर्यकाल**:- ही उणीव अशोक सम्राटानें भरून काढली. अशोक हा चंद्रगुप्ताचा नातू असून तो मौर्य घराण्याचा होता. चंद्रगुप्त हा मौर्यवंशीय असून, त्यानें नंद घराणें बुडवून, मौर्यांचें राज्य स्थापन केलें होते. त्याचा नातू अशोक हा अत्यंत थोर, मोठा पराक्रमी, सात्विक व प्रजाहित दक्ष असा सम्राट होता. त्यानें बौद्धदीक्षा घेऊन बौद्धधर्मास उचलून धरलें; (इ. स. पू. २७०) त्या धर्माच्या प्रसारार्थ देशोदेशी उपदेशक पाठवून व तदर्थ तनमनधन अर्पण करून, त्याची एकनिष्ट अशी स्पृहणीय सेवा केली. याच्या

आश्रयाखाली बौद्धधर्म भारतांत मुळी धरून झपाट्यानें वाढीस लागून फोफावत चालला. दक्षिणेंत कन्याकुमारीपर्यंत, नव्हे त्यापुढेंहि सिलोन पर्यंत त्यानें धडक मारून तेथें बद्धमूल होऊन बसला. अशोक काळीं बौद्धधर्मात अनेक वादग्रस्त मुद्यानीं डोकें वर काढून धुमाकूळ घालून सर्वत्र बजबजपुरी माजविली होती. तेव्हां त्यानें धर्मपरिषद (तिसरी संगीति) बोलवून अनेक वादग्रस्त मुद्यांचे व शंकांचें निरसन करून, त्याला शक्यातितकें व्यवस्थित व शास्त्रशुद्ध वळण दिलें. याप्रमाणें अशोक सम्राटानें बौद्धधर्माची तळी उचलून धरून त्याची अपूर्व प्रगति व अविस्मरणीय बहुमोल सेवा केली. पुढें अशोकाच्या मृत्यूनंतर त्याचें साम्राज्य लयकरच मोडकळीस आलें.

पुढें भारताबाहेरील यवनादि अनार्य टोळयांनी भारतावर स्वाऱ्या करून, तेथील राजांचा पराभव करून तेथें ते स्थाइक होऊन राहिले. तशांत मिलिंद या यवन राजानें फार मोठी स्वारी करून अयोध्येपर्यंत मुलुख काबीज केला. त्याची राजधानी पंजाबांत सियालकोट येथें होती. त्यानें बौद्ध धर्माचा स्वीकार करून, त्याला राजाश्रय दिला. हा मोठा धर्मज्ञ व तत्त्वचिकित्सक राजा असून त्याचा व महायानपंथी नागसेन या बौद्ध पंडिताची अनेक प्रश्नावर तात्त्विक चर्चा होऊन, ती ‘ मिलिंद प्रश्न ’ या ग्रंथात समाविष्ट करून ठेवण्यांत आली असून त्या ग्रंथाला बौद्ध वाङ्मयांत फार उच्च प्रतीचे स्थान लाभलें आहे. त्यानें बौद्धधर्माच्या प्रसारार्थ फार प्रयत्न केले.

पण पुढें शुंग घराण्यांतील पुष्यामित्रानें त्याचा पराभव करून, आपलें गेलेलें साम्राज्य पुनः परत मिळविलें. हा पुष्यमित्र वैदिक धर्माचा कट्टर अनुयायी व अभिमानी होता. त्यानें वैदिक धर्माचा पक्ष घेऊन, त्या धर्मास उजाळा देण्याची महत्त्वाची कामगिरी केली. त्याने स्वतः अश्वमेध यज्ञ करून वैदिक धर्माचा झेंडा देशभर नाचविला. अर्थात् त्यानें बौद्धधर्माचा

वाढत्या आक्रमणास पायबंद घालून त्यास कांही काल थोपवून धरलें. याच सुमारास कण्वराजेहि उदयास आले व ते ब्राम्हण असल्यामुळें वैदिक धर्माचा पाठपुरावा करून वैदिक धर्माला त्यानीं भरभराटीचे दिवस दाखाविले. या शुंग व कण्व राजांनी अवैदिक धर्माला बांध घालून त्याची गति कुंठित केली.

यानंतर पुढें शकाचें व कुशानाचे फावून, त्या वंशातील कनिष्काचें साम्राज्य उदयास आले. त्यानें बौद्धधर्माचा स्वीकार करून, त्याचा तो मोठा पुरस्कर्ता बनला. या सर्व काळांत वैदिक व बौद्धधर्मात सारखी चुरस व संघर्ष चालू होता. आलटून पालटून दोघांची एकमेकांवर सरशी होत असे. मौर्यांचा शेवट झाल्यावर बौद्ध धर्मांचा राजाश्रय जवळ जवळ गळल्या सारखाच होता. पण ती जागा अखेर कानिष्काने भरून काढली. त्यानें परिषदा बोलावून बौद्ध धर्मावर तात्त्विक चर्चा करण्याचा परिपाठ ठेविला व त्यास बाळसेदार स्वरूप येण्यास मोठी मदत केली. प्रसिद्ध बौद्ध तत्त्वज्ञानी व थोर कवि अश्वघोष हा त्याच्या पदरीं होता.

त्याच्यानंतर पुढे गुप्त घराणे उदयास आलें. गुप्तांचा पहिला राजा चंद्रगुप्त हा वैदिकधर्माचा अनुयायी होता. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा समुद्रगुप्त हा गादीवर आला. तो भागवत सांप्रदायी असून अश्वमेध यज्ञ करून, फार मोठा लौकिक मिळविता झाला. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा विक्रमादित्य हा गादीवर आला. हा विष्णुभक्त असून ‘ परम भागवत ’ ही पदवी त्यानें धारण केली होती. त्यानेंहि हिंदुधर्मासच उचलून धरलें तो मोठा न्यायी व विद्वान असून कालिदास प्रभृति नऊ रत्नें त्याच्या पदरीं होतीं. विक्रमादित्याच्या मागून त्याचा मुलगा कुमारगुप्त हा गादीवर आला. व त्यानें दिग्विजय करून अश्वमेध यज्ञ केला.

पुढें इ. स. ६०० च्या सुमारास दानशूर सम्राट हर्षवर्धन हा उदयास आला. हा ठाणेश्वराचा हर्षवर्धन ऊर्फ शिलादित्य होय. हें हर्षाचें ‘ वर्धन ’

घराणें वैश्यवर्णीय होते. हर्षवर्धन हा जसा रणशूर होता, तसाच तो दानशूरहि होता. तो बौद्धधर्मास उत्तेजन व आश्रय देणारा शेवटचा राजा होय. गुप्त व वर्धन या राजवटींत भारतांत तक्षशिला, नालंद, विक्रमशिला, मदुरा इत्यादि ठिकाणीं मोठ मोठी विद्यापीठें उदयास आली असून तेथें विद्यादानाचें कार्य मोठ्या धडाडीनें चाललें होतें. त्यांतल्या त्यांत नालंद हे विद्यापीठ नांव घेण्यासारखें होतें. नालंद हे बुद्धशिष्य सारीपुत्र याचें जन्मस्थान असून, तें बौद्ध-विद्येचें मोठें केंद्र बनलें होतें. येथें एकूण आठ हजार विद्यार्थी विविध विषयांवर शिक्षण घेत होते. त्यांना शिकविण्यासाठीं १५०० शिक्षकांची योजना करण्यांत आली होती! मध्य आशिया, चीन, जपान, कोरिया, मोंगोलिया, टारटरी, तिबेट वगैरे देशांतील विद्यार्थी व भारतातील सर्व प्रांतातील विद्यार्थी तेथे बौद्धधर्माचा अभ्यास करण्यासाठी येऊन राहिले होते. त्या काळांत बौद्ध पंडित प्रख्यातीस आले. त्यांत नागार्जुन, वसुबंधु, असंग. दिङ्नाग, धर्मकीर्ति हीं नावें विशेष महत्वाची आहेत. यांनी बौद्धन्यायशास्त्रावर तर्कशुद्ध व विचारप्रचुर असे ग्रंथ लिहून बौद्धधर्माची फार मोठी सेवा केली. इकडे वैदिक नैय्ययिकाही कांहीं झोंपून बसले नव्हतें. त्यांनीहि अत्यंत परिश्रम करून तात्विक ग्रंथ लिहून वरील बौद्ध-पंडितांचें मत खोडून काढलें. याप्रमाणें दोघांत चुरस व खंडणमंडण प्रकार सतत चालत राहिला होता. तथापि बौद्धधर्माला अशोक, कनिष्क, हर्षवर्धन अशा सम्राट राजांचा मोठा पाठिंबा असल्यामुळें, त्याची छाप जनमनावर खोल ठसून, जिकडे तिकडे त्यांचें वर्चस्व व बोलबाला यास ऊत आला होता. त्यामानानें वैदिक धर्माला एक प्रकारची अवकळा येत चालली होती. या कालांत फक्त तत्त्वज्ञानावरच मुख्य रोख व जोर देण्यांत आला होता. वैदिक पंडितांनी बौद्ध तत्त्वज्ञानाला खो दिला होता. तरी वेदार्थ लिहिण्याकडे, कर्मकांडाचें महत्व व ज्ञानकांडाचें सयुक्तिक मंडन

करण्याकडे कोणीहि प्रयत्न केला नव्हता. तें कार्य पुढें कुमारिल भट्टांनी व शंकराचार्यांनी करून वैदिक धर्माची विजयी पताका उदंड फडफडत ठेविली. तो इतिहास प्रस्तुत ग्रंथांत वाचकांस यथाप्रसंग पहावयास मिळणार आहे.

बौद्धधर्माप्रमाणें जैनधर्महि वैदिक धर्माचा विरोधक व प्रतिस्पर्धी होता. पण त्याची झळ वैदिकांस फारशी जाचक व बाधक झाली नाही. त्यालाहि दक्षिणेंत राष्ट्रकूटांचा आश्रय होता. व दक्षिणेतील कांहीं राजे त्याच्या नादी लागले होते. कर्नाटकांत त्यानें आपलें चांगलेंच बस्तान बसविले होते. एवंच बौद्ध व जैन यांचें शंकरकाळीं फार प्राबल्य वाढून बहुजनसमाजावर त्याची पकड चांगली बसली होती. फार काय, हिंदु राजेहि त्यांना वचकून वागत होते. ही अशी आचार्यपूर्व-कालीन भारताची उद्वेगजनक शोचनीय स्थिति होती.

हें इतकें जैन-बौद्धविषयीं झालें. पण तेवढ्याने कांही भागलें नाही. वैदिकधर्माशी फटकून वागणारे आणखी कांहीं सांप्रदाय व पंथोपपंथ होतें. तें तंत्रयुगहि होतें. निरनिराळ्या सांप्रदायाचे निरनिराळे गट असून, त्यांचा उपासना प्रकार कांहीं विचित्रच होता. त्यांत शैव, शाक्त, वैष्णव, भागवत कापालिक असे तांत्रिक भेद असून, भारताच्या निरनिराळ्या भागांत त्यांचे प्रभुत्व व प्रचार जारीनें सुरू होता. त्याविषयीं थोडीशी माहिती खाली क्रमानें देत जातो.

**पाशुपतमतः–** प्राचीन काळीं भारत वर्षांत पाशुपत मताचा बोल-बाला चांगला होता. या मताच्या संस्थापकाचें नांव नकुलीश असें असून तो गुजराथेंत भडोच जवळील कारवन नांवाच्या स्थानांत जन्मला असें मानण्यांत येतें. राजपुताना, गुजरात, सौराष्ट्र इत्यादि देशांत नकुलीश मूर्तींची प्रचुरता आढळून येतें. पाशुपत मताप्रमाणें पांच पदार्थ मानण्याचा परिपाठ आहे. (१) कार्य, (२) कारण, (३) योग, (४) विधि व

(५) दुःखांत. कार्य म्हणजे ज्यांत स्वातंत्र्यशक्ति नाहीं तें. यांत जीव व जड या दोहोंचाहि अंतर्भाव होतो. जगाची उत्पत्ति, संहार व अनुग्रह करणारा महेश्वर हा असून त्यालाच कारण असें म्हणतात. चित्तद्वारा आत्मा व ईश्वर यांच्याशी जो संबंध, त्यास योग असें नांव आहे. महेश्वराची प्राप्ति करून घेणेच्या व्यापाराला विधि ही संज्ञा आहे. प्रत्येक जीव हा मिथ्याज्ञान, अधर्म, सक्तिहेतु, च्युति व पशुत्व या पांच मलांनी युक्त असतो. हे मल जेव्हा निवळतील–निवृत्त होतील–नाहींसे होतील, त्या अवस्थेला दुःखांत उर्फ मोक्ष असें म्हणतात. पाशुपतांची हीं पांच तत्त्वें फार प्राचीन आहेत. पाशुपताचा माहेश्वरकृत 'पाशुपतसूक्त' हा ग्रंथ अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. अशी ही थोडक्यांत पाशुपतमताची कथा आहे.

**पांचरात्र मतः–** वैष्णव आगमांना पांचरात्र मत असे नांव आहे. या शद्वाचा अर्थ भिन्न भिन्न करण्यांत येतो. 'नारद पांचरात्रा' प्रमाणे रात्र शद्बाचा ज्ञान असा अर्थ करण्यांत येतो. 'रात्रं च ज्ञानबंधनं, ज्ञानं पंचविधं स्मृतम' ( नारद पंचरात्र १-४४ ) या पांच ज्ञानाचें स्पष्टीकरण हें असें आहे (१) परमतत्त्व, (२) भुक्ति, (३) मुक्ति, (४) योग, व (५) संसार. या पांच विषयांचे निरूपण करण्यांत आल्याने या तंत्राला 'पांचरात्र' असें म्हटलें जातें. पांचरात्र याचें दुसरें नांव 'भागवत' असें आहे. महाभारताच्या नारायणीय आख्यानांत या तंत्राचा सिद्धांत प्रतिपादन करण्यांत आला आहे. याच्या १०८ संहिता आहेत. (१) अहिर्बुध्न्य संहिता, (२) जयाख्य संहिता, (३) ईश्वर संहिता, (४) विष्णु संहिता–इत्यादि संहितांचा या तंत्राशी संबंध आहे. या संहितांचे विषय चार असून, (१) ज्ञान, ब्रम्ह, जीव, व जगत् यांचें अध्यात्मिक रहस्याचें उद्घाटण व सृष्टीतत्त्वांचें निरूपण. (२) योग–मुक्तीला साधनभूत योग व त्याच्या प्रक्रियांचें वर्णन, (३) क्रिया–देवतांची निर्मिती,

मूर्तींची स्थापना इत्यादि, (४) चर्या-दैनिक क्रिया, मूर्तींचें व यंत्राचें पूजन वगैरे वगैरे. वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध हे चतुर्व्यूह ह्मणविले जातात. वासुदेव हा जगाचा कर्ता-धर्ता ईश्वर आहे. त्याच्यापासून उत्पन्न होणारा संकर्षण हा जीवरूप आहे. त्यापासून अनिरुद्ध म्हणजे अहंकार हा उत्पन्न होतो. भगवान हा सगुण व निर्गुण असा उभयविध आहे. ज्ञान, शक्ति, बल, ऐश्वर्य, वीर्य, व तेज हे सहा गुण भगवानाचे विग्रह आहेत. भगवानाच्या शक्तीचे नांव लक्ष्मी असे आहे. पांचरात्र मत जीव व ब्रह्म यांच्या एकताचें प्रतिपादन करतें, पण विवर्तवाद तें मानीत नाहीं. त्याच्या दृष्टीने परिणामवाद हा सत्य आहे. रामानुजाचार्योंचें विशिष्टाद्वैत मत या आगमावरच प्रतिष्ठित झालें आहे. पांचरात्राची श्रुतिसम्मति सिद्ध करण्यासाठी यमुनाचार्य यांनी ' आगम प्रामाण्य ' व वेदांतदेशिकानें ' पांचरात्र रक्षा ' ग्रंथाची रचना केली आहे.

(३) **शाक्तमत :–** शक्तीची उपासना झाली तरी ती वैदिक कालापासून चालत आली असलेली दिसून येते. वेदांत शक्तीचें वर्णन आढळतें. ऋग्वेदांत दुर्गादेवीचें स्तोत्र हें प्रसिद्धच आहे. पुढें हळुहळूं या उपासनेचा सर्व भरतखंडभर प्रसार झाला. पण निरनिराळ्या प्रांतांत तेथल्या परिस्थितीप्रमाणें व आवडी-निवडीनुरूप उपासनेंत फेरफार झालेले आहेत. या मताच्या प्रतिपादन ग्रंथांस ' आगम ' अथवा ' तंत्र ' असें संबोधण्यांत येतें. सात्विक आगमांना तंत्र, राजस आगमांना ' यामल ' व तामस आगमांना ' डामर ' अशी संज्ञा आहे. भगवान शंकराच्या पांच मुखापासून उत्पन्न झाल्यामुळें आगमांचे पांच आम्नाय झाले आहेत. पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर व ऊर्ध्व असे हे पांच आम्नाय असून, त्याप्रमाणे पूजापद्धतींतहि भिन्न भिन्न प्रकार झालेले आढळतात. या तांत्रिक पूजांचे तीन प्रमुख केंद्रें असून, त्यांची नांवें केरल, काश्मीर व कामाख्या अशीं आहेत. मद्य,

मांसादि पांच प्रकाराचा विधि तांत्रिक पूजेंत अवश्य म्हणून सांगितला असला, तरी निरनिराळ्या प्रांतांत प्रयोगांत भेद आढळतो. केरळांत त्या पांच प्रकाराऐवजी फक्त दुधाचाच उपयोग करण्यांत येतो. काश्मीरांत फक्त त्या तत्त्वाची भावना करण्यांत येते. पण गौड देशांतील पूजाविधींत मात्र पांचहि मकाराचा सर्रास उपयोग करण्यांत येतो. पांचप्रकारचे मकार ते हेः– ' मद्यं मांसं च मौनं च निद्रा मैथुनमेव च । मकारपंचकं प्राहुर्योगिनां मुक्तिदायकम् । ' या पंचमकारांचा उपयोग भक्तांना मुक्तिदायक आहे, असें तंत्रशास्त्र सांगतें. प्रारंभी ही शक्तिपूजा सात्विक स्वरूपांत होती. पुढें लोलुप उपासकांनी त्याला तामस स्वरूप दिलें अशाप्रकारचें हें शक्ति तंत्र आहे.

(४) **गाणपत्य मत :–** गणपतीच्या उपासकांना गाणपत्य असें म्हणतात. ही उपासनाहि वैदिककालीन असून फार प्राचीन आहे. पुढें कालानुसार त्यालाहि तामसिक तंत्रांचे प्रयोग जोडण्यांत आले. विशेषेंकरून ' उच्छिष्ट ' गणपतींची उपासना मद्यमांसाच्या उपाहाराने आप्लुत होत गेली. शंकराचार्यांच्या वेळीं या उपासनेचे जागजागी अड्डे बनले होते. दक्षिणेतील ' वक्रतुंडरी ' ही गाणपत्य उपासनेचें केंद्र बनली होती.

(५) **कापालिक मत:–** प्राचीनकाळीं या कापालिक सांप्रदायाचा प्रसार भरतखंडांत विशेषतः दक्षिणेकडे फार झालेला होता. हा एक उग्र असा तांत्रिक शैव सांप्रदाय असून, त्याचे अनुयायी श्री शैल व कर्नाटक भागांत प्रामुख्यानें रहात होते. ते माला, अलंकार, कुंडलें, चूडामणी, भस्म, व यज्ञोपवात या सहा मुद्रिका धारण करीत असत. पण कांहीं प्रकारचा विचित्र असा योगाभ्यास करून त्यांनी कांहीं विलक्षण सिद्धीहि प्राप्त करून घेतल्या होत्या.

यांची शिवपूजा मोठ्या उग्र स्वरूपाची होती. शंकराचा रुद्रावतार जो महाभैरव, याचा ते उपासक असत. त्यांच्या पूजाविधींत मद्य, मांस, वसा इत्यादिकांचा यथेच्छ उपयोग केला जात असे. यांचे उपास्य दैवत ह्मणजे महाभैरव असून, तो मोठा उग्र व भयंकर देव होता. हे लोक अग्नींत नरमांसाची आहुति देत आणि ब्राह्मणाच्या करवंटींत शराब पिऊन पारणे फेडीत. महाभैरवासमोर नरबळि देण्यांत येई. त्याचें वर्णन पुढील श्लोकांत आढळतें तें असें :–

**मस्तिष्कान्त्रवसाभिपूरितमहा मांसाहुतिर्जुव्हतां,**
**ब्रम्हौ ब्रम्हकपालकल्पितसुरापानेंन नः पारणा ।**
**सद्यः कृत्तकठोरकंठविगलत्कीलालधारोज्वलै-**
**रर्च्यो नः पुरुषापहरिबलिभिर्देवो महाभैरवः ॥**

भावार्थ वर देण्यांत आलाच आहे. तेव्हा पुनरुक्तीचें कारण नाहीं. या कापालिकांचा शैल पर्वताशेजारीच कर्नाटकामध्यें फारमोठा अड्डा होता. या पंथाचा अग्रगणी भैरवानंद, तो ह्मणे कीं :–

**मंतोण तंतोण अ किंपि जाणं**
**झाणंचणो किंपि गुरुप्पसादा ।**
**मज्जं पि आमो महिलं रमामो**
**मोक्खं च जामो कुलमग्ग लग्गा ॥**

भावार्थ :– मी मंत्र जाणत नाहीं. तंत्र जाणत नाहीं. आह्मांला दुसरें ज्ञान नाहीं. मला फक्त एकच गोष्ट इष्ट आहे. ती ह्मणजे गुरुप्रसाद. ध्यानाला आह्मी कांही देणे लागत नाहीं. आह्मी मद्य प्राशन करतो व स्त्रियांबरोबर यथेच्छ रममाण होतो. आणि या कुलमार्गावर अनुरक्त होऊन त्यामार्गानें आह्मी मोक्ष मिळवितो.’ असे तो भैरवानंद ह्मणत होता. त्याला कांही अलौकिक सिद्धी प्राप्त झाल्या होत्या.

असा हा उग्र कापालिक पंथ कर्नाटकांत धुमाकूळ घालीत होता. असो.

याप्रमाणें सहाव्या–सातव्या शतकांत भारत वर्षात नाना धर्म, नाना पंथ, नाना सांप्रदाय, नाना मतमतांतरे यांचा सावळा गोंधळ व बजबजपुरी माजून राहिली होती. एकीकडे बौद्धांचा शून्य वाद, जैनांचा स्याद्वाद, एकीकडें अनेक देव देवतावाद व एकीकडे विविध तांत्रिक मतें अशा भोंवऱ्यांत सांपडून आखा देश धडपडत होता. या अशा विविध व विलक्षण मतमतांतराच्या जंजाळांत सांपडून वैदिक धर्म निस्तेज व निष्प्रभ बनला होता. बौद्धांचे आघात, जैनांची चढाई, तांत्रिकांची पुंडाई, मतमतांतरांची चुरस या गोंधळांत सांपडून बिचारा सनातन धर्म निष्प्रभ, हतबल, हताश होऊन मेटाकुटीस आला होता. ही अशी शंकरोदय कालीन भारताची धार्मिक विपन्न केविलवाणी स्थिति होती.

## प्रकरण ५ वें

## तारा चककला

लग्ने शुभे शुभयुते सुषुवे कुमारम्
श्री पार्वतीव सुखिनी शुभवीक्षितेच ॥
जाया सती शिवगुरोर्निजतुंग संस्थे।
सूर्ये कुजे रविसुतेच गुरौ च केन्द्रौ ॥
( शं. दि. २-७ )

प्रासूत तिष्यशारदामतियातवत्या-
मेकादशाधिक-शतोन-चतुः सहत्स्याम् ॥
संवत्सरे विभवनाम्नि शुभे मुहूर्ते
राधे सिते शिवगुरोर्गृहिणी दशम्याम् ॥
( नीलकंठ भट्टकृत शंकरमंदार सौरभ )

नवाधिकाशीति युताष्टशत्या।
युक्ते सहस्रातृतये व्यतीते ॥
कलेः समानां विभवाद्ध राधा।
सिते दशम्यामुदभून्महेशः ॥
( त्रिविक्रममनीषिकृत शंकराभ्युदय )

निधिनागेभवन्ह्यद्धे विभवे मासि माधवे।
शुक्लेतिथौ दशम्यां तु शंकरार्योदयः स्मृतः ॥
( यज्ञेश्वरशास्त्रीकृत आर्य विद्या सुधाकर )

वसंते माधवेमासे दशम्यामिन्दुवासरे।
आर्याम्बा सुषवे पुत्रं शंकरं लोकशंकरम्

दिवसामागे दिवस जाऊं लागले. आर्याम्बेची प्रकृति दिनेदिने नरम पडत चालली. अंगांत सुस्तपणा वाढत चालला. असें होतां होतां नऊ महिनेहि उलटून गेले आणि दहावा लागला. ज्ञानरवीचा उदयकाल समीपला. शकाब्द ७१० उजाडलें. विभवनाम संवत्सर होतें तें. वसंत ऋतु, वैशाखमास, शुद्धदशमी, वार सोमवार. या दिवशीं सूर्य मेषराशींत, चंद्र मकरांत, मंगळ तुलेंत व गुरु केंद्रस्थानी असतांना सती आर्याम्बा सुखरूप प्रसूत झाली.

पुत्ररत्न होतें तें ! मदनासारखें सुंदर, बृहस्पतीसारखे मेधावी, सूर्यासारखें तेजस्वी, व चंद्रासारखें मनोल्हादकारक, अर्थात् अष्टपैलू दिव्य हिरा होता तो ! शिवगुरूची तपस्या फळास आली आणि आर्याम्बेचा भाग्यरवि उदय पावला. तो त्यांचा आनंदाचा क्षण म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गसुखालाहि लाजविणारा असून, शेषाला देखील वर्णन करणें मोठें जडच जाईल असें ह्मटल्यास त्यांत अतिशयोक्ति मुळींच होणार नाहीं.

केवळ शिवगुरु व आर्याम्बा हे भाग्यशाली दंपतीच नव्हे, तर सृष्टिदेवता देखील त्या आनंदोत्सवांत सामील झाली होती. विविध वेली नाना प्रकारच्या पुष्पांनी प्रफुल्ल फुलल्या. झाडझुडपें फलपल्लवानी गच्च डवरलीं. नद्या मधुर उदकांनी तुडुंब वाहूं लागल्या. वारा सुगंध, सुमधुर व सुशीतल असा सुखकर वाहूं लागला. दशदिशा उजळून प्रसन्न दिसूं लागल्या. पक्षीगण झाडावर बसून मंजुळ कूजन करू लागला. पशु नैसर्गिक वैरभाव विसरून प्रेमाने इकडे तिकडे बागडूं लागले आणि स्वर्गांतील देव देखील आनंदभरित होऊन आकाशांतून पुष्पवृष्टि करूं लागले. असा परमानंदकारी मंगल दिवस होता तो ! तो सोमवार शुभ दिवस ! कैलासनाथ पार्वती-रमण श्रीशंकरच जगदुद्धारार्थ या मर्त्यलोकी प्रत्यक्ष शुभावतार धारण करते झाले. हें आह्मी पदरचें सांगत नसून शिवरहस्यांत त्याचा स्पष्ट उल्लेख करण्यांत आला आहे. तें वचनच येथें उध्दृत करतो ह्मणजे झालें.

तें वचन हें असें:- ' केरले शशलग्रामे विप्रपत्न्या मदंशतः ! भविष्यति महादेवि शंकराख्यो द्विजोत्तम : ।। ' ही भविष्यवाणि प्रत्यक्ष शंकरच महादेवी पार्वतीला समजावून सांगत आहेत. असो. दुष्टमत-मतांतराचा कर्दन काळ, वैदिक धर्माचा उद्धारकर्ता, तत्वज्ञानाचा महामेरु आणि जिज्ञासुजगाचा पौर्णिमेचा पूर्णचंद्र कालटीग्रामीं उदयास आला ! प्रत्यक्ष शंकराचा अवतारच होता तो बाळ शंकर !

सती आर्याम्बेचा आनंद आता काय सांगावा ? पुत्रदर्शनार्थ हपापलेल्या व अधीर बनलेल्या स्त्रीहृदयाचा पुत्रदर्शनानें उसळणारा उल्हास व सुखसमाधान याचें यथार्थ वर्णन आह्मी पुरुषांनी काय करावे ? आणि किती केलें तरी तें यथार्थ कसें वठवणार ? तो दिव्य आनंद फक्त ती मातृदेवताच जाणें ! धन्य झाली आर्याम्बा ! तिला पुत्ररत्नाचें दिव्यदर्शन झाले आणि तिचा जीव सुखानंदांत मुरला ! फारा दिवसांनी व असंख्य नेमव्रतांनी व नवसांनी कुशीत जन्म घेतलेलें तें गोमटें राजस बाळ आणि तशांत बालरवीसारखें मनोहर तेजस्वीरत्न ! मग कोण नाही आनंदानें फुगून व फुलून जाणार ! आर्याम्बातर त्या आनंद सागरांत बुडबुडून उठत होती असें सांगितलें तर ती अतिशयोक्ति होईल काय ?

आकाशांतील शेकडो मैलांवरील पौर्णिमेच्या प्रफुल्ल रजनीनाथाकडे पाहून पृथ्वीवरील समुद्रनाथ जर आनंदानें थै थै नाचू लागतो, उफाळून येतो तर नवमास उदरीं धारण करून, असह्य प्रसववेदना सहन करून ईश्वरी प्रसादानें प्राप्त करून घेतलेल्या गोजिरवाण्या राजहंसाला पाहून, त्याला लडिवाळपणे मांडीवर घेऊन खेळवितांना व हंसवितांना कोणती माय माऊली भान विसरणार नाही ? वात्सल्यमय मातृधर्माचा महान् असा दिव्य धर्मच आहे तो ! त्या हंसतमुख चिमुकल्या बालचंद्राकडे

पाहून कोणती माउली आपणास धन्य व कृतकृत्य मानणार नाहीं ? आर्याम्बा तर खरोखरीच सुखसागरांत पोहत होती.

मंगल बारावा दिवस उजाडला. शिवगुरूच्या घरीं केवढी धांदल नी कोण गडबड. तें घर ह्मणजे आनंदोत्सवाने बहरलें होते. नामकरणाचा शुभ व मंगल दिवस. केळीचे खुंट, आंब्याची तोरणें, नारळाचे घाप, फुलाच्या माळा इत्यादि मंगल चिन्हांनी तें घर आतून व बाहेरून गजबजून व खुलून गेलें होतें. बारशाच्या प्रभात कालीं कर्णमधुर चौघड्याच्या सुस्वर संगीताने व मधुर सनईच्या मंजुळ आलापानें तेथील वातावरण प्रसन्न झालें होतें. केवढा भाग्याचा दिवस तो ! आह्मा भारतीयांच्या जागतिक जीवनांतील तो एक अत्यंत महत्वाचा, उत्सवाचा, उल्हासाचा, भाग्याचा महामंगल दिवस. त्या बारशाच्या दिवशी त्या घरांतील आनंद, हर्ष, उल्हास, शृंगार, गडबड, धावपळ इत्यादिकांचें वर्णन करणें हें शद्बातीत आहे.

संध्याकाळचा शुभ मुहूर्त समीपला. वस्त्रालंकार विभूषित सुवासिनी स्त्रियांची हळुहळु गर्दी जमत चालली. हास्य, आनंद व उल्हास यांनी ते मधुर वातावरण खुलून गेलें असल्यास नवल तें काय ? पाळणा पुष्पा-लंकारानें सुशोभित करण्यांत आला. बाळाला नवींन अंगडे टोपडे घालून व बाल-अलंकारानें सजवून त्याला पाळण्यांत निजविण्यांत आलें. व चंद्रमौलीश्वराच्या वरप्रसादानें झालेल्या त्या बालकाचें नांव शंकर असें ठेवून पाळणा जो जो ह्मणून हलविण्यांत आला. हा सर्व सोहाळा पाहून धन्य झाली आर्याम्बा आणि तसाच धन्य झाला तो शिवगुरुहि !!

---

## प्रकरण ६ वें

## बालपण

अथ शिवो मनुजो निजमायया
द्विजगृहे द्विजमोदमुपावहन् ।
प्रथमहायन एव समग्रहीत्
सकलवर्ण मसौ निज भाषिकाम् ॥ ४ - १ ॥

द्विसम एव शिशुर्लिखिताक्षरम्
गदितुमक्षमताक्षरवित्सुधीः
अथ स काव्यपुराणमुपाशृणोत्
' स्वयमैवत्किमपि श्रवणं विना ' ॥ ४-२ ॥

( शं. दि. ४-१ व २ )

फारा दिवसांनी व उपासतपास करून नवसानें झालेलें मूल म्हणजे आईबापाचें तें पंचप्राण ! तशात शंकरासारखे सुंदर तेजस्वी रत्न ! मग आईबापाच्या आनंदाला पारावर कोठला असणार ? आर्यांबा व शिवगुरु आनंदानें नाचूं आगले तर त्यांत आश्चर्य तरी काय ! या दांपत्याचा आनंद, उल्हास, उत्साह आतां कळसास जाऊन पोंचला होता ! आकाशांतील शेकडो मैलावरच्या चंद्राला पाहून पृथ्वी-वरील रत्नाकर जसा नाचत व उचंबळत असतो, तद्वत् नवमास उदरांत धारण करून, पुढें असह्य प्रसववेदना सहन करून, जन्म दिलेल्या गोजिरवाण्या राजहंसाला मांडीवर घेऊन लडिवाळपणें खेळवितांना कोणती माऊली भान विसरणार नाहीं ! आणि त्या हसतमुख बालचंद्राकडे

पाहून कोणती माऊली स्वर्ग सुखाला लाथाडून देणार नाहीं ! शिवगुरूच्या-घरांत आतां प्रत्यक्ष स्वर्गच उतरला होता.

त्या नूतन चंद्राला शुक्लपक्ष लागला व तो दिवसेंदिवस वाढत व विकसत चालला. तिसरा महिना लागला व तें गोजिरवाणें बालक गोड हसूं लागलें. चौथ्या महिन्यांत बसूं लागलें. सहाव्या महिन्यांत रांगूं लागलें. आठव्या महिन्यांत चालूं लागलें, नवव्या महिन्यांत बोलूं लागलें ! शिवगुरूच्या घरांत आतां केवढा आनंद ! त्या बालमूर्तीला उचलून घेतां, चुंबितां, हसवितां, खेळवितां चा, वितां मातेच्या हृदयाला जो वात्सल्याचा पूर येतो, तो कोण वर्णूं शकेल ? हे इतरांस तें शक्यच नाहीं. तें पवित्र मातृपद प्राप्त करून घ्यावें तेव्हांच त्याची दिव्य गोडी कळणार ! इतरांना त्याचें काय ?

शंकर आतां खेळूं बागडूं लागला ! त्या लहानग्या शंकराला पाहून शिवगुरूचें अंतःकरण अपत्यप्रेमानें उचंबळून येई, जातां येतां तो त्याला पटकन् उचलून घेऊन, त्याच्या गुलाबी गालाचा गोड पापा घेऊन, निमिषार्धच कां होईना, त्या अनिर्वचनीय ब्रह्मानंदात बुडून जात असे ! केव्हां त्याच्याशी बोबडे बोले तर केव्हां त्याला हंसवी, केव्हां नाचवी तर केव्हां झुलवी, केव्हां उराशी कवटाळी तर केव्हां दोन्ही हातांनी धरून वर उडवी, याप्रमाणें त्याच्याशी खेळून आपल्या मनाची हौस यथेच्छ तो पुरवून घेई. ाचा गृहस्थाश्रम आतां पूर्ण रंगला होता व उभय माता-पितरें धन ली होती !

शंकर बाळ आतां वाढतां वाढतां एक वर्षाचें झालें होतें. त्याचें गोजिरवाणें रूप व बाललीला पाहून शेजारी पाजारी व येणारे जाणारे लोकहि त्याच्यावर बेहद्द खूष होत असत. पुढें त्याचे जे अलौकिक गुण दिसूं लागले ते तर मोठे विलक्षण व आश्चर्यजनकच. पहिले वर्ष संपतें न

संपतें तो बाळ शंकर आतां बोलूं लागला व अक्षरे ओळखूं लागला. दुसऱ्या वर्षी लिहिलेली अक्षरे वाचूं लागला. घरांत काव्य, पुराण, इतिहास वगैरे वाचलेली अगर म्हटलेली ऐकूनच तिसऱ्या वर्षी पाठ न करतांच तोंडाने म्हणूं लागला ! अर्थात् तो एकपाठीच होता,याची साक्ष त्यानें तिसऱ्या वर्षीच लोकांच्या नजरेस आणली. हा त्याचा अलौकिक गुण पाहून जग त्याचे सहर्ष कौतुक करूं लागलें.

शंकराला आतां चौथें वर्ष लागलें. शिवगुरूच्या मनांत त्याची मुंज पुढील वर्षी म्हणजे पांचव्या वर्षी करण्याचें आलें. व त्याप्रमाणें त्यानें बोलूनहि दाखविलें. शंकराची चौरसबुद्धि पाहून त्याला लवकर वेदाध्ययनास लावावे, असा विचार करून, त्या तयारीत तो होता. पण ईश—इच्छा कांही निराळीच होती. शिवगुरूचा वृद्धापकाळ होता तो. काय झाले कोण जाणें, मधेंच अंगात कसर आल्यासारखी होऊन प्रकृति नरम झाली. अशक्तता वाढली. दिने दिने आजार मागे न हटता, जोरावतच चालला. औषधोपचार चालू झाले. पण गुण येण्याचे लक्षण दिसेना. प्रकृति सारखीं घसरतच चालली. आणि अखेर दुर्दैव ओढावलं व त्या आजारांतच त्याचा अंत झाला. ही शोकजनक आपत्ति त्या सुखी कुटुंबावर अनपेक्षित रीत्या ओढवल्यामुळें सती आर्याम्बेचें अवसानच खचलें व ती दुःख-शोकानें होरपळून निघाली. हा त्या कुटुंबावर एक कठोर वज्रघातच झाला, असें सांगितल्यास ती अतिशयोक्ति होईल काय ?

---

२१३५३ चारोळी
१३६

# प्रकरण ७ वें

## गुरुकुलांत विद्या साधन

अधिजगे निगमांश्चतुरोऽपि स
क्रमत एव गुरोः सषडंगकान्।
अजनिविस्मितमत्र महामतौ
द्विजसुते ऽल्पतनौ जनतामनः॥
(शं. दि. ४—१६)

वेदे ब्रम्हसमस्तदंग निचये गार्ग्योपमस्तत्—
कथातात्पर्यार्थविवेचने गुरुसमस्तत्कर्म संवर्णने।
आसीज्जैमिनिरेव तद्वचनप्रोद्बोधकंदे समो
व्यासेनैव स मूर्तिमानिव नवोवाणीविलासैर्वृत:॥
(आनंदगिरि ३—४)

शंकराला आतां पांचवें वर्ष लागलें. त्याचा उपनयन काल समीपला. कै. शिवगुरुनें पांचव्या वर्षी त्याचें उपनयन करण्याचे योजिल्याप्रमाणें आर्याबा झालेलें दुःख विसरून आतां त्या तयारीस लागली. तिचा आप्तेष्टबंधुवर्ग मोठा होता. त्याना बोलावून घेतलें व शेजारीपाजारी यांनाहि जमाविलें व बाळ शंकराचें उपनयन यथासांग पार पाडण्यांत आलें. उपनयनकाली बटूला गायत्री मंत्राचा उपदेश द्यावयाचा असतो. तो शंकरला देण्यांत आल्यावर त्याच्या मुखावर नवीन कांति तळपू लागली.

हा गायत्री मंत्र आहेच तसा प्रभावी! बटूला—वैदिक आर्याला दुसरा जन्म देणारा, भावी आयुष्याला प्रभावी वळण लावणारा तो हा गायत्री मंत्रच!

याचा उपदेश झाल्याशिवाय द्विजत्व प्राप्त होत नाहीं. वेदाचें मुख्य रहस्य या पवित्र मंत्रातच गर्भित आहे. म्हणून गायत्रीला वेदमाता अससंबो-धण्यांत येतें. आधुनिकांना हा मंत्र हास्यास्पद व अर्थशून्य वाटत असला तरी अभिजात वैदिक आर्याला तो आजहि पवित्र व महिमाशाली वाटतो. गायत्रीचें पुनश्चरण हें कामधेनु प्रमाणें इष्ट मनोरथ पूर्ण करणारे आहे, ही गोष्ट सनातनी लोक आजहि मानतात व त्याचें अनुष्ठानहि मोठ्या भाव-भक्तीनें करतात. 'न गायत्र्याः परोमंत्रः' हें शास्त्रवचन गायत्रीचें महात्म्य वर्णन करण्यास पुरेसें आहे. असो.

उपनयन झाल्यावर मुलाला विद्याभ्यासासाठीं गुरुकुलांत ठेवण्यांत येतें. उदयोन्मुख बालपिढीला सुबुद्ध व सुदृढ व तसेंच कर्तव्यनिष्ठ व शिस्तबद्ध करण्याचें हें एक वैदिक शिक्षणाचें वैशिष्ट्य आहे. त्याप्रमाणें शंकराला विद्याध्ययनासाठीं गुरुकडे ठेवण्यांत आलें. या आश्रमाचे नियम कडक असून, ते काटेंकोरपणें पाळण्याचा त्यावेळचा परिपाठ होता. संध्यावंदन, अग्निपरिचर्या, स्वाध्याय, भिक्षाटण, गुरुसेवा इत्यादि कर्तव्यें विद्यार्थ्याला यथाकाल नित्यनेमाने पाळावी लागत आणि ही व्यवस्था बटूला शिस्त लागावी व त्याला कर्तव्याची जाणीव व्हावी, या उद्देशानें शास्त्रकारांनीं आश्रमकर्तव्याचा पाठ घालून दिला आहे व तो यथाविधि उरकलाहि जाई.

या आश्रमनियमाप्रमाणे शंकर वागण्यांत अत्यंत दक्ष असे. त्यावेळचे विद्यार्थी विद्यार्जन व बलारोग्यवर्धन याशिवाय इतर भानगडींत पडत नसत. हें आधुनिक विद्याखात्यानें जरूर लक्षांत घेण्यासारखे आहे. गुरुगृहीं आल्यावर शंकराचा वेदाभ्यास सुरूं झाला. तो म्हणजे कांहीं असा तसा सामान्य कोटी-तला विद्यार्थी नव्हता. अलौकिक बुद्धीचा, शीघ्रग्रहणशक्तीचा, तीक्ष्णस्मरण शक्तीचा असा तो एकपाठी अलौकिक विद्यार्थी ! गुरुमुखातून पाठ बाहेर पडण्याचाच अवकाश ठसलेंच तें बुद्धींत जाऊन ! झालीच

लागोपाठ पाठ म्हणावयाला सुरुवात ! गुरुमुखांतून बाहेर येईल, तें शंकराच्या बुद्धींत होऊन बसलेंच वज्रलेप ! त्याची ग्रहणशक्ति स्मरणशक्ति पठणशक्ति, प्रतिभाशक्ति, तर्कशक्ति, विचारशक्ति, सर्वच कांही विलक्षण ! अपूर्व व अलौकिक ! ! एकदां बुद्धींत रुजलें, तें झालेंच शिला-शाश्वत! ! विस्मरण झालें याचें नांवच घ्यावयास नको.

शंकराची प्रगति अभ्यासांत झटपट म्हणजे वायुगतीनें होऊं लागली. शंकराचें गुरुदेव हे वेदविद्येंत व शास्त्रांत तसे मोठे अत्यंत विद्वान पंडित होते. चारहि वेद व सहाशास्त्रे, त्यांना मुखोद्गत होती. इतर विद्येवरही त्यांचा हातखंडा होता. त्यांच्याकडून प्रथम शंकराने यजुर्वेदाचा आणि मग ऋग्वेदाचा पाठ घेतला. नंतर सामवेद व अखेर अथर्वण वेद या क्रमाने त्याने चारहि वेदांत प्राविण्य मिळविलें. व त्याच प्रमाणे शिक्षा, छंद, व्याकरण, ज्योतिष इत्यादि षडंगाचेंहि ज्ञान करून घेतलें. हें सर्व वयाच्या सातव्या वर्षी! मधुन मधून गुरूस कांहीं शंका विचारी, तेव्हां त्याचें समाधान करणें गुरूस मोठे जड जात असें. त्याची बुद्धि इतकी तीक्ष्ण, इतकी सूक्ष्म व इतकी गहन होती कीं गुरूला तो भारीच वाटूं लागला ! तसें म्हणजे गुरूची बुद्धि किती झाली तरी मर्यादितच आणि शंकराच्या बुद्धीला तर मर्यादाच नव्हती ! शंकराचें हें ज्ञान वैभव पाहून गुरूला तो मोठा आनंदाचा व अभिमानाचा विषयच होऊन बसला. त्याचे सहपाठी हे मागेच रेंगाळत रहात. मुंगीच्या पावलाने त्यांची प्रगति तर शंकराची वायुगतीनें ! पुढें पुढें गुरूंनी त्याला सहाध्यायांना पाठ देण्याच्या कामगिरीवर नेमलें.

आतां हें वर्णन फार न लांबविता दोनतीन वर्षांच्या मुदतींतच तो विद्येंत कसा तयार झाला, त्याचें वर्णन असें करतां यइल. वदामध्यें तो चतुर्मुख ब्रम्हासारखा, शिक्षाव्याकरण कल्पादि वेदांगांत गार्ग्यप्रमाणे, तदंग

याचा उपदेश झाल्याशिवाय द्विजत्व प्राप्त होत नाहीं. वेदाचें मुख्य रहस्य या पवित्र मंत्रातच गर्भित आहे. म्हणून गायत्रीला वेदमाता असं संबोधण्यांत येतें. आधुनिकांना हा मंत्र हास्यास्पद व अर्थशून्य वाटत असला तरी अभिजात वैदिक आर्याला तो आजहि पवित्र व महिमाशाली वाटतो. गायत्रीचें पुनश्चरण हें कामधेनु प्रमाणें इष्ट मनोरथ पूर्ण करणारे आहे, ही गोष्ट सनातनी लोक आजहि मानतात व त्याचें अनुष्ठानहि मोठ्या भावभक्तीनें करतात. ' न गायत्र्याः परोमंत्रः ' हें शास्त्रवचन गायत्रीचें महात्म्य वर्णन करण्यास पुरेसें आहे. असो.

उपनयन झाल्यावर मुलाला विद्याभ्यासासाठीं गुरुकुलांत ठेवण्यांत येतें. उदयोन्मुख बालपिढीला सुबुद्ध व सुदृढ व तसेंच कर्तव्यनिष्ठ व शिस्तबद्ध करण्याचें हें एक वैदिक शिक्षणाचें वैशिष्टय आहे. त्याप्रमाणें शंकराला विद्याध्ययनासाठीं गुरुकडे ठेवण्यांत आलें. या आश्रमाचे नियम कडक असून, ते काटेंकोरपणें पाळण्याचा त्यावेळचा परिपाठ होता. संध्यावंदन, अग्निपरिचर्या, स्वाध्याय, भिक्षाटण, गुरुसेवा इत्यादि कर्तव्यें विद्यार्थ्याला यथाकाल नित्यनेमाने पाळावी लागत आणि ही व्यवस्था बटूला शिस्त लागावी व त्याला कर्तव्याची जाणीव व्हावी, या उद्देशानें शास्त्रकारांनी आश्रमकर्तव्याचा पाठ घालून दिला आहे व तो यथाविधि उरकलाहि जाई.

या आश्रमानियमाप्रमाणे शंकर वागण्यांत अत्यंत दक्ष असे. त्यावेळचे विद्यार्थी विद्यार्जन व बलारोग्यवर्धन याशिवाय इतर भानगडींत पडत नसत. हें आधुनिक विद्याखात्यानें जरूर लक्षांत घेण्यासारखे आहे. गुरुगृही आल्यावर शंकराचा वेदाभ्यास सुरूं झाला. तो म्हणजे कांहीं असा तसा सामान्य कोटीतला विद्यार्थी नव्हता. अलाकिक बुद्धीचा, शीघ्रग्रहणशक्तीचा, तीक्ष्णस्मरण शक्तीचा असा तो एकपाठी अलौकिक विद्यार्थी ! गुरुमुखातून पाठ बाहेर पडण्याचाच अवकाश ठसलेंच तें बुद्धींत जाऊन ! झालीच

लागोपाठ पाठ म्हणावयाला सुरुवात ! गुरुमुखांतून बाहेर येईल, तें शंकराच्या बुद्धींत होऊन बसलेंच वज्रलेप ! त्याची ग्रहणशक्ति स्मरणशक्ति पठणशक्ति, प्रतिभाशक्ति, तर्कशक्ति, विचारशक्ति, सर्वच कांही विलक्षण ! अपूर्व व अलौकिक ! ! एकदां बुद्धींत रुजलें, तें झालेंच शिला-शाश्वत! ! विस्मरण झालें याचें नांवच घ्यावयास नको.

शंकराची प्रगति अभ्यासांत झटपट म्हणजे वायुगतीनें होऊं लागली. शंकराचें गुरुदेव हे वेदविद्येंत व शास्त्रांत तसे मोठे अत्यंत विद्वान पंडित होते. चारहि वेद व सहाशास्त्रे, त्यांना मुखोद्गत होती. इतर विद्येवरही त्यांचा हातखंडा होता. त्यांच्याकडून प्रथम शंकराने यजुर्वेदाचा आणि मग ऋग्वेदाचा पाठ घेतला. नंतर सामवेद व अखेर अथर्वण वेद या क्रमाने त्याने चारहि वेदांत प्राविण्य मिळविलें. व त्याच प्रमाणे शिक्षा, छंद, व्याकरण, ज्योतिष इत्यादि षडंगाचेंहि ज्ञान करून घेतलें. हें सर्व वयाच्या सातव्या वर्षी! मधुन मधून गुरूस कांहीं शंका विचारी, तेव्हां त्याचें समाधान करणें गुरूस मोठे जड जात असें. त्याची बुद्धि इतकी तीक्ष्ण, इतकी सूक्ष्म व इतकी गहन होती कीं गुरूला तो भारीच वाटूं लागला ! तसें म्हणजे गुरूची बुद्धि किती झाली तरी मर्यादितच आणि शंकराच्या बुद्धीला तर मर्यादाच नव्हती ! शंकराचें हें ज्ञान वैभव पाहून गुरूला तो मोठा आनंदाचा व अभिमानाचा विषयच होऊन बसला. त्याचे सहपाठी हे मागेच रेंगाळत रहात. मुंगीच्या पावलाने त्यांची प्रगति तर शंकराची वायुगतीनें ! पुढें पुढें गुरूंनी त्याला सहाध्यायांना पाठ देण्याच्या कामगिरीवर नेमलें.

आतां हें वर्णन फार न लांबविता दोनतीन वर्षांच्या मुदतींतच तो विद्येंत कसा तयार झाला, त्याचें वर्णन असें करतां यइल. वदामध्यें तो चतुर्मुख ब्रम्हासारखा, शिक्षाव्याकरण कल्पादि वेदांगांत गार्ग्याप्रमाणे, तदंग

कथातात्पर्य विवेचनांत बृहस्पतीसारखा, वेदोक्त कर्मकांडांत् जैमिनिसारखा, तत्त्वज्ञानकथनांत व्यासासारखा, किंबहुना वाक्चातुर्यांत तो जणु आधुनिक व्यासच कीं काय असा लोकांना भासूं लागला ! ! एवढ्याशा लहान वयाच्या चिमुकल्या देहांत हिमालयाएवढी महत्तर बुद्धिमत्ता केंद्रिय झालेली पाहून जन-मनांत मोठे कौतुक व महान् विस्मय उत्पन्न झाला असल्यास नवल तें काय?

## शंकर बटूचें औदार्य

गुरुकुलांत असतांना शंकर बटु दोन प्रहराच्या वेळीं नियमाप्रमाणें मधुकरीसाठीं गांवांत गेला व फिरत फिरत एका ब्राह्मणाच्या घरांत येऊन 'ॐभवति ! भिक्षांदेहि ' अशी आरोळी ठोकली. ब्राह्मण घरी नव्हता. त्याची गृहिणी होती. आंतूनच तिनें शंकरास पाहिलें. केवढा तेजस्वी मुलगा ! त्यांत आठ वर्षाचें लहानसें पोर ! पण सूर्यासारखी होती कांति त्याची ! चेहरा पहावा तर बृहस्पतीसारखा ! डोळ्यांत नक्षत्राचें तेज चकाकत होते ! सात आठ वर्षाची चिमुकली गोंडस मूर्ति ! ! त्याला पाहतांच तिला एकप्रकारचा अनुपम हर्ष वाटला. काय तें तेज आणि काय तें रूप ! ब्रह्मचर्येचें दिव्य तेज मुखावर ओसंडत होते ! अग्नीसारखें तेजस्वी होते, त्याचें तें ध्यान ! !

तो तिचा हर्ष फारवेळ टिकला नाहीं. दुसऱ्या क्षणीच तिचा चेहरा झरकन् उतरला ! मोठी चिंता पडली तिला ! गरीब होती बिचारी ! गरीब ह्मणजे काय, शतदरिद्री ! ! अठराविश्वे दारिद्य नांदत होतें तिच्या घरांत ! ! घरांत धान्याचा कणहि नव्हता ! ! मग त्या बटूला काय घालायचें ? दोन प्रहरची वेळ खरी. पण चुलीवर पहावें तर अक्षता ! तिला फार वाईट वाटलें. मधुकरी घरीं आल्यावर त्याला भिक्षा घालू नये, हा काय ब्राह्मणाचा धर्म झाला ? पण करणार काय ? तिचा तरी काय

उपाय ? दारिद्र्यासारखें दुःख नाहीं ! तिचा जीव कासावीस झाला ! त्या सुंदर बटूला विन्मुख पाठविणे तिच्या जीवावर आलें ! ती मोठी उदार मनाची होती. पण गरीबीमुळें तिचा उपाय थकला होता ! 'पुढें जा !' असें सांगण्याचें तिला धैर्य होईना ! कांहीतरीं घालावे म्हणून आंत जाऊन तिनें सगळें घर धुंडाळलें, कानाकोपरा तपासला, कोठें कांहींच दिसलें नाहीं.

त्या बटूला 'पुढें हो' ह्मणून सांगण्यास तिला मरणप्राय दुःख झालें ! पण करणार काय ? लक्ष्मीच्या वडील बहिणीनें तेथें ठाणें मांडलेलें ! घरांत सर्वत्र ठणठणपाळें ! नवरा बाहेर गेलेला. भिक्षामागून आणल्यावर मग चूल पेटायची. अशी त्या घरची कट्ट दैन्यावस्था ! क्षणभर थांबून पुनः शंकरानें 'ॐ भवति भिक्षांदेहि' अशी दुसरी ललकारी मारली. तें ऐकून तिला रडूं कोसळलें ! व डोळयांतून अश्रुधारा चालल्या ! पदरानें डोळे पुशीत पुशीत, दुःखाचा आलेला आवंढा गिळून बाहेर येऊन हलक्या दीन स्वरांत म्हणाली, 'बटुवरा ! क्षमाकर ! आम्ही फार दरिद्री आहो ! घरांत धान्याचा कण नाहीं ! दरिद्राचें घर ! तुला 'जा' म्हणून विन्मुख पाठविणें माझ्या जीवावर आलें आहे !'

तिला शंकर म्हणाले–'माऊली ! काय असेल तें घाल ! तें मी आनंदानें घेतो !' पुनः ती आंत गेली व इकडे तिकडे हात फिरवून तपासतां एका कोनाड्यांत तिला एक आवळा सांपडला. केवढा तिचा आनंद ! तिचा जीव आतां खालीं आला ! तो आवळा घेऊन ती बाहेर आली व त्याला म्हणाली 'हा आवळा तेवढा आहे. तो तुझ्या झोळींत घालते. तेवढा घेऊन या गरीब बाईची भिक्षा गोड मानून घे !' असें म्हणून तो आवळा त्याच्या झोळींत टाकला व दाराच्या आड जाऊन त्याच्याकडे पहात उभी राहिली.

बटु शंकर हा लहानच. अवघे सात वर्षांचें पोर! पण त्याचें मन किती थोर! किती उदार! त्या बाईची ती दैन्यावस्था पाहून त्याचें मन विरघळलें! हृदय कळवळलें! तिची त्याला दया आली. पुढें त्याला जाववेना! लगेच त्याने डोळे मिटले व लक्ष्मीची स्तुति करण्यास प्रारंभ केला. तो स्तोत्र पुढीलप्रमाणे म्हणूं लागला. तो श्लोक हा

**शुभकारिणि भवहारिणि भयदारिणि भजताम्।**
**सकलश्रुतिस्मृतिसंहाति विविधस्तुति विषयम्॥**
**कलये मम हृदये तव सदये पदयुगुलम्।**
**धरणीरथ तरुणीश्वरि करिणीमणिगमने॥**

हें स्तोत्र म्हणतांच लक्ष्मीदेवी तेथें प्रसन्न होऊन बटुवेषधारी शंकरापुढें येऊन उभी राहिली! व त्यास म्हणाली-शंकरा! कशासाठीं माझी स्तुति केलीस? काय हवें तुला?' शंकर म्हणाला-हे विष्णुवल्लभे! जगन्माते! लक्ष्मीदेवि! मला कांहीं नको! माझ्यासाठीं तुला पाचारलें नाहीं. तर हें ब्राम्हणाचें घर पहा! दारिद्र्यानें किती गांजलें आहे तें! तुझ्या वडील बहिणीचा कडक पाहरा आहे येथें! आठरा विश्वें दारिद्र्य नांदतें आहे! बाई मोठी थोर व उदार मनाची आहे. इच्छा असूनहि देण्याला घरांत धान्य नाहीं!

**लक्ष्मीः**– मग मला काय कर म्हणतोस?

**शंकरः**– दुसरें काय म्हणू? तिच्यावर अनुग्रह कर! तिला या दारिद्र्यांतून मुक्त कर!

**लक्ष्मीः**– शंकरा! तुझें म्हणणें ठीक आहे. पण करावें तसें भोगावें, हा शास्त्रनियम आहे, त्याला हरताळ कसा फासतां येईल?

**शंकरः**– म्हणजे? मला नाहीं कळलें तें.

**लक्ष्मीः**– मागच्या जन्मीं यांनी कोणाला कांहींच दिलें नाहीं. म्हणून या जन्मी नशिबी दारिद्य आलें आहे. त्याला कोण काय करणार ? उपाय नाहीं ! करावं तसं भोगावं !

**शंकरः**– हे कमलोद्भवे ! हे दीनवत्सले ! मागच्या जन्माची गोष्ट राहूं दे. पहा, याजन्मी तिने मला आवळा दिला आहे. तो तिचें सर्वस्व आहे ! या महादानाचें फळ तिला मिळूं दे ! तिच्या या उदार कृत्याचें कांहीतरी सार्थक कर ! ' असें म्हणून त्यानें तिला नमस्कार केला.

**लक्ष्मीः**– शंकरा ! तुझ्या शब्दाला मान देऊन तिच्यावर अनुग्रह करते.

असें म्हणून ती अंतर्धान पावली. शंकरास नमस्कार करून बाई आंत गेली. शंकरानें आवळा घेऊन पुढचा रस्ता सुधारला. बाई घरांत जाऊन पाहते, तों काय चमत्कार ! घरभर सगळे आवळेच आवळे ! सोन्याचे आवळे !! एकेक आवळा लिंबाएवढा पिवळा धमक !!! घरभर सर्व सुवर्णाच्या आवळयांचा आंत बाहेर नुसता सडा पडला होता !!! हा चमत्कार घडून आला, हा उल्लेख पुढील श्लोकांत देण्यांत आला आहे.

**' अमुना वचनतोषिता कमला तद्भवनं समंततः ।**
**कनकामलकैरपूर यज्जनताया हृदय चं विस्मयै ः ।।**

( शं. दि. ४–३० )

# प्रकरण ८ वें

## स्वगृहीवास

> इति सप्तमहायनेऽखिल श्रुतिपारंगततां गतो बटुः ।
> परिवृत्य गुरोः कुलाद्गृहे जननीं पर्यचरन्महायशः ॥
>
> (शं. दि. ५-१)

शंकर सात वर्षांचा झाला, तेव्हां तो सर्वश्रुतिशास्त्रांत पूर्ण पारंगत झाला ! पुढें त्या बटूला शिकविण्यास गुरूजवळ विद्या नव्हती. त्याचेजवळ होती नव्हती, तेवढी सर्व विद्या गुरूनें त्यास मोठ्या आवडीने व प्रेमानें शिकविली. पोर अजून लहानच. बोलून चालून सात वर्षांचें किशोर ! तेवढ्याशा चिमुकल्या वयांत सर्व वेद विद्या-आपल्या चिमुकल्या कोंवळ्या मेंदूत सांठवून घेतली, ही काय सामान्य गोष्ट झाली ? खरोखर तेथील सर्वांना-लहानामोठ्यांना-स्त्रीपुरुषांना-आशिक्षित व सुशिक्षित सर्व लोकांना-तो एक मोठा आश्चर्याचा व कौतुकाचा विषयच होऊन बसला असल्यास, त्यांत कांहीं नवल नाहीं.

पण हें आधुनिक जगाला पटणारें नाहीं. पण भारतांत अशा विलक्षण गोष्टी अनेक घडून आल्या आहेत. त्या आधुनिकांना अश्रद्धेय वाटतात व वाटणें हें साहाजिकच आहे. हे शंकराचार्यच काय जुन्याकाळचे ते. अगदी अलीकडच्या ज्ञानेश्वरांनी तरी काय केलें ? सोळाव्या वर्षीं त्यांनी महाराष्ट्राचा महावेद 'ज्ञानेश्वरी' हा महाप्रासादिक ग्रंथ निर्माण केला नाहीं काय ? श्रीकृष्णांनी आठव्या वर्षी बलाढ्य कंसाचा वध केला, हे वाचकांस माहीत नाहीं काय ? त्याहून चमत्कार म्हणजे अभिमन्यूने गर्भांत असतानांच चक्रव्यूह

भेदण्याची विद्या शिकून घेतली, हा भारताचा दाखला कोणास माहीत नाहीं ? वामदेवहि गर्भांतच वेद म्हणूं लागला, हें पंडितांस काय अनभिज्ञ आहे ? अलौकिक व अवतारी पुरुषाचें सर्व कांहीं विलक्षण व विस्मयजनक असतें, हें पुनः येथें स्पष्ट सांगावयास नकोच !

तीन वर्षें गुरुजवळ राहून सर्व वेदविद्या मुखोद्गत केल्यावर गुरुजींनी त्याला प्रेमाने घरीं जाण्याचा निरोप दिला व त्याप्रमाणें शंकर गुरूंना वंदन करून घराकडे परतला. घरीं येतांच आपल्या परमपूज्य मातृदेवतेकडे सरळ चालत जाऊन, तिच्या पायावर आपलें मस्तक ठेऊन, अत्यंत पूज्य भावनेनें [illegible]ा वंदन केलें ! बोलून चालून मायमाउलीच ती ! तीन वर्षांत लाडक्या शंकराची गांठ नव्हती. त्याला पाहून तिला जो स्वर्गानंद झाला, तो सांगून पुरवत नाहीं ! दोन्ही हातानीं त्याला पाठीवरून कुरवाळून वर उठवून, त्यास पोटाशी घट्ट आवळून धरलें ! व त्याच्या तोंडावरून मायेचा प्रेमळ हात फिरवून, त्याचे चुंबन घेतलें ! तिचा आनंद आतां गगनी मावेना ! हृदय हर्षानें भरून आलें ! डोळ्यांत आनंदाश्रु चमकूं लागले ! कंठ सद्गदित झाला ! गाईला पाडसाचें दर्शन झालें ! !

बाल शंकराचीहि तीच स्थिति झाली. दोन्ही हातांनी त्यानें आईच्या कमरेला घट्ट मिठी मारली ! व म्हटले–आई ! आई ! तुझ्या सेवेला शंकर आला, बघ ! तुला फार कष्ट झाले असतील ! म्हातारपण ! आई, तूं स्वस्थ बैस ! आतां शंकर तुझी सगळी सेवा करील ! ' आई-मुलाचें प्रेम कांहीं औरच असतें ! तें तोंडानें सांगण्याला अगर लेखणीने लिहिण्याला अगम्य आहे ! चौदा वर्षांच्या वनवासानंतर श्रीरामचंद्र अयोध्येंत पाय ठेविल्यानंतर कौसल्येस जाऊन भेटले, तेव्हां कौसल्येस जो कांही सुखानंद झाला, तो खरोखर अनिर्वचनीयच ! कंसाचा वध केल्यावर बाळकृष्ण देवकीस जाऊन भेटला, त्या आनंदप्रसंगाचें वर्णन करण्यास कोण समर्थ आहे ! असो.

आनंदाचा महापूर ओसरल्यावर आईला जवळ बसवून घेऊन तिला थोडक्यांत गुरुगृहवासातील सर्व वृत्तांत निवेदन करून तिला हर्षित केलें व तेंव्हापासून तो घरींच आईजवळ राहिला.

शंकर घरीं आल्यावर त्याची स्नेही सोबती बालगोपाल मंडळी त्याच्या भेटीस धांवून आली. पुढें त्यांना दररोज जवळ घेऊन खेळीमेळीनें त्यांना पाठ देण्याचा क्रम चालविला व बालगोपाल मंडळीहि त्याच्या प्रेमळ स्वभावाला भाळून त्याच्या सभोवती जमू लागली. व त्यांना हंसत खेळत वेदांचा पाठ तो देऊं लागला. त्याचा हा पुढें नित्यक्रमच ठरला. प्रथम आईची सेवा व मग सोबत्यांस विद्यादान ! याप्रमाणें त्याचा दैनंदिनक्रम चालू असे.

## पूर्णा दारासमोर आली !

आर्यांबेचा नित्य नदीवर स्नानास जाणेचा परिपाठ होता. जुन्याकाळचे स्त्रीपुरुष स्नानास बहुतेक नदीवरच जात असत. एकतर आजच्यासारखी त्यावेळीं घरींच उभ्याबसल्या पाणी भरण्याची नळाची सोय नव्हती, व दुसरी गोष्ट म्हणजे नदीवर स्नान करणें हें पुण्यप्रद आहे, अशी त्यावेळची भावना असे. नदी गांवापासून जरा लांब होती. तरी आर्यांम्बा हळुहळु चालत नदीवर स्नानार्थ जात असे. नित्याप्रमाणें ती एक दिवस नदीवर जाऊन स्नान आटपून परत घराकडे येत असतां मध्यान्हीच्या कडक उन्हानें भोंवळ येऊन, रस्त्यावरच बेशुद्ध होऊन पडली ! जवळ शंकर नव्हता. कांहीं कामाकरतां घरींच होता. त्याला ही बातमी लागतांच धांवतच तो आईकडे गेला. व तिला इतर जनांच्या सहाय्यानें घरीं उचलून आणली. पुढें कांहीं वेळानें ती शुद्धीवर आली.

आईला वृद्धपणामुळें नदीवर जाणें मोठे कष्टप्रद होतें पण तेथें गेल्या शिवाय गत्यंतर नाहीं, असें पाहून तो पूर्णानदीकडे गेला. तिला हात

जोडले व तिची भक्तिपूर्वक पुढीलप्रमाणे प्रार्थना केली. ती ह. भ. प. दासगणूंनी आपल्या शंकरचरित्रांत फार मार्मिकरीतीनें वर्णन केली असल्या-मुळें, त्यांच्याच वचनांत येथें देतो. पूर्णेला उद्देशून शंकर म्हणाला—

'त्या भगीरथापरी। मी आलो तुझ्या तिरीं। तुला न्यावया निर्धारीं। मदीय सदनापर्यंत ॥ ९-१२५ ॥ भागीरथीचें अंतर फार। माझें नाहीं तितकें दूर। अवघें एक मैलावर। येणे आहे गंगे ॥ १२६ ॥ त्रिकाल तुझ्या स्नानाचा। नेम माझ्या जननीचा। आहे तो पुरीव साचा। माझी प्रार्थना ऐकून ॥ १२७ ॥ गंगा यमुना गोदावरी। नर्मदा कृष्णा कावेरी। ह्या अवघ्या तुलाच खरी। माझी जननी मानितसे ॥ १२८ ॥ आतां वृद्धापकाळीं तिला। तुझ्या तिरास येण्याला। अवसान नुरलें देहाला। म्हणून तूंच चलावें ॥ १२९ ॥ ऐशी प्रार्थना ऐकली। पूर्णा येथें प्रगटली। चंद्र नसून फांकली। प्रभा बुध हो। चौंहीकडे ॥ १३० ॥ रूपवर्ण सरितेचें। किती तरी वानूं वाचें। मुख पाहतां रतीचे। धाबे जाय दणाणून ॥ १३१ ॥ गौरवर्ण गोमटी। चतुर्भुज सिंहकटी। मगराच्या बैसून पाठीं। पूर्णा आली जलावर ॥ १३२ ॥ पूर्णेप्रती पाहतां। आचार्य करिती दंडवता। तो पूर्णेने त्यांच्या हाता। धरून ऐसे बोलली ॥ १३३ ॥ तुम्हीं न करावा नमस्कार। तुम्ही साक्षात् शंकर। तुम्हामुळेंच माझें तीर। पवित्र होणार आहे कीं ॥ १३४ ॥ मला नका जोडूं हात। मी तयार येण्याप्रत। आतांच घरा पर्यंत। तुमच्या आहे आचार्या ! ॥ १३६ ॥ मी कोठवरी यावें। हें तुम्हींच ठरवावें। आपण पुढें चलावें। तुमच्या मागून मी येते ॥ १३७ ॥ आचार्यें तें ऐकिलें। उठून चालूं लागले। मागोमाग त्यांच्या केलें। प्रयाण पूर्णा सरितेनें ॥ १३८ ॥ लागता घराचें द्वार। आचार्य वदले होऊन स्थिर। यावत् चंद्र दिवाकर। येथून वहावें पूर्णे तुवां ॥ १३९ ॥ मग काय विचारतां। तैसेंचि झालें तत्त्वतां। आली श्री शंकराचार्यांकरितां। पूर्णा सन्निध घराच्या ॥ -१४० ॥

याप्रमाणें शंकराच्या प्रार्थनेला मान देऊन पूर्णा रातोरात कालटी गांवाला लागून, शंकराच्या अगदी घरापुढून वाहूं लागली. हा तिचा एक फाटा होता. दुसरे दिवशी सकाळीं उठून गांवातील लोक पाहतात, तो काय चमत्कार! पूर्णा अगदी दाराशी येऊन भिडलेली! सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें! व बाल शंकराचें मोठें कौतुक झालें!!

## शंकराचें अपूर्व वैराग्य

शंकराच्या काळी केरळ देशाचा राजा राजशेखर महाराज हा होता. त्याच्या कानावर सुवर्णाच्या आवळ्याचा पाऊस व पूर्णानदीला फिरविणे या गोष्टी कर्णोपकर्णी आल्या. तेव्हां त्याला त्या महात्म्या शंकराचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. म्हणून त्याने हत्ती, घोडे, पालखी, वस्त्र, भूषणें इत्यादि राजमर्यादेला अनुसरून प्रधानाच्या स्वाधीन करून, शंकराला मोठ्या वैभवानें राजमंदिरांत घेऊन येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें प्रधान सरंजामासह कालटीस शंकराच्या घरीं आला. त्यावेळीं तो शिष्यांस पुढें बसवून घेऊन पाठ सांगत बसला होता.

तेथें आल्यावर प्रधान त्याच्या जवळ येऊन, त्या तेजस्वी बालमूर्तीला नमस्कार करून, त्यास म्हणाला 'आपणास वस्त्रभूषणें अर्पण करून राजवाड्यांत घेऊन जाण्यास आलो आहे. तर आपण हा राजाने पाठविलेला, आहेर स्वीकारून, पालखीत बसून राजमंदिराकडे चलावे, तशी राजाज्ञा झाली आहे अशी प्रार्थना केली. शंकरानें त्याचा यथोचित सन्मान करून त्यास विनयपूर्वक पुढीलप्रमाणें म्हटलें:- प्रधानजी! आम्हांस राजाकडे येण्याचें काय प्रयोजन आहे? आम्हांस पालखी घोडे व वस्त्रभूषणे काय करावयाची आहेत? आम्ही बोलून चालून ब्रम्हचर्या-श्रमवासी! भिक्षेवर आमचा उदरनिर्वाह! पूर्णेचें स्नानपान! शास्त्राध्ययनानें कालक्षेप!

मग आम्हांस राजवैभवाचें काय प्रयोजन आहे ? आम्हांला द्रव्यहि नको ! वस्त्रहि नको ! कांहींच नको ! आम्हांस कशाचीच आशा नाहीं ! अत्यंत समाधानवृत्तीनें आमचा कालक्षेप चालला आहे ! आम्हांला कांही कमी नाहीं ! मग राजाजवळ येऊन आम्ही काय करायचें व काय मागायचें ! हें सर्व घेऊन आपण परत जावें येथें कांही ठेवूं नये. व आमचा राजास आशिर्वाद सांगावा ! ' हें भाषण ऐकून प्रधानाचा निरुपाय झाला. शंकर येण्यास तयार नाहीं, हें पाहून त्याचें मन जरा अस्वस्थ झालें. आणि निरुपाय होऊन तो आला तसा सर्व सरंजामासह परत निघाला.

राजा मोठ्या आतुरतेनें त्यांची मार्गप्रतिक्षा करीत होता. त्याचें दर्शन घेण्याची त्यास मोठी उत्सुकता झाली होती. लहान वय पण केवढा चमत्कार ! ती बटु मूर्ति सामान्य नसावी, अशी त्याची खात्री झाली होती. आतां येईल, क्षणांत येईल अशा विचारानें तो दरवाजाकडे सारखा येरझारा करूं लागला होता ! इतक्यांत प्रधान तेथें आलाच. पण उत्सवमूर्ति कांही दिसली नाहीं. त्यानें प्रधानास विचारलें, तेव्हां प्रधानाने सर्व हकीकत त्यास निवेदन केली. ती ऐकून राजास मोठा अचंबा वाटला. राजाच्या सन्मानाचा इन्कार कोण करणार ? वस्त्र भूषणें, द्रव्य-दक्षिणा यांचा मोह कोणास नसतो ? गरीब ब्राम्हणाला तर तें पाहून तोंडाला पाणी सुटतें ! पण या मुलानें तिकडे ढुंकून न पाहता जशाचें तसें सर्व द्रव्य परत केलें, ही कांही सामान्य गोष्ट झाली नाहीं,

दा. क्र. १५२४९

तेव्हां तो कोणीतरी लोकोत्तर महात्मा असावा असा त्याचा ग्रह होऊन, तो स्वतः त्याच्या दर्शनास जाण्यास सिद्ध झाला. तो मोठ्या सरंजामानिशी शंकराच्या भेटीस आला. शंकराने दारी आलेल्या राजाचें स्वागत केलें. तेथे आल्यावर दहा हजार मोहरा त्याच्यापुढें ठेवून राजानें त्यास दंडवत प्रणाम केला. आणि म्हटलें—आचार्य ! आमच्या वाड्यांत आपले

याप्रमाणें शंकराच्या प्रार्थनेला मान देऊन पूर्णा रातोरात कालटी गांवाला लागून, शंकराच्या अगदी घरापुढून वाहूं लागली. हा तिचा एक फाटा होता. दुसरे दिवशी सकाळीं उठून गांवातील लोक पाहतात, तो काय चमत्कार। पूर्णा अगदी दाराशी येऊन भिडलेली। सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें ! व बाल शंकराचें मोठें कौतुक झालें !!

## शंकराचें अपूर्व वैराग्य

शंकराच्या काळी केरळ देशाचा राजा राजशेखर महाराज हा होता. त्याच्या कानावर सुवर्णाच्या आवळयाचा पाऊस व पूर्णानदीला फिरविणे या गोष्टी कर्णोपकर्णी आल्या. तेव्हां त्याला त्या महात्म्या शंकराचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. म्हणून त्याने हत्ती, घोडे, पालखी, वस्त्र, भूषणें इत्यादि राजमर्यादेला अनुसरून प्रधानाच्या स्वाधीन करून, शंकराला मोठ्या वैभवानें राजमंदिरांत घेऊन येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें प्रधान सरंजामासह कालटीस शंकराच्या घरीं आला. त्यावेळीं तो शिष्यांस पुढें बसवून घेऊन पाठ सांगत बसला होता.

तेथें आल्यावर प्रधान त्याच्या जवळ येऊन, त्या तेजस्वी बालमूर्तीला नमस्कार करून, त्यास म्हणाला ' आपणास वस्त्रभूषणें अर्पण करून राजवाड्यांत घेऊन जाण्यास आलो आहे. तर आपण हा राजाने पाठविलेला, आहेर स्वीकारून, पालखीत बसून राजमंदिराकडे चलावे, तशी राजाज्ञा झाली आहे अशी प्रार्थना केली. शंकरानें त्याचा यथोचित सन्मान करून त्यास विनयपूर्वक पुढीलप्रमाणें म्हटलें:- प्रधानजी ! आम्हांस राजाकडे येण्याचें काय प्रयोजन आहे ? आम्हांस पालखी घोडे व वस्त्रभूषणे काय करावयाची आहेत ? आम्ही बोलून चालून ब्रम्हचर्या-श्रमवासी ! भिक्षेवर आमचा उदरनिर्वाह ! पूर्णेचें स्नानपान ! शास्त्राध्ययनानें कालक्षेप !

मग आम्हांस राजवैभवाचें काय प्रयोजन आहे ? आम्हांला द्रव्यहि नको ! वस्त्रहि नको ! कांहींच नको ! आम्हांस कशाचीच आशा नाहीं ! अत्यंत समाधानवृत्तीनें आमचा कालक्षेप चालला आहे ! आम्हांला कांही कमी नाहीं ! मग राजाजवळ येऊन आम्ही काय करायचें व काय मागायचें ! हें सर्व घेऊन आपण परत जावें येथें कांही ठेवूं नये. व आमचा राजास आशिर्वाद सांगावा ! ' हें भाषण ऐकून प्रधानाचा निरुपाय झाला. शंकर येण्यास तयार नाहीं, हें पाहून त्याचें मन जरा अस्वस्थ झालें. आणि निरुपाय होऊन तो आला तसा सर्व सरंजामासह परत निघाला.

राजा मोठ्या आतुरतेनें त्यांची मार्गप्रतिक्षा करीत होता. त्याचें दर्शन घेण्याची त्यास मोठी उत्सुकता झाली होती. लहान वय पण केवढा चमत्कार ! ती बटु मूर्ति सामान्य नसावी, अशी त्याची खात्री झाली होती. आतां येईल, क्षणांत येईल अशा विचारानें तो दरवाजाकडे सारखा येरझारा करूं लागला होता ! इतक्यांत प्रधान तेथें आलाच. पण उत्सवमूर्ति कांही दिसली नाहीं. त्यानें प्रधानास विचारलें, तेव्हां प्रधानाने सर्व हकीकत त्यास निवेदन केली. ती ऐकून राजास मोठा अचंबा वाटला. राजाच्या सन्मानाचा इनूकार कोण करणार ? वस्त्र भूषणें, द्रव्य-दक्षिणा यांचा मोह कोणास नसतो ? गरीब ब्राम्हणाला तर तें पाहून तोंडाला पाणी सुटतें ! पण या मुलानें तिकडे ढुंकून न पाहता जशाचें तसें सर्व द्रव्य परत केलें, ही कांही सामान्य गोष्ट झाली नाहीं,

तेव्हां तो कोणीतरी लोकोत्तर सहाजिकच असावा असा त्याचा ग्रह होऊन, तो स्वतः त्याच्या दर्शनास जाण्यास सिद्ध झाला. तो मोठ्या सरंजामानिशी शंकराच्या भेटीस आला. शंकराने दारी आलेल्या राजाचें स्वागत केलें. तेथे आल्यावर दहा हजार मोहरा त्याच्यापुढें ठेवून राजानें त्यास दंडवत प्रणाम केला. आणि म्हटलें—आचार्य ! आमच्या वाड्यांत आपले

दा. क्र. १५२४९

याप्रमाणें शंकराच्या प्रार्थनेला मान देऊन पूर्णा रातोरात कालटी गांवाला लागून, शंकराच्या अगदी घरापुढून वाहूं लागली. हा तिचा एक फाटा होता. दुसरे दिवशी सकाळीं उठून गांवातील लोक पाहतात, तो काय चमत्कार। पूर्णा अगदी दाराशी येऊन भिडलेली। सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें ! व बाल शंकराचें मोठें कौतुक झालें !!

## शंकराचें अपूर्व वैराग्य

शंकराच्या काळी केरळ देशाचा राजा राजशेखर महाराज हा होता. त्याच्या कानावर सुवर्णाच्या आवळ्याचा पाऊस व पूर्णानदीला फिरविणे या गोष्टी कर्णोपकर्णी आल्या. तेव्हां त्याला त्या महात्म्या शंकराचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. म्हणून त्याने हत्ती, घोडे, पालखी, वस्त्र, भूषणें इत्यादि राजमर्यादेला अनुसरून प्रधानाच्या स्वाधीन करून, शंकराला मोठ्या वैभवानें राजमंदिरांत घेऊन येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें प्रधान सरंजामासह कालटीस शंकराच्या घरीं आला. त्यावेळीं तो शिष्यांस पुढें बसवून घेऊन पाठ सांगत बसला होता.

तेथें आल्यावर प्रधान त्याच्या जवळ येऊन, त्या तेजस्वी बालमूर्तीला नमस्कार करून, त्यास म्हणाला ' आपणास वस्त्रभूषणें अर्पण करून राजवाड्यांत घेऊन जाण्यास आलो आहे. तर आपण हा राजाने पाठविलेला, आहेर स्वीकारून, पालखीत बसून राजमंदिराकडे चलावे, तशी राजाज्ञा झाली आहे अशी प्रार्थना केली. शंकरानें त्याचा यथोचित सन्मान करून त्यास विनयपूर्वक पुढीलप्रमाणें म्हटलें:- प्रधानजी ! आम्हांस राजाकडे येण्याचें काय प्रयोजन आहे ? आम्हांस पालखी घोडे व वस्त्रभूषणे काय करावयाची आहेत ? आम्ही बोलून चालून ब्रम्हचर्या-श्रमवासी ! भिक्षेवर आमचा उदरनिर्वाह ! पूर्णेचें स्नानपान ! शास्त्राध्ययनानें कालक्षेप !

मग आम्हांस राजवैभवाचें काय प्रयोजन आहे ? आम्हांला द्रव्यहि नको ! वस्त्रहि नको ! कांहींच नको ! आम्हांस कशाचीच आशा नाहीं ! अत्यंत समाधानवृत्तीनें आमचा कालक्षेप चालला आहे ! आम्हांला कांही कमी नाहीं ! मग राजाजवळ येऊन आम्ही काय करायचें व काय मागायचें ! हें सर्व घेऊन आपण परत जावें येथें कांही ठेवूं नये. व आमचा राजास आशिर्वाद सांगावा ! ' हें भाषण ऐकून प्रधानाचा निरुपाय झाला. शंकर येण्यास तयार नाहीं, हें पाहून त्याचें मन जरा अस्वस्थ झालें. आणि निरुपाय होऊन तो आला तसा सर्व सरंजामासह परत निघाला.

राजा मोठ्या आतुरतेनें त्यांची मार्गप्रतिक्षा करीत होता. त्याचें दर्शन घेण्याची त्यास मोठी उत्सुकता झाली होती. लहान वय पण केवढा चमत्कार ! ती बटु मूर्ति सामान्य नसावी, अशी त्याची खात्री झाली होती. आतां येईल, क्षणांत येईल अशा विचारानें तो दरवाजाकडे सारखा येरझारा करूं लागला होता ! इतक्यांत प्रधान तेथें आलाच. पण उत्सवमूर्ति कांही दिसली नाहीं. त्यानें प्रधानास विचारलें, तेव्हां प्रधानाने सर्व हकीकत त्यास निवेदन केली. ती ऐकून राजास मोठा अचंबा वाटला. राजाच्या सन्मानाचा इन्कार कोण करणार ? वस्त्र भूषणें, द्रव्य-दक्षिणा यांचा मोह कोणास नसतो ? गरीब ब्राम्हणाला तर तें पाहून तोंडाला पाणी सुटतें ! पण या मुलानें तिकडे ढुंकून न पाहता जशाचें तसें सर्व द्रव्य परत केलें, ही कांही सामान्य गोष्ट झाली नाहीं,

तेव्हां तो कोणीतरी लोकोत्तर महात्मा असावा असा त्याचा ग्रह होऊन, तो स्वतः त्याच्या दर्शनास जाण्यास सिद्ध झाला. तो मोठ्या सरंजामानिशी शंकराच्या भेटीस आला. शंकराने दारी आलेल्या राजाचें स्वागत केलें. तेथे आल्यावर दहा हजार मोहरा त्याच्यापुढें ठेवून राजानें त्यास दंडवत प्रणाम केला. आणि म्हटलें—आचार्य ! आमच्या वाड्यांत आपले

दा. नं. १५२४९

पाय लागावेत, अशी आमची इच्छा आहे. मला आपल्या दर्शनाची फारच उत्कंठा लागली म्हणून मीच स्वतः आपल्या दर्शनास आलो. आमच्या राज्यांत आपल्यासारख्या महिमाशाली पुण्यविभूतीचा जन्म झाला, हें आमच्या देशाचें भाग्य समजतो. आमच्या गांवात येऊन लोकांना आपल्या दर्शनाचा लाभ देऊन, त्यांस कृतार्थ करावें. या मोहरा आपणास नजर करण्यासाठीं आणल्या आहेत. त्यांचा कृपा करून स्वीकार करावा व मला धन्य करावें !

**शंकरः**– राजा ! आम्हांला या मोहरांची गरज नाहीं ! आम्हांला पैसा अडका जवळ बाळगण्याची इच्छा नाहीं. तेव्हां त्या मोहरा आपण परत न्याव्यात ! !

**राजा म्हणाला**– आचार्यदेव ! गुरुदेवाला अर्पण केलेली वस्तु परत कशी न्यायची ? तें शास्त्राला सोडून नाहीं का !

**शंकरः**– मग त्याचा विनियोग एखादे देवालय बांधण्याकडे करा ! बरें, आतां आपली काय इच्छा आहे ?

**राजाः**– मी स्वतः तीन नाटकें लिहिलेलीं आहेत. तीं आपणास वाचून दाखवितो. त्यावर आपला अनुग्रह व्हावा. असें म्हणून राजानें तीं नाटकें शंकरास वाचून दाखविली. नाटकें फारच सुंदर व सरस होती. नवरसानी ओथंबलेली होतीं. वाचून दाखविल्यावर शंकराला तीं फारच आवडलीं व त्याविषयीं त्यानें प्रशंसोद्गार काढले. शंकराच्या दर्शनानें राजाला फार आनंद झाला व मोठी धन्यता वाटली. शंकर कालटी सोडून येण्यास नाकबूल झाल्यामुळें निरुपाय होऊन राजा तेथून जाण्यास निघाला. तेव्हां शंकरांनी पुनः त्याला म्हटलें–राजा, आणखी कांही इच्छा आहे काय ?

**राजाः**– ( हात जोडून ) गुरुदेव ! मला पुत्रसंतति नाहीं. चांगला पुत्र व्हावा अशी इच्छा आहे !

**शंकर**— म्हणाले-राजा, तुझी इच्छा पूर्ण होईल ! काळजी करूं नकोस !

नंतर राजा हर्षभरित होऊन निरोप घेऊन तेथून निघाला.

शंकराला आतां आठवें वर्ष लागलें होतें. तेव्हां आर्याम्बेच्या मनांत शंकराचा विवाह करून आपल्या डोळ्यांचें पारणे फेडावें, अशी इच्छा उत्पन्न झाली. एके दिवशी प्रसंग साधून आर्याम्बेने ही गोष्ट शंकराजवळ काढली. पण शंकरानें विशेष न बोलता फक्त नाक मुरडून आपली नापसंती दर्शविली. तेवढयानें तिचें समाधान झालें नाहीं. सुनमुख पाहण्याची तिची इच्छा बलवत्तर झाली आणि मुलीहि सांगून येऊं लागल्या. तो काळ कांही निराळा होता. बालविवाहाचा तो चालता काळ. मुलाचें आठव्या वर्षी व मुलींचें पांचव्या वर्षीं लग्नें लागत असत. आठव्या वर्षी तर कन्येचें लग्न बहुतेक होईच होई. त्या रूढीला अनुसरून आर्याम्बेने मुलाचे लवकरच चार हात करून, त्याला संसारांत गुंतवावें असें तिच्या मनानें घेऊन त्या दिशेनें प्रयत्न चालविले.

---

# प्रकरण ९ वें

## ऋषि-संदर्शन.

अथ जातु दिदृक्षवः कलावतीर्णमुनयः पुरद्विषम् ।
उपमन्युदधीचिगौतमत्रितलागस्त्यमुखाः समाययुः ॥
( शं. दि. ५-३६ )

एके दिवशी घरांत आर्याम्बा व शंकर सहज बोलत बसलीं असतां कांहीं बैरागी बाहेर दारांत येऊन उभे राहिले. त्यांना पाहून आर्यांबा चटकन् उठून दाराजवळ येऊन त्यांस आंत येण्यास विनंति करती झाली. त्याप्रमाणे ते आंत आल्यावर त्यांचा यथोचित सत्कार करण्यांत आला. त्यावेळीं तिला कळून आलें कीं, ते बैरागी हे उपमन्यु, दधीचि, गौतम, त्रितल व अगस्त्य ऋषी आहेत. तेव्हां तिला फार आनंद झाला. तिनें घरी आलेल्या त्या ऋषींवर्यांचें अर्घ्यपादादिकांनी आदरातिथ्य करून बसावयास त्यांना योग्य आसन दिलें. व शंकराला पुढें करून ' या मुलाचें भविष्य सांगण्याची कृपा करावी ' अशी हात जोडून नम्रतेने विनंति केली.

तेव्हां अगस्त्य ऋषि शंकराकडे सूक्ष्म दृष्टीनें न्याहाळून पाहून तिला म्हणालेः- माउली ! तूं धन्य आहेस ! हा तुझा मुलगा सामान्य नाहीं ! तो महापुरुष आहे ! महाज्ञानी आहे ! प्रत्यक्ष शंकरच तुझ्या पोटीं अवतरला आहे, असें समज ! तूं मोठी पुण्यवान आहेस !

**आर्याम्बाः-** याचें आयुष्य किती आहे, हें सांगावें.

**अगस्त्यः-** हे साध्वी ! तुला माहीत आहे की, तुम्ही चंद्र-मौळीश्वराची आराधना करून त्यास प्रसन्न करून घेतल्यावर त्यानें तुम्हांस वर दिला.

**आर्याम्बाः**– होय, आठवतं तें मला.

**अगस्त्यः**– त्यावेळी तुझ्या पतीने 'मला एकच पुत्र चालेल. पण तो सद्गुणी व सर्वज्ञ असावा.' असा वर मागितला. चंद्रमौळीश्वरानें त्यास कबूली दिली पण सांगितलें कीं, तो अल्पायुषी असेल. त्या वराप्रमाणें हा बालक तुझ्या उदरीं जन्मास आला आहे! हा महाज्ञानी होईल. पण आयुष्य विचारशील तर तो अल्पायुषी आहे.

**आर्याम्बाः**– म्हणजे किती!

**अगस्त्यः**– आतां याला आठ वर्षें झालीं. आणखी आठ वर्षें हा वांचेल. म्हणजे याचें एकंदरींत आयुष्य सोळा वर्षांचें आहे!

अगस्त्य मुनींचें हें मर्मभेदक भाषण ऐकून आर्यांबेच्या छातींत धस्स झालें! दुःखातीरेकानें सर्वांग हादरून गेलें! व डोळ्यांतून अश्रु चमकू लागले! क्षणभर ती भानरहित झाली!! इतक्यांत पुनः अगस्त्य म्हणाले! माऊली! तूं दुःख करूं नकोस! याचें आयुष्य सोळा वर्षांचें असलें तरी सुदैव हे कीं, कांही कारणानें याला पुनः सोळा वर्षांचें आयुष्य लाभेल. एकूण हा बत्तीस वर्षें वांचेल! म्हणजे अधिकांत आधिक याचें आयुष्य बत्तीस वर्षें आहे, तेवढयांत हा महाज्ञानी होईल! मोठा विजयशाली होईल! धर्माला उजाळा देईल व दुर्मतांचा नाश करील! त्याच्या नांवाचा यावच्चंद्रदिवाकरौ जगाला विसर पडणार नाहीं! असा महिमाशाली होणार आहे तुझा मुलगा हा!' असे सांगून आणखी चार उपदेशाच्या गोष्टी सांगून अगस्त्य ऋषींनी तिचें सांत्वन केलें.

अगस्त्य ऋषींचें मूळ वचन आहे तें असेः—

**शरदष्ट पुनस्तथाष्ट ते तनयस्यास्य तथाप्यसौ पुनः।**
**निवसिष्यति कारणान्तराद्भुवनेऽस्मिन् दशषट्चवत्सरान् ॥**

(शं. दि. ५-४८)

पुढें आर्याम्बेचा आतिथ्यसत्कार घेऊन ते ऋषी तेथून जातें झाले.

ऋषी निघून गेल्यावर आर्याम्बा फार बेचैन झाली. पोटांत जणु खंजीर खुपसल्याचे तिला दुःख झाले ! वादळाने केळीचे झाड मुळासकट खवळून हेलकवावें तसे तिचे शरीर आपादमस्तक हादरलें ! तिच्या सर्वांगाचा दाह झाला व चेहरा म्लान व चिंताग्रस्त बनला.

शंकराने आईची ती दुःखद व दुर्मुखलेली स्थिति पाहून तिला म्हटले--आई ! ं ? अशी कष्टी का झालीस ? काय झालं तुला ?

**आर्याम्बाः**-- बाळा ! अगस्त्य ऋषीच्या भविष्यानें मला मोठे दुःख झालें ! माझा जीव कासावीस झाला ! तें भविष्य माझ्या जिवाला जहर विषाप्रमाणें जाऊन झोंबलें ! ! बाळ ! देव करो आणि तुला उदंड आयुष्य लाभो !

**शंकरः**-- आई तुझी इच्छा फार चांगली आहे. पण विधि-लेख कोणाला चुकवितां येणार आहे काय ? तो कोणाला चुकला आहे काय ? जें ठरलें आहे, तें होणारच ! शिवाय, आई ! हें पहा कीं, या शरीराचा तरी काय नेम आहे ? आयुष्याचा काय भरंवसा ? त्याला अनेक आपत्ति ग्रासत असतात, जगाकडे पहा ! तें किती चंचल व क्षणभंगुर आहे ! पाण्यावर बुडबुडे नसतात कां ? तसं आहे आई हें जग ! शोक करूं नकोस ! दुःख करूं नकोस ! विवेक कर आणि आहे त्यांतच समाधान मान ! या चंचल देहावर स्थिरबुद्धी करूं नकोस ? ममता ठेवूं नकोस !

**आर्याम्बाः**-- बाळा ! आहे त्यांतच सुख मानीन पण तुझे दोनीचे चार झालेले पाहिल्यावर ! तुझें लग्न करून, सुनमुख पाहिल्यावर !

**शंकरः–** आई ! तुला खरं सांगतो. पण रागावूं नकोस ! माझ्या मतें हें जग चंचल आहे आणि संसार क्षणभंगुर आहे ! माझें मन या संसारांत मुळूं इच्छीत नाहीं. तेथें खरें सुख नाहीं ! खरें समाधान नाहीं ! खरी तृप्ति नाहीं ! ! भ्रमामुळें अज्ञानीमनुष्य संसारांत सुख आहे असं समजतो. पण वस्तुतः तेथें सुख नाहीं, उलट दुःख मात्र पूर्ण भरलें आहे ! ह्मणून मला संन्यास फार आवडतो ! आई ! मी संन्यासी होईन ह्मणतो. मला तशी परवानगी दे ! देशील ना ?

**आर्याम्बाः–** असं बोलूं नये, बाळ ! अजून तूं लहान आहेस. संन्यास घेण्याचं तुझं वय नाहीं. हें वेड टाकून दे ! तें तुला शोभत नाहीं.

**शंकरः–** असं का ह्मणतेस आई ! मी तो घेणार ! मला त्याची फार फार आवड आहे ! संसारांत माझें मन रमत नाहीं.

**आर्याम्बाः–** असं ह्मणूं नये, शंकर ! तो नाद सोडून दे ! लग्न कर ! वंश वाढीव ! यज्ञयागादि कर ! ऋषि पितरादिकांचे ऋण फेड ! दान धर्म कर ! तीर्थ यात्रा कर ! जगाचा उपभोग घे ! आणि मग खुशाल संसार निवृत्त होऊन, संन्यास घे ! अशी तुझ्या आईची इच्छा आहे. शिवाय आणखी हें पहा, मला तूं एकुलता एकच मुलगा आहेस. तुझ्यावर माझा सगळा जीव आहे. आता मी ह्मातारी होत आले आहे. माझा संभाळ तूं सोडून गेलास ह्मणजे कोण करील ? या माझ्या उतार वयांत तूं मला अंतर देऊं नकोस ! माझें जवळ रहा !

**शंकरः–** आई ! या विचारानें तूं दुःखी–कष्टी होऊं नकोस ! मी सर्व कांही तुझें बरें करीन. तूं निर्धास्त रहा ! तुला अधांतरी ठेवून मी जाणार नाहीं !

एवढ्यावरच हा संवाद स्थगित झाला. पुढें आर्याम्बेच्या मनांत शंकराचें लग्न एकदा लवकर उरकून टाकावें असें भरून, त्या दिशेनें ती प्रयत्नास लागली.

---

## प्रकरण १० वें

## प्राणावर बेतलें !

**जलमगाहत तत्र समग्रहीज्जलचरश्चरणे जलमीयुषः ॥**
**स च रुरोद जले जलचारिणा घृतपदो ह्रियतेऽम्ब करोमि किं ।**
**चलितुमेकपदं न च पारये बलवता विवृतोरु मुखेन ह ॥**

( शं. दि. ५–६१ व ७२ )

अगस्त्यप्रभृति ऋषी आर्याम्बेचा पाहुणचार घेऊन व तिला शंकराचें भविष्य कथन करून तेथून निघून गेल्यावर पुढे कांही दिवसांनी आई व मुलगा दोघें मिळून नदीवर स्नानास गेलीं. आर्याम्बा नदींत उतरून स्नान करून वर आली आणि दुसरें धौतवस्त्र धारण करून, एका बाजूला जाऊन जप करीत बसली. इकडे शंकर नदींत उतरून सरसर पाणी कापींत पात्रांत मधोमध गेला. पण त्यावेळीं दुर्दैव ओढवून आलें ! मगरीनें येऊन त्याचा पाय धरला !! शंकरानें किंकाळी फोडली आणि आक्रोश करून 'आई ! आई ! मेलो ग मेलो ! मला सुसरीनें पाय धरून ओढण्यास प्रारंभ केला आहे ! काय करूं ! माझा उपाय चालेना ! आई ! धांव ! धांव ! मला वांचव !!

मुलाची ही आर्त किंकाळी ऐकून आर्याम्बा चटकन उठून उभी राहिली, तों इतक्यांत पुनः ' आई ! सुसर मला सोडीत नाहीं ! पाण्यांत सारखी ओढून नेत आहे ! आई ! मला वांचव ! !

आर्यांबा धावतच नदीकांठावर आली व मुलाच्या संकटाकडे व धडपडण्याकडे पाहून छाति पिटवीत धाय धाय रडूं लागली व बाजूच्या लोकांना कारुणिक मुद्रेनें दीन स्वरांत मुलास वांचविणेची विनंति करूं लागली ! पण त्या संकटांत उडी घालावयास असा कोणाचा जीव वर आला आहे ? सर्व लोक त्या बालकाकडे दयार्द्र नजरेनें पाहत होते, पण त्याच्या मदतीस जाण्यास कोणीच धजेनात ! ! प्राणसंकटच होते. शंकरानें पुनः किंकाळी फोडली व ओरडून ह्मटलें आई ! मी असंहि मरतो तसंहि मरतो ! मला संन्यास घेऊन मरणाची फार इच्छा आहे ! कृपा करून तेवढी परवानगी दे ! माझी शेवटची इच्छा, आई ! तूं पूर्ण कर ! संन्यास घेण्याची आज्ञा दिल्यास, मला हुरुप येऊन मगरीच्या तोंडातून सुटून येण्याचा प्रयत्न करीन. सुटलो तर शंकर तुला भेटेल, नाहींतर हाच शेवटचा नमस्कार ! ! ! '

आर्याम्बेचें हृदय कळवळलें ! तिचा धीर गेला ! जीव तडफडला ! मुलाची इच्छा पूर्ण करावी ह्मणजे नशीबानें तो सुटला तर मला येऊन भेटेल व जीवंत राहील ' या उद्देशानें निरुपाय होऊन तिनें ' बाळा शंकरा ! तुला संन्यास घेण्याची मी अनुज्ञा देते ! सुटून ये एकदाचा ! संन्यासी होऊन सुखरूप रहा ! ! संन्यास घेतलास तरी माझा शंकर तो शंकरच ! ! '

आईच्या तोंडून वरील शद्ब आल्याबरोबर शंकराला नवीन स्फूर्ति आली व पायानें जोरानें मगरीच्या नाकावर त्यानें लाथ मारली ! त्यासरशीं मगरीनें तोंड आकरून धरलेला पाय सोडून दिला ! परमे- श्वर पावला व शंकर पुनः पोहून तीरावर आला. !! आर्यांबेचा जीव

खाली पडला व त्याला मिठी मारून त्याच्या मस्तकावरून मायेच्या हातानें प्रेमानें कुरवाळलें. नंतर तीं दोघें घराकडे वळलीं.

ही मगरीची आख्यायिका अशी आहे कीं, ती सुसर म्हणजे तो शापित पुष्परथ गंधर्व होता. शंकराच्या पादस्पर्शानें तूं शापमुक्त होशील, असा त्याला उःशाप मिळाला होता. त्याप्रमाणे शंकारच्या पादाचा तिला स्पर्श होताच ती सुसर शापमुक्त होऊन, तिचा पुनः पुष्परथ गंधर्व झाला !! असो.

वरील गोष्ट घडल्यावर कांहीं दिवस तो आईजवळच राहिला. नंतर पुनः संधि साधून संन्यास ग्रहणाचा प्रश्न तिच्या पुढें काढला. आतां आर्यांबेला नाहीं म्हणण्याची सोय नव्हती. वचन देऊन ती चुकली होती. शंकर तिला म्हणाला-आई ! आतां मला इथं करमेनासं झालं आहे. मी तीर्थ यात्रेस जाऊन संन्यास घेईन म्हणतो. आतां माझ्या आड येऊं नकोस ! मी गेलो तरी तुझीं कांही आबाळ होणार नाहीं- घरीं अन्नवस्त्राला कांहीं कमी नाहीं. सर्व कांही यथास्थित आहे. कशाला कांही कमी नाहीं. तुला सुखांत दिवस काढण्यांत अडचण पडणार नाहीं. शिवाय मी आप्तजनास तुझी काळजी घेऊन चांगल्या तऱ्हेनें संरक्षण करण्यास सांगून जातो. ते तुझी उत्तम प्रकारे काळजी घेतील. तुला कांही कमी पडूं देणार नाहींत. प्रसंगोपात् तुझें कांहीं बरेंवाईट झालें तर पुढील सर्व गोष्टी ते यथायोग्य करतील. तर मला आतां देशपर्यटणास जाण्यास परवानगी दे ! !

आर्याम्बेच्या डोळ्यांत अश्रु चमकूं लागले. रहा म्हणण्याचें तिच्या जिवावर आलें आणि जा म्हणण्यास मरणप्राय दुःख होऊं लागलें ! मनाचा हिय्या करून ती म्हणाली-शंकरा ! ' माझ्या पोटीं पुत्र असूनहि माझें और्ध्वदेहिक दुसऱ्यांनीं करावयाचा प्रसंग यावा ना ' ! तूं माझ्या

उदरीं जन्म घेतल्याचें सार्थक काय? माझे अंत्यकर्म तूंच करावस, अशी माझी इच्छा आहे. बा शंकरा! मला आधिक बोलवत नाहीं. तेवढी तुझ्या आईची इच्छा तूं पूर्ण करणार नाहींस काय! माझा उध्दार तूं करणार नाहींस काय? मला सद्गति मिळवून देणार नाहींस काय?' असें म्हणून तिनें दुःखाचा व निराशेचा एक दीर्घ सुस्कारा टाकला.

शंकराला आईची कींव आली. लागलीच तो ह्मणालाः– आई! दुःख करूं नकोस! तुझी इच्छा मी पूर्ण करीन! ज्यावेळी तूं माझें स्मरण करशील, त्यावेळीं उशीर न लावता चटकन् तुझ्याजवळ धांवून येईन. याची खात्री बाळग! आर्याम्बा म्हणाली–शंकरा! तसें मला वचन दे! शंकर उत्तरला–आई! हें घे माझें वचन! आई दिवसा असो, अगर रात्री असो, अथवा केव्हांहि असो, तुला शरीर पराधीन होतेसें वाटल्यावेळीं माझें स्मरण कर! ह्मणजे मी कुठेंहि असलो अगर कसल्याहि कामांत गुंतलेला असलो, तरीं तें जेथल्या तेथें टाकून मी तुझ्याजवळ क्षणाचाहि विलंब न करतां धांवून येतो. आणि तुझें बरें वाईट झालें, तर तुझें अंत्यसंस्कार कर्महि मीच तडीस नेतो, कांहीं काळजी करूं नकोस! असें ह्मणून पुढील प्रमाणे त्यानें आईस धीर दिला.

तें वचन हें असें:—

**'अन्ह्यम्ब रात्रिसमये समयान्तरे वा**
**संचिंतयस्व वशगावशगाथ वा माम् ।**
**एष्यामि तत्र समयं सकलं विहाय**
**विश्वासमाप्नुहि मृतावपि संकरिष्ये ॥'**

(शं. दि. ५–९७)

शंकराचें हें भाषण ऐकून आर्याम्बेला थोडेसें हायसें वाटलें. पुढें ती कांहीं बोलली नाहीं.

---

# प्रकरण ११ वें

## गुरूचा शोध ( व परमार्थ साधन )

तमखिलगुणपूर्णं व्यासपुत्रस्य शिष्या –
दधिगतपरमार्थं गौडपादान्महर्षेः ।
अधिजिगमिषुरेष ब्रह्मसंस्थामहं त्वाम्
प्रसृमरमहिमानं प्रापमेकान्तभक्त्या ॥
( शं. दि. ५–९७ )

निस्तमस्कमिवादित्यं भास्वन्तामिह पावकम् ।
· गोविंद–भगवत्–पाद्–देशिकेंद्रमलक्ष्यत ॥
( चिद्विलास–४६ )

मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे शंकरानें आर्याम्बेला वचन देऊन, तिचें पूर्ण सांत्वन व समाधान केल्यावर तो लागलीच पुढील उद्योगास लागला. तो आपल्या जवळच्या बंधुजनांस भेटून, त्यांस आपला मनोदय व निश्चय कळवून, आपल्या पश्चात् आईचें लक्षपूर्वक संरक्षण करण्याचें वचन घेऊन, तिला त्यांच्या स्वाधीन केली. व पुढें एक दिवस आपणास संन्यास घेऊन परमार्थ साधण्यासाठी तिची प्रेमपूर्वक परवानगी मागितली. किती झालें तरी माय माऊलीच ती ! तिला तसें करणें मोठ्या जिवावर आलें ! तो विचार तिला जहर विषासारखा वाटला व तो क्षण ह्मणजे प्रळयकाळासारखा भासला ! तिचें अंतःकरण भडभडून आलें. पोटांत कालवाकालव सुरू झाली व डोळ्यांत अश्रु चमकू लागले ! पण करणार काय ? मागें वचन देऊन ती चुकली होती आणि त्यामुळेंच बाळ शंकर प्राणसंकटांतून वांचला होता. याची जाणीव तिला होती ह्मणून आतां

तिला ना ह्मणता येईल व मन तसें करण्यास कबूल होईना ! आपल्या एकुलत्या बाळाला–जीवनाधाराला–संन्यास घेऊन, देशोधडीस लावण्यास कोणतें मातृहृदय तयार होईल ? पण येथें गत्यंतरच नव्हतें. शंकरानें तिच्यामागें आतां निकडच लावली व एकदिवस तो हट्टच धरून बसला. आर्याम्बेचा निरुपाय झाला. व सर्व दुःख गिळून व विसरून तिने त्यास मोठ्या कष्टानें परवानगी दिली.

शंकराचें काम झालें व त्याला मोठा आनंद झाला. चटकन् त्यानें मातृदेवतेच्या पायावर मस्तक ठेवून, तिला मोठ्या भक्तीनें व आदरानें वंदन केलें व प्रेमाने आशिर्वाद व निरोप देण्यास तिला विनंति केली. आर्याम्बेनें आतां अंतःकरण घट्ट करून, झालेलें दुःख गिळून, डोळ्यातील आंसवे पुसून, त्याला प्रेमाने जवळ घेऊन पोटाशी घट्ट आवळून धरलें व त्याचें चुंबन घेऊन, पाठीवरून मायेचा अमृत हस्त फिरवून, त्यास शुभाशिर्वाद दिला. व त्याच्या हनुवटीवर हात ठेऊन, बाळा ! शंकरा ! उदंड विजयी हो ! जगाचा ज्ञानदीप हो ! परमार्थाचा सन्मार्ग जगास मोकळा कर ! आईचा तुला उदंड आशिर्वाद आहे ! परमेश्वर तुझा पाठराखा होवो ! जा; बाळा जा ! व संन्यास ग्रहण करून परमार्थाचें साधन कर !! असें ह्मणून त्यास दूर केलें. आईचा आशिर्वाद मिळाला व शंकर पुढील तयारीस लागला.

वरील प्रमाणे मातेचा आशिर्वाद व निरोप घेऊन, आठ वर्षाचा तो बाळशंकर हातांत दंड व अंगावर शुभ्र वस्त्र धारण करून, व कमंडलु घेऊन वेदांतज्ञान–परमार्थज्ञान–प्राप्त करून घेणेसाठीं घरातून बाहेर पडला ! व अद्वैत तत्त्वज्ञान मिळविणेंसाठीं गुरुचा शोध करण्यास्तव कोणी मार्गदर्शक नसतांना एकटाच पायी प्रवास करीत देशोदेश फिरत चालला.

वाटेंत त्यास ठिकठिकाणी सृष्टिदेवतेचें विविध व विचित्र दर्शन घडत चाललें. वाटेंत जाता जातां कोठेकोठें वृक्षाच्छादित निबिड अरण्य,

कोठे कोठें उंचच उंच डोंगर, कोठे पाण्याने तुडुंब भरून वाहणाऱ्या महा नद्या तर कोठें माणसांनी गजबजलेलीं नगरें, कोठें विशाल जलाशयें, तर कोठें झाड--झुडपांनी भरलेलें रान, कोठे दगड खडे काटे कोरांटे यांनी अंथरलेलें रखरखीत माळ, तर कोठें पाताळास जाऊन भिडलेली खोल दरी, कोठें सपाट व सुपीक खिंड तर कोठें हिंस्र व क्रूर पशू व कोठे नानाविध चित्रविचित्र व रंगी बेरंगी पक्षी, असें व यासारखें नटनकुशल सृष्टीचें विविध व विचित्र प्रदर्शन त्याच्या डोळ्यापुढून जाऊं लागलें. प्रवासांत त्याला अनेक तीर्थें व क्षेत्रें लागलीं. त्या दृष्टीनें त्याला तें एक महत्वाचें व उपयुक्त शिक्षणच होतें, असेंच कां ह्मणाना.

जिज्ञासु शंकराचा हा चरित्र भाग वाचीत असता बाळ ध्रुवाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. शंकर आठ वर्षांचा तरी होता पण बाळ ध्रुव हा नुसता पांच वर्षांचा ! कोवळें नि अल्लड पोर ! आईबापानीं त्याचा अपमान करतांच देवाजवळ दाद मागण्यासांठी त्या सर्वांना झिडका- रून, घरदार सोडून एकटाच तो देव शोधार्थ रानावनांत गेला नाहीं काय ! ज्याला उच्च ध्येयाचा सारखा ध्यास लागून राहिलेला असतो, त्याला वय, जात, लिंग, देश, अंतर या गोष्टी मुळींच अडव्या येत नाहींत. त्यांना सगळ्या जगाचा विसर पडतो, पण फक्त तेवढें साध्य मात्र नजरेसमोर राहतें ! फार लांब कशाला शंकराकडेच पहा. फक्त आठ वर्षांचा सुकुमार बाळ ! पण त्याला कशाची भीति वाटली नाहीं की कोणासाठीं जीव घुटमळला नाहीं ! कडकडीत वैराग्य धारण करून ध्येयसिद्धीसाठी तडक निघाला एकटाच गुरूच्या शोधार्थ ! भारतीय संस्कृतीचें हें दिव्य व अलौकिक वैशिष्ट्य मोठें उदात्त व स्पृहणीय व कौतुकास्पद नाहीं, असें कोण ह्मणेल ?

आता येथें असा कोणी प्रश्न करील कीं, त्यावेळीं देशांत आत्मज्ञान सांगणारे व शिकविणारे असे ज्ञानी गुरु कोणी नव्हतें कीं काय ? आमच्या मतें तसे कांही गुरू होते. पण शंकराला जें ज्ञान पाहिजे होतें, तें सांगणारे मात्र नव्हतें ! त्याला पाहिजे होतें अद्वैत ज्ञान ! तें सांगणारे गुरु जवळ जवळ साऱ्या भरतखंडात औषधाला ह्मणून नव्हते !! शिवाय त्याकाळीं वेदाविद्येला फार मोठी अवकळा आली होती. जैन बौद्धांचा चालता काळ होता तो ! वेदज्ञानाला कोणी विचारीत नसत. जिकडे तिकडे पाखंड मताचा उदोउदो चालला होता. जैन श्रवण व बौद्ध भिक्षु यांवर चवऱ्या ढळत होत्या व भंडार उधळला जात होता ! वैदिक पंडितांकडे डोळे उघडून धड कोणी पहात देखील नसत ! मग वेदांताला, तशांत अद्वैत वेदांताला–विचारतो कोण ? असो. शंकराला पाहिजे होता, अद्वैत वेदांत गुरु ! तसा कोणी लोकाच्या पाहण्यांत वा ऐकण्यांत नव्हता. असला तर कोठे तरी गिरिकंदरांत असेल. नाहीं असें नाहीं. पण त्याला शोधून काढणें जरूर होतें आणि हें अवघड कार्य आठ वर्षांच्या शंकरासारख्या एका पोराने उचललें ! तेव्हा त्याच्या धाडसाची तारीफ करावी तेवढी थोडीच नव्हे काय ? असो.

शंकर मजल दर मजल करीत केरळांतून कर्नाटकांत आला. तेथून महाराष्ट्रांत शिरला. मधुन मधून प्रसिद्ध प्रसिद्ध क्षेत्रांत उतरून, तेथें अद्वैत-ज्ञानोपदेश करणाऱ्या गुरूचा शोध घेतला. पण कोठेंच थांग लागेना. पुढें महाराष्ट्रांतून निघून उत्तरेचा प्रवास करीत करीत गुजराथेंत येऊन नर्मदा नदी गांठली. तेथें तपास करतां तेथील अरण्यांत एक योगी यतिराज राहतात, असा अंधुक अंधुक सुगावा लागला. केवढा आनंद त्याचा ! नदीच्या कांठाकांठानें वाटचाल करीत कांहीं अंतर गेल्यावर त्यास एक महाअरण्य लागलें. त्या अरण्यांतच गोविंदनाथांचा आश्रम होता.

पण तो शोधून काढण्याच्या उद्योगांत असतां, कर्मधर्मसंयोगानें त्या निर्जन व एकांतवासांत त्याचा सुगावा लागला ! केवढें तें घनदाट अरण्य व काय तें निर्जन व एकांत स्थान !

होय, अरण्यवास ह्मणजेच एकांतवास आणि एकांतवास म्हणजेच अरण्यवास नव्हे का ? अरण्यवासाशिवाय एकांतवास लाभणें शक्य नाहीं आणि एकांतवासाशिवाय योग साधणें सुलभ नाहीं. म्हणून योगी व ज्ञानी अरण्यवासच पसंत करतात. ज्यांना विश्वाची बीजशक्ति शोधून काढण्याची तहान लागली आहे, ज्यांना सृष्टीचें गूढ उकलण्याचा ध्यास लागला आहे, जे सत्य शोधण्यांत व ब्रह्मचिंतनांत रंगू पहात आहेत अशा योगी, ज्ञानी, तापसी महात्म्यांना एकांतवासासाठीं अरण्यच–गिरिकंदरवासच–पसंत असतो, हें काय आजच नव्यानें सांगावयास पाहिजे !

याज्ञवल्क्यांनी सूर्यनारायणाची तपश्चर्या करून शुक्लयजुर्वेद मिळविला, तो अरण्यांतच ! भगवान बुद्धदेवांनी संबोधिप्राप्त करून घेतली, ती अरण्यांतच ! विश्वामित्र झाले काय, व्यासपुत्र शुकाचार्य झाले काय, या ज्ञानवीरांनी व तसेंच देवभक्तांनी इष्ट सिध्यर्थ एकांतवास पत्करला, तो अरण्यांतच ! प्रभु येशु ख्रिस्त अगर हजरतमहंमद पैगंबर किंवा मोसेस यांस दिव्य स्फूर्ति लाभली, ती अरण्यांतच ! प्राचीन वैदिक ऋषींचें पवित्र आश्रम थाटले गेले, ते नैमिषारण्यांतच ! !

अर्थात् हें अरण्य–हा गिरिकंदरवास–ह्मणजे ज्ञानोपासकांची प्रत्यक्ष कामधेनु ! येथें येऊन व राहून जगातील असंख्य ज्ञानोपासकांनी व देव-भक्तांनी, तसेंच साधुपुरुषांनी व संतमहंतांनी आपणास काय हवें होतें तें सर्व मिळवून, आपला दुर्लभ मानव जन्म धन्य व कृतकृत्य केला व जगाला ज्ञानदीप होऊन व श्रेयस्कर कल्याणमार्ग दाखवून, इतिहासांत अजरामर



मणिकर्णिका घाट ( काशी ) पान नं. २७८

स्थान पटकावून राहिले, ही गोष्ट आज जगाला महाशूरच होऊन राहिली आहे. नाहीं काय ?

याचें कारण असें कीं, येथील एकांत व पवित्र स्थान स्वार्थी व लोभी मनुष्यांच्या प्रापंचिक व व्यावहारिक खळबळी व दगदगीपासून अगदी अलिप्त असते. येथें नितांत शांतता व गंभीर स्तब्धता अखंड नांदत असून, नटनकुशल सृष्टि--सुंदरीचें रमणीय लावण्य सर्वत्र खुलून व मोहरून राहिलेलें असतें. शिवाय मंगल देवदेवतादिकांचा शुभदायक संचार व विहारहि येथें मधुन मधून चालूं असतो. त्याचप्रमाणे विश्वात्म्याची गूढ व सूक्ष्म शक्ति अज्ञ व अल्प अशा जीवात्म्याशी हितगुज करावयास व त्यास अलौकिक ज्ञान, दिव्य स्फूर्ति व अद्भुत सामर्थ्य देऊन, सामान्य जनतेचा देव बनविण्यास सदैव तत्पर असते !

अरण्यातील व गिरिशिखरावरील वास ह्मणजे इहलोकांतला प्रत्यक्ष स्वर्गवासच ! शुद्ध व स्वच्छ हवा, पवित्र व शांत वातावरण, मधुर व निर्मळ उदक, निरभ्र आकाश, शुभ्र पीठा सारखे चांदणें, तेजस्वी तारामंडळ, गगन-चुंबित वृक्षराजि, फल—पुष्पादिकांनी डवरलेल्या विविध वृक्षवेली, फुलांशी मधुर क्रीडा करणारीं फुलपांखरें, झाडावर बसून मंजुळ कूजन करणारे पक्षीगण, गगनचुंबित पर्वत, पाताळास जाऊन भिडलेल्या खोलच खोल दऱ्या ! शिवाय या सर्वांना निर्माण करणाऱ्या त्या विश्वेश्वराचे अगाध ज्ञान, अनुपम कौशल्य, अचिंत्य शक्ति, अपारचातुर्य, अलोट ऐश्वर्य, इत्यादि मनाला मोहविणारे अंतःकरणाला खुलविणारें, बुद्धीला स्फुरविणारे, तें अपूर्व सौंदर्य व आश्चर्यजनक कलाकृति पाहून मनुष्याच्या अंतरंगांत स्फुरण पावणारी आत्म-ज्योत आनंदाने फुंलून नागाप्रमाणे डोलणार नाहीं तर काय करील ?

त्याच वेळेस हेंहि सांगणें जरूर आहे कीं, प्रपंचांत रमलेल्या विषयमूढ मानवाला तें सूक्ष्म व दिव्य ज्ञान गहन व दुर्घट असलें तरीं तेंच

अरण्यांत जाऊन एकांतांत वास करणाऱ्या ज्ञानी व योगीजनांना--ऋषी-मुनींना ध्यानावस्थेंत सहज स्फुरतें असा ज्ञानी व तपस्वी लोकांचा गोड-अनुभव आहे. तात्पर्य काय कीं तर विश्वात्मक बीजशक्तीचें--सृष्टिकर्त्या परमेश्वराचें--मंगल--ज्ञान--प्रातीचें एकमेव पवित्र क्षेत्र ह्मणजेच अरण्य ! तेथील एकांतवास !

---

## प्रकरण ११ (अ) वें

## गुरुदेवाचें संदर्शन

**आदेशमेकमनुयोक्तुमयं व्यवस्य--**
**न्प्रादेशमात्रविवरप्रातिहारभाजम् ।**
**तत्र स्थितेन कथितां यमिनां गणेन**
**गोविन्ददेशिकगुहां कुतुकी ददर्श ॥**

(शं. दि. वि. ५-९२)

त्या पवित्र व सुमंगल अरण्यांतील नटनकुशल निसर्गसुंदरीचें नितांत मनोहर व रमणीय सौंदर्य पाहून शंकराचें मन प्रसन्न झालें व प्रवासाचा सारा शीण पार जेथल्या येथें मावळून गेला ! आतापर्यंत सोसलेल्या प्रवासश्रमाचा सगळा परिहार होऊन, त्याची तहानभूक सगळी हरपून गेली ! जिकडे तिकडे थंडगार सावली देणारे मोठमोठे विशाल वृक्ष,

मधुन मधून विविध फळांनी डवरलेलीं फळझाडें, व तेथें तेथें झाडाला विळखे घालून सुंदर सुवासिक फुलांनी बहरलेल्या हंसऱ्या वेली ! झाडांवर किलकिलाट करणारे रंगीबेरंगी पक्षी व इकडे तिकडे उडत उडत धांवपळ करणारीं हरिणांची कळपें व ठिकठिकाणी झुळझुळ वाहणारे मधुर पाण्याचे निर्मल निर्झर ! या सर्व नयनमनोहर हर्षकारक गोष्टींनी त्या प्रदेशाला एक प्रकारचें दिव्य सौंदर्य, मंगल पावित्र्य व रुचिर शुचिर्भूतता आली होती ! !

त्या अरण्यांतून वाटचाल करीत करीत कांही अंतर पुढें गेल्यावर झाडांवर मृगचर्म, कौपीन, लंगोटी वगैरे मुनिजनांची वल्कलें वाळत टाकलेलीं त्यास दिसून आलीं, त्यावरून तो प्रदेश मुनिजनांचें निवासस्थान असावा असा तर्क केला. तेथें गेल्यावर त्यास एका बाजूला कांहीं मुनिजन एकत्र बसून आपापसांतच गप्पागोष्टी पिटत आहेत असें त्यास दिसलें. तसा तो कोणाचा आश्रम असावा हें समजून घेण्यासाठीं त्या मुनीजनांजवळ जाऊन विचारपूस करतां तो आश्रम श्रीगोविंदनाथ यतिराजाचा आहे असें त्यास कळून आलें. व ते मुनिजन त्याचे शिष्य असून गुहेच्या रक्षणार्थ तेथें बसले आहेत हेंहि समजून आलें.

चार पावलें पुढें जातांच गुहेचें लहानसें विवर लागलें. गुहा सर्व बाजूंनी सुवासिक फुलवेलींनी दाट वेढून गेली होती. शंकरानें त्या गुहेवर आपली दृष्टि फिरविली. तेथील दिव्य सृष्टिशोभा पाहून त्याचे नेत्र दिपून गेले. केवढा त्याचा तो आनंद ! त्याला त्रिभुवन ठेंगणेच झालें ! त्या जिज्ञासु जिवाला ! मुमुक्षु साधकाला ! मोराला मेघदर्शन झालें ! गरीबाला कामधेनु भेटली ! बुभुक्षिताला अन्नपूर्णा दिसली ! चातकावर अमृतवृष्टि झाली ! लागलीच त्याचें अंतःकरण भक्तिभावनेने उचंबळून येऊन त्या भरांत हात जोडून गुहेला तीन प्रदक्षिणा घातल्या. व गुहेच्या

दाराजवळ येऊन गुरुदेवाला साष्टांग नमस्कार केला व आंत प्रवेश करून ध्यानस्थ स्वामीच्या समोर हात जोडून उभा राहिला.

गुरुदेव श्री गोविंदनाथ ! केवढी तेजःपुंज मूर्ति ! केवढा प्रसन्न चेहरा ! काय दिव्य कांति ! तें कषाय वस्त्र ! तें शुभ्र भस्मलेपन, त्या सुवर्णानें मढविलेल्या टपोऱ्या रुद्राक्ष-माळा, ती पद्मासन घालून डोळे मिटून ध्यानस्थ बसलेली भव्य व दिव्य मूर्ति !! सूर्यासारखी निष्कलंक व अग्नी सारखी प्रकाशमान ! त्या मंगल मूर्तीचें पवित्र दर्शन घडतांच शंकराचें अंतःकरण भावभक्तीनें उचंबळून आलें व सर्वांग आनंदातिरेकाने शहारून गेलें ! मन संतोषलें ! बुद्धि प्रसन्न झाली ! डोळे धन्य झालें ! गुरुमाउलीचें मंगल दर्शन घडलें ! व पाडसाचा जीव खाली पडला !!! त्यावेळेला शंकराची काय स्थिति झाली असेल, हें अजमावणें कल्पना—
[illegible] आहे !!! असो

पुढें कांही वेळानें गोविंदनाथाची समाधि उतरली. व डोळे उघडून पाहतात तो दारांत समोर हात जोडून उभी असलेली बालमूर्ति यतिराजाची त्या बालरवीकडे त्यांची दृष्टि गेली, इतकेंच नव्हे तर त्या तेजस्वी मूर्तीवर दृष्टि खिळली ! तोंच शंकराच्या मुखांतून निघालेला स्तुतिपर श्लोक त्यांच्या कानावर आला. तो श्लोक हा असाः—

उरगपतिमुखादधीत्य साक्षा-
त्स्वयमवनेर्विवरं प्रविश्य येन ।
प्रकटितमचलातले सयोगं
जगदुपकारपरेण शब्द भाष्यम् ॥ ९६ ॥
तमखिलगुणपूर्णं व्यासपुत्रस्य शिष्या-
दधिगतपरमार्थं गौडपादान्महर्षेः ।
अधिजिगमिषुरेष ब्रह्मसंस्थामहं त्वा
प्रसृमरमहिमानं प्राषमेकान्त भक्त्या ॥ ९७ ॥

**भावार्थः**– स्वतः पातालांत जाऊन शेषाच्या मुखांतून योगशास्त्र, वैद्यक व परमार्थसार या शास्त्रांचें अध्ययन करून, येथें भूमीवर अवतार धारण करून पतंजलिरूपानें व्याकरणशास्त्र ज्यांनी प्रकट केलें, अशा त्या सकलगुणपरिपूर्ण पतंजलिस्वरूप महात्म्यापाशी व ज्यानें व्यासपुत्र शुकाचार्य, त्याचा शिष्य गौडपाद महर्षि त्याच्याकडून परमार्थज्ञान मिळविलें असा जो विशालमहिमाशाली त्या तुज गुरुप्रत ब्रह्मविद्या शिकण्याच्या इच्छेनें अनन्य-भक्तिपूर्वक मी येथें आलो आहे. (शं. दि. ५–९७–९८)

हें स्तुतिस्तोत्र त्या बालजिज्ञासुजीवाच्या तोंडातून कानावरपडतांच गोविंदयतींचें मन हर्षातिरेकानें फुलून आलें आणि त्या गुरुमाउलीच्या कोमल अंतःकरणांत वात्सल्याचा पान्हा फुटला ! आणि लागलीच त्यांच्या तोंडातून शद्ब बाहेर फुटले– बाळ, तूं कोण ?

या प्रश्नाला त्या बाळ शंकरानें जें उत्तर दिलें तें मोठें मार्मिक व अर्थपूर्ण आहे. त्यानें असें ह्मटलें नाहीं की माझें नांव अमुक, मी अमक्याच मुलगा, माझें गांव अमुक. अशा प्रकारचें लौकिक उत्तर त्याने दिलें नाहीं. तर पुढील प्रकारचें तत्त्वगर्भ उत्तर त्याच्या तोंडातून बाहेर आलें. तो उत्तरला :—

**"स्वामिन्नहं न पृथिवी न जलं न तेजो**
**न स्पर्शनो न गगनं न च तद्गुणा वा ।**
**नापीन्द्रियाण्यपि तु विद्धि ततोऽवशिष्टो**
**यः केवलोऽस्ति परमः स शिवोऽहमस्मि ॥**

(शं. दि. ५–९९)

**भावार्थः**– स्वामिन् ! मी कोण असें आपण विचारता– तर तो मी नव्हे, मी पृथ्वी नव्हे, जल नव्हे, तेज नव्हे, वायु नव्हे, आकाश नव्हे,

व यांचा संघात ह्मणजे जड देहहि नव्हे ! त्याचप्रमाणें मी इन्द्रियें नव्हे, मन नव्हे, बुद्धिहि नव्हे, अर्थात् मी इन्द्रिययुक्त जड देह नव्हे ! तर त्याहून निराळें असें जें केवळ चैतन्यघन परम तत्त्व आहे, तें शिवरूपें मी आहे. प्रत्यक्ष केवळ शिवच-शंकरच—मी आहे ! !

किती मार्मिक, किती सुंदर, किती समर्पक उत्तर ! परमार्थाचा शुद्ध गाभाच ! तत्त्वज्ञाचा बीजमंत्रच ! वेदांताचें परम रहस्यच !! हें त्या बालमुखांतून अर्थपूर्ण व सत्यगर्भ सुंदर उत्तर ऐकतांच गोविंदयतीचें अंतःकरण हर्षानें भरून आलें ! कौतुकानें मान डोलविली ! डोळे झांकून अंतर्दृष्टीनें सूक्ष्म विचार केला व डोळे उघडून त्याला जवळ घेऊन यतिराज ह्मणाले:— शंकरा ! ये असा पुढें, तुला काय पाहिजे ? काय तुझी इच्छा आहे ? कशासाठी घरदार सोडून तूं इकडे आलास ?

शंकर उत्तरला--यतिराज ! मला परमार्थज्ञान पाहिजे. सत्यज्ञान जाणण्याची माझी इच्छा आहे. अद्वैतज्ञान समजून घेण्याची मला तहान लागली आहे. त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करून मी येथें आपल्या पायाजवळ आलो आहे. गुरुमाउलींनी वत्सावर कृपा करून तेवढी मला भिक्षा घालावी. असें म्हणून त्याने गुरुदेवास साष्टांग नमस्कार घातला.

त्या बालमूर्तीची ज्ञानलालसा व वैराग्यवृत्ति पाहून यतीश्वरांना मोठें आश्चर्य व कौतुक वाटलें.

गुरुमाउलीच ती ! पूर्ण कृपेची साउली ! यति राजाचें अंतःकरण विरघळलें व दयेचा पान्हा फुटला ! त्यांनीं बाळाला दोन्ही हातानीं उठवून प्रेमाने जवळ घेतलें व त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून त्यास अभयसूचक प्रेमळ शद्बांत ह्मटलें तें असें:—

**मा भैष्ट विद्वन्स्तव नास्त्यपायः ।**
**संसारसिन्धोस्तरणेऽस्त्युपायः ॥**
**येनैव याता यतयोऽस्य पारम् ।**
**तमेव मार्गं तव निर्दिशामि ॥**

( विवेक चूडामणि ४५ )

**भावार्थः**- हे बटुवर्या ! तूं कांहीं चिंता करूं नकोस ! घाबरूं नकोस ! किंवा निराशहि होऊं नकोस ! तुला कसलाहि अपाय होणार नाहीं. हा दुस्तर संसारसागर तरून जाण्यास उपाय आहे, कीं ज्या उपायानें यतिलोक भवसागर तरून जाते झालें. तोच मार्ग मी तुला उपदेशित आहे.

ही अभयसूचक अमृतवाणी गुरुदेव श्री गोविंदपूज्यपाद यतिवर्यांच्या दिव्य मुखांतून त्या लहानग्या शंकरबटूच्या आशाळभूत कानावर पडतांच त्याच्या अंतःकरणांत नवचैतन्याची लहर चमकून गेली. व त्याचे मुखकमल आनंदाने प्रफुल्ल झाले व डोळ्यांत आनंदाश्रु चमकूं लागलें. भुमुक्षिताला कामधेनु भेटली व शंकराचा जीव खाली पडला.

इतक्यांत गुरुदेव ह्मणालेः- शंकरा ! तुझी इच्छा पूर्ण होईल, तूं इथेंच मजजवळ रहा आणि पारमार्थिक ज्ञान--अद्वैतविद्या--लक्ष देऊन ग्रहण कर ! अद्यापि कोणाला उमजलें नाही अशी गूढ व गहन विद्या तुला शिकवितो. ती ग्रहण करून स्वतःचे सार्थक कर व मुमुक्षु जगाचा उद्धार कर ! असें ह्मणून त्यानीं त्याला पुढील उपदेश केला.

ते ह्मणालेः-


**‘ अस्त्युपायोमहान्कश्चित्संसारभयनाशनः ।**
**येन तीर्त्वा भवाम्बोधिं परमानन्दमवाप्स्यसि ॥**

( विवेक चूडामणि ४६ )

' सबिन्दुसिन्धुसुस्खलत्तरंगभंगरंजितम्
द्विषत्सु पापजातजातकादिवारि संयुतम् ।
कृतान्तदूतकालभूतभीतिहारिनर्मदे
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥ १ ॥
( नर्मदाष्टक )

या श्लोकापासून भगवति नर्मदेची स्तुति करण्यास प्रारंभ केला. पण नर्मदा त्यास दाद न देतां तशीच जोरजोरानें उफाळून जाऊन तिच्या भयंकर लाटा गुहेच्या दारांत धडाधड येऊन आदळूं लागल्या ! अष्टकांतला शेवटचा श्लोक ह्मणून आचार्यांनी आपला कमंडलु पुढे धरला. त्याला स्पर्श होतांच चमत्कार असा झाला कीं त्या पुराला एकदम पायबंद बसला. पुढे पाणी सरकेनासें झालें व पुराला ओहटी सुरूं झाली ! लवकरच आपलें रुद्ररूप आवरते घेऊन नर्मदा माई आस्ते आस्ते मागे सरकत चालली व गुहेवर ओढवलेले संकट निरस्त झालें ! ! गुरुदेव सुरक्षित राहिले. व त्यांची समाधि निर्विघ्न पूर्ण झाली. तेथील शिष्यांना हा चमत्कार पाहून मोठा अचंबा वाटला व आचार्यांच्या धैर्याची व प्रभावाची मुक्तकंठानें स्तुति करून त्यानीं त्यांस धन्यवाद दिले.

हा प्रकार झाल्यावर आचार्य तेथें फार दिवस राहिले नाहींत. गोविंदपादयतीजवळ तीनवर्षें राहून ते अद्वैत विद्येंत पूर्ण तरबेज झाले. त्यानीं ब्रह्मसूत्रावर व उपनिषदांवर पूर्ण नैपुण्य प्राप्त करून घेतले. आतां शिकायचें असें नवीन कांहीं राहिलें नाहीं. आचार्यांची विद्यापारंगतता पाहून गुरुदेवाला फार आनंद झाला. त्यांना मोठी धन्यता वाटली. आतां पुढें आश्रमांत राहण्याचें कारण नाहीं असें पाहून एके दिवशी गोविंदपादांनी आचार्यांस



काशीविश्वनाथ सुवर्णशिखर



काशीविश्वनाथ ( काशी ) पान नं. ७८

बोलावून घेऊन अद्वैत विद्येचा लोकांत प्रचार व प्रसार करण्यासाठीं काशीस जाऊन राहण्यास त्यांस आज्ञापिलें. त्याप्रमाणें आचार्यांनी गुरुदेवास नमस्कार करून, त्यांचा आशीर्वाद घेऊन तेथील कांहीं शिष्यांस बरोबर घेऊन काशीचा रस्ता धरला.

---

## प्रकरण १२ वें

## काशीवास

**स्नात्वैव तोये मणिकर्णिकायां विश्वेश्वरं प्रत्यहमर्चतिस्म ।**
**वासंचकारानिशमेव शिष्यैःसाकं स घट्टे मणिकर्णिकायाः ॥**

( चिद्विलास, शं. वि. १२–२ )

**अमानुषं तस्य यतीश्वरस्य विलोक्य बालस्य सतःप्रभावम् ।**
**अत्यंतमाश्चर्ययुतांतरंगाः काशीपुरस्था जगदुस्तदेत्थम् ॥**

( शं. दि. ६–८१ )

गोविंदपादयतींनी त्यांना निरोप दिल्यावर अकरा वर्षांचे आचार्य काशीस जावयास निघाले. गोविंदपादयतिजवळ असतांना आचार्यांची बुद्धिमत्ता व आचरण पाहून तेथील कांहीं शिष्यांची भक्ति व श्रद्धा त्यांच्यावर बसली व आचार्यांबरोबर हे शिष्यहि काशीयात्रेस जावयास

निघाले. मजल दरमजल करीत शेवटी आचार्य काशीस येऊन पोंचले. व तेथें मणिकर्णिका घाटावर त्यानीं तळ दिला. त्यावेळीं त्यानी काशीला उद्देशून पुढील श्लोक ह्मटला. तो हाः—

काशीधन्यतमा विमुक्तनगरी सालंकृता गंगया
तत्रेयं मणिकर्णिका सुखकरी मुक्तिर्हि तत्किंकरी ।
स्वर्लोकस्तुलितः सहैव विबुधैः काश्यासमं ब्रह्मणा
काशी क्षोणीतलेस्थिता गुरुतरास्वर्गो लघुःखेगतः ॥

( मणिकर्णिकाष्टकं )

नंतर गंगेंत उतरून स्नान करून नित्य विश्वेश्वराची पूजाअर्चा करण्याचा त्यानीं परिपाठ ठेविला.

काशीस आल्यावर त्यांनी मणिकर्णिकेच्या घाटावर बसून शिष्यांस अद्वैतमताचा पाठ देण्यास व त्यावर उपन्यास करण्यास प्रारंभ केला. त्यावेळीं बाहेरचे लोकहि हळुहळूं त्यांचें उपन्यास ऐकण्यास जमूं लागले. आचार्यांचें अस्खलितवाणीनें चाललेलें तें अमृतमधुर प्रवचन ऐकून परम-हर्षित होऊन आनंदानें परत जात. त्यांचा बोलबाला आतां काशीक्षेत्रांत वाढूं लागला व पुढेपुढे मोठमोठे विद्वान पंडित लोकहि त्याचें उपन्यास ऐकण्यास मोठ्या उमेदीनें येऊं लागले.

एके दिवशी आचार्य घाटावर बसले असतां एक ब्राह्मण तरुण त्यांचेपाशी आला व त्यांस साष्टांग नमस्कार घातला. आचार्यांनी त्याजकडे पाहिलें. त्या तरुणाचा सात्विक व तेजस्वी चेहरा पाहून त्यांना मोठें प्रेम वाटलें व त्यास उद्देशून म्हणाले ' तूं कोण ? कुठून आलास ?

तरुण म्हणाला–' यतिराज ! मी एक ब्राम्हणपुत्र असून तत्त्वजिज्ञासु आहे. मला सत्यज्ञानाची तीक्ष्ण उत्कंठा लागलेली आहे. त्यासाठी मी पुष्कळ हिंडलो फिरलो व पुष्कळ साधू–महतांच्याजवळ राहिलो. पण माझें समाधान झालें नाहीं. गुरूचा तपास करीत करीत मी येथें आलो व आपली कीर्ति ऐकून आपणास शरण आलो आहे. गुरुदेवांनी माझा अंगिकार करून, मला सदुपदेश देऊन माझा उद्धार करावा. आपला शिष्य होऊन, शेवटपर्यंत आपल्या पायापाशी राहीन म्हणतों. तर गुरुदेवांनी अनुग्रह करून मला संन्यासदीक्षा द्यावी व आपल्या सेवेचा लाभ द्यावा. ' त्या तरुणाच्या चेहऱ्याकडे पाहून व भाषण ऐकून त्यांच्या अंतःकरणांत त्याच्याविषयीं आत्मीयता उत्पन्न झाली व त्यास दीक्षा देऊन जवळ ठेवून घेतलें. त्यादिवसा-पासून तो आचार्याजवळच राहूं लागला. हा त्यांचा प्रथम पट्टशिष्य होय.

या सनंदनाची थोडीशी पूर्व हकीकत सांगण्यासारखी असल्यामुळें ती थोडक्यांत येथें देतो.

हा सनंदन दक्षिणेकडचा राहणारा. त्याचे मूळचें नांव विष्णु. त्याच्या बापाचें नांव माधवाचार्य व आईचें नांव लक्ष्मी. वासस्थान अहोबल-क्षेत्र. माधवाचार्य मोठा विद्वान व तसाच मोठा धनाढ्य पुरुष असून तो काश्यपगोत्री ऋग्वेदी बाम्हण होता. तो नरसिंहाचा एकनिष्ठ उपासक होता. सनंदनाचें आईबाप लहाणपणींच वारल्यामुळें, विष्णूचें रक्षण व शिक्षण पुढें त्याच्या मामाच्या घरींच झालें. मामाचें नांव दिवाकरध्वरी असें असून, तो प्रख्यात मीमांसक प्रभाकर भट्ट याचा पट्टशिष्य होता. याच्या देखरेखे-खालीच वेदशास्त्राचें शिक्षण घेऊन सनंदनहि मोठा विद्वान पंडित झाला. मामाने आपली मुलगी देऊन त्यास घरजावई करून घेतलें. पण पुढे मामाचे व त्याचे पटेनासें झालें. दोघांतला मतभेद तीव्र झाल्यामुळे सनंदन वैतागून व वैराग्य धारण करून मामाच्या घरांतून पाय काढून बाहेर पडला.


व नव्या गुरूचा शोध करीत करीत अखेर काशीस येऊन थडकला. या इकीकतीचा आधार गोवर्धनपीठाच्या मठाम्नायमध्यें खालील प्रमाणें आढळतो. तो असा:—

गोवर्धनमठेरम्ये विमलापीठ संज्ञके ।
पूर्वाश्रमे [illegible] श्रीमत्काश्यपगोत्रजः ॥
माधवस्य सुतःश्रीमान् सनंदन इतिश्रुतः ।
प्रकाश ब्रह्मचारीच ऋग्वेदी सर्वशास्त्रावित् ॥

( चिद्विलासकृत शंकर विजय विलास, अ. १० श्लो. १२ ते २० )

हा मजकूर गोवर्धनपीठाच्या मठाम्नायांत येण्याचें कारण पद्मपाद हे या पीठाचे पहिले जगद्गुरु होत. असो.

काशींत आतां आचार्यांचा लौकिक चांगलाच वाढला. व जमहि तसाच बसत चालला. आतापर्यंत ब्रम्हसूत्रावर अद्वैतपर प्रवचन काशींत कोणींच केलें नव्हतें, तें या बाल संन्याशानें मोठ्या कुशलतेनें व अधिकार-वाणीनें मार्मिक विवेचन करून, श्रोतृवृंदाला नागाप्रमाणें मंत्रमुग्ध करून डोलविण्याचे श्रेय घेतलें ! घाटाखाली पापहारक गंगामाता वाहत होती. तिच्याशी स्पर्धा करण्याकरितांच की काय आचार्यमुखांतून ज्ञानगंगा अस्खलितपणे बाहेर उफाळून येत होती ! त्यांचें प्रवचन ऐकायला मोठमोठे पंडित व वृद्धलोक यांची तेथें तोबा गर्दी जमूं लागली. व प्रवचन ऐकून परत जातांना आचार्यांची अगाध बुद्धिमत्ता, अपूर्वप्रतिभातेज, अलौकिक वाक्चातुर्य, अखंड वक्तृत्वप्रवाह पाहून, जो तो त्यांचें कौतुक करीत त्यांना धन्यवाद देत, घराकडे वळत असे. त्या बाल आचार्यांचा अलौकिक ज्ञान-



श्री बद्रीनाथ, पान नं. ९४

प्रभाव पाहून जो तो आश्चर्यानें चकित होऊन तोंडांत बोट घाली व त्यांचें मनःपूर्वक गोडवे गाई ! त्याचें वर्णन शंकर दिग्विजयांत पुढील प्रमाणें केलेलें आढळतें. तें वचन हें—

**अमानुषं तस्य यतीश्वरस्य**
**विलोक्य बालस्य सतः प्रभावम् ।**
**अत्यंतमाश्चर्ययुतान्तरङ्गाः**
**काशीपुरस्था जगदुस्तदेत्थम् ॥**

( ७-८१ )

तसें सांगावयाचें म्हणजे काशीपुरस्थाना तो एक मोठा ज्ञानसोहाळाच झाला होता, असे सांगितल्यास त्यावर अतिशयोक्तीचा आरोप मुळींच येणार नाहीं.

—

## प्रकरण १३ वें

## शंकर-चांडाल-भेट

**शंकरो दिवसमध्यमभागे पंकजोत्पलपरागकषायाम् ।**
**जान्हवीमभिययौ सहशिष्यैरान्हिकं विधिवदेषविधित्सुः ॥**

( ६-२४ )

**सोऽन्त्यजं पथि निरीक्ष्य चतुर्भिर्भीषणैःश्वभिरनुव्रतमारात् ।**
**गच्छ दूरमिति तं निजगाद प्रत्युवाच च स शंकरमेनम् ॥**

( शं. दि. ६-२४ व २५ )

ती दोनप्रहरची वेळ. सूर्य अगदी मध्यान्हावर आलेला. आन्हिक कर्माचरणाची योग्य संधि. अशावेळीं आचार्य शिष्यपरिवाराला बरोबर घेऊन मध्यान्हीचें आन्हिक आटपण्यासाठी मणिकर्णिका घाटाकडे निघाले होते. पण कर्मधर्मसंयोगानें त्यादिवशीं एक विचित्र घटना घडून आली. राजमार्गावरून अस्पृश्यास जाण्यास सक्त मनाई असतांना एक चांडाल चार कुत्रे बरोबर घेऊन त्या रस्त्यावरून राजरोज आचार्यांस सामोरा आला. त्याच वाटेनें आचार्य आपल्याकडे येत आहेत, हे पाहून देखील तो बाजूला सरकला नाही. आचार्य अगदी जवळ आले, तरी तो बाजूस सरकण्याचा रंग दिसेना. जवळ जवळ रस्ता रोखून धरला त्यानें, त्या चांडालानें ! असेच कां म्हणाना.

त्याचा हा उद्दामपणा पाहून व रस्त्यावरून बाजूस होत नाहीं हें जाणून, आचार्य जरा दटावून त्यास म्हणाले "काय रे चांडाला ! ! भर रस्त्यावर असा उभा कां ? रस्ता अडवून धरला आहेस, तुला कांहीं वाटत नाही काय ? हो बाजूला ! कर रस्ता मोकळा ! चांडाल तूं ! रस्ता कसा अडवतोस ?"

'स्वामी !' तो उत्तरला 'आपण संन्यासी ना ?'

आचार्यः– तुला दिसत नाहीं काय ? मूर्ख कुठला ! होय, मी संन्यासी.

चांडालः– अद्वैत तत्त्वाचे प्रणेते व उपदेशक ते आपणच ना ? शिष्यांना त्याचा उपदेश करतां ना ?

आचार्यः– मग ? तुला काय करावयाचें आहे त्याच्याशी ? हो दूर, नि कर रस्ता मोकळा !

चांडालः– यतिवर्य ! क्षमा करा ! अजून आपणास अद्वैत-तत्त्वज्ञानाचें पूर्ण ज्ञान झालेसें दिसत नाहीं ! मडकें अजून कच्चें राहिलें आहे !

आचार्यः— माझा पक्केपणा—कच्चेपणा—घेऊन तुला काय करायचा आहे ! तुला कोणी विचारलें ? फाजील कुठला ! उपदेश करायला आला आहे मोठा ! चांडाला ! तुझें भाषण अनाठायीं आहे. लहान तोंडी मोठा घांस घेणें चांगलें नाहीं !

चांडाल ( नम्रतेनें )— यतिराज ! आपण ' दूर हो ' असें ह्मणाला, तें कोणाला उद्देशून ? सांगा ! कृपा करून सांगा मला, कोणाला उद्देशून ? आत्म्याला कां शरीराला ?

आचार्यः— म्हणजे ?

चांडालः— म्हणजे तें असें. आपण आत्म्याला उद्देशून म्हणत असाल, तर तें आपल्या अद्वैत मताला विरुद्ध आहे ! वावडे आहे ! बाधक आहे ! मग आपणास अद्वैत तत्त्वच समजलें नाहीं, असें म्हणावे लागेल !

आचार्यः— आहेस चांडाल आणि दाखवितोस मोठा अद्वैताचा आव ! सांग तुझा अद्वैतवाद तरी काय आहे ?

चांडालः— मुनिवर्य ! मी जातीनें चांडाल आहे ! मी अस्पृश्य आहे ! काय सांगणार मी आपल्यासारख्या आचार्य देवापुढें ! पण माझें चांडालाचें अद्वैत ज्ञान असें आहे.

आचार्यः— कसें आहे ?

चांडालः— तें असें आहे. आत्मवस्तु जी आहे, ती सर्व विश्वांत सर्वत्र सारखीच भरून आहे ! ती एकच्च एक आहे ! ती आंत आहे व बाहेरहि आहे ! वर आहे, खाली आहे ! ती सर्व प्राणिमात्रांत आहे. व सर्व स्थावर वस्तूंतहि आहे ! ती तुमच्यांतहि आहे, माझ्यांतहि पण आहे ! ती भेदरहित आहे ! ती नित्य आहे ! शुद्ध आहे ! ती विटाळत

नाहीं ! अपवित्र होत नाहीं ! सदैव शुद्ध, बुद्ध, मुक्त अशीच राहते ! ही आत्मवस्तु ! हें माझें चांडालाचें असें तत्त्वज्ञान आहे ! अद्वैत ज्ञान म्हणतात तें याला ! मग आतां सांगा, 'मी ब्राम्हण, तूं चांडाल' असें जें आपण म्हणाला, तें तुमचें तत्त्व आत्म्याला कसें व कोठें लागूं पडतें ? तें पटवून द्याल कां मला ? मी अज्ञान आहे ! मूर्ख आहे ! अस्पृश्य आहे !! 'मी ब्राम्हण पवित्र, तूं चांडाल अपवित्र, अतएव तूं दूर हो ! बाजूला सरक ! ' असें म्हणणे, यतिवर ! अद्वैतवाद्याला कसें शोभतें ? तें कसें युक्त आहे ? ब्राम्हण व चांडाल या दोघांच्यामध्येंहि एकच आत्मतत्त्व-चैतन्यभाव-स्फुरत आहे ना ? तो एकच पुराण पुरुष तुमच्यांत व माझ्यांत दोघांमध्येंहि वास करून राहतो ना ? मग त्यांत चांडाल कोण व ब्राम्हण कोण ? आणि कोण कोणाला वाट देणार ? व कोण कोणापासून दूर सरकणार ? हें सर्व एकच आहे. हे माझें तत्त्वज्ञान आत्म्याविषयीं हें असें आहे. आतां आपलें अद्वैतज्ञान सांगा पाहूं.

हें चांडालाचें भाषण मूळ शद्बांत पुढीलप्रमाणें आहेः—

**'ब्राम्हणश्वपदविचारः प्रत्यगात्मनि कथं तव युक्तः ।**
**बिंबतेऽम्बरमणौ सुरनद्यामन्तरं किमपिचास्ति सुरायाम् ॥**
॥ ६–२९ ॥

**'शुचिर्द्विजोऽहं श्वपच्चव्रजेति मिथ्याग्रहस्ते मुनिवर्य कोऽयम् ।**
**सन्तं शरीरेष्वशरीरमेकमुपेक्ष्यं पूर्णं पुरुषं पुराणम् ॥ '**
( शं. दि. ६–३० )

आचार्यः– पुढें तुझें म्हणणें काय ?

चांडालः– वरील भाग आत्म्याविषयीं झाला. आतां आपण शरीराला उद्देशून म्हणत असाल, तर तेंहि माझ्यामतें युक्त नाहीं. दोघांचेंहि

शरीर अन्नापासूनच झालें आहे व अन्नावरच वाढलें आहे. दोघांच्या शरीरांत निराळें असें कांहींच नाहीं. अवयवादि शारीरिक रचना दोघांची सारखीच. आणि घटकद्रव्येंहि सारखींच ! मग माझेंशरीर पवित्र व तुझें अपवित्र, हें जाणत्यानें कसें व कां म्हणावें ? दोघांच्याहि देहांतील तत्त्वें-घटकद्रव्यें-एक व सारखीच असल्यावर पवित्र व अपवित्र हा भेद तेथें कोठून आला ? कशामुळें आला ? हें आपण मला समजावून सांगाल कां ? मुनिवर्य ! गंगेच्या पाण्यांत व मद्याच्या कुंभांत सूर्याचें प्रतिबिंब सारखेंच पडतें. पण म्हणून सूर्यांत त्यापासून कांहीं फरक होतो कां ? गंगेत प्रतिबिंब पडतें म्हणून सूर्य पवित्र व मद्याच्या भांड्यांत पडतें म्हणून सूर्य अपवित्र, असें आपण म्हणतां काय ? तद्वत् सर्व प्राणिमात्रांच्या-ब्राह्मणचांडाला-दिकांच्या-शरीरांत स्फुरण पावणारी प्रतिबिंबित चैतन्यवस्तु भिन्न भासली, तरी मूळ आत्मवस्तु ही एकच अभिन्न आहे. तेथें भेद नाहीं. शुद्धाशुद्ध नाहीं, उच्चनीच नाहीं, हें आपण जाणत असूनहि आपला द्वैत-भाव-अहंकार-मी-तूंपणा-गळून पडूं नये, हें आश्चर्य नव्हे काय ? हा ब्राह्मण, हा चांडाल हा भेद भ्रममूलक नाहीं काय ? सांगा, आचार्यदेव ! हा भ्रम --शुद्ध भ्रम-नव्हे काय ? हा दुराग्रह नव्हे काय ? सांगा ! माझें कोठें चुकतें तें मला सांगा ! यावर आपलें अद्वैत आचार्यांचें ह्मणणें मला कळूं द्या ! मला तें ऐकवा इतकें बोलून आचार्यांकडे पहात तो स्तब्ध उभा राहिला.

चांडाल बोलला तें मूळ वचन हें पुढील प्रमाणें आहे.

**' अन्नमयादन्नमयं चैतन्यमेव चैतन्यात् ।**
**यतिवर दूरी कर्तुं वाञ्छसि किं ब्रहि-गच्छ गच्छेति ॥**
**प्रत्यग्वस्तुनि निस्तरंग सहजानन्दावबोधाम्बुधौ ।**
**विप्रोऽयं श्वपचोऽयमित्यपि महान् कोऽयं विभेद-भ्रमः ॥**

**किं गंगाम्बुनि बिम्बतेऽम्बरमणौ चाण्डाल वीथी-पयः पुरे।**
**वान्तमास्ति कांचनघटे मृत्कुम्भयोर्वाम्बरे ॥**

**भावार्थः**- अन्नमयकोश व साक्षीचैतन्य तुझ्यांत व माझ्यांत एकच आहे. ब्राम्हण व श्वपच भेदाला तेथें वावच नाहीं. सूर्य गंगेत किंवा सुरेच्या घटांत सारखाच प्रतिबिंबित होतो. नव्हे काय ?

चांडालाचें हें वरील अद्वैत-तत्त्वज्ञानपर दिव्य भाषण ऐकून आचार्य आश्चर्यानें स्तिमित झाले ! दिसतो चांडाळ पण बोलतो तत्त्वज्ञानाच्या महान् गोष्टी ! भासतो अपवित्र पण बोलतो शुद्ध ब्रम्हज्ञान !! वाणी अशुद्ध पण विचार निर्मळ मोत्यासारखे !! असा हा चांडाल कोण बरे असेल ? खरोखर तो चांडाळच का ? आचार्य क्षणभर गोंधळांत पडले ! त्यांनीं डोळें मिटले व अंतर्दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें. अंतःकरणांत एकदम नवीन प्रकाश उजळला व चांडालासारखा दिसला तरी तो महाज्ञानी असावा, असें त्यांच्या मनानें घेतलें. नंतर डोळे उघडून त्या चांडाळाला उद्देशून म्हणाले:—

"हे चांडाला! आता माझें ह्मणणें सांगतो ऐक. हें सर्व ब्रम्हच आहे. आणि हें सकल जग चिन्मात्राचाच विस्तार आहे. हें सर्व त्रिगुणात्मक अविद्येमुळें मी कल्पिलेलें आहे, अशाप्रकारची ज्याची मति त्या सुखैक, नित्य व निर्मल अशा श्रेष्ठ सद्वस्तूवर दृढ झाली आहे, तो मग ब्राम्हण असो वा चांडाल असो तो साक्षात् माझा गुरुदेवच, अशी माझी दृढ भावना आहे !

**ब्रह्मैवाहमिदं जगच्च सकलं चिन्मात्र-विस्तारितम् ।**
**सर्वं चैतदविद्यया त्रिगुणया शेषं मया कल्पितम् ॥**

इत्थं यस्य दृढा मतिः सुखतरे नित्ये परे निर्मले !
चाण्डालोऽस्तु स तु द्विजोस्तु गुरुरित्येषा मनीषा मम ॥
( शं. दि. )

असें म्हणून त्यांनी त्या चांडालाला नमस्कार केला !!

---

## प्रकरण १४ वें

## विश्वेश्वराचा आचार्यांस आदेश

'यथा श्रुतीनां सर्वासां परब्रम्हणि निष्ठता
तथाऽद्वैतपरं भाष्यं कुरुष्वाभिनिवेशतः ॥
श्रुतिसूत्रेतिहासानां व्याख्या निर्माय यत्नत ।
सम्प्रदायाविदां मार्गः प्रकाश्यस्तेऽधुना यते ॥
( आनंदगिरि शंकर विजय )

केवढा चमत्कार ! आचार्यांनी त्या चांडालाला गुरुदेव समजून नमस्कार केला व अंतर्दृष्टीनें त्याचा छडा घेण्यासाठीं क्षणभर डोळे मिटले. पुढे लोळे उघडून पाहतात तर येथें कोण चांडाळहि नाहीं ! कुत्रेहि नाहीत ! कोणीच नाहीं ! आचार्यांचा नमस्कार घेतला व तो चाण्डाल एकदम अदृश्य

नाहीं ! अपवित्र होत नाहीं ! सदैव शुद्ध, बुद्ध, मुक्त अशीच राहते ! ही आत्मवस्तु ! हें माझें चांडालाचें असें तत्त्वज्ञान आहे ! अद्वैत ज्ञान म्हणतात तें याला ! मग आतां सांगा, ' मी ब्राम्हण, तूं चांडाल ' असें जें आपण म्हणाला, तें तुमचें तत्त्व आत्म्याला कसें व कोठें लागूं पडतें ? तें पटवून द्याल कां मला ? मी अज्ञान आहे ! मूर्ख आहे ! अस्पृश्य आहे !! ' मी ब्राम्हण पवित्र, तूं चांडाल अपवित्र, अतएव तूं दूर हो ! बाजूला सरक ! ' असें म्हणणे, यतिवर! अद्वैतवाद्याला कसें शोभतें ? तें कसें युक्त आहे ? ब्राम्हण व चांडाल या दोघांच्यामध्येंहि एकच आत्मतत्त्व-चैतन्यभाव-स्फुरत आहे ना ? तो एकच पुराण पुरुष तुमच्यांत व माझ्यांत दोघांमध्येंहि वास करून राहतो ना ? मग त्यांत चांडाल कोण व ब्राम्हण कोण ? आणि कोण कोणाला वाट देणार ? व कोण कोणापासून दूर सरकणार ? हें सर्व एकच आहे. हे माझें तत्त्वज्ञान आत्म्याविषयीं हें असें आहे. आतां आपलें अद्वैतज्ञान सांगा पाहूं.


हें चांडालाचें भाषण मूळ शब्दांत पुढीलप्रमाणें आहेः—

**' ब्राम्हणश्वपदविचारः प्रत्यगात्मनि कथं तव युक्तः ।**
**बिंबतेऽम्बरमणौ सुरनद्यामन्तरं किमपिचास्ति सुरायाम् ॥**
॥ ६-२९ ॥

**' शुचिर्द्विजोऽहं [illegible] व्रजेति मिथ्याग्रहस्ते मुनिवर्य कोऽयम् ।**
**[illegible] रमेकमुपेक्ष्यं पूर्णं पुरुषं पुराणम् ॥ '**
( शं. दि. ६–३० )

म्हणण काय ?

[illegible] भाग आत्म्याविषयीं झाला. आतां आपण शराराला [illegible] असाल, तर तेंहि माझ्यामतें युक्त नाहीं. दोघांचेंहि




विद्याशंकर देवालय- (श्रंगेरी)

झाला ! कुत्रेहि नाहीं, चांडाळहि नाहीं ! पण एक दिव्य मूर्ति मात्र पुढें उभी ! ती चांडाळाहून अगदींच निराळी ! कपूरधवल अशी सुंदर मूर्ति ! जटाधारण केलेली, भस्मलेपन केलेली, सर्पालंकार घातलेली, गजचर्म पांघरलेली, रुद्राक्ष माळा घातलेली, त्रिशूल धरलेली, त्रिनेत्र अशी शांत, व सुप्रसन्न श्रीशंकराची मंगल मूर्ति पुढें उभी ! ! ती कोण याची वाचकांना पूर्ण कल्पना आली नसेल. प्रत्यक्ष काशीविश्वेश्वरच ! ! धन्य झाले आचार्य ! श्रीविश्वेश्वर भेटला. शंकराचें प्रत्यक्ष दर्शनाचें भाग्य लाभलें त्यांना ! !

त्यांनी त्या चंद्रमोळीश्वर देवदेवाला—काशीविश्वेश्वराला—हात जोडले व त्याचें स्तवन करण्यास प्रारंभ केला. ते म्हणाले— प्रभो ! देहबुद्धीनें मी आपला अनन्य दास आहे. माझ्यावर आपण अनुग्रह करावा ! मजकडे कृपादृष्टीनें पहावें ! व्यावहारिक दृष्टीनें मी आपला सेवक व आपण माझे गुरुदेव ! परमार्थ दृष्टीनें मी आपलाच अंश आहे ! अध्यात्मदृष्टीनें पाहिलें तर देव व भक्त ही भाषाच फोल ठरतें ! वस्तुतः मीच आपण व आपणच मी ! ! 'तत्त्वमसि' हा श्रुतिसिद्धांत त्रिवार सत्य आहे ! कैलासनाथ ! उमापते ! भक्त कामकल्पद्रुमा ! मला पदरांत घ्या. मजवर अनुग्रह करा व सन्मति द्या ! सन्मार्ग दाखवा ! ! असें म्हणून आचार्यांनी पुनः त्या विश्वनाथास त्रिवार नमस्कार केला ! !

भोलानाथ श्रीशंकर ! भक्त कामकल्पद्रुम ! शरणागत वत्सल ! आचार्यांच्या अद्वैतगर्भ स्तोत्रसुमनाने प्रसन्न होऊन उमापतीनें त्याच्यावर कृपा कटाक्ष टाकला व त्यास म्हणाले—यतिवर्य ! आपलें वेदज्ञान—आत्मज्ञान अत्यंत प्रगल्भ आहे ! तें शास्त्रशुद्ध आहे ! व तर्कपुष्ट आहे ! तें सत्य आहे व शुद्ध आहे ! आजपर्यंत अद्वैतज्ञानी फार झाले नाहींत. आपली परीक्षा पाहण्यासाठींच मी चांडाळाच्या रूपाने आपल्यापुढें आलो होतो.

आपली परीक्षा पाहिली व मन संतुष्ट झालें. आपल्याकडून अजून मोठें कार्य व्हावयाचें आहे.

आचार्यः– तें काय, प्रभो !

विश्वेश्वरः– या अद्वैतज्ञानाचा जगदुद्धारार्थ प्रसार झाला पाहिजे. त्यासाठीं जगांत फिरून नुसत्या तोंडी प्रसारानें भागण्यासारखें नाहीं. आतां वेळच अशी आली आहे कीं, तें ज्ञान ग्रंथबद्ध होऊन चिरकाल टिकलें पाहिजें. आणि तें काम करण्यास आपणच योग्य आहा !

आचार्य (हात जोडून) जशी प्रभूची आज्ञा ! मी काय करावें, याचें मला दिग्दर्शन करण्यांत आल्यास, तें मी भाग्य समजेन.

विश्वेश्वरः– बादरायण व्यासांनीं श्रुतीचें बनलेलें निबिड जाळें हळुवार उलगडून, त्यांतील तात्त्विक निवडक वचनें एकत्रित करून त्यांचा सुसंगतवार समन्वय करून, त्या ग्रंथाला 'ब्रह्मसूत्र' हें नांव दिलें आहे. पण तो ग्रंथ अत्यंत महत्वाचा असला, तरी तो समजण्यास मोठा दुर्बोध झाला आहे.

आचार्यः– मला त्याची जाणीव आहे.

विश्वेश्वरः– त्यावर आपण भाष्य लिहावें. आतांपर्यंत त्यावर अनेकानी —सांख्य, कणाद, वैशेषिकांनी इत्यादिकांनी—भाष्य लिहिलें आहे. पण त्यांत सत्यार्थ प्रकाशत नाहीं. निरनिराळ्या मताभिमानी पंडितांनीं आपापल्या मताला अनुसरून त्या सूत्रांवर व्याख्यान केलें आहे. पण तें श्रुतिसम्मत नाहीं. श्रुतिबाह्य आहे. तें अद्वैत नाहीं. द्वैत आहे.

आचार्यः– मला काय आज्ञा आहे देवेशाची ?

विश्वेश्वरः– व्यासाचें ब्रम्हसूत्र हें अद्वैतपर आहे. पण तसें भाष्य अद्याप कोणी लिहिण्यास समर्थ झालें नाहीं. त्यांना वेदांत मताचें-ब्रम्ह-

विद्येचें–असावें तसें सखोल, संपूर्ण व समर्पक ज्ञान नसल्यामुळें, आत्मज्ञानाचें रहस्य, त्यांतील बोध, त्याचें श्रेष्ठत्व व सर्वव्यापकत्व त्यांना नीट व वास्तवतेनें ग्रहण करतां आलें नाहीं. तें काम आपण करण्यास समर्थ आहा. वेद व उपनिषदें यांचें भरीव, व्यापक व सूक्ष्म ज्ञान तुजपाशी आहे. तेव्हां तूं वेदाला धरून त्या ब्रम्हसूत्रांवर अद्वैतपर सयुक्तिक भाष्य लिहून प्रकाशित करावेंस !

आचार्यः– त्याविषयी मला गुरुदेवांनी मार्गदर्शन केल्यास जरूर त्या मार्गांनें मी प्रयत्न करीन.

विश्वेश्वरः– सर्व श्रुतींची शिकवण ही ब्रम्हनिष्ठतेंत आहे. म्हणजे ‘ इदं खलु ब्रम्हैव ’ याचें प्रतिपादन करण्याचें श्रुतीचें परम तात्पर्य आहे. ‘ ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या ’ ही अद्वैतपर शिकवण देण्याची श्रुतीची प्रतिज्ञा आहे. हें सिद्ध करण्यासाठी श्रुति, स्मृति, सूत्रें, इतिहास यांची स्वतंत्र व्याख्या निर्माण करून, त्या सर्वांचा सुसंगत समन्वय संप्रदायाला धरून करून, ब्रह्मसूत्रावर सोपपत्तिक अद्वैतपर भाष्य करावें ! तसा माझा तुला आदेश आहे !

हेंच विश्वेश्वराच्या मूळवचनांत सांगावयाचें झालें तर तें याप्रमाणें सांगतां येईल.

‘ यथा श्रुतीनां सर्वासां परब्रम्हणि निष्ठता ।
तथाऽद्वैतपरं भाष्यं कुरुष्वाभिनिवेशतः ॥
श्रुतिसूत्रेतिहासानां व्याख्यां निर्माय यत्नत ।
सम्प्रदायविदां मार्गः प्रकाश्यस्तेऽधुना यते ॥

( आनंदगिरी–शंकर विजय )

हें आपलें भाष्य इतर सर्व भाष्यांना अंधकारांत लोटून देऊन, सूर्याप्रमाणे जगांत सतत प्रकाशत राहील ! तें केवळ या जगांतच नव्हे, तर स्वर्गांतसुद्धां देवसभेंत त्याचें स्वागत करण्यांत येईल !! आतां अधिक सांगणे न लगे ! माझें कार्य झालें ! ' असें सांगून आचार्यांवर वरदहस्त ठेवून, त्यांच्यावर अनुग्रह करून, विश्वेश्वराची मूर्ति अंतर्धान पावली.

ह्या प्रकार पाहून सर्वांना मोठा विस्मय झाला. नंतर आचार्य आपल्या शिष्यपरिवारासह गंगेत मणकर्णिका घाटावर स्नानास गेले. त्यावेळीं त्यांनी पुढील श्लोक ह्मणून मणिकर्णिकेची स्तुति केली.

' गंगातीरमनुत्तमं हि सकलं तत्रापि काश्युत्तमा,
तस्यां सा मणिकर्णिकोत्तमतमा यत्रेश्वरो मुक्तिदः ।
देवानामपि दुर्लभं स्थलमिदं पापौघनाशक्षमं,
पूर्वोपार्जितपुण्यपुंजगमकं पुण्यैर्जनैः प्राप्यते ॥ ४ ॥
( मणिकर्णिकाष्टकम् )

याप्रमाणे मणिकर्णिकेचें स्तोत्र गावून गंगेत उतरून स्नानाविधि आटोपल्यावर पुढे ते आन्हिकांत मग्न झाले.

## प्र ण १५ वें


## भाष्यरचना

दुष्टाचार-विनाशाय धर्मसंस्थापनायच ।
भाष्यं कुर्वन् ब्रम्हसूत्रतात्पर्यार्थाविनिर्णयम् ॥
( शं. दि. उपो. ४१ )

सतां हृदाब्जानि विकासयन्ती
तमांसिगाढानि विदारयन्ती ।
प्रत्यर्थ्युलूकान् प्रविलापयन्ती
भाष्यप्रभा भाद्यातिवर्यभानोः ॥
( शं. दि. ६-१०१ )

चांडाळ वेषधारी श्रीशंकरांनी आचार्यांना ब्रह्मसूत्रावर अद्वैतपर भाष्य लिहावयास आदेश व प्रोत्साहन देऊन, मार्गदर्शन केल्यावर ते तेथून अंतर्धान पावले, हा मजकूर मागच्या प्रकरणांत आलाच आहे. नंतर आचार्य शिष्यांस बरोबर घेऊन घाटावर स्नानास गेले. तेथें नदींत स्नान केल्यावर विश्वेश्वराच्या मंदिरांत येऊन, त्याचें दर्शन घेऊन स्वस्थानीं परत येते झाले.

आतां त्यांच्या मनांत ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहण्याची इच्छा झाली व त्याप्रमाणें भाष्य लिहिण्याचें त्यांनी मनांत ठरविलें. आर्षवेदांत विषयावर ( बादरायण व्यासांच्या पूर्वी ) अनेक विद्वान आचार्यांनी सूत्रबद्ध ग्रंथ लिहिले असून, त्यांत हीं पुढील नांवे विशेष उल्लेखनीय आहेत. आत्रेय, आश्मरथ्य, औडुलोमि, कार्ष्णाजिनि, काशकृत्स्न, जैमिनि, बादरि वगैरे




विद्याशंकर देवालय- (श्रृंगेरी)

दर्शनकार होऊन गेले. त्याचप्रमाणें भर्तृप्रपंच, भर्तृमित्र, भर्तृहरि, बोधायन, टंक, ब्रह्मनंदी, भारुचि, कपर्दी, द्रविडाचार्य, सुंदरपांड्य, उपवर्ष, ब्रह्मदत्त, गौडपाद, गोविंदपाद इत्यादि आचार्यांनी अद्वैत वेदांतावर ग्रंचरचना केली होती. त्यानंतर श्रीशंकराचार्य हे ब्रह्मसूत्रावर अद्वैतपर महा भाष्य लिहिणारे पहिलेच आचार्य होत.

आतां शंकराचार्यांनी हा ग्रंथ कोठें लिहिला याविषयी वाद आहे. कोणी म्हणतात त्यांनी ग्रंथरचना काशीस राहूनच केली. व कोणी म्हणतात ती बदरीं येथें केली. आनंदागिरींचें मतहि असेंच आहे. या वादाचा अचुक निर्णय करणें, हें आधुनिक काळीं तितकेंसें सोपें नाहीं. व म्हणून त्या प्रश्नांत खोल शिरण्याचें प्रस्तुत स्थल नसल्यामुळे आम्ही त्या भानगडींत न पडतां, आम्हांला सकृद्दर्शनी स्पष्ट असा जो थोडा बहुत आनंदागिरीचा आधार मिळाला आहे, त्यावर भर देऊन भाष्यरचना बदरीमध्यें झाली, असें धरून चालतो. आमच्या म्हणण्याला आणखी एक पुष्टी म्हणून यापुढील वचनाचा आधार येथें उद्धत करतो. तें वचन हें:-

**'गत्वैकादशवार्षिको बदरिकारण्ये सुपुण्याश्रमे।**
**पञ्चाद्वान्तर कुण्ठया निजाधिया भाष्याणि यः षोडश।**
**निर्माय प्रथयांचकार बदरीनारायणार्चां तथा।**
**श्रीज्योतिर्मठमाबबन्ध स गुरुः श्रीशंकरो वंद्यते॥**

( कालिदास- शंकर-विजय )

बदरीमध्यें ग्रंथरचना करण्याचें मनांत ठरवून शिष्यांना बरोबर घेऊन आचार्यांनी बदरीची वाट धरली. वाटेंत तीर्थक्षेत्रें पहात पहात ते हरिद्वारास आले. तथे कांहीं दिवस राहून पुढें कुच करीत हृषीकेश

येथें येऊन पोहोंचले. या क्षेत्रांत विष्णूचें देवालय आहे. त्याचें दर्शन घेऊन तेथून बदरिकाश्रमाची वाट धरली. वाट दुर्गम असून चालत जाण्यास मोठी अवघड व मोठ्या धोक्याची. तशांतूनच काळजीपूर्वक पदयात्रा करीत अखेर बदरीस येऊन दाखल झाले.

भरतखंडांत बदरीक्षेत्र अत्यंत पवित्र व पुण्यप्रद मानलें जात असून पुराणकालापासुन त्या स्थानाला फार मोठे महत्व प्राप्त झालें आहे. नर–नारायण ऋषींनी घोर तपश्चर्या केली, ती इथेंच. समोरच गगनचुंबित असा बर्फाच्छादित विशालकाय हिमालय पर्वत उभा असून, विष्णूची विशाल मूर्ति तेथें बसलेली आहे. एका बाजूला नर व एका बाजूला नारायण हे पर्वत उभे आहेत. हें स्थान म्हणजे भूतलावरील स्वर्गच ! तेथील सृष्टिसौंदर्य पाहून मंत्रमुग्ध होणार नाहीं, असा मनुष्य अगदी विरळा. चारीधामांमध्यें बदरीधाम हें श्रेष्ठ धाम असून, त्या यात्रेला मोठें महत्व प्राप्त झालें आहे.

महर्षि व्यासांनी महाभारत लिहिलें तें याच ठिकाणीं. बदरीनाथाच्या मंदिराच्या उत्तरेस कांहीं अंतरावर त्रिकोणाकृतीची एक टेकडी असून तेथें एक मोठी गुहा आहे. तेथें वेदव्यास रहात होते. त्याला व्यासाश्रम असें म्हणतात. या व्यास गुहेच्या उजव्या बाजूला सरस्वतीचें व डाव्या बाजूला गणपतीचें मंदिर असून, व्यासमुनि भारत रचीत असतांना गणपति हा त्यांचें लेखनकार्य करीत होता व त्यांतील कांहीं कूट श्लोकांचे अर्थ बरोबर आहेत, याची खात्री देणेंसाठी सरस्वती तेथें उपस्थित होती. ही जागा मोठी शांत, निसर्गसुंदर व प्रसन्न असून तेथील वातावरण मोठें आल्हादप्रद व स्फूर्तिजनक आहे. हिमालयाची गार, मधुर व उत्साहदायक हवा व आसमंतातील प्रशांत व प्रसन्न वातावरण व एकंदर सृष्टिशोभा यामुळें आचार्यांच्या मनांत ग्रंथ लेखनाला बलवत्तर

प्रेरणा मिळून, भाष्यलेखनाचें महत्वाचें कार्य तेथेंच करण्याचें त्यांनीं निश्चित करून, त्याप्रमाणें ते उद्योगास लागले. तीन वर्षें त्यांचा तेथें मुक्काम होता. त्या अवधींत त्यांनी ब्रम्हसूत्र, उपनिषद् व गीता यांवर सुंदर व विस्तृत अशी बोधप्रद भाष्यें लिहिलीं. तीं आजहि जिज्ञासु लोक मोठ्या आवडीने वाचतात.

आतां ब्रह्मसूत्रासंबंधी चार शद्ब लिहिणें येथें जरूर असल्यामुळें ती माहितीहि येथें थोडक्यांत देतो. ह्मणजे ब्रह्मसूत्राची रचना व तद्गत विषय यांची वाचकांस कांहींशी कल्पना करण्यास मदत होईल. भारतीय आर्यांच्या सर्वधर्मग्रंथांमध्ये वेद हे आद्य व प्रमुख ग्रंथ असून धर्माचें प्रतिपादन मुख्यतः याच ग्रंथांमध्यें करण्यांत आलें आहे. हा धर्म वैदिक धर्म या नांवाने प्रसिद्ध असून, त्याचे साध्य व सिद्ध असे दोन भेद आहेत. यज्ञयागादि पुण्य-कर्मांनी प्राप्त होणारा धर्म हा साध्यधर्म व परब्रह्माचें अनुचिंतन करणें हा सिद्धधर्म. साध्यधर्म हा कर्मनिष्ठ आहे व सिद्धधर्म हा ज्ञाननिष्ठ आहे. साध्यधर्माचे फळ कालभंगुर म्हणजे अशाश्वत आणि सिद्धधर्माचें फळ शाश्वत आहे. साध्यधर्माचें ध्येय स्वर्गप्राप्ति व सिद्धधर्माचें ध्येय ब्रह्मप्राप्ति. ऋग्वेदादि संहितेंत साध्य धर्माचें व उपनिषद् ग्रंथांत सिद्धधर्माचें प्रतिपादन करण्यांत आलें आहे. उपनिषदभागालाच वेदांत असे दुसरें नांव आहे. कारण उपनिषदभाग हा वेदाचा अंत म्हणजे शेवटचा भाग होय.

वेदामध्यें ज्या दोन प्रकारच्या धर्माचें प्रतिपादन करण्यांत आलें आहे, त्यांपैकीं साध्यधर्माचें प्रतिपादन करणाऱ्या वेदाच्या अर्थाचा यथार्थ निर्णय करण्याकरतां पूर्वमीमांसा शास्त्राचा अवतार आहे. या शास्त्रावर जैमिनीचे सूत्रबद्ध असे बारा अध्याय असून, त्या सूत्रांचा अर्थ व स्पष्टी-करण करण्यासाठी शबर स्वामींनी सविस्तर भाष्य केलें आहे. ‘ अथा तो

धर्म जिज्ञासा ' यापासून त्याचा प्रारंभ होतो. त्याचप्रमाणें सिद्धधर्माचें प्रतिपादन करणाऱ्या वेदाच्या अर्थाचा निश्चय करण्यासाठीं उत्तरमीमांसा शास्त्र प्रवृत्त झालें असून, यावर श्रीबादरायण व्यासांनी सूत्रबद्ध असे चार अध्याय केले आहेत. यालाच ब्रह्मसूत्र असे ह्मणतात. ' अथातो ब्रह्म-जिज्ञासा ' हें याचें प्रारंभींचे वाक्य आहे. श्रीशंकराचार्यांनी या प्रसिद्ध ब्रह्मसूत्रावरच अद्वैतपर असें महाभाष्य लिहिलें आहे. आणि हा ग्रंथ वेदांत ग्रंथांत अद्वैत ज्ञान दृष्टीनें प्रमुख व प्रमाणभूत मानण्यांत येत असून त्याला जगमान्यताहि लाभली आहे. या ब्रह्मसूत्रामध्ये ब्रह्मासंबंधानें सांगोपांग विमर्श करण्यांत आला आहे. अद्वैततत्त्वज्ञान ह्मणजे काय याचें पुढें थोडक्यांत दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. असो—

आतां ब्रम्हसूत्राची येथें ओझरती अशी प्रत्यक्ष माहिती देणें हें अप्रस्तुत होणार नाहीं. कारण ब्रम्हसूत्र हें काय प्रकरण आहे, याची आधुनिक पिढीला नांवाच्या पलीकडे फारशी माहिती नाहीं. उपनिषदांचा म्हणजे उपनिषद्वाक्यांचा समन्वय हें बादरायणांच्या ब्रम्हसूत्राचें मुख्य ध्येय. आणि त्यांचें समन्वयरूप ताप्तर्य काय याबद्दल चार आचार्यांनी चार भाष्यें ( अद्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत, व द्वैत सिद्धांत प्रतिपादन करण्यासाठीं ) लिहिलीं. त्यांत ब्रम्हसूत्रावर अद्वैतपर भाष्य लिहिणारे श्रीशंकराचार्य हे पहिलेच आचार्य होत. या ग्रंथाचा मुख्य विषय आत्मतत्त्वज्ञानपर असून, त्याचें मुख्य ध्येय म्हणजे ' ब्रम्हसत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रम्हैव नापरः हें आहे. हें सिद्ध करण्यासाठीं त्याकाळीं इतर जीं अवैदिक मतें बोकाळली होती, उदाहरणार्थ बौद्धमत, जैनमत, वैशेषिकमत, सांख्यमत, पांचरात्रमत इत्यादि इत्यादि— या सर्वांचें खडसून खंडण करणें हें प्रवाह-प्राप्त झाल्यामुळें त्यांचाहि पार धुव्वा उडविण्यास त्यांनी कमी केले नाहीं. या ग्रंथातील विषय मोठा गहन व तात्विक असल्यामुळें व ह्मणून सामान्य

जनास समजण्यास दुर्बोध व नीरस असल्यामुळें त्यांतील प्राथमिक अभ्यासाची थोडीशी पूर्व तयारी करणें भाग आहे. त्याशिवाय ग्रंथाची अवीट गोडी लागणार नाहीं.

शंकराचार्य ही विभूति कोणत्या कोटीची आहे, हें समजण्यासाठी प्रस्तुत ग्रंथाच्या बहिरंग व अंतरंगाबद्दल धावता उल्लेख करणें आम्हास योग्य व इष्ट वाटल्यावरून त्याविषयी दोन शब्द येथें टिपूं इच्छितो. प्रथम बहिरंगांची ओळख करून देतो. या ब्रह्मसूत्राचे एकंदर चार अध्याय असून, प्रत्येक अध्यायाचे पुनःचार पाद आहेत. पहिल्या अध्याय हा समन्वय अध्याय असून, त्याची सूत्रसंख्या १३४ आहे. दुसऱ्या अध्यायाला अविरोध अध्याय हें नांव असून, त्याची सूत्रसंख्या १५६ आहे. तिसऱ्या अध्यायाला साधनाध्याय हें नांव असून, त्याची सूत्रसंख्या १८६ आहे. व शेवटचा चौथा अध्याय हा फलनिर्णयाध्याय असून, त्याची सूत्रसंख्या ७८ आहे. या ग्रंथाची चारहि अध्यायाची मिळून एकंदर सूत्रसंख्या ५५४ आहे. या ग्रंथाची ही अशी रचना आहे.

आता या ग्रंथाच्या अंतरंगांत शिरून तेथील महत्वाच्या विषयांचा नामनिर्देश तेवढा करून काम भागवितो. पहिल्या समन्वय अध्यायांत वेदांतील भिन्न भिन्न अर्थांचे जे निरनिराळे मंत्र आहेत, ते सर्व तत्वतः व वस्तुतः एका परब्रह्माचेंच द्योतक व बोधक आहेत, असें सिद्ध करून दाखविणेंत आलें आहे. त्यांतील मुख्य मुख्य प्रतिपाद्य विषय पुढीलप्रमाणें आहेत. मूळ वस्तु जें परब्रह्म, तें सगुण व निगुर्ण असें उभयविध असून त्यांत सगुणब्रह्म हें उपास्य व निर्गुण ब्रह्म हें ज्ञेय स्वरूपाचें आहे. तें आकाशमय आहे, प्राणमय आहे, ज्योतिर्मय आहे, मनोमय आहे, आनंदमय आहे. तें विश्वाचें सर्वाधार असून, जगाचें निमित्तकारणहि तेंच व उपादान कारणहि तेंच आहे. जीव व ब्रह्म हीं एकच

आहेत. भिन्न नाहींत; उपाधिमुळें ब्रह्माला जीवत्व लाभलें असून, सर्व उपनिषदें त्या परमात्म्याचेंच वर्णन करतात. अनुषांगाने इतरांचाहि परामर्ष घेतात. असा पहिल्या अध्यायाचा तात्पर्यार्थ आहे.

द्वितीय अध्याय हा अविरोध अध्याय असून, त्यांत मुख्यत्त्वें करून इतर मतांचें खंडण करून, परमात्मा हाच विश्वांत विविध नामरूपानें नटला आहे, असा त्या अध्यायाचा सर्वसाधारण रोख आहे. त्यासाठीं या अध्यायांत समवाय मताचें, बौद्धमताचें, जैनमताचें, सांख्यमताचें, वैशेषिकमताचें, भागवतमताचें खडसून खंडण करण्यांत आलें आहे. यांत आरंभवाद, शून्यवाद, स्याद्वात, द्वैतवाद, परमाणुवाद इत्यादि पाखंड वादाचें अशास्त्रीयत्व व वैय्यर्थ्यत्व सिद्ध करून दाखविण्यांत आलें आहे. परमात्मा हा आकाशादिरूपानें प्रगट होतो, जीवात्मा हा परमात्म्याचाच अंश व प्रतिबिंब आहे, जीव व ईश्वर यांतील भेद निव्वळ औपाधिक असून, विश्व व विश्वातील यच्चयावत् पदार्थ हेही ब्रह्ममयच आहेत, असें चक्क दाखवून दिलें आहे. अर्थात हें सर्व शांकरभाष्यानुसारी तात्पर्य होय. हें निराळें सांगावयास नकोच. असा या दुसऱ्या अध्यायाचा तात्पर्यार्थ आहे.

तिसरा अध्याय जो आहे, तो साधनाध्याय असून, जीवात्मा हा खाली संसारांत कसा येतो, या विषयावर प्रारंभी विवेचन करण्यांत आलें आहे. जीवात्मा हा स्वर्ग अगर देवलोकांतून खाली पृथ्वीवर येताना सूक्ष्म भूतांशी संयुक्त होऊनच पुढें येथें दुसऱ्या शरीरांत प्रविष्ट होतो. इंद्रियेंहि त्याच्या बरोबरच असतात. अनुपभुक्त कर्मांचा उपभोग घेण्यासाठीं जीवांना खाली उतरावें लागतें व जन्म घ्यावा लागतो. खाली पृथ्वीवर उतरतांना जीवांना आकाशादिकांचें साम्य प्राप्त होतें. संसारांत पडलेल्या जीवांच्या स्वाभाविक शक्ती गुप्त असतात. परमात्मा हा निर्गुण आहे; तसाच तो अव्यक्त आहे. तो चित्स्वरूप असून सर्वव्यापी व सर्वाधार आहे. त्याच्याहून

श्रेष्ठ असें दुसरें कांही नाहीं ह्मणजे तो सर्वापेक्षा श्रेष्ठ आहे. त्याच्याहून निराळें असें दुसरें तत्त्वच नाहीं. कर्माचें फल देणाराहि तोच आहे. देहापेक्षा आत्मा निराळा आहे व ह्मणून तो स्थूल देहाबरोबर नाश पावत नाहीं. सगुणोपासक हे मरणोत्तर देवयान मार्गानें जातात आणि जे आत्मज्ञानोपासक आहेत, ते मोक्षाप्रत जातात. त्यांना कर्माची जरूरी नाहीं. एकदा आश्रमांतर केल्यावर पुढील आश्रमांतून मागील आश्रमांत पुनः परत येतां येत नाहीं. चारहि आश्रम श्रुतिसिद्ध आहेत. जो मुमुक्षु आहे, त्यानें ढोंग न करता सरळ व निष्कपट भावानें वागावें. इत्यादि इत्यादि. याप्रमाणें तिसऱ्या अध्यायाचें तात्पर्य आहे.

आतां चौथा अध्याय जो आहे, तो फलाध्याय आहे. त्याचे तात्पर्य हें असें आहें. जो मुमुक्षु आहे, त्यानें फलप्राप्त होईतोपर्यंत श्रवणमननादिकांची आवृत्ति सतत करीत रहावें. उपासना करावयाची ही बसूनच केली पाहिजे. आणि चित्त एकाग्र होईल, अशी ती उपासना असावी. आत्मज्ञान ह्मणजे ‘ मी परमात्मा आहे ’ — अहं ब्रह्मास्मि — हे ज्ञान होय. प्रतीकांच्या उपासनेंत आत्म्याची भावना नाहीं. उपासना ही मरणान्त केली पाहिजे. ज्याला ब्रम्हविद्या लाभली त्याच्या पातकांचा नाश होतो. तसाच पुण्यकर्माचाहि पण होतो. संचितकर्माचाहि लय होतो. पण प्रारब्ध कर्म मात्र सुटत नाहीं. त्याचा नाश होत नाहीं. म्हणून ब्रम्हज्ञान्याला त्या कर्माचा क्षय होईपर्यंत तिष्ठत बसावें लागतें. तोपर्यंत मुक्ति मिळत नाहीं. मरणसमयीं स्थूल शरीराचा तेवढा नाश होतो. इंद्रियांचा होत नाही. वाणीश्रोत्रादि इंद्रियांचा लय होत नसून, फक्त त्या इंद्रिय व्यापारांचा मनांत लय होतो. आणि मनाचा नव्हे, तर मनोव्यापाराचा प्राणामध्यें लय होतो आणि प्राणाच्या व्यापाराचा जीवात्म्यामध्यें लय होतो.

अशावेळी जीवात्मा हा प्राणेंद्रियासहवर्तमान सूक्ष्म महाभूतामध्यें असतो. आणि या महाभूतांचा तत्त्वज्ञानापूर्वी कधींहि लय होत नाही. शरीरांत जी उष्णता असते ती या सूक्ष्म महाभूतांचीच होय. जो ज्ञानी आहे त्याचे प्राण शरीरापासून उत्क्रमण पावत नाहींत. तर त्याचें शरीर, इन्द्रियें, मन इत्यादिकांचा परमात्म्यामध्येंच लय होतो. ज्ञानी मनुष्याचा जीव मरणसमयीं मधल्या नाडीतून म्हणजे मस्तकांतून निघून बाहेर पडतो. सगुणोपासक हे मरणोत्तर देवयान मार्गानें जातात. ते पुनः जन्माला येत नाहीत, तर प्रळयकाळी हिरण्यगर्भाबरोबर परब्रम्हांत तेही अखेर लीन होतात.

ब्रम्हांत परब्रम्ह व अपरब्रम्ह असे दोन पर्याय आहेत. जेथे नामरूपादि भेदांचा निषेध करून, 'नेति नेति' ह्मणून उपदेश केला जातो, तें परब्रह्म व नामरूपादिकांनी युक्त अशा ब्रम्हाचा उपदेश केला जातो, तें अपर ब्रह्म. ह्मणजेच सगुण ब्रह्म. मोक्षावस्थेमध्यें जीवात्मा हा आत्मरूपानेंच व्यक्त होतो. ह्मणजे मोक्षावस्थेंत जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य असतें. ज्ञानी लोक जे आहेत, ते आपलीं कार्यें संकल्पमात्रेंकरूनच पूर्ण करून घेतात. मुक्त लोक फिरून संसारांत कधींहि परत येत नाहींत. त्यांचें भवचक्र कायमचें सुटून जातें. इत्यादि इत्यादि. हें चौथ्या अध्यायाचें तात्पर्य आहे. या सूत्र भाष्याचें अंतरग येथें न देता पुढें ३९ व्या प्रकरणांत 'अद्वैत-दर्शन' येथें देण्यांत आलें असून, वाचकांनी तें अवश्य नजरेखालून घालावें, अशी आग्रहाची सूचना आहे.

ब्रह्मसूत्राची ही अशी विषय मांडणी असून, आचार्यांनी त्यावर प्रथमच अद्वैतपर महाभाष्य लिहिलें आहे. व त्याचें महत्व व श्रेष्ठत्व आजहि जगन्मान्य झालें आहे ! यानंतर त्यानी उपनिषदें व गीता यावरहि भाष्यें लिहिलीं आहेत, तीं आज बहुतेकांस परिचित असल्यामुळें त्याविषयी येथें प्रपंच करू इच्छित नाहीं. भाष्यरचना करतांना आचार्य फक्त चौदा-

क्र. १५२४०

पंधरा वर्षांचे होते ! म्हणजे अजून ते बालवयांतच मोडत होते. तेव्हां अल्पवयांत त्यानी ब्रम्हसूत्र, उपनिषद् व गीता या प्रस्थानत्रयीवर विद्वानांनी आनंदानें व कौतुकानें मान डोलवावी, असें सुंदर व सरस भाष्य रंगविलें. तेव्हां त्यांची योग्यता काय वर्णावी ? अद्वैत तत्त्वज्ञानाचें मुख्य ध्येय जें 'ब्रम्हसत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रम्हैव नापरः' हें सिद्ध करण्यासाठीं आपलें सर्व बुद्धिवैभव, प्रतिभाविलास, विचार सौंदर्य, वादकौशल्य, भाषाप्रभुत्व, सुबोध-शैली, रचनाचातुर्य, शद्बसौष्ठव, शास्त्रज्ञान, अलौकिक पांडित्य हीं सर्व पणास लावून अखेर विजयश्रीला आपलीशी करून घेतली, ही गोष्ट काय सामान्य म्हणावयाची ? यासाठी वादक्षेत्रांत अनेक अतिरथी महारथी अशा ज्ञानवीरांशी झुंज खेळून एकामागून एक बळी घेण्याचा सपाटा चालविला, हा पराक्रम काय लहान म्हणावयाचा ? आम्हांला वाटतें तें वर्णन करण्याला शद्बच नाहींत !!

काशी विश्वेश्वरानें त्यांस 'यथा श्रुतीनां सर्वासां परब्रम्हाणि तिष्ठता। तथाऽद्वैतपरं भाष्यं कुरुष्वभिनिवेशतः ॥' असा आदेश दिल्याप्रमाणें तदनुरोध ब्रम्हसूत्रावर अद्वैतपर भाष्य लिहिण्यास त्यानीं सुरवात केली. अर्थात् ब्रम्हसूत्रांतील तात्पर्यार्थनिर्णय करून तत्कालीन प्रचलित जैनबुद्धादि मतांचा पाडाव व वैदिक मताचें संस्थापन होईल, अशा रोखानें भाष्य लिहिण्यास ते उद्युक्त झाले. यासाठीं त्यानीं वैदिकेतर सर्व मतांचा सूक्ष्म अभ्यास व वेद, वेदांग, स्मृति, इतिहास, पुराणे, न्याय, व्याकरण इत्यादि ग्रंथांचें सखोल अवलोकन करून, भाष्य रचनेला प्रारंभ केला व थोड्याच अवधींत तें संपूर्णहि केलें. तें इतकें सुंदर व सरस व तसेंच शास्त्रशुद्ध व युक्तिपुष्ट झालें कीं, तें पाहून सज्जनांची हृदयकमलें आनंदानें प्रफुल्ल फुलली ! व अज्ञानतिमिराचा पूर्ण लोप झाला ! विरोधक घुबडांवर आक्रोश करण्याची पाळी आली ! अशी ती आचार्य भास्कराची दिव्य

भाष्यप्रभा अद्वैत तेजानें तळपूं लागली ! तेव्हांच नव्हे, आजहि त्याचा प्रखर प्रकाश विद्वज्जगाला आनंदाश्चर्यानें थक्क करून बुद्धीला दिपवून सोडीत आहे ! असो

ब्रम्हसुत्रावर भाष्य लिहून झाल्यावर उपनिषदावर त्यांची दृष्टि बळली. आणि दशोपनिषदावर वरील प्रमाणेंच अद्वैतपर भाष्य त्यांनीं लिहिलें. याविषयीं शंकर दिग्विजयांत पुढलि श्लोक आढळतो. तो मननीय असल्यामुळें तो येथें उध्दत करतो. तो श्लोक हा.

करतलकलिताद्वयात्मतत्त्वं
क्षपितदुरन्तचिरन्तनप्रमोहम् ।
उपचितमुदितोदितैर्गुणौघै-
रुपनिषदामयमुज्जहार भाष्यम् ॥
( शं. दि. ६-६१ )

उपनिषद् भाष्य लिहून झाल्यावर गीतेवर त्यांचा डोळा बसला व त्या ग्रंथावरहि भाष्य लिहून ते कृतार्थ झाले. या भाष्याची प्रशंसा पुढीलप्रमाणें करण्यांत आली आहे.

ततो महाभारतसारभूताः
स व्याकरोद्भागवतीश्चं गीताः ॥ (६-६२)
श्रीशंकराचार्यरवावुदेत्य
प्रकाशमाने कुमतिप्रणीताः ।
व्याख्यान्धकाराः प्रलयं समायु-
र्दुर्गादिचंद्रप्रभया वियुक्ताः ॥
( शं. दि. ६-६४ )

याप्रमाणें आचार्य देवांनीं ब्रम्हसूत्र, उपनिषदें, व गीता यांवर महाभाष्य लिहून, जिज्ञासु जगाचे त्यानीं धन्यवाद घेतले व आपलें नांव यावच्चंद्र दिवाकरौ अजरामर करून ठेवलें !!

या प्रस्थानत्रयी ग्रंथांचा महिमा वर्णन करून प्रस्तुत विषयाला पूर्णविराम देतो. या ग्रंथाचे महत्व व महिमा व्यतिरेकालंकारांत वर्णन करण्यात आला आहे तो असा :—

**पादासीत्पद्मनाभस्य गंगा**
**शंभोर्वक्त्राच्छांकरी भाष्यसूक्तिः ।**
**अद्यालोकान्दृश्यते मज्जयंती –**
**त्यन्या मग्नानुद्धरत्येष भेदः ॥**

( शं. दि ६–१०३ )

भावार्थ :— विष्णूच्या पायापासून गंगा जन्मली आणि शंकराचार्यांच्या मुखापासून भाष्यसूक्ति प्रगट झाली. पण आश्चर्य हें की, स्नान करणाऱ्यांना गंगा ही बुडविते पण भाष्यसूक्ति ही भाष्याध्ययनांत मग्न झालेल्यांना तारून नेते !

या सर्वांचा तात्पर्यार्थ सांगावयाचा हा कीं आचार्यकृत प्रस्थानत्रयी भाष्य भव्य, गंभीर, मधुर व उद्धारक असें आहे व तें सर्व मुमुक्षु लोकांना मननीय व शिरोधारणीय असें आहे !!

बदरी येथें असतांना आणखी एक उल्लेखनीय गोष्ट घडून आली. तिचा उल्लेख केल्याशिवाय पुढें जाणें युक्त होणार नाहीं. भाष्यरचनेबरोबर भाष्यपाठहि शिष्यांस देण्याचा त्यांचा परिपाठ असे. भाष्यपठण सर्व शिष्य करीत असत. पण त्यांचा परमशिष्य जो सनंदन तो मोठा बुद्धिमान

असल्यामुळें त्याला सोडून ते भाष्याचा शिष्यांना पाठ सहसा देत नसत. एकदां असें झालें कीं गुरूच्या आज्ञेवरून तो गुरूच्या देवपूजेसाठी तुळशी, बिल्व, फुलें इत्यादि आणण्यासाठी ह्मणून अलकनंदानदी उतरून पलीकडे गेला. फुलपत्रें तोडून जमवून घेणेस जरा उशीर लागल्यामुळें आचार्यांनी त्याला कांहीं जरुरीच्या कामाकरता 'सनंदना लवकर ये !' असें मोठ्यानें ओरडून हाक मारली. त्यासरशी तो तेथून चटकन जशाचा तसा परत येण्यास निघाला.

त्यावेळी नदीला पूर येऊन पायवाट बुजून गेली होती. तेव्हां त्यानें मागचा पुढचा विचार न करता परमेश्वराचें ध्यान करीत व आचार्यांचें स्तोत्र ह्मणत तशा महापुरांतच पाय ठेविला, तों काय चमत्कार ! त्याच्या पायाखाली एकेक कमल निर्माण होऊन, त्याला त्यावर पाय देण्यास आधार करून देण्यांत आला. पात्रातून जातांना प्रत्येक पावलागणिक एकेक कमल निर्माण होऊन, त्यास परतीरावर चालून जाण्यास मदत झाली. आचार्य-शिष्यांना तो मोठा चमत्कार वाटला ! हा चमत्कार गुरुभक्ति व देवनिष्ठा यामुळे घडून आला म्हणून त्यास आचार्यांनी पद्मपाद या नांवाने संबोधिलें व तेव्हांपासून तो पद्मपाद या नांवानेंच प्रसिद्ध झाला. हा मोठा ज्ञानी व योगी असून, आचार्यांचा तो पहिला पट्टशिष्य झाला व त्यानें आचार्यांस वेळोवेळी फार मोठी मदत केली असून, त्याचा पुढें यथाप्रसंग उल्लेख करण्यांत येईलच.

वर सांगितल्याप्रमाणें प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहून झाल्यावर आचार्यांनी तेथून मुक्काम हलविला व ते काशीस येऊन दाखल झाले. तेथें त्यांनी दररोज भाष्याचा शिष्यांना उपदेश करण्यास सुरुवात केली.

---

# प्रकरण १६ वें

## व्यासदर्शन

आत्मीयसूत्रनिकरस्य निबद्धभाष्यं
श्रुत्वा पराशरसुतो मुनिराजगाम ।
दृष्ट्वा मिथोऽप्यतनुतामुचितां सपर्यां
तं स्माह शंकरमुनिर्मुदितो यतीन्द्रः ॥

( व्यासाचल विरचित शंकर विजय )

न प्राकृतस्त्वं सकलार्थदर्शी
महानुभावः पुरुषोऽसि कश्चित् ।
यो ब्रह्मचर्याद्विषयान्निवार्य
पर्यव्रजः सूर्य इवान्धकारान् ॥ ७-४३ ॥
अष्टौ वयांसि विधिना तव वत्स दत्ता -
न्यन्यानि चाष्ट भवता सुधियाऽऽर्जितानि ।
भूयोऽपि षोडश भवन्तु भवाज्ञया ते
भूयाच्च भाष्यमिदमा रविचन्द्रतारम् ॥ ७-५५ ॥
त्वमायुषाऽनेन विरोधिवादि-
गर्वाङ्कुरोन्मूलनजागरूकैः ।
वाक्यैः कुरुष्वोज्झितभेदबुद्धिन्
अद्वैतविद्यापरिपन्थिनोऽन्यान् ॥ ७-५६॥

( शां. दि. ४३, ५५ व ५६ )

आचार्यांचा मुक्काम आता काशींत होता. तेथें ते दररोज आपल्या शिष्यांना ब्रह्मसूत्र भाष्याचा पाठ देत होते. मधुन मधून शिष्य गुरुदेवास प्रश्न विचारीत व आचार्यहि त्या प्रश्नांचें समर्पक समाधानकारक उत्तर देऊन त्यांना निःशंक करीत. याप्रमाणें नित्यक्रम चालला असतां एके दिवशीं प्रातःकाळीं एक काळा वृद्ध ब्राह्मण अकस्मात् तेथें उपस्थित झाला व त्यानें शंकराचार्यांस विचारलें की आपण कोण आहा व यांना काय शिकवित आहा.

तेव्हां त्यांतील एक शिष्य त्या ब्राह्मणाला उद्देशून आचार्यांकडे बोट करून ह्मणाला– हे आमचे गुरुदेव आहेत. आह्मी त्यांचे शिष्य आहो. गुरुदेवांनी उपनिषदावर व गीतेवर भाष्य लिहिलें असून, त्यांचा वेदांत विद्येवर फार मोठा अधिकार आहे ! ब्रह्मसूत्रावर त्यांनी अद्वैतपर महा–भाष्य लिहिलें आहे. त्याचाच आम्हांस पाठ देत आहेत ते आतां.

ब्राम्हणः– अस्सं ? मला तेंच पाहिजे होतं. मीहि थोडासा ब्रम्ह-सूत्राचा अभ्यास केला आहे. मला कांहीं सूत्रांची शंका आली आहे. तर तुमचे गुरुदेव माझ्या शंकेचें निरसन करतील का ?

शिष्यानें आचार्यांस ‘ एक ब्राम्हण ब्रम्हसूत्रावरील शंका विचारावयास आला आहे ’ असें कळविलें. तेव्हां आचार्यांनी त्या ब्राम्हणाकडे पाहिलें. केवढा तेजस्वी ब्राम्हण ! त्याला पाहतांच आचार्यांच्या मनांत आदराची भावना उद्भूत झाली. चटकन् ते उठून उभे राहिले व आपला आदरभाव व्यक्त करून ‘ मी सूत्रार्थ जाणणाऱ्या ब्रम्हवेत्त्याला नमस्कार करतो ! ’ असें म्हणून, दोन्ही हात जोडून नम्रतापूर्वक नमस्कार केला. ‘ आपण इथें बसावें. आपण मला जें विचाराल, त्याविषयीं यथाशक्ति व यथामति मी आपलें समाधान करीन ’ असें ते नंतर विनयपूर्वक म्हणाले.

आचार्योंच्या विनंतीप्रमाणें ब्राह्मण आचर्योंच्या पुढें येऊन समोर बसला. नंतर तो त्यांना म्हणाला — 'मला या पुढील सूत्राचा अर्थ पाहिजे आहे. सांगाल कां ?

आचार्य :— कोणत्या सूत्राचा ?

ब्राह्मण :— तदन्तर प्रतियत्तौ रंहति संपरिष्वक्तः प्रश्ननिरूपणाम्याम् ' याचा

आचार्य :— म्हणजे अध्याय ३, पाद १, व सूत्र पहिलें या सूत्राचाच ना ?

ब्राम्हण :— हं, त्याचाच अर्थ.

आचार्य :— हें सूत्र पुरुष मरणोत्तर पुनः पृथ्वीवर कसा जन्मतो या विषयांवर आहे. त्याचें स्पष्टीकरण हें असें. जीव हा पहिलें शरीर टाकून दिल्यावर (तदन्तरप्रतियत्तौ) पुढें जेव्हां दुसरे शरीर धारण करतो तेव्हां तो पंचमहाभूतांच्या सूक्ष्म तत्त्वांनी वेष्टित होऊनच दुसऱ्या शरीराप्रत जातो. सपरिष्वक्तो रंहति येथें हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं जीव हा देह सोडतांना मुख्य प्राण इंद्रियें, मन आणि त्याच प्रमाणें विद्या, कर्म व पूर्वप्रज्ञा म्हणजे पूर्व संस्कार इत्यादि बरोबर घेऊन जात असतो.

ब्राह्मण :— जीव हा दुसरा देह प्राप्त करून घेतांना बीजभूत जी सूक्ष्मभूते त्यांनीं वेष्टित होऊनच जातो असें आपण म्हणाला, त्याला आधार काय ?

आचार्य :— त्याला आधार म्हणजे छांदोग्य श्रुति होय. यांत पंचाग्नि विद्येच्या अनुरोधानें जीव हा संसारांत पडण्याचा प्रकार क्रम निरूपण करण्यांत आला आहे.

ब्राम्हण :— काय तो प्रकार ?

आचार्य :— स्वर्ग, पर्जन्य, पृथ्वी, पुरुष आणि स्त्री हे पांच अग्नी आहेत. ( द्युपर्जन्य पृथ्विपुरुष योषित् पंचाग्नयः ( छां. ५–९–१ )

ब्राम्हणः– बरं, पुढें ?

आचार्य :— या पांच अग्नीमध्यें द्यावयाच्या श्रद्धा, सोम, वृष्टि, अन्न आणि रेत या अशा पाच आहुति आहेत. पंचस्वाग्नित्र श्रद्धा–सोम वृष्टयन्न रेतोरूपाः पंचाहुतीः छां. ५–९–१ )

ब्राम्हण :— हें मला समजेल असें स्पष्ट करून सांगाल तर बरें होईल मला त्याचा चांगला बोध होईल.

आचार्य :— उदकाच्या सूक्ष्मरूपाला ' श्रद्धा ' म्हणजे ' उदक ' हें नांव आहे. सूक्ष्मरूपानें स्वर्गलोकाप्रत जाणे, हींच स्वर्गरूपी अग्नीमध्यें श्रद्धा-रूपी पहिली आहुति होय. तेथें त्या सूक्ष्मरूपाचें देव शरीर बनतें. पुढें त्या जीवानें केलेल्या कर्माला अनुसरून कांहीं काल तेथें त्याला सुखोपभोग मिळतो. नंतर तें शरीर द्रव होऊन त्या जीवाबरोबर पर्जन्यामध्यें मिश्रित होतें. या द्रवाला सोम हें नांव आहे. आणि त्या द्रवाचें जे पर्जन्यामध्यें मिश्रण होणें, हींच पर्जन्यरूपी अग्निमध्यें त्या उदकाची सोमरूपी दुसरी आहुति होय.

ब्राम्हण :— पुढें काय होतें ?

आचार्य :— पुढें पर्जन्याबरोबर तो द्रव त्या जीवासहवर्तमान पृथ्वीवर पडतो. हीच पृथ्वीरूपी अग्नीमध्यें त्या उदकाची वृष्टिरूपी तिसरी आहुति होय. समजलेना ?

ब्राम्हण :— हं समजलं. पुढें ?

आचार्य :— नंतर या द्रवाचें औषधीच्याद्वारा धान्य बनतें व तें धान्य अन्नरूपानें पुरुषाच्या पोटांत जाते. ही पुरुषरूपी अग्निमध्यें त्या उदकाची अन्न-

(१०१) ९३५९ 3

रूपी चवथी आहुति. नंतर त्या अन्नाचें पुरुषाच्या पोटांत रेत बनतें. तें रेत स्त्रीच्या उदरामध्यें त्या जीवनासह वर्तमान प्रवेष करतें. हीच स्त्रीरूपी अग्नीमध्ये त्या उदकाची रेतोरूप पांचवी आहुति होय. नंतर त्या रेताचाच गर्भाच्याद्वारें पुरुष बनतो. म्हणून पूर्वी सांतिलेल्या सूक्ष्मरूपीं उदकाला पांचव्या आहुतीच्या वेळीं ' पुरुष ' असें म्हणतात. हा असा मी तुम्ही विचारलेल्या सूत्राचा अर्थ व स्पष्टीकरण केलें आहे. आपलें समाधान झाले ना ? शंका असेल तर विचारायची.

ब्राह्मण :– झालें इतकेंच नव्हे, तर पूर्ण झालें ! मला आणखी कांहीं सूत्रावर आणखी कांही प्रश्न विचारावयाचें आहेत! व कांही मुद्यावर चर्चा करावयाची आहे. विचारूं कां त्याप्रमाणें प्रश्न व करूं का चर्चा ?

आचार्य :– खुशाल. आपणास हवे ते प्रश्न विचारण्याची व वाटेल त्या प्रश्नावर चर्चा करण्याची मोकळीक आहे.

' बरे ' म्हणून तो ब्राह्मण प्रश्न व मधुन मधुन चर्चाहि करूं लागला प्रथम प्रथम ब्राह्मण साधा दिसत होता. भोळा दिसत होता. पण पुढें पुढें प्रश्नांची सरबत्ती झडूं लागली व वादग्रस्त मुद्यावर चर्चा रंगत चालली तस तसे त्याचें सत्यस्वरुप व विद्वत्तेज उजळत चाललें. त्यानें अनेक प्रश्न उपस्थित केलें व कांहीं जटिल मुद्यांवर सूक्ष्म चर्चा चालविली. आचार्यांनीं त्या सर्व प्रश्नांचें व मुद्याचें सुंदर व तर्कशुद्ध स्पष्टीकरण करून खणखणीत निराकरण केलें. याप्रमाणें सात आठ दिवस शास्त्रार्थावर उलट सुलट हल्ले प्रतिहल्ले यांचा सारखा भडिमार सुरूं झाला. ब्राम्हणाचे सर्व प्रश्न सरळ व समाधानकारक सुटत चाललें व चर्चा ब्राह्मणाच्या आंगलट येऊं लागली ! त्या दोघांचें तें तुमुल शास्त्रार्थ पाहून तेथील शिष्यमंडळी चकित झाली. ब्राह्मणाची विलक्षण प्रतिभा व वादकौशल्य पाहून पद्मपादाची दृष्टि त्याब्राम्ह-

णावर सूक्ष्म रीतीनें क्षणमात्र रोखण्यांत आल्यावर त्याला असें समजून आलें कीं, तो म्हातारा हा खरा ब्राह्मण नसून, प्रत्यक्ष महर्षि बादरायण वेद व्यास आहेत ! पण हें उघड बोलून दाखविण्याचें त्याला धाडस होईना. आचार्यांना प्रत्यक्ष तसें सांगणे हें त्यास युक्त न वाटल्यामुळें पुढील श्लोक म्हणून अपरोक्ष रीतीनें त्यांना त्याची कल्पना दिली. तो श्लोक हा :—

' त्वं शंकरः शंकर एव साक्षाद्व्यासस्तु नारायण एव नूनम् । तयोर्विवादे सततं प्रसक्ते किं किंकरोऽहं करवाणि सद्यः ॥ ' हा श्लोक आचार्यांच्या कानावर पडतांच त्यांना एकदम अंतर्दृष्टी चमकून स्मृति आली व चटकन् उठून आचार्यांनीं त्या ब्राम्हणाचे पाय धरून नमस्कार केला ! ते त्या ब्राम्हणास म्हणालें :— महर्षि आपण वृद्ध ब्राम्हण नसून साक्षात् व्यास महामुनी आहा ! अजाणतां मी आपणाशी वाद करण्याचा व उपदेश करण्याचा अतिप्रसंग केला ! मला क्षमा करा ! व आपल्या मूळ स्वरुपांत दर्शन द्या ! !

व्यासांनीं आचार्यांची विद्वत्ता, विनय व विनम्रता पाहून परमानंद झाला व त्यांनी चटकन् आपलें सत्यस्वरूप प्रकट केलें. ! केवढें तें तेजस्वी स्वरूप ! ती दिव्य कांति व ती भव्य मुद्रा पाहून आचार्यांनी त्यांना साष्टांग नमस्कार घातला ! पुनः घातला ! पुनः घातला ! व्यासांनी त्यांस आपल्या हातांनी वर उचलून घेऊन, प्रेमानें पोटाशीं कवटाळून धरलें व म्हटलें— आचार्य ! आपण मला माझ्या शुकाप्रमाणेंच प्रिय आहा ! माझ्या सूत्रांवर आपण लिहिलेलें भाष्य पाहून मला परमानंद झाला ! मला तें फार आवडलें आपली विद्वत्ता परीक्षून पाहण्याच्या उद्देशानें मी बळेंच आढे वेढें घेऊन आपणास छेडले. पण आपण शांत राहून माझ्या सर्व प्रश्नाचें व मुद्याचें समर्पक निराकरण करून आमचें पूर्ण समाधान केलें. आपण प्राकृत पुरुष नाहींत ! तर सकलार्थदर्शी आहा !

आपण महानुभाव आहा ! ब्रह्मचर्यातूनच आपण संन्यास घेतला असून, जागतिक सुखावरील आपण दाखविलेलें खडतर वैराग्य अनुपम आहे ! सूर्याप्रमाणें आपलें प्रतिभातेज झळकत आहे ! आचार्य ! फार काय सांगूं ? तुह्मी माझ्या पदवीस येऊन पोंचला आहा !! माझ्या सूत्रांचें अंतरंग आपण यथार्थतः ओळखूनच स्पष्टीकरण करून मुमुक्षु जगाला नवीन प्रकाश दिला आहे !!' तुमचे जगावर फार मोठे उपकार आहेत !!! आपणाला माझे शतशः धन्यवाद आहेत. आपल्याला माझा आणखी एक संदेश आहे.

आचार्यः— तो कोणता ?

व्यासः— या ब्रह्मसूत्रावरील भाष्याप्रमाणेच आपण उपनिषदावरहि भाष्य रचना करावी.

आचार्यः— मुनिवर्य ! तें मी आधींच केलें आहे आणि शिष्यांस तें पढविलें आहे. आपण माझ्या भाष्याचा गौरव केलांत. मी धन्य झालो ! आतां माझें या जगांतील इतिकर्तव्य संपलें ! त्याबरोबरच माझें आयुष्यहि संपलें !! महामुने ! आपण इथं क्षणभर थांबावें. मी आपल्या समक्ष या गंगामातेच्या पवित्र उदकांत उडी घेऊन इहलोकयात्रा पूर्ण करतो !

व्यासः— आचार्य ! काय ह्मणालांत ? आयुष्य संपलें ? गंगेच्या उदरांत उडी मारून जलसमाधि घेणार ? आचार्य ! असलें साहस करूं नका ! इतक्यांत देहत्याग करूं नये ! आयुष्य संपलें असल्यास पुनः सोळा वर्षांचें आयुष्य भगवान धूर्जटीच्या अनुग्रहानें आपणास लाभेल ! आपण आतां आणखी सोळा वर्षे येथें जगून रहा ! व अद्वैततत्त्वाचा झेंडा जगभर फिरवून मिरवा ! ठिकठिकाणी जाऊन दुर्मतिवाद्यांचें खंडण करून, अद्वैतमताचा डांगोरा जगभर पिटविण्याचा प्रयत्न करा ! आणि विचारी

पुरावा नाहीं. तो उत्तरेचा रहिवासी असावा, असा जो तर्क आहे, त्याला आधार म्हणून आनंदगिरींच्या शंकरविजयांतलें हें पुढील वचन पुढें करण्यांत येतें. तें वचन हे असें आहे :—

'भट्टाचार्यो द्विजवरः कश्चित् उद्गदेशात्समागत्य
दुष्टमतावलम्बिनो बौद्धान् जैतान् संख्यातान्
निर्जित्य निर्भयो वर्तते ॥

(आनंदगिरीकृत शंकर दिग्विजय, पृ. १००)

भावार्थः— भट्टाचार्य नांवाचा कोणी एक द्विजवर उत्तर देशांतून येऊन, जैनबौद्ध पंडितांशी राजसभेंत वाद करून, वादांत त्यानें त्यांचा खडसून पराभव करून निर्भय झाला.

या वचनावरून असें निश्चित ह्मणतां येत नाही कीं, तो उत्तर देशाचा रहिवासी होता. वादकरण्यास-दिग्विजय करण्यास-उत्तर प्रदेशांतून खालीं दक्षिणेंत आला, हें विधान खरें आहे. पण तत्पूर्वी तो बौद्ध धर्माचें तत्त्वज्ञान शिकण्यास ह्मणून नालंदा विद्यापीठांत जाऊन राहिला होता, ही गोष्ट लक्षांत घेतल्यास वरील आनंदगिरीचें वचन खरेंच ठरतें. कारण नालंदा विद्यापीठ उत्तर प्रदेशांतच होतें, हें सुप्रसिद्ध आहे. तेथून निघून तो खाली दक्षिणेंत उतरला, एवढेंच त्यावरून अनुमान काढतां येईल. त्यावरून त्याच्या निवासस्थानाचा निःसंशय पक्का बोध होत नाहीं असो.

कुमारिल हा वैदिक धर्माचा कट्टा कैवारी व अभिमानी होता. जैमिनी सूत्रावर वार्तिक लिहून यज्ञसंस्थचें – वैदिक कर्मकांडाचें – पुनरुज्जीवन करून, त्याला प्रतिष्ठित स्वरुप आणून दिलें. तो गृहस्थाश्रमी असून कर्मकांडांत त्याचा हातखंडा होता. त्याचें वेदाचें ज्ञान मोठें खोल, विशाल

सूक्ष्म व मार्मिक होतें. तो घरचा चांगला प्रतिष्ठावंत होता. त्याची शेतीवाडी फार मोठी होती. घरांत धान्याची कोठारें तुडुंब भरली होती. शिवाय संपत्तीहि तशीच गडगंज होती. अर्थात् त्याचें जीवन सुसंपन्न व सुसमृद्ध होतें. घरामध्यें पांचशे दास व पांचशे दासी राबत होत्या. इतके सांगितल्यावर त्याच्या सांपत्तिक स्थितीचें निराळें वर्णन करणें नको ! चूडामणी राजाच्या दरबारी त्याची प्रतिष्ठा व वर्चस्व जबर होतें. राजानें त्याचा मानमरातब चांगला राखला होता.

कुमारिल हा वेद - वेदांग विद्येंत अत्यंत निपुण व शास्त्रज्ञानांत प्रगाढ पंडित होता. पण त्याकाळीं वेद विद्येला अवकळा आली असून, जनमनावरील त्याची पकड ढिली झाली होती. तो जैन–बुद्धाचा चालता काळ होता. राजदरबारी त्यांचें हुकमी वर्चस्व होतें. हिंदुराजे सुद्धां बौद्धाचार्यांना नमून व वचकून वागत असत. अशी ही वैदिक धर्माची भरतखंडातील त्यावेळची शोचनीय व अनुकंपनीय स्थिती होती.

कुमारिलाला बौद्ध धर्माचा पाडाव करावयाचा होता. पण तें कसें जुळावयाचें ? त्या धर्माचें–विशेषतः त्यातील तत्त्वज्ञानाचें – यथार्थ व सखोल ज्ञान करून घेतल्याशिवाय त्यातील मर्मस्थानें ओळखल्या शिवाय प्रतिपक्षास वादांत नामोहरम करणें सुलभ नाहीं, हें तो ओळखून होता. म्हणून तें ज्ञान प्रथम करून घेणेच्या भरीस तो लागला. अर्थात् त्यावेळी नालंदा विद्यापीठ हें फार प्रसिद्ध होतें. हजारो विद्यार्थी शिक्षण घेण्यास तेथें फार लांबून येत असत. बाहेर देशचें जिज्ञासु सुद्धा तेथें शिकण्यास येऊन राहिले होते. बौद्ध धर्माचें व तत्त्वज्ञानाचें तें त्यावेळीं प्रमुख व प्रसिद्ध विद्यापीठ बनलें होतें. तेथें जाऊन बौद्ध तत्त्वज्ञानाचें शिक्षण घ्यावे, या इराद्यानें कुमारिल आतां नालंदाकडे निघाला.

वाटेंत त्याला असें समजलें कीं, भिक्षुशिवाय इतर धर्मियांस तेथें प्रवेश मिळणें सुलभ नाहीं व शक्य असलें तरी बौद्ध आचार्य इतरांस तसें शिक्षण मन मोकळें करून देण्यास तयार नाहींत. तेव्हां कुमारिलाने भिक्षुवेष घेऊन व भिक्षुचर्या पत्करून विद्यापीठांत प्रवेश मिळविला. त्यावेळीं तेथें धर्मपाल हा कुलगुरु व मुख्याध्यापक होता. त्याच्या जवळ जाऊन, त्याची शिष्यवृत्ति पत्करून, बौद्धधर्माचें संपूर्ण ज्ञान व अंतरंग समजून घेण्याच्या उद्योगास लागला. मूळग्रंथ पालीभाषेंत असल्यामुळें त्याभाषेचें ज्ञानहि त्यानें कसोशीनें करून घेतलें.

नालंदा येथें महायान पंथाचें विशेष प्राबल्य असून, त्याचें शिक्षण संस्कृत भाषेतून देण्यांत येत असे. ही गोष्ट कुमारिलाच्या आयती पथ्यावरच पडली. त्याचें संस्कृत ज्ञान तर सव्यसाची होतें, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. तेव्हां संस्कृत व पाली ग्रंथांचें सूक्ष्म अवलोकन करून त्यांतहि त्यानें प्राविण्य मिळविलें. बौद्धधर्माचे गुणदोष, त्याचीं मर्मस्थानें, त्याचीं विकृत शब्दयोजना, त्याचीं व्यंगे व छिद्रे या सर्वांची बारकाईनें छाननी करून, वैदिक धर्माशी व तत्त्वज्ञानाशी तीं कोठें व कशीं विसंगत आहेत, याचा आराखडा मनांत आंखून तो नीट जपून ठेविला. अर्थात् तो आतां बौद्ध आचार्यांशीं वाद करण्यास–वाच्निक झुंज घालण्यास–उत्तम तरबेज झाला. आतां तो विद्यापिठांतून बाहेर पडण्याच्या विचारांत व तयारींत होता.

इतक्यांत तेथें एक अनपेक्षित प्रसंग उद्भवला. एके दिवशीं विद्यापीठांत उघड्या मैदानांत बसून धर्मपाल हा भिक्षुवृंदाला समोर बसवून घेऊन बौद्धधर्मावर प्रवचन करीत बसला होता. त्या सभेंत कुमारिल हाहि होता. धर्मपाल हा बौद्धधर्माचें महत्व व श्रेष्ठत्व वर्णन करण्याच्या भरांत वैदिक धर्माची अवास्तव निंदा व नालस्ती आणि त्याबरोबरच नसते

जगाला अद्वैतपंथावर घेऊन या!!! प्रयागास जाऊन आतां तुम्ही कुमारिल भट्टास भेटून त्यास अनुकूल करून घ्यावें ह्मणजे आपले कार्य सुलभ होईल! तुमचा अखंड व उदंड विजय असो!!! आचार्य! माझें कार्य संपलें. आता मी स्वस्थानी जातो.

शंकराचार्यांनी पुनः त्यांस साष्टांग नमस्कार घातला व उठून वर पाहतात तो तेथें व्यास अदृश्य झालेले त्यांना दिसले.

---

## प्रकरण १७ वें

## भटपाद उर्फ कुमारिल भट

ततः स तारकाराति रजनिष्ट महीतले
भट्ट पादोऽभिदा यस्य भूषादिक सूत्रितम् ॥ ६० ॥
स्फुटयन्वेदतात्पर्यम भाज्जैमिनि सूत्रितम्।
सहस्रांशुरिवानूरु व्यञ्जितं बासयन् जगत् ॥ ६१ ॥
(शं. दि. उपो. ६०–६१)

जैमिनी सूत्रावर वार्तिक लिहून वेदाचें अंतरंग प्रकाशित करणारा प्रसिद्ध मीमांसक, वैदिक कर्मकांडाचा कट्टर अनुयायी, बौद्धधर्माचा कर्दनकाळ कुमारिल भट्ट उर्फ भट्टपाद हा चोल देशचा राहणारा असा सर्व सामान्य समज असून, त्याला अजून सर्व मान्यता मिळाली नाहीं. कांहींचें ह्मणणे असें आहे कीं, तो उत्तरेकडचा राहणारा. पण त्यालाहि भक्कम

घाणेरडे आरोप व दोष लादण्यांत हिरहिरीनें जीभ चालवीत होता. कुमारिलाला तें पाहून मोठें दुःख झालें. त्यांत धर्मपालाचें वेदविषयक अज्ञान मात्र उघडकीस आलें. ही गोष्ट फक्त कुमारिलाच्याच नजरेस आली. वेदाविषयी बौद्ध भिक्षूंचें अज्ञान, उथळज्ञान, तिरस्कारबुद्धि, विपरीत भावना व दूषितग्रह पाहून त्या वेदभक्तास अत्यंत विषाद वाटून, त्याच्या डोळ्यातून अश्रू टिपूं लागले. हें पाहून धर्मपालानें अश्रु टिपण्याचें कारण पुसतां, आपलें वेदविषयक अज्ञान व दूषित ग्रह पाहून मला फार वाईट वाटलें व त्या दुःखोद्वेगांत डोळ्यांतून अश्रुपात झाला असें सांगितलें.

याप्रमाणें कुमारिलानें त्या भर सभेंत धर्मपालाचें अज्ञान बाहेर काढून, त्याचें पांडित्य अवहेलनापूर्वक खंडण केल्यामुळें धर्मपालाची प्रकृति अर्थातच गरम झाली व सभेतील भिक्षुलोकांना मनस्वी राग आला. सर्व वातावरण तप्त व क्षुब्ध झालें. सर्व लोक कुमारिलावर उलटून आग पाखडूं लागले व दांत ओंठ चावूं लागले. धर्मपाल रागानें लालेलाल झाला. आणि त्यानें येथील शिष्यांना सांगितलें कीं या पाखांड्याला—धर्मनिंदकाला—गुरुद्रोह्याला—आतांच्या आतां प्रासादाच्या शिखरावर नेऊन तेथून त्याला खाली लोटून द्या ! कुलगुरु धर्मपालाचा हुकूम ! मग आतां विचारतां काय ? हुकुमाप्रमाणें शिष्यांनी त्यास झटकन् उचलून, प्रासाद शिखरावर नेऊन, तेथून त्यास मोरया केलें !

कुमारिलाने त्या असहाय स्थितीत वेदनारायणाची अनन्यभावें करुणा भाकली व हात जोडून प्रार्थना केली कीं, हे वेदनारायणा ! ही परीक्षेची वेळ असून, माझी लाज राखणें न राखणें हें तुझ्याकडेच आहे. वेद खरे असले तर या दिव्यांतून सहिसलामत मी पार पडेन ! देवा ! मला या संकटांतून वांचवून, जगास वेदाचा महिमा जाहीर कर ! त्यावेळचे प्रत्यक्ष त्याचे उद्गार हे असे आहेत :—

पतन् पतन् सौधतलान्वरोरुहं,
यदि प्रमाणं श्रुतयो भवन्ति ।
( शं. दि. ७–९८ )

जीवेयमस्मिन् पतितोऽसमस्थले,
मज्जीविते तत् श्रुतिमानता गतिः ॥
( व्यासाचलकृत शंकर विजय ५–२९ )

भावार्थ : – श्रुति जर प्रणाम असेल तर प्रासाद शिखरावरून खाली पडलो तरी मी पुनः उठेन. कारण मी जर या प्रासाद तळांत जीवंत राहिलो तर तें माझें जीवंत राहणें हीच श्रुतिप्रामाण्याची साक्ष आहे !

याप्रमाणे हात जोडून वेदनारायणाची प्रार्थना केल्यावर शिष्यांनीं त्यास गुरूच्या आज्ञेप्रमाणें शिखरावरून खाली लोटून दिलें ! पण चमत्कार हा झाला कीं, कापसाच्या रासीवर फेंकून द्यावे, तसा प्रकार होउन, तो वेदभक्त कुमारिल सुराक्षित जीवंत राहिला ! ! त्याच्या केसासहि धक्का पोंचला नाहीं ! ! हा चमत्कार पाहून तेथील लोकांना महदाश्चर्य वाटलें. कुमारिल मेला तर नाहींच, ऊलट सुरक्षित वांचला, हें पाहून धर्मपाल चाकित झाला !

आपला बार फुसका ठरला, हें पाहून धर्मपाल मनांत चपापला. त्याच्या मनांत संशय डोकावूं लागला. कुमारिलाची चांगली खोड जिरवावी, ह्मणून त्यानें वेदप्रामाण्याचें खंडण करून आपल्या धर्माचें श्रेष्ठत्व त्यास पटवून द्यावयाच्या इराद्यानें कुमारिलाशी वेदप्रामाण्यावर वाद करण्यास पाचारण केलें. व जो वादांत हरेल त्यानें तुषाग्नीत प्रवेश करावा असें ठरलें. कुमारिलाला काय, हेंच पाहिजे होतें. देवानें आपणास ही आयती संधि

आणून दिली, याबद्दल संतोष व्यक्त करून तो वादास सिद्ध झाला. त्या दोघांचा वेदप्रामाण्यावर कडाक्याचा वादविवाद होऊन, अखेर धर्मपाल निरुत्तर झाला ! कुमारिलाची सरशी झाली व धर्मपालानें आपटी खाल्ली ! वेदाला पाणी चढलें व सुगतधर्माचें तेज काळवंडलें !! पुढें प्रतिज्ञेप्रमाणें तुषाग्नींत (भुसाच्या आगींत) प्रवेश करून धर्मपालानें प्राण दिला !! याप्रमाणें वैदिक धर्माचा पहिला विजय झाला आणि तेव्हांपासून बौद्धधर्माला अवकळा येत चालली ! हा पहिला तडाखा ह्मणजे बौद्धधर्मावर झालेला वज्राघातच कां म्हणाना !!

कुमारिलाला हें जें सामर्थ्य लाभलें व विजयश्रीनें माळ घातली, त्याचें मूळ त्याच्या वैदिक व बौद्ध धर्माच्या सखोल अभ्यासांत आहे. त्याचें दोन्ही धर्मांतील ज्ञान प्रगाढ व हुकमी होतें. बौद्धांचें मर्मस्थान त्यानें नीट व अचूक ओळखिलें होतें. बौद्धपंडित हे बुद्धिप्रामाण्याला अधिक महत्व व अग्रस्थान देत. शद्बप्रामाण्य ते मानीत नसत. बुद्धिप्रधान तर्कावरच त्यांची सर्व कांही भिस्त होती. बुद्धिवाद हा कितीहि चांगला असला तरी त्याला मर्यादा ह्मणून आहेच ! तर्कनिष्ठ बुद्धिवादांत शाश्वत सत्य असत नाहीं. त्याची सत्यता सापेक्ष असते. निरपेक्ष असत नाहीं. ह्मणून कालांतराने तो शिळा होतो. निरुपयोगी ठरतो. दुसरा सवाई शाहाणा निपजून त्यावर कुरघोडी करतो व त्याचे वाभाडे काढतो. याला प्रत्यक्ष बौद्धधर्मच साक्ष आहे.

या बौद्ध पंडितांना वेदाचेंहि कांही ओझरतें ज्ञान होतें. उपनिषदेंहि त्यांनी चाळली होतीं. अर्थात् त्यांतील पटेल व मानवेल अशा आचार-विचारांची उसनवारी करून, शद्बप्रामाण्याला धाब्यावर बसवून, तर्काला फाजील महत्व देऊन त्यांनी आपल्या बुद्धिप्रमाणें धर्मप्रपंच सजविला. आपल्याला आड येणाऱ्या वैदिक तत्त्वज्ञानाला मुरड घालून, बौद्धधर्माची

कशीबशी सजावट करून, कांही काल बौद्धधर्माचा बेगडी झेंडा भरत खंडांत मोठ्या तोऱ्यानें मिरविला. पण तो चिरंजीवी झाला नाहीं. वैदिक पंडितांनी पुनः उचल खाल्ली व त्या पाखंडी धर्मावर निकराचा हल्ला करून-मर्मस्थानावर घाव घालून-त्याला नामशेष केलें. ही मर्दुमकी मुख्यतः कुमारिल व श्रीशंकराचार्य यांची असून, त्याचें सर्व श्रेय या महान् विभूतिद्वयांनाच दिलें पाहिजे, असें ह्मटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं. असो. प्रकृतं अनुसरामः

यानंतर भट्टपाद तेथून निघाला व उत्तरेतील प्रसिद्ध जैन-बौद्ध आचार्यांबरोबर वादविवाद करून, वादांत त्यांना पराभवाचे तडाखे देऊन, वेदविद्येचे श्रेष्ठत्व व प्रभुत्व पुनः जगाच्या निदर्शनास आणलें. आतां त्यानें कंबर कसली व सनातन धर्माचें गतवैभव पुनः प्रस्थापित करण्याच्या इराद्यानें दिग्विजय करण्याचा चंग बांधला व ठिकठिकाणीं जाऊन उत्तरेतील प्रतिस्पर्ध्यांचा पुरा त्रीमोड करून स्वारी दक्षिणेकडे वळली.

नर्मदेच्या खाली उतरून हळुहळू येता येतां तो कर्नाटक प्रांतात आला. तेथें त्यावेळीं सुधन्वा नांवाचा राजा राज्य करीत होता. तो वैदिक मार्गी होता. तरी दरबारांत बौद्धांचें वजन व वर्चस्व भारी होते. जैनांची चुळबुळहि जोरांत होती. वैदिक धर्माला उजाळा देणारे पंडित निष्प्रभ व निराश बनल्यामुळें त्यांचें ज्ञानभांडार अडगळींत जाऊन पडलें होतें. जिकडे तिकडे वेळीं अवेळीं वेदांची निंदा, ब्राह्मणांची टवाळी, देवतांची निर्भर्त्सना भरमसाट व मनमुराद करून, बौद्धधर्माचा उदोउदो करण्याचा सपाटा जोरांत चालला होता. राजा सुधन्वा हा शांत, दयाळु व सहिष्णु-वृत्तीचा असल्यामुळें व रात्रंदिवस बौद्धांच्या संगतीत रुळल्यामुळें, त्यांची पकड त्याच्यावर चांगली बसली होती. शिवाय तो मोठा न्यायप्रिय असल्यामुळें सर्वधर्मावर त्याची समदृष्टि होती. कुमारिल हा येतांयेतां कर्नाटकांत उतरल्यावर अखेर राजधानींत येऊन पोहोंचला.

सुधन्वा हा वैदिक मार्गी राजा होता, तरी जैन-बौद्धांच्या सहवासानें जवळ जवळ तो बौद्धाळल्या सारखाच होता. बौद्धधर्मावर त्याचा विशेष लळा होता. पण त्याची राणीमात्र कट्टर वैदिक धर्माभिमानी होती. घरांत तिनें बौद्ध-जैनांचा पायहि शिरकूं दिला नव्हता. वाड्यांत सगळा वैदिक आचारविचार चालू होता. देवतार्चन, पूजाअर्चा, व्रतउपोषणें, उत्सव-समारंभ हीं सगळीं वेदोक्त मार्गानेंच चालत. राजा तेथें लुडबुड करीत नसे. पण राणीला त्याचें दरबारांतील मुळमुळीत आचरण मुळींच पसंत नव्हतें. राजा जितका बौद्धांचा कैवारी, तितकीच ती त्यांचा द्वेष करणारी होती. एकदिवस दरबारांत बौद्धांनी केलेली ब्राह्मणधर्माची निंदा ऐकून तिला पुष्कळ वाईट वाटलें व मनस्वी रागहि आला. ती आपल्या महालांत येऊन पुष्कळ रडली व निराशेनें 'किं करोमि क्व गच्छामि को वेदान् उद्धरिष्यति' असा मोठा साद काढून आक्रोश करूं लागली. त्यावेळीं कुमारिल हा खाली रस्त्यावरून चालला होता. त्याच्या कानावर वरील उद्गार आले. ते ऐकून लगेच वर तोंड करून तो मोठ्यानें उद्गारला 'मा विषाद वरारोहे भट्टाचार्योस्मि भूतले'-राणी! विषाद मानूं नकोस! मी भट्टाचार्य भूमीवर जीवंत आहे. वेदाचा मी उद्धार करीन असें ह्मणून तो पुढें चालतां झाला. हें धीरोदात्त भाषण ऐकून राणीला जरासें हायसें वाटलें.

सरळ त्याने दरबाराची वाट धरली व थोडक्याच वेळांत दारांत येऊन उभा राहिला. द्वारपालांनी त्याची खबर आंत जाऊन राजास दिली. राजास कुमारिलचा लौकिक ऐकून माहीत होता. ती बातमी ऐकून त्याला फार आनंद झाला. तो चटकन् सिंहासनावरून उठून बाहेर आला. त्याला नमस्कार करून, त्याचा हात धरून मोठ्या आदरानें त्यानें त्याला दरबारांत नेलें व आपल्या शेजारीं मानाचें स्थान दिलें.

कुमारिल आसनस्थ झाल्यावर तेथील सभेवर एकवार त्यानें बारीक नजर फिरविली. तेथें त्याला काय दिसलें ? व त्यानें काय पाहिलें ? सगळा भिक्षूंचाच बाजार तेथें भरला होता. ब्राह्मण पंडिताचें नांव नाहीं ! कोठें असतील तर कानाकोपऱ्यांत त्यांना स्थान देण्यांत आलें होतें. तेथें धर्मचर्चा चालली होती, ती सगळी बौद्धधर्माचीच. त्या धर्माचें तिखटमीठ लावून महापुराण चाललें होतें. मधुन मधुन वैदिक धर्मावर शिंतोडे उडविण्याचा प्रकारहि चालला होता. आणि राजा तें सर्व मन लावून ऐकत होता. कुमारिलनें कांहींवेळ बसून तो प्रकार पाहिला. पुढें त्याला गप्प बसवेना. तेथील चावटपणा व खोडसाळपणा त्यास खपला नाहीं. ह्मणून मधेंच उठून उभा राहून तो राजास ह्मणाला—राजन् ! हे कोकिल! मलिन, काळे, नीच, श्रुतिनिंदक अशा या कावळ्यांच्या सहवासापासून तूं दूर राहशील तर खरोखर तूं प्रशंसनीय होशील ! ( ' मलिनैश्चेन्न संगस्ते नीचैः काककुलैः पिक । श्रुतिदूषकनिर्हादैः श्लाघनीयस्तदा भवेः ॥ ' शं. दि. १—६५ )

राजन् ! जागा हो ! आणि हा खोडसाळ प्रकार बंद कर ! '

हे त्याचे खणखणीत उद्गार ऐकून, तेथील पंडितांची मनें हादरून गेली ! ही ब्याद मधेंच कोठून उत्पन्न झाली, असें त्यांना वाटूं लागलें. वरील अन्योक्तीतील खोंच तेथील बौद्धपंडितांच्या लक्षांत येण्यास वेळ लागला नाहीं. राजानेंहि त्यांतील मर्म ओळखलें. तें मर्मभेदक भाषण ऐकून तेथील पंडितवर्ग खवळला. त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. तावातावाने राजाला उद्देशून ते ह्मणाले—राजा ! या धर्मनिंदकांचा ताबडतोब निग्रह कर ! त्याचें टाळकें ठिकाणावर दिसत नाहीं. दे त्याला हाकलून ! माथेफिरूं दिसतो !

त्या बौद्धपंडितांच्या वरील विषारी फूत्काराला भीक न घालतां कुमारिल स्पष्ट व खणखणीत आवाजांत उत्तरला - पंडितहो ! मी वैदि

धर्मांचा अनुयायी आहे ! तसा अभिमानीहि आहे ! लक्षांत घ्या, वायफळ शद्बानीं कार्य साधणार नाहीं. मी स्पष्ट स्पष्ट जाहीर करतो कीं, वैदिक धर्म हाच खरा व श्रेष्ठ धर्म आहे ! तुमचा धर्म म्हणजे निव्वळ थोतांड होय ! वैदिक धर्मावरच तुमचा धर्म जगला आहे ! त्याची यथेच्छ उसनवारी करून तो धर्म धष्ट व पुष्ट झाला आहे ! हें विसरून उलट त्या वेदमाऊलीलाच बोल लावतां ! केवढें धाष्टर्य हें तुमचें ! केवढा कृतघ्नपणा हा तुमचा ! आतांपर्यंत तुम्हाला तसा वस्ताद कोणी भेटला नाहीं, म्हणून तुमचे हे चाळे चालले आहेत ! आतां तरी काय झालें ? तुम्ही सर्व पाखंडी आहा, हें मी तुमच्या तोंडादेखत म्हणतो. तुमचा धर्म बिनबुडाचा आहे ! तो बांडगुळासारखा आहे ! असेल हिम्मत तर या माझ्याशीं वाद करायला. मी तुमच्याशीं झुंज खेळण्यास तयार आहे. वेदाचें प्रामाण्य पटवून देण्याची माझी सिद्धता आहे ! त्याचे श्रेष्ठत्व व सत्यता तुमच्या गळी उरविण्यास मी इथं आलो आहे. तुमचा धर्म तसा असल्यास तो मला सप्रमाण सिध्द करून दाखवा ! !

हें कुमारिलाचें सडेतोड भाषण ऐकूण, बौध्द पंडितांचें धाबे दणाणलें. त्यांच्या अंतःकरणांत धडकी भरल्यासारखें होऊन, क्षणभर तेथील वातावरण स्तब्ध व शांत झालें. पुढें अशी तोड निघाली कीं कोणी कोणाला अपशब्द न बोलता शांत चित्ताने कोणाचा धर्म खरा आहे, याविषयीं उभयतांनीं शास्त्रीय चर्चा करून, त्याचा निर्णय घ्यावा. आणि त्याबरोबर हा वाद राजाच्या अध्यक्षतेखाली व्हावा, असा संकेतहि ठरला. सगळे बौध्द पंडित एका बाजूला बसले व कुमारिल भट्टपाद विरुध्द बाजूला बसला. या बौद्ध पंडितांस कुमारिलची किंमत व योग्यता ठाऊक नव्हती. सामान्य भटाप्रमाणेच हाहि एक भिक्षुक भट आहे, अशी त्यांची कल्पना होती. बुद्धिप्रामाण्य व शद्बप्रामाण्य यांतील भेद व महत्व कोठें व कसें आहे, हे

तेथील ब्राह्मणांना समजत नव्हतें. ह्मणून बौद्धपंडित बुद्धिवाद लढवून ब्राह्मणांचें तोंड धरीत पण कुमारिल अव्वल दर्जाचा पंडित होता. त्यास बौद्धधर्माचें प्रगाढ ज्ञान असल्यामुळें बौध्दपंडितांच्या डावपेंचाविषयीं तो अनभिज्ञ नव्हता. सहज लीलेनें तो त्यांचे खंडण करीत सुटला. बौध्दपंडितांना वैदिक धर्माचें तेवढें सूक्ष्म व गाढ ज्ञान नसल्यामुळें त्यांची बाजू यात्रावर्तींत लंगडी पडूं लागली. वाद रंगत चालला व भरांत आला तसा त्यांचा चढाईचा जोर ओसरत चालला! त्यांचा युक्तिवाद फिका पडत चालला. त्यांची धर्मतत्त्वें चर्चेच्या ओघांत निष्प्रभ व निराधार होऊन, लटपटत चाललीं. अखेर अखेर कुमारिलाच्या भडिमाराला प्रतिपक्षांचा टिकाव लागेना व शेवटी भट्टपादाच्या प्रश्नाला निरुत्तर होऊन, मूग गिळून मौन धारण करणें त्यांस भाग पडलें!! अर्थात् वादांत बौद्धपंडित हरले! व कुमारिलाचा जय झाला!!

तेव्हां कुमारिल ह्मणाला— राजा! पहा! तुझे पंडित हरले! त्यांचा बुध्दिवाद कोलमडून पडला! व धर्मतत्त्वें निर्मूल ठरलीं! आमचा वैदिक धर्म हाच खरा धर्म! व त्याचें प्रामाण्य हेंच श्रेष्ठ प्रामाण्य!! कुमारिलाचें हें अपूर्व व अलौकिक गाढ पांडित्य पाहून राजा खरोखर आश्चर्यचकित झाला! राणी पडद्यांत बसून हा वाद ऐकतच होती. तिचा आनंद तर गगनी मावेना! ती परम हर्षित झाली व मुखावर स्मित हास्य चमकलें! बौध्दपंडितांचीं तोंडे आतां पाहण्यासारखी झालीं होतीं! खग्रास ग्रहण लागलें होतें त्यांच्या चेहऱ्यांना. खाली माना घालून पुतळ्याप्रमाणें ते स्तब्ध बसले होते!!

वेदाचें श्रेष्ठत्व हें बाह्यप्रमाणांनी सिध्द झालें, हें स्पष्ट झालें असलें तरी तेवढ्यावरच सर्व जगाची पूर्ण खात्री पटणें शक्य नाहीं. अंतःप्रमाणानेंहि ती गोष्ट सिध्द झाली पाहिजे, असें राजास वाटल्यावरून तो ह्मणालाः—

' भट्टपाद पंडितवर्य ! तुमचा वादांत जय झाला, हें मला मान्य आहे. हे आमचे दरबारी पंडित हरले, याविषयीं शंका नाहीं. तथापि माझें एक ह्मणणें आहे. तें आपण ऐकावें. वादांत जयपराजय करणें व होणें हें कांहीं धर्मश्रेष्ठतेचें लक्षण नव्हे. त्याला कांहीं तरी अंतःप्रमाणाची जोड हवी. त्याशिवाय धर्मश्रेष्ठतेचा ठाम निर्णय झाला असें होत नाहीं. वादकौशल्यानें एखादे वेळेस प्रतिपक्षाला निरुत्तर करतां येईल. पण तेवढ्यानें विचारी मनुष्याचें पूर्ण समाधान होणें शक्य नाहीं. तर आपण कांहीं अंतःप्रमाण दाखवून आमची खात्री करून द्यावी. व या बौध्द पंडितांनाहि कुरकुर करण्यास मग जागा राहणार नाहीं. तर मी त्याची परीक्षा पाहणार आहे. जो त्यांत यशस्वी होईल, त्याचा धर्म खरा. उद्ईक तुह्मी सगळे दरबारांत या असें ह्मणन राजाने ती सभा विसर्जन केली.

राजा दरबारातून उठून मंदिरांत आल्यावर त्यानें एक युक्ति योजिली. दोन्ही धर्मांचें अंतरंग परीक्षावें, याहेतूनें त्याने एक मोठा घटसर्प आणवून तो एका कुंभांत घालून त्याचें तोंड बंद करून ठेविलें. दुसरे दिवशीं दरबारांत पंडित जमल्यावर—अर्थात् यावेळीं कुमारिलहि तेथें होतांच—तो कुंभ सभेमध्यें आणवून ठेवून, त्यांस उद्देशून तो ह्मणाला–' पंडित हो ! हा कुंभ येथें आणून ठेविला आहे. मला तुमच्या धर्मांचें अंतरंग परीक्षावयाचें आहे. तर तुह्मी विचार करून, तुमच्या धर्माचा कौल द्या ! कुंभांत काय आहे, याचें उत्तर पाहिजे मला. ज्याचें उत्तर बरोबर असेल, त्याचा धर्म खरा. उत्तर खोटें असेल तर तो धर्म खोटा ! व खोटा [illegible] मी देहांत प्रायश्चित्त देईन !!

राजाचें हें भाषण ऐकून तेथील पंडितांच्या छातींत धडकीच भरली. देहांत प्रायश्चित ! केवढी ही कठोर शिक्षा ! आपलें चुकलें तर ! नको तो विचार !! राजाला काय सांगावें, हें त्यांना तेथें सुचेना. तेव्हां

त्यांनी त्याचें उत्तर देण्यास एक दिवसाची मुदत मागून घेतली व राजानें ती दिली. कुमारिलालाहि तोच न्याय लागूं करण्यांत आला, हें निराळें सांगणें नकोच.

बौद्ध पंडित दरबारांतून उठून घरीं आले. पण त्यांना कांहीं सुचेना. रात्रीं सर्वजण एकत्र जमून, त्या प्रश्नावर खल करून, अखेर एक निर्णय निश्चित करण्यांत आला. दुसरे दिवशीं दरबारांत गेल्यावर राजाने प्रथम बौद्ध पंडितांस विचारलें, तेव्हां त्यांनीं ' राजा ! या कुंभांत साप आहे ' असें सांगितलें. उत्तर बरोबर आलें. राजा तें ऐकून जरा अस्वस्थ झाल्या-सारखा दिसला. कुमारिलावर मोठी आपत्ति येणार ह्मणून तो जरा सचिंत झाला. तोच प्रश्न त्यानें आता कुमारिलासहि विचारला.

तेव्हा कुमारिल निर्भयवृत्तीनें गर्जून ह्मणाला, '' राजन् ! यांत भगवान शेषशायी नारायण आहे. ' ( भोगीश भोगशयनो भगवानिति भूसुरः ॥ ' ( शं. दि. उपो. ८७ ). या उत्तरानें राजाची खात्री पटली कीं, कुमारिलाची इतिश्री झाली ! त्याचा कौल लटका पडला ! मरणदंड भोगणें त्याला आतां प्राप्त आहे. न्यायदेवतेला पक्षपात नाहीं. ज्यांच्याकडे सत्य, त्याला ती विजयमाळ घालणार ! आता परीक्षेचीच वेळ आली. राजानें कुंभाचें तोंड उघडण्यास सांगितल्यावर तोंड उघडून आंत पाहतांच-काय चमत्कार ! - तेथें साप न दिसतां शेषशायी भगवान श्रीविष्णूची मूर्ति दिसली ! ! केवढें आश्चर्य ! सुधन्व्याला तें पाहून परमावधीचें आश्चर्य वाटलें व त्याचें मन आनंदभरित झालें ! ! कुमारिलाचा जय झाला ! ! वैदिक धर्माचें प्रामाण्य श्रेष्ठ ठरलें ! ! सत्यानें अखेर जिंकली ! ! वैदिक धर्माचा केवढा प्रचंड विजय तो ! ! !

आतां न्यायाची अम्मलबजावणी करणें प्राप्तच झालें. निर्णय आपल्याविरुद्ध गेला, असें पाहतांच बौद्ध पंडितांचें धाबेच दणाणले ! व

आपला जीव वांचविणेसाठीं त्यांची तेथून धांवपळ सुरू झाली ! जीव घेऊन ते सैरावैरा पळत सुटले ! पळतां पळतां त्यांना भुई थोडीच झाली. कांहीं लोक पकडले गेले व कांहीं पसार झाले. नंतर राजानें आपल्या हद्दींतून सर्व बौद्धांना बाहेर जाण्यास व जे जाणार नाहींत, त्यांना जीवें मारण्यास राजाज्ञा दिली ! ! अर्थात् जे पळाले ते वाचले व जे राहिले, ते प्राणास मुकले ! ! हा कुमारिलाचा दक्षिणेतील फार मोठा विजय होय ! !

नंतर त्यानें जैनांचाहि समाचार घेतला. त्यांच्याशीहि खडाजंगी वाद करून, त्यांनाहि वादांत धूळ चारली ! ! जैन पंडितहि वादांत हरले व कुमारिलाच्या गळीं विजयश्रीने माळ घातली ! सिंहानें हत्तीच्या कळपांत विध्वंस मांडावा, तसें कुमारिलाने जैन पंडितांचें केलें.

**'कुमारिल मृगेंद्रेण हतेषु जिनहस्तिषु ।**
**निष्प्रत्यूहमवर्धंत श्रुतिशाखाः समंततः ॥**

( शं. दि. उपो. ९७ )

हत्तीच्या कळपांत शिरून सिंहानें जशी त्यांची दाणादाण करावी, तद्वत् कुमारिल भट्टानें जैनांचाहि वादक्षेत्रांत पार फडशा उडवून दिला !

याप्रमाणें कुमारिल भट्टांनी मोठा पराक्रम गाजवून जैनबौद्धधर्माला जो हादरा दिला, त्यानें त्या धर्मांची कंबरच मोडल्यासारखी झाली ! पुढें तो कसाबसा जीव धरून होता, पण पुढें श्रीशंकराचार्यांनी त्याचा पार धुव्वा उडवून त्यास जमिनीस खिळवून टाकलें ! आणि तें कायमचेंच ! ! पुनः त्यांनी डोकें वर काढलें नाहीं ! बौद्धधर्माला भारतांतून गचांडी मिळाली आणि जैन धर्म जमीन धरून बसला, तो पुढें वर उठलाच नाहीं ! ! तेव्हांपासून वैदिक धर्माची विजयी पताका जगांत मोठ्या वैभवानें व तोऱ्याने फडफडत राहिली आहे ! ! !

---

# प्रकरण १८ वें

## कुमारिल व शंकराचार्य

श्रुत्वेति तां सत्वरमेष गच्छ—
न्व्यालोकयत्तं तुषराशिसंस्थम् ।

शं. दि. ७—७७

दूरे विधूताघमपाङ्गभङ्ग्या
तं देशिकं दृष्टिपथावतीर्णम् ।
ददर्श भट्टो ज्वलदग्निकल्पो
जुगोप यो वेदपंथ जितारि : ॥

शं. दि. ७—७९

कुमारिलाचें प्रगाढ पांडित्य अगाध विद्वत्ता आणि अपार बहुश्रुतपणा पाहून, शंकराचार्यांना त्यांची भेट घेण्याची व अनुभवाचा उपयोग करून घेण्याची प्रबळ इच्छा झाली व इच्छा होणें साहजिकच आहे. कुमारिलानी बौध्दधर्माच्या चढाई धोरणाला चांगलाच पायबंद घातला होता. किंबहुना त्याला चांगला कैचींत पकडलें होतें. ठिकठिकाणीं वाद करून बौद्धधर्माचें बेगडी स्वरूप लोकांच्या निदर्शनास आणलें होतें. त्याचा फायदा शंकराचार्यांस फार अनुकूल झाला. अर्थात् भट्टपादांना भेटण्यास ते मोठे उत्सुक झाले. ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहून त्यांनी ठेविलें होतें. त्यावर कोणी पंडितानें उद्बोधक व साधार असें विस्तृत वार्तिक लिहावें, अशी त्यांची फार इच्छा होती. अर्थात् वार्तिक लिहिण्यास कुमारिल हे सिद्धहस्त होते. शबर भाष्यावर त्यांनी श्लोक–वार्तिक व तंत्र–वार्तिक अशीं दोन श्रेष्ठ वार्तिकें लिहिलीं होतीं. आणि त्या ग्रंथातील विद्वत्तेचा प्रभाव पंडित-

समाजावर चांगला पडला असून, त्यामुळें वार्तिककार या नावानें मीमांसा-दर्शनाच्या इतिहासांत त्यांचें स्थान अजरामर होऊन राहिलें होतें.

आचार्यांनी याच उद्देशानें शिष्यमंडळी बरोबर घेऊन व्यासांच्या सूचनें प्रमाणें उत्तर काशीहून निघून प्रयागाला आले. व त्रिवेणी तटाकावर तळ दिला. तेथें त्यांना बातमी लागली कीं, कुमारिल हे त्रिवेणी तटावर तुषानल पेटवून त्यांत ते प्राणाहुति देत आहेत ! केवढी खेदाची गोष्ट ! एवढ्या मोठ्या महामीमांसकाला-वैदिक धर्माच्या उध्दारकर्त्याला-अग्निप्रवेश करून देहपात करण्याचा प्रसंग यावा, हा केवढा दैवदुर्विलास ! अजून भट्टपाद जीवंत होते. त्यांच्या शरीराचा अगदी खालचा भाग मात्र जरासा भाजला होता. पण मुखावर विलक्षण तेज झळकत होतें ! त्यांच्या सभोवती शिष्यपरिवार जमून तें हृदयद्रावक दृश्य पाहून डोळ्यांतून अश्रू ढाळीत होता. शंकराचार्य तेथें आले व तो कारुणिक देखावा डोळ्यांनी पाहिला.

शंकराचार्यांचा लौकिक अगोदरच कुमारिलांच्या कानावर येऊन थडकला होता. पण त्यांना प्रत्यक्ष डोळ्यानें पाहण्याचें भाग्य मात्र लाभलें नव्हतें. तो योग आता जुळून आला. आचार्य अकल्पित आपल्यासमोर उभे असलेले पाहून, त्यांना मोठे समाधान वाटलें. व आपल्या शिष्यांकडून त्यांचें यथायोग्य आदरातिथ्य करविलें. भिक्षा ग्रहण केल्यावर आचार्यांनी आपलें भाष्य भट्टपादांना दाखविलें. तें पाहून त्यांना फार आनंद झाला. व त्या ग्रंथाची त्यांनी खूप प्रशंसा केली. भट्टपादांनी सांगितलें कीं, मी जर तुषानलाची दीक्षा घेतली नसती, तर त्याग्रंथावर अवश्य सुंदर वार्तिक लिहिलें असतें.

आचार्यांनी त्यांना सांगितलें कीं, आतांतरी काय झालें ? मी तीर्थ शिंपडून आपलें सर्व शरीर पूर्ववत् करतो. आपण वार्तिक लिहावें, अशी माझी इच्छा आहे. यागोष्टीस भट्टपादांनी सम्मति दिली नाहीं. तेव्हां

तशा प्रकारची उग्र दीक्षा घेऊन देहपात करण्याचें कारण विचारतां भट्टपाद म्हणाले ! – मी दोन मोठे अपराध केले आहेत. त्यांच्या परिमार्जनार्थ मी हें कठोर प्रायश्चित्त घेत आहे. माझें पहिलें पातक हें कीं ज्या गुरुजवळ मी बौद्ध धर्माचें शिक्षण घेतलें, त्याचा मी एकापरी द्रोह केला आहे. व दुसरें पातक ह्मणजे जगत्कर्त्या ईश्वराचें खंडण. कर्मकांडाची महति गाण्याच्या भरांत मी ईश्वराचें निराकरण केलें आहे. ज्यांच्या पासून मला बौद्ध आगमाचें व तत्त्वज्ञानाचें ज्ञान झालें त्यांना मी वैदिक धर्माच्या अभ्युदयार्थ भर सभेंत वाद करून नामोहरम केलें. व त्यांच्या कुलाचा नाश केला. हें पाहिलें पातक माझें. दुसरें जैमिनीय मत–समर्थनार्थ ईश्वराचें मी जागजागीं खंडण केलें. हें दुसरें पातक माझे ! हीं दोन अक्षम्य पातकें मी केलीं आहेत. । 'तदेवमित्थं सुगतादधीत्य, प्रघातयं तत्कुलमेव सर्वम् । जैमिन्युपज्ञे ऽभिनिविष्टचेता : शास्त्रे निरास्य परमेश्वरंच ॥' शं. दि. ७–१०१ )

या दोन्ही अपराधांतून मुक्त होणेसाठीं मी हें प्रायश्चित्त घेत आहे. आपण ब्रह्मसूत्रावर भाष्य केलें आहे, असें माझ्या ऐकिवांत आलें आहे. त्यावर वृत्ति लिहून यश मिळविणेची माझी इच्छा होती पण जें व्रत मी अंगिकारलें आहे, त्याची पूर्तता करणें माझें परम कर्तव्य होय. अंगीकृत व्रत मी मोडूं इच्छित नाहीं. माझी अशी सूचना आहे की वेदांत मार्गाचें ऊर्फ ब्रह्मविद्येचें प्रकाशन व प्रसार करण्यासाठीं आपण आतां माझा पट्टशिष्य जो मंडनमिश्र, त्याजपाशी जाऊन त्याच्याशी चर्चा करावी. कुमारिल भट्टाच्या शद्बांतच सांगावयाचें ह्मणजे तें असें:–' तथा ऽ दग्धशेषशरीर : मद्भगिनीभर्ता मण्डनमिश्र : सर्वज्ञ इव सकलविद्यासु पितामह इव वर्तते । तेन साकं भवद्वादकण्डूतिनिवृत्तिपर्यन्तं प्रसङ्गं कुरु '

( आनंदागीरिकृत शंकर विजय, प्रकरण ५५ )

पुनः सांगतो तोहि माझ्यासारखाच कट्टर कर्मवादी आहे. वैदिक कर्मकांडाचा तो मोठा अभिमानी आहे. प्रवृत्तिशास्त्रांत तो महा निपुण आहे. वेदविद्या त्याला पूर्ण वश आहे. तथापि निवृत्तिशास्त्राविषयीं त्याचा आदरभाव नाही तर आपण त्याच्याशी युक्तिवाद घालून, अद्वैतपंथाची महति त्यास पटवून देऊन त्याची समजूत पाडावी. तो जर वश झाला तर जगच वश झालें, असें समजण्यास हरकत नाहीं. ह्मणून ह्मणतो कीं आपल्या कार्यसिध्यर्थ लवकर त्याच्याकडे जावें. ' अयंच पन्था यदि ते प्रकाश्य : सुधीश्वरो मंडनमिश्रशर्मा । दिगंत-विश्रांतयशा विजेयोयस्मिन् जिते सर्वमिदं जितं स्यात् ॥ (शं. दि. ७-११३ ) आचार्यांनी कुमरिलाच्या या सूचनेस मान्यता दिली व त्याचा निरोप घेऊन पुढील मार्ग सुधारला.

## प्रकरण १९ वें

## मंडनमिश्र

**सदावदन्योगपदं च साम्प्रतं स विश्वरूपः प्रथितो महीतले ।**
**महागृही वैदिक कर्मतत्परः प्रवृत्तिशास्त्रे निरतः सुकर्मतः॥११४॥**
**निवृत्तिशास्त्रे न कृतादरः स्वयं केनाप्युपायेन वशंनीयताम् ।**
**वशंगते तत्र भवेन्मनोरथस्तदान्तिकं गच्छतु माचिरं भवान् ॥११५॥**

( शं दि. ११४-११५ )

भारताच्या इतिहासांत एक असा काळ चमकून गेला कीं त्यावेळीं मीमांसा शास्त्राला फार मोठी भरती आली होती. तशा उज्वल कालांतच मंडनमिश्राचा उदय झाला होता. हा सुप्रसिद्ध महामीमांसक कुमारिल भट्टपादाचार्यांचा प्रमुख व पट्टशिष्य होता. तो अत्यंत विद्वान् - विद्वान् ह्मणजे महा विद्वान्-असून त्याच्या विद्वत्तेची ख्याति भरतखंडांत सर्वत्र

दुमदुमून राहिली होती. मीमांसाशास्त्रावर त्याची हुकमी सत्ता असून वैदिक कर्ममार्गाचा तो कट्टर अनुयायी व एकनिष्ठ उपासक होता. प्रवृत्तिमार्गावर त्याची अनन्य श्रद्धा असून निवृत्तिमार्गाविषयीं त्याला बिलकूल आदर व सहानुभूति नव्हती. अर्थात् फक्त वेदांचें एकमेव प्रामाण्य त्यास पसंत व मान्य असून वेदांताला-ह्मणजे उपनिषद्विद्येला-तो तितके प्राधान्य देत नसे. तो त्याकाळी समस्त विद्वन्मंडळाचा मुकुटमणि असल्यामुळें कोठें गेला तरी विद्वत्सभेत त्यास अग्रपूजेचा मान मिळत असे.

आपल्या अद्वैत मताचा जगावर प्रकाश व प्रभाव पाडावयाचा झाला तर या मंडनमिश्राचें सहाय्य व सहानुभूति यांची अत्यंत जरूरी आहे, ही गोष्ट आचार्यांना पूर्ण पटली होती. कसेंहि करून त्यास अनकूल करून घ्यावे-किंबहुना अद्वैत तत्त्वाचें सत्य व श्रेष्ठ असें पारमार्थिक स्वरूप शास्त्रार्थ करून त्यास पटवून द्यावे, ह्मणजे त्याची आपल्या कार्याला अनुकूलता लाभून आपला मार्ग सुकर होईल - असा विचार करून आचार्यांनी त्याला वादांत जिंकण्याचें ठरविलें. वादांत त्याच्या सारखा नामी मोहरा पडला व पाडला तर जगातील सर्व पंडितांवर जय मिळविल्याचें श्रेय खास लाभणार, याची त्यांनीं पक्की खूणगांठ मारून ठेविली. अतएव दिग्विजयास प्रारंभ करतांना प्रथम त्यांनी मंडनमिश्र या हुकमी मोहऱ्यावरच नेम धरला व वादांत त्यांना चीत करण्याचें ठरविलें.

मंडनमिश्राचें व्यक्तिगत नांव विश्वरूप असें होतें. ( पंडित मंडळीचा तो भूषणभूत होता, ह्मणून त्याला मंडन हें नांव पडलें. ) त्याच्या बापाचें नांव हिममित्र असे असून माहिष्मती येथील तो रहिवासी होता. तो शुक्लयजुर्वेदी काण्वशाखीय ब्राम्हण असून वैदिक कर्मकांडाचा तो एकनिष्ट उपासक होता. वेद हे अपौरुषेय असुन स्वयमेव प्रामाण्य ग्रंथ आहेत आणि

तदुक्त धर्म हाच खरोखर मनुष्याच्या अभ्युदय-निःश्रेयसास कारणीभूत आहे. त्याच्यासारखा विश्वकल्याणकारी असा जगांत दुसरा धर्मच नाहीं, अशी त्याची दृढ समजूत व प्रामाणिक भावना होती.

मंडन जितका विद्वान्, तितकाच तो मोठा भाग्यवानहि होता. त्याचें घर ह्मणजें इहलोकांतील प्रत्यक्ष कुबेरभुवनच ! बृहस्पतीसारखी विद्वत्ता व कुबेरासारखें वैभव होतें त्याचें-त्या मंडन-मिश्राचें ! अफाट नि उंचच उंच असा भक्कम चुनेगच्ची भव्य वाडा होता त्याचा. ! व त्याला शोभेल अशी अंतर्बाह्य सजावट, आंत बाहेर सुंदर व रेखीव असें कोरीव नक्षीकाम व भिंतीवर विविध रंगानें रंगविलेलीं देव-देवतांचीं मनोहर चित्रें. घरांत पहावे तिकडे लखलखाट व चकचकाट ! त्याचें ऐश्वर्य व वैभव पाहून तो महागृही असें ह्मणविला जात असे.

ब्रह्मसूत्रावरील भाष्य जगमान्य होण्यास मंडनमिश्राची मदत अवश्य आहे, तर त्याजकडे जाऊन त्यास आपलें भाष्य दाखवून, त्याची अद्वैत सिद्धांताची – ' ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या '– या महावाक्याची त्यास खात्री पटवून, त्याचा कल अनुकूल करून घेतल्यास भाष्य जगमान्य होण्यास मग अडचण पडणार नाहीं असें कुमारिलाने आचार्यास सुचविल्यावर, त्या आदेशानुसार शंकरानी प्रयागहून निघून, मंडनमिश्राच्या घराची वाट धरली. बरोबर शिष्य परिवारहि घेतला. मजल दरमजल करीत करीत कांहीं दिवसांनी मंडनाचें महष्मती नगर गांठलें. मंडनाचें तें निवासस्थान नर्मदेच्या कांठाकर वसलें होतें. नगराच्या शेजारीच एक सुंदर उद्यान असून, तेथें त्यांनी आपला तळ दिला। उद्यानाच्या मध्यभागीं एक तलाव होता. तेथें जाऊन, स्नान करून, आन्हिक वगैरे आटोपून शिष्यांना तेथेंच सोडून, ते एकटेच मंडनाच्या घराकडे निघाले.

दोनप्रहरची वेळ होती ती. सूर्य अगदी मध्यावर आला होता. लोक जेवणाच्या तयारींत गुंतले होते. अशावेळी आचार्य मंडनाच्या घराकडे निघाले. पण त्यांना त्याच्या घराचा पत्ता माहीत नव्हता. मोठी पंचाईत येऊन पडली. नगर पडलें मोठें. कोणाची ओळख नाहीं, देख नाहीं. विचारावें कोणाला नि जावें कुठें हा विचार येऊन पडला. इतक्यांत सुदैवानें डोक्यावर पाण्याच्या घागरी घेऊन दोन स्त्रिया वाटेनें घराकडे चालल्या होत्या. त्यांच्या जवळ जाऊन मंडनाच्या घरासंबंधीं चौकशी करतां, त्या बायांना तें पाहून मोठा आचंबा वाटला. मंडनाचें घर ह्मणजे तेथील सर्व आबालवृद्धांना माहीत. तेव्हां हा मनुष्य चौकशी करतो, त्या अर्थी हा कोणी तरी नवखा असला पाहिजे, असा विचार करून त्यांनी पुढील प्रमाणें त्याच्या घरचा पत्ता सांगितला. त्यांनी मंडनाच्या घराची खूण सांगितली ती येणें प्रमाणें–

**स्वतः प्रमाणं परतः प्रमाणं**
**कीरांगना यत्र गिरं गिरन्ति**
**द्वारस्थ नीडांतरसन्निरुद्धा**
**जानीहि तन्मंडनपंडितौकः ॥ ६ ॥**
**फलप्रदं कर्म फलप्रदोतः**
**कीरांगना यत्र गिरं वदन्ति**
**द्वारस्थनीडान्तर सन्निरुद्धा**
**जानीहि तन्मंडनपंडितौकः ॥ ७ ॥**

( शं. दि. ८, ६-७ )

**भावार्थः**– वेद हे स्वतःप्रमाण आहेत का परतःप्रमाण आहेत, सुखदुःखात्मक फळ कर्म देतें का ईश्वर देतो, याप्रश्नांची चर्चा ज्याच्या दारावर बांधलेल्या पिंजऱ्यांतील पोपट मैना पक्षी हे आपापसांत करतात, तोच मंडनाचा वाडा समजा. असें सांगून त्या दासी आपल्या रस्त्यास लागल्या. अर्थात् त्या स्त्रिया मंडनाच्या घरच्या दासी होत्या.

तदुक्त धर्म हाच खरोखर मनुष्याच्या अभ्युदय-निःश्रेयसास कारणीभूत आहे. त्याच्यासारखा विश्वकल्याणकारी असा जगांत दुसरा धर्मच नाहीं, अशी त्याची दृढ समजूत व प्रामाणिक भावना होती.

मंडन जितका विद्वान्, तितकाच तो मोठा भाग्यवानहि होता. त्याचें घर ह्मणजें इहलोकांतील प्रत्यक्ष कुबेरभुवनच ! बृहस्पतीसारखी विद्वत्ता व कुबेरासारखें वैभव होतें त्याचें-त्या मंडन-मिश्राचें ! अफाट नि उंचच उंच असा भक्कम चुनेगच्ची भव्य वाडा होता त्याचा. ! व त्याला शोभेल अशी अंतर्बाह्य सजावट, आंत बाहेर सुंदर व रेखीव असें कोरीव नक्षीकाम व भिंतीवर विविध रंगानें रंगविलेलीं देव-देवतांचीं मनोहर चित्रें. घरांत पहावे तिकडे लखलखाट व चकचकाट ! त्याचें ऐश्वर्य व वैभव पाहून तो महागृही असें ह्मणविला जात असे.

ब्रह्मसूत्रावरील भाष्य जगमान्य होण्यास मंडनमिश्राची मदत अवश्य आहे, तर त्याजकडे जाऊन त्यास आपलें भाष्य दाखवून, त्याची अद्वैत सिद्धांताची - ' ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या '- या महावाक्याची त्यास खात्री पटवून, त्याचा कल अनुकूल करून घेतल्यास भाष्य जगमान्य होण्यास मग अडचण पडणार नाहीं असें कुमारिलाने आचार्यास सुचविल्यावर, त्या आदेशानुसार शंकरानी प्रयागहून निघून, मंडनमिश्राच्या घराची वाट धरली. बरोबर शिष्य परिवारहि घेतला. मजल दरमजल करीत करीत कांहीं दिवसांनी मंडनाचें महष्मती नगर गांठलें. मंडनाचें तें निवासस्थान नर्मदेच्या कांठाकर वसलें होतें. नगराच्या शेजारीच एक सुंदर उद्यान असून, तेथें त्यांनी आपला तळ दिला. उद्यानाच्या मध्यभागीं एक तलाव होता. तेथें जाऊन, स्नान करून, आन्हिक वगैरे आटोपून शिष्यांना तेथेंच सोडून, ते एकटेच मंडनाच्या घराकडे निघाले.

दोनप्रहरची वेळ होती ती. सूर्य अगदी मध्यावर आला होता. लोक जेवणाच्या तयारींत गुंतले होते. अशावेळी आचार्य मंडनाच्या घराकडे निघाले. पण त्यांना त्याच्या घराचा पत्ता माहीत नव्हता. मोठी पंचाईत येऊन पडली. नगर पडलें मोठें. कोणाची ओळख नाहीं, देख नाहीं. विचारावें कोणाला नि जावें कुठें हा विचार येऊन पडला. इतक्यांत सुदैवाने डोक्यावर पाण्याच्या घागरी घेऊन दोन स्त्रिया वाटेनें घराकडे चालल्या होत्या. त्यांच्या जवळ जाऊन मंडनाच्या घरासंबंधीं चौकशी करतां, त्या बायांना तें पाहून मोठा आचंबा वाटला. मंडनाचें घर ह्मणजे तेथील सर्व आबालवृद्धांना माहीत. तेव्हां हा मनुष्य चौकशी करतो, त्या अर्थी हा कोणी तरी नवखा असला पाहिजे, असा विचार करून त्यांनी पुढील प्रमाणें त्याच्या घरचा पत्ता सांगितला. त्यांनी मंडनाच्या घराची खूण सांगितली ती येणें प्रमाणें—

**स्वतः प्रमाणं परतः प्रमाणं**
**कीरांगना यत्र गिरं गिरन्ति**
**द्वारस्थ नीडांतरसन्निरुद्धा**
**जानीहि तन्मंडनपंडितौकः ॥ ६ ॥**
**फलप्रदं कर्म फलप्रदोतः**
**कीरांगना यत्र गिरं वदन्ति**
**द्वारस्थनीडान्तर सन्निरुद्धा**
**जानीहि तन्मंडनपंडितौकः ॥ ७ ॥**

( शं. दि. ८, ६-७ )

**भावार्थः**— वेद हे स्वतःप्रमाण आहेत का परतःप्रमाण आहेत, सुखदुःखात्मक फळ कर्म देतें का ईश्वर देतो, याप्रश्नांची चर्चा ज्याच्या दारावर बांधलेल्या पिंजऱ्यांतील पोपट मैना पक्षी हे आपापसांत करतात, तोच मंडनाचा वाडा समजा. असें सांगून त्या दासी आपल्या रस्त्यास लागल्या. अर्थात् त्या स्त्रिया मंडनाच्या घरच्या दासी होत्या.

त्या खुणांच्या रोखानें आचार्यांनी आपला रस्ता सुधारला. वाटेंत त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. ज्याच्या घरच्या दासी देखील उत्तम संस्कृत बोलतात व पोपटमैना गहन प्रश्नांची चर्चा करतात, तो मंडन केवढा पंडित असला पाहिजे, हा विचार त्यांच्या मनाला चाटून गेला! मोठ्यांचा हा महिमा आहे! खुणेच्या रोखानें शोध करीत करीत अखेर आचार्य मंडनाच्या वाड्यापाशी आले. आंत जावें म्हणताततर त्यावेळीं बाहेरचा दिंडी दरवाजा बंद करण्यांत आला होता. तेथील रखवालदारास कारण विचारतां त्यांनीं आंत मंडनमिश्राच्या वडिलांची श्राद्धतिथि असल्यामुळें श्राद्धकर्म चाललें आहे म्हणून दरवाजा बंद करण्यांत आला आहे व बाहेरच्या माणसाला परवानगीशिवाय आंत सोडण्यास मनाई आहे, असें सांगितले. हें त्यांचें उत्तर ऐकून आचार्य देव मनांत जरा अस्वस्थ झाले. मंडनास तावडतोब भेटण्याची त्यांना मोठी उत्कंठा लागली होती. पण येथें पहावें तर हा प्रकार! काय करावें हें त्यांना सुचेना. पुढें विचार करतां करतां त्यांना एक मार्ग सुचला व त्याप्रमाणें त्यांनीं करावयाचें मनांत आणलें.

## प्रकरण २० वें

## पहिली सलामी झडली

**अथ द्युमार्गादवतीर्णमन्तिके**
**मुन्योः स्थितं ज्ञानशिखोपवीतिनम् ।**
**संन्यास्यसावित्यवगम्य सोऽभव-**
**त्प्रवृत्ति शास्त्रैकरतोऽपि कोपनः ॥**

(शं. दि. ८-१४)

आचार्य योगविद्येंत पूर्ण तरबेज असून, त्यांनी कांहीं अलौकिक सिद्धीहि प्राप्त करून घेतल्या होत्या. आतां त्या विद्येचा येथें उपयोग करून

घेण्याचें त्यानीं ठरविलें. बाहेरचा दिंडी दरवाजा आतां इतक्यांत उघडण्यांत येण्याचा रंग न दिसल्यामुळें बाहेरच तिष्ठत बसणें हें त्यांस योग्य दिसलें नाहीं. शिवाय मंडनाची भेट घेण्याची ही संधिहि योग्यच वाटली. झालें तर त्यांतून कदाचित् चांगलेंहि निघण्याचा संभव होता. म्हणून ते योगासन घालून, शरीर हलकें करून, योगबलानें अंतरिक्षमार्गानें प्रासादावर चढून, गवाक्षांतून खाली उतरून जेथें श्राद्धविधि चालला होता, तेथें दत्त म्हणून ब्राह्मणाजवळ जाऊन ते नेमके उभे राहिले !

त्यावेळीं व्यास व जैमिनी हे पितृस्थानीं बसले असून, मंडन हा श्राद्धांगभूत त्यांचें प्रादप्रक्षालन करण्याच्या तयारींत गुंतला होता. शंकराचार्य हे अचानक ब्राह्मणाशेजारी उभे राहिलेले पाहून, त्याला एक मोठा आश्चर्याचा धक्का बसला. त्यानें तोंड आंबट केलें. व मेंदूत पारा चढूं लागला ! संन्यासी ! कर्मभ्रष्ट संन्यासी ! ! धर्मलंड संन्यासी ! ! काय अभद्र ध्यान तें ! काय अमंगळ पेहराव त्याचा ! श्राद्धांत केवढे विघ्न ! ! केवढा अपशकून ! ! पण तो अमंगल प्राणी येथें आला कसा व कोठून ? कोणी त्याला आंत सोडलें ? का द्वारपालांचा डोळा चुकवून चोरून तो आंत आला, हें त्याला समजेना. नतद्दष्ट संन्याशासारखा अभद्र प्राणी श्राद्धासारख्या पवित्र प्रसंगीं उपस्थित होतो, म्हणजे काय गोष्ट आहे! केवढा अपशकून हा! केवढें भयंकर साहस या संन्याशाचें! तो सर्व विरुद्ध व विपरीत प्रकार पाहून, मंडना सारख्या कर्मठाचें चित्त खवळणार नाहीं तर काय होईल ! त्याला जो रागाचा झटका आला, तो शेषाच्या टाळूस जाऊन भिडला ! त्याचा विवेक सगळा पार मावळून गेला व मोठ्यानें कडाडून तो म्हणालाः—ए मुंडक्या ! तूं कसा व कुठून आलास ? ( कुतो मुंडी ? )

**आचार्यः**— ( मुंडी या शद्बावर श्लेष करून ) मी गळ्यापासून वर डोक्यापर्यंत मुंडण केलें आहे. ( ' आगळान्मुंडी ' ) .

आपल्या प्रश्नाचा श्लेष काढून भलतेंच उत्तर दिलेलें पाहून, मंडन अधिकच चिडून म्हणाला- ' मी तुझा मार्ग विचारतो. कुठपासून मुंडण केलें आहेस, हें विचारीत नाहीं. (' मया ते पृच्छते पन्थाः ' ८-१७ ).

यांतूनहि आचार्यांनी श्लेष काढून त्यास प्रश्न केला:- ' मार्ग काय म्हणाला ? ' ( किमाह पन्थाः ? )

मंडन ( अधिकच चवताळून )- तुझी आई मुंडी म्हणजे विधवा आहे, असें म्हणाला (' तन्माता मुण्डेत्याह ' ८-१७ ).

आचार्य ( तितक्याच शांतपणें म्हणाले)- तो म्हणाला तें बरोबर आहे !(' तथैवेति त्वन्माता मुण्डेति आह ' ८-१७. )

**मंडनः**- तूं सुरापान करून आला आहेस कीं काय ? ( अहो, पीता किमु सरा ! '

आचार्यः- (' पीता ' याचा अर्थ ' पिवळी ' असा करून ) अहो सुरा पिवळी नसते. पांढरी असते. (' नैव, श्वेतायतःस्मर ८-१७ )

मंडनः- मग दारूचा वर्ण सुद्धा तुला ठाउक आहे तर.

आचार्यः- हं दारूचा रंग तेवढा मी जाणतो. पण त्याची चव मात्र तूं जाणतोस ! ( अहं वर्णं भवान् रसम् ' ८-१८ )

मंडनामिश्र मनांत फार ओशाळल्यासारखा झाला. आपल्या प्रत्येक प्रश्नावर श्लेष काढून मर्मभेदक उत्तर दिलेलें पाहून त्याचा चेहरा खाडकन् उतरला. तथापि रागाचा आवेश आणून तो म्हणाला. हे संन्याशा! हे दुर्बुद्धे ! गाढवाला देखील ओझें होईल, असली कंथा तूं पांघरली आहेस. मग शिखा व यज्ञोपवीत यांचाच भार झाला काय तुला ?

(' कन्थां वहसि दुर्बुद्धे गर्दभेनापि दुर्वहाम् । शिखायज्ञोपवीताभ्यां कस्ते भारो भविष्यति ' ८-२० )

आचार्यः— तुझ्या बापाला देखील उचलली नसती, अशी कंथा मी वाहतो. पण मी खरंखुरं सांगतो की, शिखा व यज्ञोपवीत यांचा भार तुझ्या वेदांना सुद्धां होईल! ('कन्थां वहामि दुर्बुद्धे तव पित्रापि दुर्भराम्। शिखा यज्ञोपवीताभ्यां श्रुतेर्भारो भविष्यति' ८–२१).

मंडनः— मी जाणतो तुझी योग्यता! स्वतःच्या भार्येचें पालनपोषण करण्यास असमर्थ ठरलास म्हणून संन्याशाचें सोंग घेऊन, शिष्यांचा घोळका व पुस्तकांचा भारा बरोबर घेऊन गांवोगांव भटकत आहेस.

नव्हे कां! यावरून तुझें ब्रह्मज्ञान किती आहे, हें स्पष्ट दिसतें! ('त्यक्त्वा पाणिगृहीतिं स्वामशक्त्या परिरक्षणे। शिष्यपुस्तकभारेच्छोर्व्याख्याता ब्रम्हनिष्ठता' ८–२२)·

आचार्यः— माझे दोष काढणारा तूं तरी काय? तूं तरी असा कोठें निष्पाप आहेस? गुरुसुश्रूषेचा कंटाळा करून, गुरुकुलांतून पळ काढलास आणि बायको करून घेऊन घरदार थाटून तिची सेवा चाकरी करीत आयुष्य घालवीत बसला आहेस! त्यावरून तुझी कर्मनिष्ठा केवढी प्रखर व दांडगी आहे, हें उघडच दिसतें! ('गुरुसुश्रूषणालस्यात् समावर्त्य गुरोः कुलात्। स्त्रियःशुश्रूषमाणस्य व्याख्याता ब्रम्हनिष्ठता' ८–२३).

मंडनः— नवमास स्त्रियांच्या गर्भांत राहिलास. स्त्रियांनीच तुला लहानाचा मोठा केला. आणि आतां कृतघ्न होऊन त्यांची निंदा करतो आहेस. हा तुझा कृतघ्नपणा अत्यंत किळसवाणा आहे, नव्हे काय? ('स्थितोसि योषितां गर्भे ताभिरेव विवर्धितः। अहो कृतघ्नता मूर्ख कथं ता एव निन्दसि॥' ८–२४).

आचार्यः- पंडितजी! आपलें धर्मज्ञान खरोखरच मोठें और आहे! अहो! ज्या स्त्रियांचें दुग्धपान आपण केलेंत, ज्यांच्या उदरीं आपण

जन्म घेतलांत त्यांच्याच ठिकाणी आपण पशुवत् रमत बसलात, काय म्हणावे या तुमच्या मूर्ख आचरणाला ? ( 'यासां स्तन्यंत्वया पीतं यासां जातोसि योनितः । तासु मूर्खतम स्त्रीषु पशुवत् रमसे कथम्' ॥ ८-२५).

मंडनः- अहो शहाणे ! आह्वनीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नि या तीन पवित्राग्नींचा-श्रौताग्नींचा-आपण संन्यास घेऊन त्याग केलांत-उच्छेद केलांत म्हणून आपणास वीरहत्येचें महापातक लागलें आहे ! तुम्ही मोठे पापी आहां ! ( 'वीरहत्यामवाप्नोसि वन्हीनुद्वास्य यत्नतः' ८-२६).

आचार्यः-आपण परमपदाविषयीं – सच्चिदानंद ब्रह्माविषयीं – कोरे करकरीत अज्ञानी राहिल्यामुळें आपणास आत्महत्त्येचें महापातक जडलें आहे ! हें कसें आपण जाणत नाहीं ?

हा सर्व आचार्यांचा मार्मिक युक्तिवाद एकंदरींत आंगलट येऊन पडल्यामुळें मंडनानें शहाणपणा शिकून, या विषयाला बगल देऊन, निराळाच प्रश्न उपस्थित केला. तो म्हणालाः- द्वाररक्षकांना चकवून आपण येथें आंत आलात, त्या अर्थी आपण चोर आहां ! ( दौवारिकान्वन्चयित्वा कथं स्तेनवदागतः १८-२७ )

आचार्यः- आणि आपण तरी काय ? मी तर चोर नाहींच ! आपण मात्र पक्के चोर आहात ! योग्यवेळीं आलेल्या भिक्षूंना त्यांचा अन्नभाग न देतां स्वतःच आपण भक्षण करूं पाहतां ! यावरून चोर कोण हे उघडच दिसतें ! ( भिक्षुभ्यो अन्नमदात्वा त्वं स्तेनवद्भोक्ष्यसे कथं ८-२७)

येथेंहि मंडनाचे नाक खालीं झालें. आचार्यांच्या हरजबाबी अष्टपैलू विद्वत्तेपुढें व वक्तृत्व कौशल्यापुढें मंडनाची बुद्धि फिक्की पडली ! व पुढें काय बोलावें, हें सुचेना. तेव्हां वादाला पूर्णविराम द्यावा या हेतूनें तो

म्हणाला– हल्ली मी श्राद्धकर्मांत गुंतलो आहे. अशावेळीं आपल्या सारख्या दीडशहाण्याबरोबर बोलत बसणें बरोबर नाहीं. ( ' कर्मकाले न संभाष्य अहं मूर्खेण सम्प्रति ' ८–२९ )

आचार्यः– आपण यतिभंग करून ह्मणजे ' संभाष्य अहं ' या ठिकाणीं नियमप्राप्त झालेला संधि न करतां बोललात, त्याअर्थीं आपलें व्याकरण ज्ञान किती अगाध आहे, हें स्पष्ट झालें. ( ' अहो प्रकटितं ज्ञानं यतिभङ्गेन भाषिणा ' ८–२९ )

मंडनमिश्र त्यावर कोटि लढवून म्हणाले– जो तुम्हासारख्या यतीचा पराभव करण्यास प्रवृत्त झाला, त्याला व्याकरणांतील यतिभंगाचा काय दोष लागणार ? ( ' यतिभङ्गे प्रवृत्तस्य यतिभङ्गो न दोषभाक् ' ८–२९ )
यावरहि आचार्यांनी मात करून म्हटलें;– अहो पंडितजी ! यतिभंग याचा षष्ठी तत्पुरुषसमास न करतां, पंचमी तत्पुरुष करा म्हणजे काय अर्थ होतो, हें कळेल. ( ' यतिभङ्गे प्रवृत्तस्य पञ्चम्यन्तं समस्यताम् ' ८–२९ )

शेवटी आपली कोणत्याच प्रकारें मात्रा चालत नाहीं व डाव टिकत नाहीं, हें पाहून मंडन रागाच्या झटक्यांत म्हणाला– कुठें तें ब्रह्म ! कुठें तुझी दुर्बुद्धि ! कोठें तुझा संन्यास ! नि कोठें हें कलियुग ! कशाला काय ताळ ना मेळ ! आयतें गोड गोड खायला मिळावें म्हणून संन्याशांनी हा ढोंगी वेष पत्करला आहे ! ( क्व ब्रह्म क्वच दुर्मेधाः क्व संन्यासः क्व वा कलिः । स्वाद्वन्न भक्ष्यं कामेन वेषोऽयं योगिनां धृतः ' ८–३० )

आचार्यांनीहि तसलेंच माप त्याच्या पदरांत घालण्यास कसी केलें नाहीं. तेहि गंभीर स्वरांत म्हणाले– कुठें तो स्वर्ग ! कुठें हें तुझें दुराचरण ! कुठें आग्निहोत्र ! आणि कुठें हें कलियुग ! केवळ विषय भोगाच्या मैथुनाच्या इच्छेनेंच तूं हा गृहस्थाचा वेष घेतला आहेस ! ( ' क्व स्वर्गः क्व दुराचारः क्वाग्निहोत्रं क्व वा कलिःन्ये मन्ये मैथुनकामेण कर्मिणां धृतः ! ' )

अशाप्रकारें एकमेकाची दुरुत्तरें चालू असतां पितृस्थानी बसलेले व्यास तो वाद ऐकून मनांत अस्वस्थ होऊन मंडनास ह्मणाले– मंडना ! तूं कोठें बसला आहेस, कोणाला काय बोलतो आहेस, याचें कांहीं तारतम्य आहे काय तुला ? या संन्याशाची योग्यता तूं जाणत नाहींस. पण आह्मी ती जाणतो. याचा अधिकार फार मोठा आहे. आत्मतत्त्वाचें त्याला परम ज्ञान झालें आहे. यानें पुत्रैषणा, दारैषणा, लोकैषणा यांचा बालपणींच त्याग करून, प्रखर तपश्चर्या करून श्रेष्ठ आत्मज्ञान करून घेतलें आहे ! सर्व ज्ञानी व तत्त्ववेत्त्यांमध्ये हा श्रेष्ठ मुकुटमणि आहे ! असें असतां तूं त्याच्याशीं जें कुत्सित भाषण केलेंस, तें सर्वथैव अनुचित झालें. तें तुझ्या विद्वत्तेला व योग्यतेला शोभणारें नव्हतें. या माध्यान्हकालीं यज्ञभोक्ता श्रीविष्णूच यतिरूपानें तुझ्या घरीं आला आहे, असें समज. त्याचें आदरातिथ्य कर ! त्याचें पूजन कर ! आणि यतिधर्माला उचित अशी भिक्षा घाल ! त्याला विन्मुख पाठवूं नकोस व अनादरहि करूं नकोस ! यति हा सर्वांना पूज्यच आहे ! !

व्यासांच्या या भाषणानें मंडनमिश्राचा पारा खालीं उतरला. तो शुद्धीवर आला. आपण आतांपर्यंत केलेलें वर्तन गृहस्थ धर्माला धरून नव्हतें. शिष्टाचाराला तें वावडें व विरुद्ध होतें, याची जाणीव होऊन, झालेली गोष्ट त्याच्या मनास लागून राहिली. नंतर त्यानें उठून आचार्यांना बसावयास आसन दिलें. व यथाविधि त्यांचें पूजन केलें. नंतर हात जोडून ‘ यतिवर्य, आज आपण आमचे घरी भिक्षा ग्रहण करावी ’ अशी प्रार्थना केल्यावरून आचार्यांनी तीं मान्य केली. पण त्यांनी एक अट घातली. ते म्हणाले- मंडनजी ! मी तुमची भिक्षा स्वीकारतो. पण अन्नभिक्षा मला नको. त्यासाठीं मी इथं आलो नाहीं. मला वादभिक्षा हवी आहे. ती तुह्मी द्या ! आपण मोठे पंडित कुलशेखर आहा, असा मी तुमचा लौकिक

एकला आहे. तुमच्याशी वाद करून तुह्माला जिंकावें आणि मी लिहिलेलें ब्रह्मसूत्रावरील अद्वैतपर भाष्य दाखवून, अद्वैततत्त्वज्ञान व निवृत्तिमार्ग यांचें महत्व व सत्यत्त्व पटवून द्यावे, या उद्देशानें मी इथें आलो आहे. कुमारिल भट्टपादांनी मला तसा आदेश दिला आहे. ह्मणून मी तुमचें घर गांठलें.

मंडनपंडितानें 'कांहीं हरकत नाहीं. आपल्या इच्छेप्रमाणें मी आपणास वाद भिक्षा देण्यास तयार आहे' असें सांगून, मधेंच स्थगित झालेल्या श्राद्धकर्मास पुढें चालना दिली. पुढें श्राद्धविधी आटपून, ब्राह्मणांस भोजन व आचार्यांस भिक्षा दिल्यावर, श्रीमदाचार्यांच्या शिष्यांसहि बोलावून घेऊन, त्यांचेंहि भिक्षावंदन आटोपल्यावर आपण स्वतः भोजनविधि उरकून घेतला. झाला हा प्रकार आचार्यांस एकापरी अनुकूलच झाला.

## प्रकरण २१ वें

## शंकर-मंडन-प्रतिज्ञा

**बाढं जये यदि पराजयभागहं स्यां,**
**संन्यासमंग परिहृत्य कषायचैलम् ।**
**शुक्लं वसीय वसनं द्वयभारतीयं,**
**वादे जयाजयफलप्रतिदीपिकाऽस्तु ॥**

शंकर-प्रतिज्ञा. शं. दि. ८-६२

**वादे कृतेऽस्मिन्यदि मे जयान्य**
**स्त्वयोदितात्स्याद्विपरीत भावः ।**
**येऽयं त्वयाभूद्वदिता प्रसाक्ष्ये**
**जानाति चेत्सा भविता वधूर्मे ॥**

मंडन-प्रतिज्ञा, शं. दि. ८-६५

भोजन वगैरे आटोपल्यावर व्यास, जैमिनि, शंकर, मंडन हे बाहेर चौकांत बैठकीवर येऊन बसले. त्यावेळीं त्यांच्या समक्ष वादविषय व अटी यांची चर्चा झाल्ं झाली. शंकराचार्य व मंडनमिश्र यांच्यांत तत्त्वतःच मोठा फरक होता. मंडन हे मीमांसक असल्यामुळे ते प्रवृत्तिमार्गाचे कट्टर चाहते होते. आचार्य हे वेदांती असल्यामुळे ते निवृत्तिमार्गाचे जहाल कैवारी होते. ब्रह्म व जग हीं दोन्हीं सत्य मानणारे मंडन तर ब्रह्म सत्य, जग मिथ्या मानणारे आचार्य. वेद हे कर्मप्रधान आहेत, असा मंडनाचा अभिप्राय, त्याचा जो शेवटचा भाग म्हणजे वेदांत हा ज्ञानप्रधान आहे, असा आचार्यांचा अभिप्राय; कर्म श्रेष्ठ हें मंडनाचें मत, ज्ञान श्रेष्ठ हे आचार्यांचें मत. कर्मानेंच मोक्ष हा मंडनाचा आग्रह व ज्ञानानेंच मोक्ष असा आचार्यांचा आग्रह. वेद हेच प्रमाण असें मंडनाचें म्हणणें, वेदांत हाच प्रमाण असें आचार्यांचें म्हणणें.. याप्रमाणें दोघांच्या मतप्रणालींत उत्तर दक्षिण ध्रुवाइतका विरोध असल्यामुळें वादांत कोण हरतो, त्यानें विजयी पक्षाचा स्वीकार केला पाहिजे, अशी अट आचार्यांनी पुढें आणली व आपण तसें वागण्यास मी तयार आहोत असें सांगितलें.

शंकराचार्य म्हणाले मी जो येथें आलो आहे, तो मंडनाशी वाद करून त्यास माझें अद्वैत मत पटवून देऊन, त्याचें सहकार्य माझ्या अंगीकृत कार्यांत मिळवावें, या हेतूनें आलों आहे. मंडन सांगतील तसें ऐकण्यास मी तयार आहे. म्हणजे वादांत मी परभूत झालो तर संन्याशाची ही काषाय वस्त्रे टाकून देऊन गृहस्थाची पांढरी वस्त्रें धारण करीन व वादांत मी जिंकलो तर माझ्या सांगण्याप्रमाणें मंडनानें वागलें पाहिजे, या अटीवर वाद करण्यास माझी तयारी आहे.

व्यासांनी ही अट मंडनापुढें ठेविली, तेव्हां त्यांनीहि त्यास कबुली दिली व नंतर प्रत्येकानें आपली प्रतिज्ञा पुढील प्रमाणें मांडली.

शंकराचार्यांनी आपला सिद्धांत व प्रतिज्ञा सांगितली ती अशीः—

**ब्रम्हैकं परमार्थसच्चिदमलं विश्वप्रपंचात्मना,**
**शुक्तीरूप्यपरमात्मनेव बहलाज्ञानावृतं भासते ।**
**तज्ज्ञानान्निखिलप्रपंचनिलया स्वात्मव्यवस्थापरं,**
**निर्वाणं जनिमुक्तमभ्युपगतं मानं श्रुतेर्मस्तकम् ॥**

( शं. दि. ८–६१ )

भावार्थः– या जगांत ब्रह्म एकच सत्, चित्, निर्मल व यथार्थ अशी वस्तू आहे. तें स्वतःच जगद्रूपानें अशा तऱ्हेनें भासते कीं, जसें शिंपलीमध्यें रूप्याचा भास होतो. शिंपलीतील रूपे जसें मिथ्या, तद्वत हें जगहि मिथ्या आहे.त्या ब्रम्हाच्या ज्ञानानेंच या प्रपंचाचा नाश होऊन प्राणी जगातील बाह्य पसाऱ्यातून सुटून, आपल्या विशुद्ध रूपांत प्रतिष्ठित होतो. त्यावेळीं तो जन्ममरणाच्या भवचक्रांतून म्हणजे संसारातून मुक्त होऊन जातो. हा असा माझा अद्वैताचा सिद्धांत आहे. (८–६१)

‘आणि मी अशी प्रतिज्ञा करतो कीं, या शास्त्रार्थांत जर मी पराभूत झालो तर ही अंगावरचीं काषायवस्त्रें टाकून देऊन, गृहस्थाचीं पांढरीं वस्त्रें धारण करीन.’ (८–६२)

याप्रमाणें शंकराचार्यांनी आपला अद्वैत सिद्धांत व प्रतिज्ञा सांगितल्यावर व्यासांनी यावर मंडनाचे म्हणणे काय आहे, हें विचारल्यावरून तो म्हणाला ‘ माझें म्हणणें हें असें आहे.:–

**‘वेदान्तान प्रमाणं चितिवपुषि पदे तत्र संगत्ययोगात्,**
**पूर्वो भागः प्रमाणं पदचयगमिते कार्यवस्तुन्यशेषे ।**
**शब्दांनां कार्यमात्रं प्रति समधिगता शक्तिरभ्युन्नतानां,**
**कर्मभ्यो मुक्तिरिष्टा तदिह तनुभृतामाऽऽयुषःस्यात् समाप्ते ॥**

( शं. दि. ८–६४ )

भावार्थः-वेदाचा कर्मकांड भाग हाच प्रमाण आहे. वेदांताला–उपनिषदाला– मी प्रमाण मानत नाहीं. कारण तो भाग चैतन्य-स्वरूप ब्रह्माचें प्रतिपादन करून सिद्ध वस्तूचें वर्णन करणारा आहे. वेदाचें तात्पर्य हें आहे कीं, विधीचें प्रातिपादन करावें. पण उपनिषदें विधीचें वर्णन न करतां केवळ ब्रह्मस्वरूपाचेंच प्रतिपादन करतात. म्हणून तीं प्रमाणकोटींत येऊं शकत नाहींत. शब्दाची शक्ति कार्यमात्रांत प्रकट करण्यांत येते. पण दुःखाचा मोक्ष कर्मद्वाराच होतो व त्या कर्माचें अनुष्ठान प्रत्येक मनुष्यानें आयुष्य-भर करीत राहिलें पाहिजे. हा असा माझा वेदोक्त सिद्धांत आहे.

(श. दि. ८-६४)

'जर माझा या शास्त्रार्थांत पराजय झाला तर मी हा गृहस्थाश्रम त्याग करून, संन्यास–धर्म स्वीकारीन आणि या गोष्टीस माझी भार्या भारती देवी साक्ष राहील. ही अशी माझी प्रतिज्ञा आहे.

( शं. दि. ८–६५ ).

याप्रमाणें दोघांनी आपापले सिद्धांत व प्रतिज्ञा व्यास व जैमिनि यापुढें मांडल्यावर त्या कार्यांत नजर ठेवून निर्णय देण्यासाठी अध्यक्षांची जरुरी आहे असा मुद्दा पुढें येऊन, व्यासास तो मान देण्याची दोघांनीहि आपली कबुली दिली. पण व्यासांनी तसें करण्यास सम्मति दर्शविली नाहीं. ते म्हणाले ' हें काम आमच्यापेक्षां चोख बजावण्यास श्री भारतीदेवी हीच लायक आहे. ती साक्षात् सरस्वतीचा अवतार असून सर्व शास्त्रांत ती पारंगत आहे.या वादाचा निर्णय देण्यास ती समर्थ आहे. तेव्हां आपण दोघांनी या बाबतीत तिचीच योजना करावी असें मला वाटते.' व्यासांचा हा सल्ला आचार्य व मंडन दोघांनाहि मान्य झाला व या कामी निर्णय देण्यास भारतीची योजना झाली.

८९३६३ ... वि: ... ९३६९

# प्रकरण २२ वें

## मंडन-शंकराचार्य-वादसंग्राम

ततस्तयोरास महान्विवादः
सदस्य विश्राणित साधुवादः ।
स्वपक्ष साक्षीकृत सर्व वेदः
परस्परस्यापि कृतप्रमोदः ॥

( शं. दि. ८-७० )

विद्वच्छिरोमणि महामीमांसक मंडनमिश्र व तत्त्वज्ञानशिखामणि अद्वैत मत स्थापनाचार्य श्रीशंकराचार्य यांच्यांत वादसंग्राम जुंपण्याचा प्रसंग आला. मंडनमिश्र हा मीमांसाशास्त्राचा पट्टीचा महापंडित असून कर्मकांडांत मोठा निष्णात होता. अर्थात् तो द्वैतवादी म्हणजे जीव व शिव यांच्यांत भेद मानणारा द्वैत पंडित होता. आचार्य हे, वेदांतविद्येचे पुरस्कर्ते असून ते जीव व शिव यात अभेद मानणारे अद्वैतवादी होते. मंडनाचा अभिप्राय असा कीं उपनिषदें ही द्वैतपर असून त्यांचें स्थान गौणप्रतीचें आहे. वेद हेच मुख्य असून वेदांत हा त्याला पूरक आहे. आचार्यांचा रोख असा कीं वेदांत- उपनिषदें- हींच मुख्य व श्रेष्ठ असून कर्मकांडात्मक वेद हे साधक व पूरक आहेत. वेदामध्ये व्यावहारिक ज्ञानाचा विमर्श असून, वेदांतांत पारमार्थिक ज्ञानाचा उहापोह आहे. याप्रमाणें त्या दोघांत उत्तर ध्रुवाइतकें मतवैचित्र्य असून तो जटिल प्रश्न निकसास लावून सत्यज्ञान प्रस्थापित करण्यासाठीं हा मोठ्या चुरशीचा वाद होता. एका बाजूला मंडनमिश्रासारखा महामदोन्मत्त हत्ती व दुसऱ्या बाजूला तत्त्वज्ञाननिपुण श्रीशंकराचार्यांसारखा सिंहाचा छावा असा प्रकार असून, ही लढत मोठी प्रेक्षणीय व युगप्रवर्तक अशी होती.

या वादक्षेत्रांत मंडन हा पूर्वपक्ष व आचार्य हे उत्तरपक्ष करते झाले. वादविषय असा होता कीं, मंडनाच्या मते जीव व ब्रह्म हे भिन्न असून

त्यांचे ऐक्य कदापि होणे व असणें नाहीं. आचार्यांचा सगळा रोख जीव व शिव यांचें ऐक्य या मुद्यावर होता. मंडनाने वादास तोंड फोडलें तें असें:—

मंडन म्हणाला— यतिवर्य ! जीव व परमेश्वर यांच्यांत वस्तुतः ऐक्य आहे— भेद नाहीं— असें आपण प्रतिपादन करतां. होय ना ? पण याला आधार काय ? ( शं. दि. ८–७६ )

शंकर— याला आधार ? आधार पाहिजे आपल्याला ? ठीक आहे. याला आधार प्रत्यक्ष श्रुतिच आहे.

मंडन— काय ? श्रुतिच आहे याला आधार ? आम्हांला तरी ती आढळत नाहीं. ती कोणती ?

शंकर— ती ही. ' तत्त्वमसि ' ही श्रुति आमच्या विधानाला पुष्टि-कारक असें प्रमुख प्रमाण आहे.

मंडन— ती कोठें आहे व तिचा संबंध कसा आला ?

शंकर— ही छांदोग्यातील श्रुति होय. आणि ती उद्दालक ऋषींनी आपल्या पुत्रास— श्वेतकेतूस— परमात्म्याचें निरूपण करतांना शेवटीं ' तो आत्मा, श्वेतकेतो ! तूं आहेस ' असें निःसंदिग्धपणे उपदेशिलें आहे. हें महा-वाक्यच आमच्या विधानाचें स्पष्ट व मुख्य प्रमाण आहे. आणि जीवेश्वराचे ऐक्य तें चक्क प्रतिपादन करतें. ( शं. दि. ८–७७ )

मंडन— उपनिषदांतील ' तत्त्वमस्यादि ' वाक्यें आमच्या मतें स्वतंत्र अर्थबोधक नव्हेत. एवढेंच कीं त्यांच्या जपापासून पापनाश मात्र होतो. हुंफट इत्यादि उभयसम्मत वाक्यें या बाबतींत उदाहरणें म्हणून दाखवितां येतील. ( शं. दि. ८–७८ )

शंकर– हुंफट इत्यादि वाक्यें उदाहरणार्थ घेऊन 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यें जपार्थ म्हणून मानणें हें योग्य नव्हे–कारण हुंफटादि-वाक्यांना मुळीं अर्थच नाहीं. पण पूर्वापार संबंध पाहिला तर 'तत्त्वमस्यादि' वाक्यें स्पष्ट व स्वच्छ अर्थबोध करतात. म्हणून अशाप्रकारचीं महावाक्यें केवळ जपार्थच आहेत हें म्हणणे ठीक नाहीं. पंडितवर्य ! सूज्ञांनी तसें कसें म्हणावे ? ( ७९ )

मंडन– यतिवर्य ! वेदवाक्यें हीं विधिचोदना व प्रतिषेधचोदना यांनी यज्ञयागादिकांचें विधान, मांसभक्षणादिकांचा निषेध करण्यासाठी प्रवृत्त झालेलीं आहेत. अशाप्रकारचीं विधीचीं प्रशंसा करणारी अर्थवाद स्वरूपाचीं अनेक वाक्यें आहेत. यज्ञ करणाऱ्या यजमानाचें वर्णन करणारीं–यागी देवता प्रकाशक–अशीं कांहीं वाक्येंहि आढळतात. कथा गोष्टीप्रमाणें केवळ वस्तूरूप कथन करणें हें कांहीं राजाज्ञेप्रमाणें वेदाचें काम नव्हे. म्हणून 'तत्त्वमसि' हें वाक्य आपाततः जीवेश्वराचें ऐक्यबोध करीत आसल्याचें दिसत असलें तरी तसा अर्थ करणें हें युक्त नाहीं. यज्ञयागादि करणाऱ्या जीवाचें स्वरूप प्रशंसनार्थ म्हणून त्याचा निर्देश आहे असें समजावें पाहिजे तर. पण जीवेश्वरांच्या ऐक्याचीं तीं तात्पर्यबोधक नाहींत. असें मी म्हणतो. ( ८० )

शंकर– कर्मकांडातील कर्मांगभूत अशीं यूपस्तंभादिक कांहीं वस्तूंना सूर्यादिकांच्या सादृश्यानें प्रशंसा करणारीं कांहीं वाक्यें आहेत. त्यांना विधि-विशेष म्हणण्याचें आम्ही मान्य करतो. पण स्वतंत्र अशा ज्ञानकांडांतील जीवेश्वराचें ऐक्य प्रतिपादन करणारीं वाक्यें कांडांतरांतील यज्ञयागादि कर-णाऱ्या यजमानाचीं प्रशंसक आहेत, हें आपलें म्हणणें आम्हांस पटत नाहीं. ( ८१ )

मंडन– तसें झालें तर 'मनोब्रह्म' 'अन्नं ब्रह्म, आकाशं ब्रह्म' इत्यादि वाक्यांप्रमाणेच जीवाला ब्रह्म म्हणून बोधणारीं वाक्यें वास्तविक ब्रह्म

नसलेल्या जीवांत परमात्म दृष्टि सांगितल्यामुळें एक संस्कार निर्माण करून कर्म समृद्धिच करतात असें समजण्यास काय हरकत आहे ? (८२)

आचार्य– ‘ मनो ब्रह्मेत्युपासीत ’ इत्यादि तुह्मी निर्दिष्ट केलेल्या वाक्यांत लिंग असून त्यापासून तसा अर्थ करणें हें युक्त होऊं शकेल. पण ‘ तत्त्वमसि ’ मध्यें मात्र मुख्यतः अभेदच प्रतिपादण्यांत आलें आहे. तसें जर नसतें तर ‘ तत्त्वमसीत्युपास्व ’ असे वाक्यस्वरूप झालें असतें. पण तसें त्याचें स्वरूप नाहीं. म्हणून तुमचें उदाहरण येथें लागूं पडत नाहीं. (८३)

मंडन– ‘ तत्त्वमसि ’ च्या अनुसंधानापासून मुक्ति म्हणून फलाचा निर्देश करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणे रात्रिसत्रांतहि ‘ प्रतिष्ठा ’ नामक फल प्रतिपादन करण्यांत आल्यामुळें तेथे विधीची कल्पना केली आहे. तसेंच येथेंहि तशी कल्पना कां करूं नये ? (८४)

शंकर– कर्म ह्मणा अथवा उपासना ह्मणा, ती आपल्या मनाप्रमाणें करतां येईल अगर सोडताहि येईल अगर अन्यप्रकारें आचरतां येईल. पण वस्तुस्वरूप जें आहे, तें आमच्या इच्छेप्रमाणें करतां अगर सोडतां येणार नाहीं. सबब रात्रीसत्राचें उदाहरण देऊन येथें विधीची कल्पना केली तर मुक्ति ही क्रियाजन्य स्वर्गादि लोकाप्रमाणें अनित्य ह्मणावी लागेल. नव्हे का ? (८५)

मंडन– बरें, तुह्मी म्हणता त्याप्रमाणें तत्त्वमस्यादि वाक्यें उपासना पर्यवसायी नव्हेत, हें आह्मी आतां मान्य करतो. तथापि हीं वाक्यें जीव व ईश्वर यांची साम्यबोधक आहेत, असें धरून चालण्यास कसला प्रत्यवाय आहे ? आपण म्हणतां त्याप्रमाणें तीं अत्यंत अभेदाचे बोध करणारीं आहेत हें आह्मांस मान्य नाहीं. (८६)

शंकर– तत्त्वमस्यादि वाक्यें जीवेश्वराचें साम्यबोधक आहेत, ऐक्य-बोधक नाहींत असें आपलें म्हणणें आहेसें दिसतें. मग आतां सांगा कीं जीव व ब्रह्म हे दोघेहि चेतन असल्यामुळें तें तुमचें साम्य चैतन्यसाम्य का सर्वज्ञता, सर्वात्मता इत्यादि गूण दोघांमध्येंहि असल्यामुळें, तें गुणसाम्य, यांत आपलें ह्मणणें काय आहे ! चैतन्यसाम्य हें तर प्रसिद्धच असल्यामुळ तें उपदेशाचा विषय होऊं शकत नाहीं. सर्वज्ञता, सर्वात्मता इत्यादि गुणाचें साम्य भेदवादी तुह्मांला संमत होण्यासारखें नाहीं. हें वरच दिसतें. ( ८७ )

मंडन– जीवेश्वर हे दोघेहि नित्य असल्यामुळें परमात्म्यांत असणारे ज्ञानानंद इत्यादि गुण जीवामध्येंहि आहेत. पण अविद्योपाधिमुळें त्याला त्यांचा उमज पडत नाहीं. म्हणून नित्य व ज्ञानानंदादि गुणामुळें परस्पर साम्य स्वीकारावें, असें आह्मी ह्मणतो. त्याला हरकत कां असावी ? ( ८८ )

शंकर– परमात्म्याप्रमाणेंच नित्य व ज्ञानानंद गुणांनी परिपूर्ण असलेला जीवात्मा हा परमात्माच आहे. त्या गुणांच्या अभिव्यक्तीला अविद्येचें आवरण आड येतें. हें आपणास मान्यच आहे. हें नाकबूल आहे कां आपणाला ? ( ८९ )

मंडन– जगाच्या जन्मस्थितिलयादिकांस कारणीभूत असलेला परमेश्वर हा चेतन आहे असें मान्य करून, त्याला जीवाचें साम्य कसें देतां येईल, हें दाखवून द्या.

शंकर– जगत्कारण जें ब्रह्म, तें तुझ्या सारखेंच चेतन आहे, जड नाहीं, असा ‘ तत्त्वमसि ’ चा उपदेश असता तर ‘ एवमस्ति ’ ( तुझ्या प्रमाणेंच आहे ) असा प्रयोग झाला असता. ‘ तत्त्वमसि ’ ( तें तूच आहेस ) असा प्रयोग झाला नसता. जगत्कारण हें जड नाहीं ही गोष्ट ‘ तदैक्षत ’ ( त्यानें संकल्प केला ) या वचनानें स्पष्टच होते. ( ९१ )

नसलेल्या जीवांत परमात्म दृष्टि सांगितल्यामुळें एक संस्कार निर्माण करून कर्म समृद्धिच करतात असें समजण्यास काय हरकत आहे ? (८२)

आचार्य– ' मनो ब्रह्मेत्युपासीत ' इत्यादि तुह्मी निर्दिष्ट केलेल्या वाक्यांत लिंग असून त्यापासून तसा अर्थ करणें हें युक्त होऊं शकेल. पण ' तत्त्वमसि ' मध्यें मात्र मुख्यतः अभेदच प्रतिपादण्यांत आलें आहे. तसें जर नसतें तर ' तत्त्वमसीत्युपास्व ' असे वाक्यस्वरूप झालें असतें. पण तसें त्याचें स्वरूप नाहीं. म्हणून तुमचें उदाहरण येथें लागू पडत नाहीं. (८३)

मंडन– ' तत्त्वमसि ' च्या अनुसंधानापासून मुक्ति म्हणून फलाचा निर्देश करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणे रात्रिसत्रांतहि ' प्रतिष्ठा ' नामक फल प्रतिपादन करण्यांत आल्यामुळें तेथे विधीची कल्पना केली आहे. तसेंच येथेंहि तशी कल्पना कां करूं नये ? (८४)

शंकर– कर्म ह्मणा अथवा उपासना ह्मणा, ती आपल्या मनाप्रमाणें करतां येईल अगर सोडताहि येईल अगर अन्यप्रकारें आचरतां येईल. पण वस्तुस्वरूप जें आहे, तें आमच्या इच्छेप्रमाणें करतां अगर सोडतां येणार नाहीं. सबब रात्रीसत्राचें उदाहरण देऊन येथें विधीची कल्पना केली तर मुक्ति ही क्रियाजन्य स्वर्गादि लोकाप्रमाणें अनित्य ह्मणावी लागेल. नव्हे का ? (८५)

मंडन– बरें, तुह्मी म्हणता त्याप्रमाणें तत्त्वमस्यादि वाक्यें उपासना पर्यवसायी नव्हेत, हें आह्मी आतां मान्य करतो. तथापि हीं वाक्यें जीव व ईश्वर यांची साम्यबोधक आहेत, असें धरून चालण्यास कसला प्रत्यवाय आहे ? आपण म्हणतां त्याप्रमाणें तीं अत्यंत अभेदाचे बोध करणारीं आहेत हें आह्मांस मान्य नाहीं. (८६)

शंकर– तत्त्वमस्यादि वाक्यें जीवेश्वराचें साम्यबोधक आहेत, ऐक्य-बोधक नाहींत असें आपलें म्हणणें आहेसें दिसतें. मग आतां सांगा कीं जीव व ब्रह्म हे दोघेहि चेतन असल्यामुळें तें तुमचें साम्य चैतन्यसाम्य का सर्वज्ञता, सर्वात्मता इत्यादि गूण दोघांमध्येंहि असल्यामुळें. तें गुणसाम्य, यांत आपलें ह्मणणें काय आहे ! चैतन्यसाम्य हें तर प्रसिद्धच असल्यामुळ तें उपदेशाचा विषय होऊं शकत नाहीं. सर्वज्ञता, सर्वात्मता इत्यादि गुणाचें साम्य भेदवादी तुह्मांला संमत होण्यासारखें नाहीं. हें वरच दिसतें. ( ८७ )

मंडन– जीवेश्वर हे दोघेहि नित्य असल्यामुळें परमात्म्यांत असणारे ज्ञानानंद इत्यादि गुण जीवामध्येंहि आहेत. पण अविद्योपाधिमुळें त्याला त्यांचा उमज पडत नाहीं. म्हणून नित्य व ज्ञानानंदादि गुणामुळें परस्पर साम्य स्वीकारावें, असें आह्मी ह्मणतो. त्याला हरकत कां असावी ? ( ८८ )

शंकर– परमात्म्याप्रमाणेच नित्य व ज्ञानानंद गुणांनी परिपूर्ण असलेला जीवात्मा हा परमात्माच आहे. त्या गुणांच्या अभिव्यक्तीला अविद्येचें आवरण आड येतें. हें आपणास मान्यच आहे. हें नाकबूल आहे कां आपणाला ? ( ८९ )

मंडन– जगाच्या जन्मस्थितिलयादिकांस कारणीभूत असलेला परमेश्वर हा चेतन आहे असें मान्य करून, त्याला जीवाचें साम्य कसें देतां येईल, हें दाखवून द्या.

शंकर– जगत्कारण जें ब्रह्म, तें तुझ्या सारखेंच चेतन आहे, जड नाहीं, असा 'तत्त्वमसि' चा उपदेश असता तर 'एवमस्ति' ( तुझ्या प्रमाणेच आहे ) असा प्रयोग झाला असता. 'तत्त्वमसि' ( तें तूच आहेस ) असा प्रयोग झाला नसता. जगत्कारण हें जड नाहीं ही गोष्ट 'तदैक्षत' ( त्यानें संकल्प केला ) या वचनानें स्पष्टच होते. ( ९१ )

नसलेल्या जीवांत परमात्म दृष्टि सांगितल्यामुळें एक संस्कार निर्माण करून कर्म समृद्धिच करतात असें समजण्यास काय हरकत आहे ? ( ८२ )

आचार्य– ' मनो ब्रह्मेत्युपासीत ' इत्यादि तुह्मी निर्दिष्ट केलेल्या वाक्यांत लिंग असून त्यापासून तसा अर्थ करणें हें युक्त होऊं शकेल. पण ' तत्त्वमसि ' मध्यें मात्र मुख्यतः अभेदच प्रतिपादण्यांत आलें आहे. तसें जर नसतें तर ' तत्त्वमसीत्युपास्व ' असे वाक्यस्वरूप झालें असतें. पण तसें त्याचें स्वरूप नाहीं. म्हणून तुमचें उदाहरण येथें लागूं पडत नाहीं. ( ८३ )

मंडन– ' तत्त्वमसि ' च्या अनुसंधानापासून मुक्ति म्हणून फलाचा निर्देश करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणे रात्रिसत्रांतहि ' प्रतिष्ठा ' नामक फल प्रतिपादन करण्यांत आल्यामुळें तेथे विधीची कल्पना केली आहे. तसेंच येथेंहि तशीं कल्पना कां करूं नये ? ( ८४ )

शंकर– कर्म ह्मणा अथवा उपासना ह्मणा, ती आपल्या मनाप्रमाणें करतां येईल अगर सोडताहि येईल अगर अन्यप्रकारें आचरतां येईल. पण वस्तुस्वरूप जें आहे, तें आमच्या इच्छेप्रमाणें करतां अगर सोडतां येणार नाहीं. सबब रात्रीसत्राचें उदाहरण देऊन येथें विधीची कल्पना केली तर मुक्ति ही क्रियाजन्य स्वर्गादि लोकाप्रमाणें अनित्य ह्मणावी लागेल. नव्हे का ? ( ८५ )

मंडन– बरें, तुह्मी म्हणता त्याप्रमाणें तत्त्वमस्यादि वाक्यें उपासना पर्यवसायी नव्हेत, हें आह्मी आतां मान्य करतो. तथापि हीं वाक्यें जीव व ईश्वर यांची साम्यबोधक आहेत, असें धरून चालण्यास कसला प्रत्यवाय आहे ? आपण म्हणतां त्याप्रमाणें तीं अत्यंत अभेदाचे बोध करणारीं आहेत हें आह्मांस मान्य नाहीं. ( ८६ )

शंकर– तत्त्वमस्यादि वाक्यें जीवेश्वराचें साम्यबोधक आहेत, ऐक्य- बोधक नाहींत असें आपलें म्हणणें आहेसें दिसतें. मग आतां सांगा कीं जीव व ब्रह्म हे दोघेहि चेतन असल्यामुळें तें तुमचें साम्य चैतन्यसाम्य का सर्वज्ञता, सर्वात्मता इत्यादि गूण दोघांमध्येंहि असल्यामुळें. तें गुणसाम्य, यांत आपलें ह्मणणें काय आहे ! चैतन्यसाम्य हें तर प्रसिद्धच असल्यामुळ तें उपदेशाचा विषय होऊं शकत नाहीं. सर्वज्ञता, सर्वात्मता इत्यादि गुणाचें साम्य भेदवादी तुह्मांला संमत होण्यासारखें नाहीं. हें वरच दिसतें. ( ८७ )

मंडन– जीवेश्वर हे दोघेहि नित्य असल्यामुळें परमात्म्यांत असणारे ज्ञानानंद इत्यादि गुण जीवामध्येंहि आहेत. पण अविद्योपाधिमुळें त्याला त्यांचा उमज पडत नाहीं. म्हणून नित्य व ज्ञानानंदादि गुणामुळें परस्पर साम्य स्वीकारावें, असें आह्मी ह्मणतो. त्याला हरकत कां असावी ? ( ८८ )

शंकर– परमात्म्याप्रमाणेच नित्य व ज्ञानानंद गुणांनी परिपूर्ण अस- लेला जीवात्मा हा परमात्माच आहे. त्या गुणांच्या अभिव्यक्तीला अविद्येचें आवरण आड येतें. हें आपणास मान्यच आहे. हें नाकबूल आहे कां आपणाला ? ( ८९ )

मंडन– जगाच्या जन्मस्थितिलयादिकांस कारणीभूत असलेला परमे- श्वर हा चेतन आहे असें मान्य करून, त्याला जीवाचें साम्य कसें देतां येईल, हें दाखवून द्या.

शंकर– जगत्कारण जें ब्रह्म, तें तुझ्या सारखेंच चेतन आहे, जड नाहीं, असा ‘ तत्त्वमसि ’ चा उपदेश असता तर ‘ एवमस्ति ’ ( तुझ्या प्रमाणेच आहे ) असा प्रयोग झाला असता. ‘ तत्त्वमसि ’ ( तें तूच आहेस ) असा प्रयोग झाला नसता. जगत्कारण हें जड नाहीं ही गोष्ट ‘ तदैक्षत ’ ( त्यानें संकल्प केला ) या वचनानें स्पष्टच होते. ( ९१ )

मंडन– आचार्यजी ! हा 'तत्त्वमसि' चा प्रश्न जाऊं दे. जीव व ईश्वर यांत भेद नाहीं, या तुमच्या तात्त्विक मुद्यावर मी आतां अधिक चर्चा करूं इच्छित नाहीं. तो मुद्दा मी सोडून देतो. हा तात्त्विक प्रश्न बाजूस ठेवून प्रत्यक्षादि प्रमाणाने जीवेश्वर ऐक्यास श्रुतींचा घवघवीत विरोध आहे, हें मी दाखवूं शकतो.

शंकर– ठीक. आपल्या मर्जीप्रमाणेंच होऊं द्या. पण मला प्रथम हें सांगा कीं कोणतीं प्रमाणें आपण मान्य करतां ?

मंडन– प्रत्यक्ष, अनुमान व शाब्द ह्मणजे श्रुति, हीं तीन प्रमाणें मी मान्य करतो. आणि तीं तुमच्या विधानास विरुद्ध आहेत, असें स्पष्ट ह्मणतो. व दाखवितो. प्रथम प्रत्यक्ष प्रमाणच घेतो. उदाहरणार्थ, 'स्वाध्यायो अध्येतव्यः' (स्वशाखेच्चें अध्ययन करावें), या विधिवचनावर बोट ठेवून, मी असें ह्मणतो की, अभेद बोधक जीं वाक्यें आहेत, त्याचा फक्त जपाप्रमाणें उपयोग आहे. (९२)

शंकर– पंडितजी ! आपण ह्मणता तसें मान्य करण्यास कांहीं हरकत नाहीं. पण तें केव्हां ? तर जीव व ईश्वर यांचा भेद प्रत्यक्ष दिसत असला, तर मग तुह्मी ह्मणतां त्यापासून अभेद बोधक श्रुतिवचनांना बाध येईल. पण जीवेश्वर हे इंद्रियादिक प्रत्यक्ष प्रमाणांना अगोचर असल्यामुळें त्यांचा संनिकर्ष नसतांच त्या दोघांचा प्रत्यक्षपणा हा असंभवनीयच आहे, नव्हे काय ? अप्रत्यक्ष असलेल्या जीवेश्वरांमधील भेदाचें प्रत्यक्ष प्रमाण हें ग्राह्य कसे होईल ? (९३)

मंडन– जीवाला 'अहमीश्वरात् भिन्नः' मी ईश्वराहून निराळा आहे) असा भेदाचा अवभास असल्यामुळें त्या अवभासांत भेद हा जीवाला विशेषण म्हणून प्रतीत होत असतो. ह्मणून जीवेश्वर भेदाला इंद्रि-

यांचा संयोग नसला तरी जीवात्मा विशेषणात्मक भेदाचा संनिकर्ष असल्या-मुळें भेदज्ञानाला हरकत नाहीं. (९४)

शंकर– पंडित महाशय ! जीवाचा संनिकर्ष नसतांना तद्विशेषण अशा जीवेश्वर भेदाचा संनिकर्ष होऊं शकत नाहीं. जीव हा प्रत्यक्ष नाहीं, ही गोष्ट त्याचा व इंद्रियाचा संयोग नसल्यामुळें स्पष्ट होत आहे. (९५)

मंडन– भेदाश्रय असलेल्या जीवात्म्याला व इंद्रियांना संपर्क नाहीं असें म्हणणे हे विचारवंताना शोभत नाहीं. आत्मा व मन हीं दोन्हीं द्रव्येंच असल्यामुळें त्या दोघांचा संयोग होऊं शकतो. आणि म्हणून आत्मा हा प्रत्यक्ष होऊं शकेल. (९६)

शंकर– पंडितजी ! आत्मा हा व्यापक स्वरूपाचा ह्मणजे विभु म्हणा अगर अणु म्हणा, कसें म्हटलें तरी आत्म्याचा व मनाचा संयोग, मी म्हणतो, असंभव आहे. कारण असें कीं, संयोग हा सावयव द्रव्यामध्येंच होऊं शकतो. निरवयव असा आत्मा व मन यांचा संयोग कसा होणार ? मन हें इंद्रिय असें धरून तन्मूलक भेदज्ञान संभवणार नाहीं असें आम्ही वर म्हटलें. पण मन हें वस्तुतः इंद्रियच नव्हे. चक्षुरादि इंद्रियांना त्या त्या विषयांचें प्रत्यक्ष ज्ञान होण्याला तें दीपाप्रमाणे सहकारी आहे. ' इंद्रियेभ्यः पराह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः ' हें श्रुतिवचन इंद्रियें व त्यांचे विषय यांहून मन हें निराळें आहे असें दाखविण्याला वरील वचन हें प्रमाण आहे. (९७)

मंडन– मन हें सहावें इंद्रिय आहे असें म्हणण्यालाहि प्रमाण आहेच.

शंकर– तें कोणतें ?

मंडन– ' मनः षष्ठानीद्रियाणि ' ( मन हें सहावें इंद्रिय आहे ) हें तें स्मृतिवचन, याला आपण काय म्हणतां ? आतां यापेक्षां आणखी स्पष्ट असें काय पाहिजे ?

शंकर- तेथें मन हें सहावें इंद्रिय म्हणून म्हटलें आहे हे खरें. पण त्याचा अर्थ आपण करतां तसा नाहीं व नव्हे.

मंडन- मग कसा आहे ?

शंकर-वस्तुतः मन हें इंद्रिय नाहीं. तरी पण त्याला स्मृतीनें सहावें इंद्रिय असें ह्मटलें आहे, त्याचें कारण निराळेंच आहे. त्याला सहावें इंद्रिय म्हटलें आहे, तें औपचारिक आहे.

मंडन- तें कसें काय ?

शंकर- ती एक सांगण्याची तऱ्हा आहे. चारजण ऋत्विज हे इडा भक्षण करीत असतां ऋत्विजांत नसलेला यजमान हा पांचव्या ऋत्विजांत मोडला जातो. 'यजमान पंचमा इडां भक्षयन्ति' असा तेथें प्रयोग आहे. वस्तुतः यजमान हा ऋत्विज नसताही त्याची गणना पांचवा ह्मणून ऋत्विजांत केली आहे. त्याशिवाय हें दुसरें वचनहि पहा. महाभारत हें वस्तुतः वेदांत मोडत नाहीं. पण पाठ सांगतांना वेदाबरोबर त्याचाही अंतर्भाव करण्यांत आला आहे. 'वेदानध्यापयामास महाभारतपंचमान्' असें ह्मटलें आहे. येथें महाभारताला पांचवा वेद असे म्हटले आहे. तेव्हां सांगावयाचें तात्पर्य काय तर वरील उदाहरणें लक्षांत घेतां प्रत्यक्ष इंद्रिय नसलेल्या मनाला सहावें इंद्रिय म्हटलें आहे एवढेंच. पण तें प्रत्यक्ष सहावें इंद्रिय नव्हे.

मंडन- 'इंद्रियाणां मनश्चास्मि' हें स्मृतिवचन मन हें इंद्रिय आहे, असा स्पष्ट बोध करतें. मग तेंहि अर्थ शून्यच का ?

शंकर- या तुमच्या वचनाला विरोध दाखविणारे तुमच्यासारखेंच हें आमचें प्रतिवचन पहा.

मंडन- तें कोणतें.

शंकर— ‘ नक्षत्राणामहं शशि ’ हें तें वचन. तुमच्या गीतेतलिच तें आहे. नक्षत्रांपैकीं मीं चंद्र आहे. असा याचा अर्थ आहे. पण वस्तुतः चंद्र हा कांहीं नक्षत्रांत मोडत नाहीं. तो नक्षत्रसहजातीचा असल्यामुळें त्याची गणना नक्षत्रांतच करण्यांत आली आहे. अशीच गोष्ट तुमच्या मनाची देखील आहे. इंद्रियांना उपकारक अशा मनाला तें प्रत्यक्ष इंद्रिय नसूनहि त्या इंद्रियांतच त्याची गणना करण्यांत आली आहे. आतां तर प्रकाश पडला ना ! आपल्या वचनाच्या अर्थाचा ?

मंडन— ( प्रश्न बदलून ) ईश्वरापासून मी वेगळा हें भेदज्ञान इंद्रियजन्य म्हणावयाचें नसेल तर तें जाऊं द्या. आमचा कांहीं आग्रह नाहीं. पण साक्षी म्हणजे ईश्वर हा प्रत्यक्ष असें मानूया. त्या साक्षी प्रत्यक्षाला विरुद्ध असा जो जीवात्मा व परमात्मा यांचा अभेद आहे, हें श्रुति कसें सांगेल ? आणि तें मान्य कोण करणार ? (९९)

शंकर— मायोपाधिक हा ईश्वर आणि अविद्योपाधिक हा जीव आहे. हे दोघेहि परस्पर भिन्न हें ज्ञान साक्षी प्रत्यक्षाचा विषय झाला आहे. श्रुति हीं उपाधि रहित अशा परमार्थ चैतन्य स्वरूपगत ऐक्याचा बोध करते. म्हणून साक्षी प्रत्यक्ष व पारमार्थिक श्रुतिवचनें हीं भिन्न विषयात्मक असल्यामुळें त्यांच्यांत परस्पर विरोध नाहीं. ( १०० )

त्याशिवाय प्रत्यक्ष व श्रुति यांत विरोध आहे असें गृहीत धरलें तरी प्रत्यक्षापेक्षा श्रुति ही बालिष्ठ म्हणविते. प्रत्यक्ष हे प्रथम प्रवृत्त होतें. श्रुति ही शेवटीं प्रवृत्त होते. तुमच्या मीमांसामतांत ‘ पौरापर्येपूर्वदौर्बल्यं प्रकृतिवत् ’ असा निर्णय देण्यांत आला आहे तो तुम्हांला विदित व मान्य असलाच पाहिजे. नाहीं का ?

मंडन– आपल्या म्हणण्याप्रमाणें प्रत्यक्षाला श्रुतीचा विरोध नाहीं हें हें मान्य केलें तरी तें अनुमानाला जुळत नाहीं याला काय म्हणतां ? जीव हा सर्वज्ञ नंसल्यांमुळें घटादिकांप्रमाणें ईश्वराहून भिन्न आहे असें म्हणावयाला काय हरकत आहे ? म्हणून मी म्हणतो कीं ' जीवः ब्रह्माभिन्न असर्वज्ञत्वात् घटवत् जीव हा असर्वज्ञ असल्यामुळें घटाप्रमाणे तो ब्रम्हाहून भिन्न आहे. ( १०२ )

शंकर– आतां मी स्पष्टच विचारतो कीं, जीवेश्वर भेद हा पारमार्थिक म्हणता कां काल्पनिक म्हणतां ? यांत काय तुह्मी साधूं पाहतां ? तो भेद पारमार्थिक म्हणत असाल तर त्याला दृष्टांत नाहीं, काल्पनिक ह्मणत असाल तर आम्ही ज्ञालो तरी तो मान्य करतो. ( १०३ )

मंडन– मी असें साधूं पाहतो कीं जीव हा स्वज्ञानानें बाधित न होणाऱ्या भेदाला आश्रय होतो. दृष्टांतरूप घट हा घटज्ञानानें बाधित न होणाऱ्या भेदाला आश्रयभूत होतो. तुह्मीं स्वस्वरूपज्ञानानें जीवेश भेद हा बाधित होतो, हे मान्य केल्यामुळें ' स्वप्रत्ययाऽबाध्यभिदाऽश्रयत्व ' हें तत्त्व जीवामध्यें मान्य करीत नाहीं. पण ही गोष्ट मी सिद्ध करूं पाहतो. ( १०४ )

शंकर–ईश्वर व घट यांतील भेदालाहि अविद्या ही उपाधीच कारण असल्यामुळें तो भेदहि औपाधिकच ह्मटला पाहिजे. घट हा जड असल्यामुळें चेतनात्मक परमात्म्याहून तो भिन्न आहे असें तुह्मी ह्मटलें पाहिजे. ( घटः ईशः भिन्नः जडत्वात् ) आम्ही जीव हा परमात्म्याप्रमाणेंच चेतन असल्यामुळें परमात्म्यापासून तो अभिन्न आहे असें ह्मणतो. ( जीवःपरमात्माऽभिन्नः चेतनत्वात् ) तुह्मी ' स्व ' शब्दानें सुखदुःखादि गुणात्मक जीव हा अर्थ धरतां कां निर्गुण हा अर्थ धरता ? प्रथमपक्षी सुखादिगुणात्मक जीव हा व्यावहारिक व अनिर्वचनीय ह्मणविणाऱ्या भेदाला आश्रय ज्ञाला

आहे, ही गोष्ट आम्ही मान्य केलीच आहे. दुसऱ्या पक्षीं तुम्हाला दृष्टांत नाहीं. सुखदुःखादिरहित अशा आत्म्यांत घटादि प्रपंच हा अज्ञानामुळें दृग्गोचर होतो. आत्मज्ञानानें ऐक्य उत्पन्न होऊन घटादि भेद बाधित होतो. ( १०५ )

मंडन– तुम्ही जीवेश्वर भेद हा अज्ञानरूप उपाधिमुळें उत्पन्न होत असल्यामुळें औपाधिक म्हणून व ईश्वरघट हा भेद निरुपाधिक म्हणून मान्य करता. मी जीवांतहि औपाधिक भेद असतो हें सिद्ध करूं पाहतो. ( १०६ )

शंकर– ईश्वर व घट यांतील भेदालाहि अविद्या ही उपाधीच कारण असल्यामुळें तो भेदहि औपाधिकच म्हटला पाहिजे. घट हा जड असल्यामुळें चेतनस्वरूप परमात्म्याहून तो भिन्न आहे असें तुम्ही म्हटलें पाहिजे. (घटः ईशः भिन्नः जडत्वात्,) आतां आम्ही जीव हाहि परमात्म्याप्रमाणेंच चेतन असल्यामुळें परमात्म्यापासून तो अभिन्न आहे असें म्हणतो. ( जीवः परमात्माऽभिन्न चेतनत्वात् ) ( १०७ )

( तेव्हां मंडनानी जीवामध्ये व ब्रह्मामध्यें प्रत्यक्ष भेद दाखविण्याच्या भरीस न पडतां भेद प्रतिपादक वेद–वचनाकडेच ते वळले. ते म्हणाले तुम्ही जीव व ब्रम्ह यांत भेद नाहीं असें ह्मणता. पण वेदाला तें संमत नाहीं. वेद हे प्रत्यक्ष त्या दोहोंत भेदाचेंच प्रतिपादन करतात. )

मंडन– आचार्यजी ! हें पहा, 'द्वासुपर्णा' ही श्रुति जीव व ईश यांत भेद दाखवीत असुन अभेद प्रतिपादक श्रुतीला ती विरुद्ध आहे. तें तुमचें म्हणणें वेदाला संमत नाहीं. वेद हे भेदाचेंच प्रतिपादन करतात. ( ११२ )

शंकर– पंडितवर्य ! खरें ह्मणाल तर भेदज्ञान हें प्रत्यक्ष प्रमाणानेंच सिद्ध होऊं शकतें. भेदज्ञानाला स्वर्ग अगर मुक्ति असें कोणतेंहि फल नाहीं.

शिवाय भेदज्ञानानें मृत्यु संभवतो. 'मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति' ही श्रुति भेदज्ञानानें अनर्थ फलाचें निरूपण करते. इतर प्रमाणांनी न समजणाऱ्या विषयांचें प्रतिपादन करणें हें वेदाचें कर्तव्य आहे असा जैमिनी महर्षींचा न्याय आहे. सूज्ञ असे आपण भेदपर नसलेले वाक्य उध्दृत करून अभेद प्रतिपादक श्रुति-वचनाला विरोध सुचविणें हें बरें नव्हे. ( ११३ )

मंडन– 'क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्व क्षेत्रेषु भारत' हें स्मृतीमधील वाक्य समर्थन करण्यास प्रवृत्त होऊन प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध होणाऱ्या जीव ब्रम्ह भेदाला मूळ समजून 'द्वा सुपर्णा' हें वाक्य प्रमाणभूत मानलें पाहिजे. ( ११४ )

शंकर– नाहीं. तसें नाहीं. 'द्वासुपर्णा' याचा अर्थच निराळा आहे. वस्तुतः ही श्रुति बुद्धि व जीव यांचा बोध करीत असून बुद्धीला भोग आहे व जीवाला संसार नाहीं असें सुचविते. ( ११५ )

मंडन– हा तुमचा अर्थ वेदज्ञ कसा मानील? 'द्वासुपर्णा' ही श्रुति देही व सर्वज्ञ, जीवेशांचा बोध न करतां बुद्धि व जीव यांचा बोध करते असें स्वीकारल्यास जडात्मक बुद्धीला भोग प्रतिपादन केल्यासारखें होईल. जडाला असंभव असें भोक्तृत्व सांगणारें हें वेदवाक्य प्रमाण असें कसें म्हणतां येईल. तो तुमचा अर्थ कोण मानील?

शंकर– 'द्वासुपर्णा' या वाक्याचें व्याख्यानरूप अशा पैंग्यरहस्य ब्राह्मणांत 'तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्तीति सत्त्वं, अनश्नन् अन्यो अभिचाकशी-त्यनश्नन् अन्यो अभिपश्यतिज्ञः तावेतौसत्वक्षेत्रज्ञौ' असा या वाक्याचा अर्थ विवरून बुद्धि व जीव येथें विवक्षित आहेत असें सांगण्यांत आलें आहे. वेदपारंगत असे आपण याचा विचार करावा. ( ११८ )

मंडन– आम्हांस तें पटत नाहीं. पैंग्यरहस्य ब्राह्मण वाक्यांतील अर्थ स्वत्वं शद्वाला जीव व क्षेत्रज्ञ शद्वाला परमात्मा असाच अर्थ लावला पाहिजे. तसें केल्यानें पैंग रहस्य ब्राह्मण वाक्याला जडात्मक बुद्धीला तद्विरोध असलेल्या भोक्तृत्वाचा बोधात्मक जो दोष त्या दोषाचा परिहार होईल. ( ११९ )

शंकर–तुमचा अर्थ अयुक्त दिसतो. तसा अर्थ त्या ब्राह्मण वाक्यांतून ध्वनित होत नाहीं. कसें तें पहा. तें वाक्यच येथें उद्धृत करतो. ‘ तदेतत्सत्वं येन स्वप्नं पश्यति, अथ योऽयं शारीर उपद्रष्टा स क्षेत्रज्ञस्तावेतौऽसावक्षेत्रज्ञौ ’ या वचनानें सत्त्व शद्वाला बुद्धि व क्षेत्रज्ञ शद्वाला जीव असा अर्थ होतो हें स्पष्टपणे सूचित होतें. ( १२० )

मंडन– आपण उद्धृत केलेल्या पैंग्य रहस्य ब्राह्मण वाक्याचा ‘ येन ’ या पदाचा स्वप्न दर्शन करणारा जो, तो जीव आणि उपद्रष्टा जो क्षेत्रज्ञ तो ईश्वरच असा अर्थ कां करूं नये ? ( १२१ )

शंकर– ‘ येन स्वप्नं पश्यति ’ या वाक्यांत त्रिज् प्रत्ययानें कर्तृ जो जीव त्याला ‘ येन ’ या तृतीया विभक्तीनें चित्त हें करण म्हणून, तसेंच उपद्रष्ट्याला शारीर विशेषण म्हणून देण्यांत आलें आहे. तें शरीर नसलेल्या ईश्वराला जुळत नाहीं. मग तुमचा अर्थ सयुक्तिक असें कसें म्हणतां येईल ? ( १२२ )

मंडन– कां नाहीं ? आमचा अर्थच सयुक्तिक आहे. कारण ईश्वर हा सर्वव्यापी असल्यामुळें शरीरांतहि तो असतो म्हणून तोहि शारीर ठरतो तसें म्हणायला कसली अडचण आहे ? ‘ शरीरे भवः शारीरः ’ ही व्युत्पत्ति यथार्थ नाहीं काय ? ( १२३ )

शंकर– तुमचें म्हणणे सर्वस्वी खरें नाहीं. ईश्वर हा सर्वव्यापी आहे हें आम्ही मान्य करतो. तो शरीरांतहि असतो हेंहि आम्हाला मान्य आहे. पण म्हणून त्याला शारीर या संकुचित पदानें संबोधणें हें आम्हांस मान्य नाहीं. तसें म्हणावयाचें झालें तर आकाश हें देखील सर्वव्यापी आहे. तें शरीरांतहि असतें. मग त्याला शारीर कां म्हणूं नये? (१२४)

मंडन– आपलें म्हणणे मान्य केल्यास 'द्वासुपर्णा' हा मंत्र जीवेश्वरांचा बोध न करतां बुद्धि व जीव यांचाच बोधक आहे, हें धरून चालल्यास अचेतन अर्थात् जड बुद्धीला भोक्तृत्व सुचविल्यासारखें होईल. पण हें प्रामाणिक होईल काय? (१२५)

शंकर– कां नाहीं होणार? जरा खोल गेल्यास हें अधिक स्पष्ट होईल. उदाहरणच पाहिजे असल्यास लोखंडाचें देता येईल. लोखंड हें जात्याच गार पण प्रखर अग्नीचा संयोग झाला तर तेंच जडात्मक गार लोखंड देखील अग्नीप्रमाणेच प्रखर दाहक होतें. नाहीं का? हें जसें खरें, तद्वतच अचेतन बुद्धि ही चेतन जीवाच्या संपर्कानें भोक्त्री होते असें म्हटल्यास चूक ती काय झाली? तेव्हां आमचा अर्थच संयुक्तिक म्हणावा लागेल. (१२६)

मंडन– आचार्यशेखर! 'द्वासुपर्णा' या मंत्रावरील चर्चा आम्ही आतां सोडून देतो. आपण केलेल्या खुलाशावर आम्हांस अधिक कांहीं म्हणावयाचें नाहीं. जीवेश्वर हे दोघेहि भिन्न आहेत, हें दाखविणारे हें पुढील श्रुतिवचन पहा. (१२६)

शंकर– ते कोणतें? पंडितवर्य! (१२६)

मंडन– तें हें 'ऋतं पिबन्तौ सुकृतस्य मध्ये गुहां प्रविष्टौ परमे परार्धे। छायातपौ ब्रम्हविदो वदन्ति पंचाग्नयोये च त्रिणाचिकेताः' (कठो

पनिषद्) हें कठोपनिषदांतील वचन असून तें जीव व ईश्वर हे ऊन व सावलीप्रमाणें भिन्न म्हणून सांगतें. येथें कर्मफलाचे जीवेश्वर दोघेहि सेवन करतात म्हणून सांगण्यांत आलें आहे. अर्थात् भेदसूचक या श्रुती जीवेश्वराचें ऐक्य सूचित करणाऱ्या श्रुतीला बाध आणीत नाहींत काय? काय म्हणतां आचार्य तुम्ही? (१२७).

शंकर– व्यवहारानें सिद्ध झालेल्या भेदाचा, पंडित–महाशय ! हा नुसता अनुवाद आहे. अपूर्व अशा अभेदाचा बोध करणारी श्रुति ही बलिष्ट असून उलट भेदसूचक श्रुतीलाच ती बाधक ठरते. (१२८).

मंडन - मला हा आपला युक्तिवाद पटत नाहीं. भेदश्रुति ही प्रत्यक्ष प्रमाणानें परिपुष्ट असल्यामुळें तीच बलिष्ट ठरते. म्हणून प्रत्यक्ष प्रमाणाला विरुद्ध अर्थ प्रतिपादन करणाऱ्या अभेदबोधक श्रुतींपेक्षां भेदश्रुति हीच अधिक सबळ म्हणावी लागेल. नहून अभेदश्रुति ही भेदश्रुतीला बाधित करूं शकत नाहीं, असें आम्ही स्पष्ट म्हणतो. (१२९)

शंकर– प्रत्यक्षादि प्रमाणांतरांनी बोध झालेला विषयच पुनः बोध करणारी श्रुति ही बलिष्ट असें कसें म्हणता येईल? तुमच्या म्हणण्या–प्रमाणे ती बलिष्ट होऊं शकत नाहीं. 'अग्निर्हिमस्य भेषजम्' या श्रुति-वचनाप्रमाणें समजलेलें तेंच पुनः सांगितल्याने गतार्थ बोधक म्हणवून ती दुर्बलच ठरणार. ती दुर्बलच मानली पाहिजे. त्याला बाधित करण्याचें सामर्थ्य आमच्या अभेद श्रुतीमध्ये आहे. (१३०)

मंडन– तो कठोपनिषदातील मुद्दा आम्ही फार खेचूं इच्छित नाहीं. तुमचें म्हणणें आम्ही मान्य करतो. तो प्रश्न बाजूस करूं या. आतां हें आमचें तैत्तिरीयोपनिषदातील या वचनाकडे वळूं (१३१)

शंकर– तें कोणतें? पंडितवर्य !

मंडन– तें हें, यतिराज ! ‘ सोऽश्नुते सर्वान् कामान् सह ब्रम्हणा विपश्चितेति ’ (१३१)

शंकर– ठीक आहे. याचा अर्थ आपल्या मतें काय आहे ?

मंडन– मुक्त जीव हा ब्रम्हाबरोबर सर्व इष्टार्थ मिळवून त्यांचें सेवन करतो. (१३१)

शंकर– यावरून काय बोध होतो ?

मंडन– मुक्त जीव व ब्रम्ह वेगळे वेगळे आहेत असें येथें स्पष्ट सांगितलें असल्यानें हें सांगणें तुमच्या अभेद बोधक श्रुतीला बाधक होतें, असें मी म्हणतो.

शंकर– तसा त्याचा अर्थ नाहीं. पंडितजी !

मंडन– मग कसा आहे ?

शंकर– तो असा आहे. वरील तुमच्या श्रुतीचा अर्थ हा असा आहे. ब्रम्हज्ञानी जो आहे, तो अज्ञानातून निवृत्त होऊन सच्चिदानंद स्वरूप ब्रम्हभाव प्राप्त करून घेऊन तदंतर्गत सर्व काम अनुभवितो. असा या वचनाचा अर्थ आहे. नहून मुक्तिनंतरहि जीवेश्वरांत भेद राहतो, असा त्याचा अर्थ नव्हे. तसें ती श्रुति प्रतिपादन करीत नाहीं. (१३१)

मंडन– आचार्यदेव ! आपणांस माझा अर्थ पटत नसल्यास जाऊं द्या. आतां हें बृहदारण्योपनिषद् पहा. तेथें ‘ आत्मा वा अरे द्रष्टव्यः ’ हें वचन आत्म्याचे दर्शन घ्यावें असें चक्क सांगते. येथें दर्शन घेणारा जीव व दर्शन क्रियेचें कर्म म्हणविणारा आत्मा हे वेगळे वेगळे समजले पाहिजेत. दर्शन घेणारा व दर्शन देणारा हे दोघे एकच असूं शकत नाहींत. तेव्हां ही श्रुति भेद हा खरा आहे असें सुचित करते. नाहींतर हें श्रुतिवचन अप्रमाण म्हणावें लागेल. (१३१)

शंकर– तुम्ही अर्थ करतां तसा त्या श्रुतीचा अर्थ नाहीं. ती श्रुती आमच्या मतें वास्तव भेद सूचित करीत नाहीं. कारण विचाराल तर त्याच श्रुतीमध्यें 'अहं ब्रम्हमस्मि' हें वाक्य अभेदबोधक आहे. अतएव या वाक्याला बाध न येईल असाच ब्रम्हपर अर्थ वरील श्रुतीला लावला पाहिजे. पूर्वापर वाक्यांच्या तात्पर्याचें पर्यालोचन करून प्रामाण्याचा निर्णय करणें उचित दिसतें. [१३१]

मंडन– भेदबोधक श्रुतीवाक्यांचें प्रामाण्य मान्य करून अभेद-बोधक वाक्यें हीं काल्पनिक ऐक्य बोध करणारीं आहेत असें कां म्हणूं नये?

शंकर– व्यवहार सिद्ध होऊन अनुभव–विषय म्हणविणाऱ्या भेदाला प्रतिरूप काल्पनिक अभेदाचा बोध श्रुती करते असें म्हटलें तर भेद-बोधक प्रमाणाना प्रकोप होईल. म्हणून तसें न करतां भेद हा व्यवहारिक व अभेद हा पारमार्थिक असें मानल्यास विरोध येणार नाहीं (१३१)

मंडन- जीव–ब्रम्ह भेदाला अर्थापत्ति ही प्रमाण म्हणविते. 'सत्यं भेदं विना व्यवहारः अनुपपन्नस्सन् तं कल्पयति' म्हणून प्रयोग करून भेद-व्यवहार हा सत्य भेद असल्याशिवाय संभवणार नाहीं. त्यासाठीं सत्य–भेदाची कल्पना करावी असें मी म्हणतो.

शंकर– व्यवहाराचें समर्थन करण्यासाठीं सत्य असलेला भेदच मान्य करावा असा कांहीं निर्बंध नाहीं. काल्पनिक भेदानें देखील व्यवहाराचा निर्वाह करतां येईल. म्हणून अर्थापत्ति प्रमाण हें भेद–सत्य अशा विषयांत प्रमाण होणार नाहीं.

मंडन– जीव व ब्रम्ह यांचें ऐक्य असलेंच तर त्याची उपलब्धि असलीच पाहिजे. पण उपलब्धि असत नाहीं ही गोष्ट तुम्हां आम्हां

दोघांसहि मान्य झाली आहे. म्हणून अनुपलब्धि या सहाव्या प्रमा– णानें जीव व ब्रम्ह यांचें ऐक्य नाहीं असें माझें मत आहे. (१३१)

शंकर– पंडितवर्य ! याविषयीं फार बोलणे नलगे. काळोखानें अच्छादिलेल्या घटाची उपलब्धि जशी असत नाहीं, त्याचप्रमाणें अज्ञानानें आवृत झालेला अभिन्नात्मा हा अप्रत्यक्ष झालेला आहे. तत्त्वज्ञांना आवरणाचें निवारण झालें असल्यामुळें अद्वितीय आत्मतत्त्वाचा साक्षात्कार होऊन भेद नाहींसा होतो. म्हणून अनुपलब्धि या सहाव्या प्रमाणानेंही भेदाचा बोध सूचित होणार नाहीं. (१३१). यावर आतां आपणास काय म्हणावयाचें आहे ?

मंडनमित्र आतां काय बोलणार ? त्याची सगळी ज्ञानगंगा आटून जाऊन कोरडी ठणठणीत पडली. पुढें त्यांना कांही सुचेना. मान खाली घातली व तोंडांला कुलुप पडलें ! आचार्य–देवांचें सखोल, मार्मिक, ठसठशीत व मुद्देसूद शास्त्रीय विवेचन पाहून मंडनमिश्र गारेगार झाले. आचार्यांच्या ज्ञानतेजापुढें त्यांचा चेहरा निस्तेज पडला. व गळ्यांतील माळ कोमेजून गेली ! मीमांसा शास्त्राचा वरचष्मा करूं पाहणाऱ्या त्या मीमांसक वीराग्रणीची घमेंड जिरून जाऊन तेथें अगतिकाची नैराश्यवृत्ति उफाळूं लागली. वादांत आचार्यांचा नक्षा हां हां म्हणतां उतरवून टाकून त्यांना पराजयाचे खडे चारूं, हा त्यांचा चेढल अभिमान वादक्षेत्रांत अखेर नेस्तनाबूद झाला. यतिवर्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेपुढें व दिव्य प्रतिभा–तेजापुढें त्यांचे सगळे पांडित्य व वादकौशल्य निष्प्रभ व निष्फळ ठरलें. आणि अखेर आचार्य देवापुढें नाक घासणें व आपला पराजय मान्य करणें भाग पडलें !

तसें सांगावयाचें म्हणजे श्रीशंकराचार्य गुरुदेवांचें ज्ञानैश्वर्य व प्रतिभातेज होतेंच तसें प्रखर व प्रभावशाली ! त्यांची चौरस व अष्ट-

पैलू विवेचन पद्धति, मार्मिक व ठसकेबाज विषय-मांडणी, प्रौढ व भेदक युक्तिवाद, सिद्धहस्त लेखनशैली, प्रौढ भाषाप्रभुत्व, समर्पक दृष्टांत कथन, प्रतिपक्षावर मर्माघात करण्याचें हुकमी कौशल्य, अद्वैतविचार-सरणीला बाळसेदार व जोरकस करण्यास घातलेलें विविध शास्त्रज्ञानाचें पौष्टिक खतपाणी, या सर्व गोष्टींची विरुद्ध पक्षाशीं सामना देण्यांत दिसून येणारी दृष्टि–दीपविणारी दिव्य चमक–आमच्या सूज्ञ वाचकांच्या लक्षांत बिंबल्याखेरीज रहावयाची नाहीं. असो.

हा अद्भुत व अपूर्व चमत्कार पाहून तेथें जमलेल्या पंडित–समाजांत मोठी खळबळ उडून तो दिङ्मूढ झाला. त्यांना स्वप्नांत देखील कल्पना नव्हती की पंडित कुलशेखर मंडनाची प्रभा कधीं काळीं क्षीणतेज होईल. पण हा चमत्कार अकल्पित घडून आला, हें पाहून तेथील प्रेक्षकवृंदाला आश्चर्याचा धक्का बसला, यांत नवल तें काय ?

मंडनमिश्राची चुरचुरीत जिव्हा लुली व थंड पडली, तोंच सरस्वती देवी आंतून बाहेर आली. तिने पंडितजींच्या गळ्यां–तील माळ कोमेजलेली पाहून पंडिताचा पराजय सभेंत जाहीर येला. याप्रमाणें भगवान शंकराचार्यांनीं आपल्या अपूर्व ज्ञानवैभवानें, लोकोत्तर बुद्धिचातुर्यानें व अप्रतिम वादकौशल्यानें जगविख्यात महा मीमांसक, पंडितकुलनायक व वेदवादपटु मंडनमिश्राचा दणदणीत पराभव करून तेथें जमलेल्या विद्वन्मंडलांत आपला दिव्य प्रभाव गाजविला ! ! हा प्रथमारंभींचा आचार्य–देवाचा फार मोठा हुकमी दिग्विजय आणि अद्वैत अरुणोदयाचें शुभ चिन्हच होय, असें म्हटल्यास ती अति–शयोक्ति होईल काय ?

---

# प्रकरण २३ वें

## मंडनभार्या सरस्वतीचें आव्हान

अथावतीर्णस्य विधेः पुरंध्री
सा भूद्यदाख्योभय भारतीति ।
सरस्वती सा खलु वस्तुवृत्या
लोकोऽर्पितां वक्ति सरस्वतीति ॥ ३-९ ॥
सर्वाणि शास्त्राणि षडंग वेदान्
काव्यादिकान्वेत्ति परं च सर्वम् ।
तन्नास्ति नो वेत्ति यदत्र बाला
तस्मादभूच्चित्रपदं जनानाम् । ( ३-१६ )

( शं. दि. ३-९ व ३-१६ )

आज भारतास आपल्या प्राचीन इतिहासाचें व उज्वल संस्कृतीचें संपूर्ण विस्मरण झालें आहे, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. जें राष्ट्र आपली प्राचीन संस्कृति व इतिहास डोळ्याआड करते–तिकडे दुर्लक्ष करतें–तें राष्ट्र सुखी, संपन्न व चिरंजीव कदापि होऊं शकणार नाहीं, हा इतिहासाचा कौल आत्मकल्याणेच्छु राष्ट्राने रात्रंदिवस डोळ्यापुढें ठेवून चाललें पाहिजे. संस्कृति ही राष्ट्राचें लिंग शरीर व इतिहास हा स्थूल शरीर आहे, याची दखल ठेवणें अत्यंत जरूर आहे. आज भारत राष्ट्र अनेक संकटातून–अनेक विपत्तीतून–सहिसलामत सुरक्षित पार होऊन जीवंत राहिलें आहे, याचें कारण त्याची प्राचीन तेजस्वी संस्कृति व प्रभावी इतिहास याची स्मृति ही होय. 'परप्रत्ययनेय' बुद्धि नव्हे किंवा परानुकरणहि नव्हे.

पण हल्ली भारताच्या राजकारणाला भलतीच दिशा व अनिष्ट वळण लागत चालल्यामुळें भारताचें पुढें काय व कसें होईल, हा प्रश्न

विचारी भारतीयांना भेडसावूं लागला आहे. हें येथें सांगण्याचें कारण या पुण्य व प्राचीन भूमींत केवळ पुरुषच नव्हे, तर स्त्रिया देखील केवढ्या कर्तृत्ववान व विद्याविभूषित निघाल्या, याची आठवण करून देण्याचा येथें प्रसंग आला आहे म्हणून. आचार्य व मंडन यांच्या वाद-संग्रमात खास निर्णय देण्याचा मान व अधिकार एका सुविद्य स्त्री अध्यक्षाकडे आला असून तिची ओळख करून देणें हें अप्रस्तुत होणार नाहीं. म्हणून तिच्याविषयीं दोन शद्ब आधी सांगून मग आचार्यास वादांत कैचींत पकडून त्या विदुषीनें कसें रंजीस आणलें, याचें निरूपण करतो.

मंडनमिश्र हा ब्रम्हाचा अवतार समजण्यांत येतो. तद्वत ही सरस्वती झाली तरी ब्रम्हदेवाची भार्या. येथें उभय भारतीरूपानें अव-तरली, असें समजण्यांत येतें. ही प्रसिद्ध महामीमांसक कुमारिल भट्टाची बहीण असें आनंदगिरींने शंकर–विजयांत म्हटलें आहे. पण तसें मान-ण्याला विश्वसनीय असा भक्कम आधार नाहीं. माधवाचार्य शंकर दिग्विजयांत तिला विष्णुमित्र विप्राची कन्या असें म्हणतात. विष्णुमित्र हा शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण असून, तो शोणनदीच्या तीरावर राहत होता. तिचें व्यक्तिगत नांव अंब्रा असें होतें. पण ती वेदविद्येत व इतर शास्त्रांत अत्यंत निष्णात असल्यामुळें ती भारती, उभय भारती, सरस्वती, शारदा इत्यादि नांवानीं प्रसिद्ध झाली. शंकराचार्य व मंडनमिश्र यांच्या तत्त्व-ज्ञानाच्या शाद्बिक संग्रामांत तिच्याकडे न्याय देण्याची महत्वाची काम-गिरी देण्यांत आली, यावरून तिची विद्वद्योग्यता स्पष्ट दिसून येते.

तिला चारहि वेदांचें भरीव ज्ञान होतें. त्याचप्रमाणे वेदांगांत म्हणजे शिक्षा, कल्प, व्याकरण, छंद, ज्योतिष व निरुक्त यांतहि ती पारंगत होती. त्याबरोबरच मीमांसा धर्मशास्त्र, न्याय, इत्यादि शास्त्रां-

तहि तिची सूक्ष्म गति होती. काव्य—नाटकादि ललित वाङ्मयांतहि तिनें पांडित्य संपादिलें होतें. फार काय जगांत अशी एकहि विद्या नव्हती कीं जिचा तिला परिचय नव्हता. ! थोडक्यांत म्हणजे सकल विद्येची, सकल शास्त्रांची, सकल कलांची ती नांवाप्रमाणें प्रत्यक्ष विद्यादेवता सर–स्वतीच होती ! तिची योग्यता जाणूनच आचार्यांनी तिला या महत्वाच्या वादांत अध्यक्ष होण्यास मान्यता दिली, यावरून तिची योग्यता काय होती, हें सूज्ञ वाचकांना अधिक न सांगताच समजण्यासारखें आहे. अर्थात् ती त्या काळीं लोकांत आदर व आश्चर्य यांचा विषय होऊन बसली होती, हें उघड सांगावयासच नको. असो.

मंडनमिश्र-आपला पतिवाग्युद्धांत पराजित झाला त्यानें आपटी खाली, हा प्रकार न्यायाने प्रवाह प्राप्त झाला, ही गोष्ट सरस्वतीला उचितच वाटली. तरी तिच्या मनांत एकापरी अस्वस्थता निर्माण झाली. रास्तच आहे, किती जरी ती शाहणी व विचारी असली, तरी ती स्त्रीच, पुरुषाची अर्धांगीच. आपला पति पराभूत झाला ही विषम गोष्ट तिला आवडणार कशी ? तेंव्हां तिचें मन झाला हा प्रकार पाहून जरा उद्विग्न झालें. मंडनमिश्र म्हणजे कांहीं लहानसहान व्यक्ति नव्हे ! पंडितांचा केवळ मुकुटमणि ! जगांत आत्यंत जाडा विद्वान म्हणजे त्याचा तोच ! 'यस्मिन् जिते सर्वमिदं जितं स्यात्' असा ज्याचा लौकिक, त्याचा एका बाल संन्याश्यानें–सोळा सतरा वर्षाच्या पोरानें पराभव करावा, म्हणजे काय ? हें तिच्या जिवाला फार लागून राहिलें ! तिजा जीव कासावीस झाला ! मंडन प्रतिज्ञापूर्ती करण्याच्या पुढील तयारीस लागले.

इतक्यांत ती वाघिणीप्रमाणें आंतून धडधडत धांवून पुढें आली आणि शंकराचार्यांस उद्देशून म्हणाली - आचार्य-देव ! जरा सबूर करा!

माझा एक सवाल आहे तुह्मांला. त्याचें उत्तर द्या आणि मग माझ्या पतीला आपला शिष्य बनवा.

शंकर– तो काय ? सरस्वती ! काय आहे सवाल तुझा ?

सरस्वती–मी कोण मंडणाची ?

शंकर– त्याची भार्या.

सरस्वती– मी त्यांची अर्धांगी ना ?

शंकर– होय.

सरस्वती– मग पुरुष हा एकटाच पूर्ण नाहीं, अपूर्ण आहे ! त्याचा पूर्ण पराभव करण्याला त्याच्या अर्धांगीचाहि पराभव करावयास पाहिजे ! स्त्री ही पुरुषाचा अर्धा भाग आहे. हें आपणास कबूल आहे ना ? 'अर्धो ह वा एष आत्मनो यज्जाया' हें श्रुति–वचन आपण मानता ना ?

शंकर– जरूर.

सरस्वती– मग मला प्रथम जिंका आणि मग त्यांना शिष्य करून संन्यास द्या ! मला जिंकल्याशिवाय आपला जय पूर्ण होत नाहीं.

शंकर– सरस्वती ! तुझें ह्मणणें मला मान्य करतां येत नाहीं.

सरस्वती– कां ?

शंकर– स्त्री किती जरी विदुषी असली, तरी पुरुष स्त्रीजनाबरोबर वाद करीत नाहींत. तें शिष्टाचारास सोडून आहे.

सरस्वती– असल्या उडवाउडवीच्या भाषणानें ही सरस्वती फसणार नाहीं ! मी आपणास माझ्याशी गप्पा मारण्यास सांगत नाहीं. शास्त्रार्थावर वाद करण्यास आव्हान करते !

शंकर– सरस्वती ! मला तुझ्या योग्यतेची जाणीव आहे. पण स्त्रीबरोबर वाद करण्यास माझें मन घेत नाहीं.

सरस्वती– आपलें हें ह्मणणें मला पटत नाहीं. स्त्री असो वा पुरुष असो, कोणी जरी असलें तरी लिंगाची अगर वयाची आडकाठी न आणता त्याच्याशीं शास्त्रीय चर्चा करणें हें शिष्टाचारास सोडून व इतिहासास अपरिचित नाहीं. आपण इतिहास जाणतच असाल. नसेल तर मी सांगते, ऐका ! याज्ञवल्क्य कोण, हें आपणास माहीत आहे ?

शंकर– हो, आहे.

सरस्वती– जनकसभा आपणास आठवते ?

शंकर– हो, बरोबर आठवते.

सरस्वती– ती कशाकरतां झाली ?

शंकर– ब्रह्मिष्ठ कोण, याच्या निर्णयासाठीं.

सरस्वती– तेथें पुष्कळ विद्वान व थोर थोर तत्वज्ञ उपस्थित होते होय ना ?

शंकर– होय, पुढें मग ?

सरस्वती– त्यांत स्त्रियाहि होत्या ?

शंकर– होत्या.

सरस्वती– त्यांत गार्गीहि होती, हें आठवते कां ?

शंकर– होती.

सरस्वती– तिने वादक्षेत्रांत उडी घेऊन याज्ञवल्क्याशी शास्त्रार्थांत मोठा संग्राम गाजविला ! मोठें रणकंद माजविलें तिने. योगीश्वर याज्ञवल्क्यांनी ती स्त्री म्हणून तिच्याशी वाद करण्यास नकार दिला नाहीं. गोष्ट खरी ना ?

शंकर– हो खरी.

सरस्वती– हें असूं दे. आतां दुसरें उदाहरण.

शंकर– तें कोणतें ?

सरस्वती– तें जनक राजाचें. सुलभेचें या राजर्षी बरोबर वाग्युद्ध झाले !

शंकर– मग आतां तुझें म्हणणे काय ?

सरस्वती– माझ्याशी वाद करून माझा पराभव करा ! म्हणजे मंडनांचा पूर्ण पराभव झाला, असें मी म्हणेन. तोपर्यंत त्यांना पराजित मानणें हें न्याय्य होणार नाहीं व तोपर्यंत त्यांना संन्यास–दीक्षा देतां येणार नाहीं ! मी घेऊं देणार नाहीं ! !

सरस्वतीनें या विचारसरणीनें आचार्यांना जवळ जवळ कैचींत पकडून धरलें. सरस्वतीचा वाद करण्याचा आग्रह पाहून यतिवर्यांनी तिच्या म्हणण्याला शेवटीं रुकार दिला.

आचार्य व सरस्वती यांच्यांत शास्त्रार्थावर वाग्युद्ध जुंपणार आहे, ही बातमी गांवात प्रसृत झाली. दुसरे दिवशीं सभेत वादास तोंड लागणार होतें. हा अपूर्व योग पाहण्याची पंडितांना पुनः एक संधि लाभली. अर्थात् तो योग अपूर्वच म्हटला पाहिजे. भारताची सर्व शास्त्रविशारद एकमेवाद्वितीय विदुषी सरस्वती व ज्ञानाचे प्रचंड गौरी-शंकर असे सर्व विद्यापारंगत श्रीशंकराचार्य यांच्यातील चुरशीचे झुंझार वाग्युद्ध तें ! मग कोणाला त्याचें आश्चर्य व कौतुक वाटणार नाहीं ? जिने मंडन पंडित व शंकराचार्य यांच्या वादांत न्यायदान देण्याची भूमिका पत्करली होती, तीच आतां आचार्यांशी वाद करण्यास उद्युक्त झाली, हें पाहून कोणाला विस्मय वाटणार नाहीं ? गांवातील सर्व विचारी व सूज्ञ लोक हा वादसंग्राम पाहण्यासठीं सभागृहांत झुंडीनें जमूं लागले. सरस्वतीच्या विद्वतेची योग्यता व प्रभाव सर्वांच्या चांगलाच परिचयाचा होता. आणि शंकराचार्यांचा लौकिकहि तितकाच प्रसिद्ध

होता. मग हा कपिलाषष्ठीचा योग पाहण्यास कोण बरें उत्सुक असणार नाहींत ? ठराविक वेळेच्या आधीच सबंध सभागृह श्रोतृवृंदानें चिकार भरून गेलें.

वादाचा क्षण समीपला. आचार्य व सरस्वती दोघेंहि स्वस्थानावर येऊन आसनस्थ झालीं. मग आतां विलंब कसला! लागलीच वादास प्रारंभ झाला. शारदेचा पूर्वपक्ष व आचार्यांचा उत्तरपक्ष याप्रमाणें वादास तोंड लागलें. मंडनमिश्रांची वेदविद्येंत हुकमी सत्ता होती. पण सरस्वतीचा अधिकार इतर शास्त्रांत तितकाच वरचढ होता. दोघां-मध्यें आता शास्त्रार्थाचे द्वन्द्व चालू झालें. अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, मोक्षशास्त्र, काव्यनाटकादि ललितशास्त्र या विषयांवर प्रसंगाप्रसंगाने दोघा-मध्यें घनचक्कर माजून राहिलें.

तसें म्हटलें तर सरस्वतीचे प्रश्न मोठे मार्मिक व रहस्यमय होते. आणि आचार्यांचें उत्तरहि तितकेंच स्पष्ट व समर्पक होतें. दिवसेदिवस वादाचा रंग चढत व खुलत चालला. सरस्वतीने आपल्या पांडित्याची शर्थ केली. तिला फार मोठी आशा होती कीं आपण आचार्यांनां सहज निरुत्तर करूं. पण तिचें वादक्षेत्रांत कुठेंच कांहींच टिकून राहिना. प्रत्येक शास्त्रांत तिने आचार्यांना चिमट्यांत धरण्याचा हरप्रयत्न करून पाहिला. त्यांना चांगलेंच छेडून काढलें. पण आचार्यांच्या उत्तरांत भुसभुशीत जागा तिला कोठेंच आढळेना! पुढें पुढें वाद जसा रंगत चालला व दिवस जसे लोटत चालले तसतशी तिची बाजू घसरतच चालली. अर्थात् तिचा उत्साह व महत्वाकांक्षा ओसरत चालली. तिनें जंगजंग पछाडलें, आपल्या विद्येची व ज्ञानाची पराकाष्ठा केली, मार्मिक व गूढ प्रश्नांचा भडिमार करून पाहिला; आपली सर्व विद्या व ज्ञान-भांडार पणास लावून त्याची शिकस्त करून पाहिली. पण सर्व पालथ्या घागरीवर पाणी!

ती आतां जवळ जवळ निराश होत चालली. आचार्यांच्या ज्ञान-तेजापुढें तिचें कांही चालेनासें झालें. तिचें सगळें ज्ञानवैभव अगदी संपुष्टांत आलें. तिला अन्न गोड लागेना व रात्रीं झोंप येईना सतरावा दिवस होता तो. त्या दिवशी थकून भागून, निराश होऊन रात्री अंथरुणावर पडून चिंता करीत असता सुदैवानें तिच्या डोक्यांत एक आशेचा बारीक किरण चमकला. शंकराचार्य सर्वज्ञ होते, याची तिला पुरेपूर साक्ष पटली होती. पण एक बाजू मात्र त्यांची लंगडी होती. ते सर्व शास्त्रांत पारंगत होते हे खरें. पण एकांत मात्र ते अगदींच अनभ्यस्त होते. चाणाक्ष सरस्वतीनें तें मर्म नीट ओळखलें. कामशास्त्र होतें तें. बालपणींच संन्यास स्वीकारल्यामुळें त्यांना कामशास्त्राचा गंधहि नव्हता. स्त्रीचीं त्यांना असावी तशी ओळख नव्हती. येथें मात्र पाणी मुरत होतें. सरस्वतीनें ते व्यंग अचूक ओळखिलें. शास्त्रांत गति नाही व प्रत्यक्षांत अनुभव नाहीं. अशा या शास्त्रांत प्रश्न घालून त्यांना पेचांत पकड–ण्याचा, चिमट्यात धरण्याचा निश्चय करून, दुसऱ्या दिवशीं म्हणजे अठराव्या दिवशीं त्या शास्त्रांतील प्रश्न तयार करून घेऊन, ती सभेंत आली. श्रोत्यांची आतांपर्यंतच्या वादविवादावरून पूर्ण खात्री होऊन चुकली होती की, सरस्वतीला पड खावी लागणार.

दुसऱ्या दिवशीं सभेंत आल्यावर आचार्यांस उद्देशून ती म्हणाली– आचार्य देव ! आतां आपणास एक पण शेवटचा प्रश्न विचारते. त्याचें आपण सयुक्तिक उत्तर दिलें तर माझा पराजय मला मान्य आहे.

त्या प्रश्नाला आचार्य उत्तरले– भगवति ! काय तुला हवें असेल, तें विचार. अनमान करूं नकोस. यथाशक्ति मी उत्तर देईन व तुझें समाधान करीन.

सरस्वती म्हणाली– तर मग या प्रश्नाचें उत्तर पाहिजे. ते मला द्या' तो प्रश्न माझा हा असा आहे.–

**कलाः कियन्त्यो वद पुष्पधन्वनः**
**किमात्मिकाः किञ्च पदं समाश्रिताः ।**
**पूर्वे च पक्षे कथमन्यथा स्थितिः**
**कथं युवत्यां कथमेव पूरुषे ॥ शं. दि. ९–६९**

भावार्थः– मदनाच्या कला किती आहेत ? त्यांचें स्वरूप काय ? त्या कोणत्या स्थानावर राहतात ? शुक्ल आणि कृष्ण पक्षांत त्यांची स्थिति सारखीच असतें कां भिन्न भिन्न असते ? स्त्री व पुरुषांमध्यें त्यांचा वास कसा व कोठें असतो ?

हा प्रश्न ऐकून आचार्य गारेगार झाले ! त्यांची मति गारठून गेली ! प्रश्न मोठा मार्मिक व हुकमी खरा. याला योग्य उत्तर दिलें नाहीं, तर पदरांत पराजय पडून, जाळ्यांत पकडलेलें सावज निसटून जाणार. मंडनमिश्र हातचे निसटणार ! आणि लोकांत आपला बदलौकिक होणार ! आचार्यांना मोठा पेंच पडला ! उत्तर द्यावें तरी कठीण, न द्यावें तरी कठीण ! अचानक हा बॉम्बगोळा सरस्वतीनें अचूक अंगावर फेकून दिला ! आचार्य क्षणभर दिङ्मूढ झाले ! पुढें लवकरच ते ताळ्यावर आले आणि विचार करूं लागले. जर या प्रश्नाला उत्तर दिलें नाहीं तर सर्वज्ञतेला काळिमा लागणार, जर उत्तर दिलें तर संन्यास धर्माला बाध येणार ! तर उत्तर तर यथोचित दिलें पाहिजे आणि संन्यास धर्माला तर बाध येऊ नये, अशी कांहीतरी युक्ति लढवावी, या विचारांत त्यांनीं किंचित् काळ काढला.

तसें म्हणजे त्यांना दिव्य दृष्टीचा उपयोग करून सरस्वतीला निरुत्तर करतां आलें असतें. पण त्यामुळें संन्यास नियमांचा भंग झाला असता.

तेव्हां त्यांनीं सूक्ष्म विचार करून या प्रश्नाचें जागच्याजागीं उत्तर देण्यापेक्षां सहा महिन्यांची मुदत मागून घेतली. ( आनंदगिरि )

सरस्वतीला वाटलें कीं, भला सांपडला सन्याशी पिंजऱ्यांत ! यात आचार्यांची खास नामुष्की होणार व आपणाला विजयश्री लाभणार, या विचारानें हुरळून जाऊन, आढेवेढे न घेतां तिनें आचार्यांच्या विनंतीस मान दिला व विनंतीप्रमाणें सहा महिन्यांची मुदत मंजूर केली. याप्रमाणें अशा या सभेचा शेवट लागला. सरस्वतीचा आतां खास जय होणार, या निश्चयानें श्रोतृवृंद तेथून सगळा उठून हर्षिताचित्तानें घरोघर परतला.

## प्रकरण २४ वें

## परकाया प्रवेश

महिपस्य सूक्ष्मगुरुयोगबलो ऽ
विशदातिवाहिक शरीरयुतः ॥ ९ - १०४ ॥
अंगुष्ठमार्गेण समीरणं नयन्,
करंध्रमार्गाद्बहिरेत्य योगवित् ।
करंध्रमार्गेण शनैः प्रविष्टवान्,
मृतस्य यावच्चरणाग्रमेकधीः ॥ ९ - १०५ ॥
गात्रं गतासोर्वसुधाधिपस्य,
शनैः समस्पन्दत हृत्प्रदेशे ।
तथोदमीलन्नयनं क्रमेण
तथोदातिष्ठत् स यथा पुरैव ॥ ९ - १०६

शं. दि. ९ - १०४ ते १०६

सरस्वतीच्या प्रश्नाला उत्तर देणें म्हणजे ती एक मोठी समस्याच होऊन बसली होती. आचार्य देवांना. यतिधर्माचें पालन तर झालें पाहिजे आणि त्याबरोबरच सरस्वतीच्या प्रश्नालाहि चोख उत्तरहि पण दिलें पाहिजे. पण हें जुळायचें कसें ? दोन्हीं गोष्टी साध्य होणेचा अचूक उपाय अगर मार्ग शोधून काढल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. पण मार्ग तर कांहीं तसा दिसेना. आणि स्वस्थ एका जागीं बसवेना. तेव्हां शिष्यांना बरोबर घेऊन मार्ग शोधून काढण्याच्या उद्देशानें ते देशाटणास निघाले.

फिरत फिरत येतां येतां ते एका राज्यांत आले. तेथें अमरुक नांवाचा राजा नुकताच मरण पावला होता. तसा तो तरुण असून शिकारीस गेल्यावेळीं मूर्च्छित होऊन पडला व तेथेंच तो कालाधीन झाला. त्याच्या स्त्रिया जवळ बसून धाय धाय रडत होत्या. डोळयांतून सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. राजाचे गुण आठवून आठवून शोक करीत होत्या. दास-दासी व इतर राजपरिवार सभोंवती जमून मोठमोठ्यानें आक्रोश करीत होता. राजमंत्री व इतर अधिकारी एका बाजूला बसून पुढील राज्यकारभाराचा विचार करीत होते. सर्वांच्या तोंडावर दुःखाची छाया पसरली असून, दुःख व शोक यांचा हलकल्लोळ माजला होता तेथें. त्या स्मशानभूमींत !!

अशावेळीं आचार्य तेथें अकस्मात आले व त्यांनीं तो देखावा पाहिला. त्याबरोबर त्यांना एक आशेचा किरण दिसला. त्यांनीं मनांत विचार केला कीं, आपला हेतु साध्य करून घेण्यास ही संधि बरी आहे. याचवेळीं या मृत राजाच्या शरीरांत प्रवेश करून आपला कार्यभाग साधून घेतला पाहिजे. कामशास्त्राचें व्यावहारिक ज्ञान प्राप्त करून घेण्यास याच्यासारखा सुयोग इतरत्र लाभणार नाहीं. एकंदरींत हा विचार त्यांना पटला व ती गोष्ट त्यांनीं शिष्यांजवळ काढली.

पण ती शिष्यांना पटावी तशी पटली नाहीं. त्यांना ती कल्पना कशीशीच वाटली. त्यांचें मन जरा अस्वस्थ व उद्विग्न झाल्यासारखें झालें. संन्यास ग्रहण केल्यावर हा कामशास्त्राचा बावडा विचार काय कामाचा! लोक तरी काय म्हणतील? छे, केवढें अब्रम्हण्य हें! त्यांना अर्थात् आचार्यांचा विचार मुळींच पटला व रुचला नाहीं. पण तसें त्यांना उघड बोलून दाखविण्याचें धैर्य मात्र होईना.

त्यांतल्या त्यांत पद्मपाद हा जरा मनाचा धीट होता. मनाचा हिय्या करून तो आचार्यांस म्हणाला- 'गुरुदेव! आपला हा विचार आम्हां अल्पज्ञांना पटत नाहीं. स्त्रियांचा मोह मोठा दुर्निवार्य म्हणतात. म्हणून ज्ञानी लोक त्यांच्यापासून लांब एकांतांत राहूं इच्छितात. आपण आतां जाणूनबुजून स्त्रियांच्या घोळक्यांत रहावयास जाणार. आणि त्यांच्याशीं यथेच्छ भोगविलासांत रंगणार! राजमंदिरांत एकदाचें पाऊल पडल्यावर तेथून परतण्याची बुद्धि होते कशाला? राजमंदिर म्हणजे देऊळ अगर मठ नसून, तें भोगविलासाचें प्रत्यक्ष माहेरघर! तेथें अनेक प्रकारच्या सुखविलासांची व कामोपभोगांची विविध साधनें सतत तयारच असतात. मग त्या मोहजालांतून सुटून बाहेर येण्याला मन काय म्हणून तयार होईल? तशांत आपण पहावें तर वैराग्याचें कडकडीत व्रत पालन करणारे एकनिष्ठ संन्याशीं! गुरुदेव! मला आपला हा विचार क्षेमकर वाटत नाहीं! जळो ते कामशास्त्र! जळो तो रमणी- विलास! जळो तो सरस्वतीचा प्रश्न!! लोकांत निंदास्पद आहे ही गोष्ट! नको तो विचार!

अर्थात् गुरुदेवाला धर्मज्ञानाच्या गोष्टी सांगण्याचा आमचा अधिकार नाहीं हें स्पष्ट आहे खरें. पण आपल्यावरील अलोट भक्तिभावामुळें आम्हीं आमचें वेडें मन आपणाजवळ बोलून दाखविलें आहे, इतकेंच. आपण पूर्ण-

प्रज्ञ आहां. सूक्ष्म विचारज्ञ आहां. योग्य वाटेल तसें करण्यास आपण स्वतंत्र आहां.

पद्मपादाचें हें भाषण ऐकूण आचार्य म्हणालें— पद्मपादा, तुझें म्हणणें बरोबर आहे. तें सद्भाव-प्रेरित आहे, आणि त्यांत व्यावहारिक सत्य आहे हे मी जाणतो. पण हें लक्षांत ठेव कीं, कर्मबंध हा विषयासक्त मनुष्यालाच बाधक होतो. कर्मबंधाचें मूळ हें वासनेंत - संकल्पांत बद्ध आहे. संसाराकडे त्यागदृष्टीनें - वैराग्यदृष्टीनें पहाणाऱ्या निरासक्ताला त्यानें कांहीं जरी केलें, तरी तें त्याला काय होय ? तेथें संकल्पाचा - अहंकाराचा—सर्वस्वी अभावच असतो. अशा विगत - संकल्प - निरासक्त मनुष्याला संसार हा मुळींच बंधनकारक होऊं शकत नाहीं. संसार हा केवळ काल्पनिक तमाशा आहे. व्यवहारांत सत्यसा भासला, तरी परमार्थतः तो खोटाच आहे ! आणि हें सत्य ज्यानें जाणलें - अशी ज्याची बुद्धि झाली - त्याला कोणत्याहि प्रकारें कर्म हें बंधनकारक होत नाहीं. कर्म त्यालाच बाधेत कीं, ज्याची अहंकार बुद्धि तेथें जागृत असते. पण ज्याची अहंकार बुद्धि नष्ट झाली, त्याला कर्मांचें सुष्ट अगर दुष्ट फल भोगावें लागत नाहीं. त्यानें ब्रम्हहत्या केली तरी तो पापानें लिप्त होत नाहीं आणि हजारो यज्ञयाग केलें तरी त्याला पुण्याची जोड लाभत नाहीं. अशी ही अद्वैत कर्ममीमांसा आहे.

तुला माहीतच आहे ऋग्वेदांतली ती इंद्राची गोष्ट. अहंकार शून्य त्या इंद्रानें त्वष्ट्याचा पुत्र जो त्रिशिर त्याचा वध केला आणि एका मेंढीला मारुन ती एका मुनीस खावयास दिली. पण त्या कर्मानें त्याचें कांहीं सुद्धां वांकडे झालें नाहीं ! ही पापकृत्याची गोष्ट झाली. आतां पुण्यकृत्याची सांगतो, ऐक. प्रसिद्ध राजर्षि जनक राजा तुला माहीतच आहे. त्यानें अनेक लहान थोर यज्ञयाग केलें आणि मोठ मोठ्या दाक्षिणा दिल्या. अनेक पुण्य कृत्यें केलीं. पण त्या सत्कर्मांचें फळ त्याला लाभलें नाहीं ! कारण

त्यानें अभय ब्रम्हाची प्राप्ति करून घेतली होती. जो ब्रम्हवेत्ता आहे; अहंकार शून्य आहे - त्याचा हा असा प्रभाव आहे ! संकल्पनाशाचा हा महिमा आहे ! त्याला सुकृत काय अगर दुष्कृत काय कशाचाहि लाभ अगर बाध प्राप्त होत नाहीं.

हें सर्व तुला येथें सांगितलें तें अशाकरता कीं, मी निरिच्छ व निरहंकारी आहे. कामवासनेचा, विषय सुख भोगाचा, लवलेशहि माझ्या हृदयांत नाहीं. मी ममत्व बुद्धि टाकून दिली आहे, मग मला भीति कसली ? अल्पज्ञतेचा दोष घालविण्यासाठीं - ज्ञान मिळविण्यासाठीं पर-काया प्रवेश करून कामशास्त्राची वाण भरून काढली, तर तें निंदास्पद होण्याचें कारण काय ? म्हणून या कार्यापासून मला विन्मुख करूं नका. उलट मला मदत करून माझें अंगीकृत कार्य सुगम करा.

आचार्यांच्या या वचनाला शिष्यांनी हात जोडून आपलें शीर लवविलें आणि आनंदानें त्यांच्या कार्यांत मदत करण्याचें त्यांस पूर्ण आश्वासन दिलें. नंतर आचार्यांनी बिलंब न करतां शिष्यांना बरोबर घेऊन घनदाट अरण्यांतील एका पर्वतशिखरावर ते चढून गेलें. खरोखर ती जागा मोठी रमणीय होती. तेथें एक सुंदर गुहा होती. शेजारीच स्वच्छ पाण्याचा एक लहानसा तलाव होता. सभोंवती विविध वन्य फलपुष्पांची वृक्षराजी दाटून होती. आसमंतातील सृष्टिशोभा व वनश्री मोठी मनोवेधक दिसत होती. ती जागा आचार्यांनी पसंत करून शिष्यांस म्हटलें:— शिष्य हो ! ही जगा पवित्र व प्रशस्त आहे. येथें या गुहेंत मी माझें शरीर सोडून जातो. मी परत येईतोपर्यंत तुम्ही सावधान राहून या शरीराचें रक्षण करावें. सहा महिन्यांनी मी परत येईन. तोपर्यंत तुम्ही जागृत राहून त्याचा संभाळ करावा ! शिष्यांनी मान तुकवून त्यांस आपली सम्मति दिली.

नंतर आचार्यांनी गुहेंत शिरून समाधि लावली. आणि पुढें लवकरच जड शरीर सोडून, सूक्ष्म शरीर धारण करून योगबलाने त्या अमरुक राजाच्या मृत शरीरांत प्रवेश केला. तो प्रकार असाः— प्रथम-त्यांनी योगबलानें पायाच्या आंगठ्यापासून प्रारंभ करून दशमस्थानापर्यंत प्राणवायु नेऊन नंतर वर ब्रह्मरंध्रापर्यंत आकर्षून घेतला. नंतर तेथून म्हणजे ब्रह्मरंध्रातून बाहेर पडून अमरुकच्या ब्रह्मरंध्रांत शिरून पुढें तेथून खाली उतरत उतरत पायाच्या आंगठ्यापर्यंत प्राणवायु आणून सोडला. याप्रमाणे सर्व शरीरभर प्राणवायु संचारूं लागल्यावर प्रथम तोंडावरची मृत्युकळा-जाऊन तेथें चैतन्याची टवटवी उमटूं लागली. हें जें सूक्ष्म शरीर, तें पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच प्राण, मन व बुद्धि या सतरा तत्त्वाचें बनलेलें असतें. लिंग देह म्हणतात तो हाच.

या लिंग शरीराने राजाच्या मृत शरीरांत आचार्यांनी प्रवेश केल्या-वर राजांत हळुहळुं चैतन्याचा आविर्भाव होत चालला ! मुखावर चैतन्याचें नवें तेज विलसूं लागलें ! नाकांतून हळुहळू श्वास खेळूं लागला ! छाती स्फुरूं लागली ! ओंठ हलूं लागले ! थंडगार पडलेल्या शरीरांत ऊब शिरली. हा विलक्षण प्रकार पाहून तेथील लोकांना मोठा अचंबा वाटला ! स्त्रियांचा दुःख—शोकावेग ओसरून त्यांना हायसें वाटूं लागलें. रडारड व ओरडा ओरड यांना खंड पडला, तों अमरुकनें डोळे उघडले व पुढें तो लवकरच उठून बसला !

आतां केवढा आनंद ! केवढा उत्साह ? केवढा हर्ष ! नि केवढा संतोष ! त्याला आतां सीमाच राहिली नाहीं. जेथें क्षणापूर्वी रडारड—आरडाओरड—दुःखशोक इत्यादिकांचा एकच डोंब उठून राहिला होता—हलकल्लोळ माजला होता, तेथें आतां आनंदाचे व हास्याचे मधुर फवारे

नाचूं लागलें ! मेलेला राजा पुनः जीवंत झाला, हा चमत्कार काय लहान सहान म्हणावा ?

मग आतां विचारतां काय ? लगेच राजधानींत ही आनंदाची बातमी सर्व शहरभर जाहीर करण्यांत आली. राजा मेला नाहीं, मूर्च्छित होऊन पुनः शुद्धीवर आला आहे, तो जीवंत आहे, ही वार्ता गावांत वाऱ्याप्रमाणे प्रसृत झाली. केवढा आनंद तो प्रजेचा ! त्याला परत घरी आणण्यासाठी राजपुरोहित, मंत्री, सरदार, अधिकारीवर्ग व इतर राज परिवारातील मंडळी, त्याचप्रमाणे हत्ती, घोडे, पालख्या, मेणे, वाजंत्री, नगारे, ढोल, टाळ, मृदंग इत्यादि राजवैभव बाहेर पडून, राजाला परत घरी आणण्यासाठीं स्मशानाकडे निघाले.

तेथें आल्यावर शांतिकर्म करण्यांत येऊन मंगलविधि उरकण्यांत आला. नंतर राजा शृंगारलेल्या हत्तीवर बसून मोठ्या थाटानें मिरवीत मिरवीत राजवाड्यांत आला. व याप्रमाणे राजधानींत जिकडे तिकडे आनंदी आनंद फुलून राहिला.

# प्रकरण २५ वें

## राजभुवनांत

समधिगम्य पुरं परिसान्त्वित-
प्रियजनः सचिवैः सह सम्मतैः ।
भुवमपालयदादृत शासनो
नृपतिभिर्दिवमिन्द्र इवाधिराट् ॥ ( शं. दि. १०-२
अथ राज्यधुरं धराधिपः
परमा-सेषु निवेश्य मान्त्रिषु ।
बुभुजे विषयान्विलासिनी-
सचिवोऽन्यक्षिति पालदुर्लभान् ॥
पुरेव भोगान् बुभुजे महीभृत्स १०-११
भोगिनीभिः सहितोऽप्यरंस्त ।
कंदर्प शास्त्रानुगतः प्रवीणै-
र्वात्सायने तच्च निरैक्षताद्धा ॥ १०-१७

आता पुढील कथाभाग सांगावयाच्या पूर्वीं येथें प्रथम योग-विद्येचा महिमा व प्रभाव काय असतो, याविषयीं दोन शब्द वाचकांस सांगून मग पुढें चालूं लागावें असें आम्हांस वाटतें. मागच्या प्रकरणांतील अद्‌भुत व आश्चर्यकारक हकीकत वाचून आधुनिक सुशिक्षित वाचक वर्गाचा विश्वास त्यावर बसणार नाहीं. व तें त्यांना पटणारहि पण नाहीं, याची आम्हांस जाणीव आहे. सांप्रत भारतांतील प्राचीन योगविद्या जवळ जवळ आतां लुप्तप्राय झाली असून, तशांत विज्ञानशास्त्राच्या अपूर्व व लोकोत्तर प्रगतीमुळें सामान्य लोकांचीं मनें दिपून गेलीं आहेत. जड-विज्ञान शास्त्रापलीकडील सूक्ष्मज्ञानाची—अतीन्द्रिय ज्ञानाची—त्यांना जाणीव

नाहीं. उलट तेच आम्हाला अंधश्रद्धाळूंत काढण्यांत चुकणार नाहींत. अतएव योगविद्येचा महिमा काय आहे, याविषयीं योगशास्त्र काय सांगतें, याचा हवाला येथें देणे आम्हांस जरूर वाटतें.

याविषयीं योगतत्त्वोपनिषदांत माहिती देण्यांत आली आहे, ती अशी :– ' यथा वा। चित्तसामर्थ्यं जायते योगिनो ध्रुवम्। दूरश्रुतिर्दूरदृष्टिः क्षणाद्दूरागमस्तथा। वाक्सिद्धिः कामरूपत्वमदृश्यकरणी तथा। मलमूत्रप्रलेपेन लोहादेः सुवर्णता भवेत्। खे गतिस्तस्य जायेत संतताभ्यास योगतः। सदा बुद्धिमता भाव्यं योगिना योग सिद्धये ॥ '

भावार्थः– योगीलोकांना योगसाधनापासून अलौकिक असें चित्त. सामर्थ्य प्राप्त होतें. उदाहरणार्थ त्यांना अतिदूरचें ऐकूं येतें व अतिलांबचें दिसूं लागतें. क्षणांत अतिलांबून जवळ येतां येतें व क्षणांत अतिदूर जात-येतें. ते बोलतील तसें घडून येतें आणि वाटेल ते रूप सूक्ष्म अगर स्थूल धारण करतां येतें. ते वाटेल ती अघटित गोष्ट सहज करूं शकतात. मलमूत्राचें लेपन करून लोखंडाचें ते सुवर्ण बनवूं शकतात. व आकाशांतून गमन करूं शकतात ! असा हा योगविद्येचा महिमा आहे. हाच भावार्थ पातंजल योगदर्शनांतहि विभूतिपादांत सांगण्यांत आला आहे, तो असा– शद्बज्ञान, पूर्वजन्मज्ञान, अंतर्धान, मरणज्ञान, भावीसंकटाचेंज्ञान, प्रचंड बलप्राप्ति, सूक्ष्मज्ञान, गुप्तज्ञान, दूरज्ञान, क्षुत्पिपासानिवृत्ति, परकाया प्रवेश, दिव्य इंद्रियज्ञान, आकाशगमन, अणिमा, महिमा, गरिमा, महिमा, ईशित्व, वशित्व, मनोजवित्व, इत्यादि अनेक अलौकिकसिद्धि योगापासून प्राप्त होतात.

( पातंजल योग्यदर्शन विभूतिपाद १६ ).

यावरून शंकराचार्यांनी दाखविलेले चमत्कार व असाधारण कृति अशक्य व अविश्वसनीय म्हणण्यास व मानण्यास मग आतां कोण सूज्ञ व विचारी मनुष्य तयार होईल ? आज ही योगविद्या दुर्दैवानें दृष्टि आड झाल्यामुळें, त्याचें प्रात्यक्षिक आज पहावयास मिळणार नाही, ही खेदजनक गोष्ट आहे. पण हा दोष कांहीं शास्त्राचा नव्हे. प्रस्तुत काळ हा विज्ञानाचा चालता काळ असल्यामुळें त्यानें दाखविलेले आधुनिक नवोनवीन शोध नि चमत्कार हे सगळे जडात्मक सृष्टीतले असून त्यानें दिपून गेलेल्या जडमूढ लोकांचा बसावा तसा विश्वास अंतर्धान पावला आहे. हा खेळ कालमहात्म्याचा असून, त्याला योग अगर अध्यात्मशास्त्र जबाबदार नाहीं. एवढी गोष्ट सूज्ञ वाचकांनी ध्यानांत घ्यावी म्हणजे झालें. एवढी प्रस्तावना करून आतां प्रस्तुत विषयाकडे वळतो.

अमरूक राजा पुनः जीवंत झाल्यावर त्याची स्मशानातून राजवाड्याकडे मोठ्या थाटाने हत्तीवरून मिरवणूक काढण्यांत आली. राजरस्त्यावरून मिरवीत मिरवीत राजवाड्यांत आल्यावर हत्तीवरून उतरून तो राजवाड्यांत शिरला, ही गोष्ट मागच्या प्रकरणांत सांगण्यांत आली आहे.

वाड्यांत आल्यावर त्याला भेटायला त्याचे आप्तइष्ट, स्नेहीसोबती,सरदार जहागीरदार, इत्यादि प्रियजन येऊन गोड शब्दांनी त्यानीं त्याचें स्वागत केलें व अरिष्ट टळल्याबद्दल त्याचें अभीष्ट चिंतन केलें. वाड्यांत सगळा आनंदी आनंद झाला. नंतर तो दरबारांत येऊन मंत्रिमंडळाच्या सहाय्यानें राज्यकारभार करण्यास त्यानें प्रारंभ केला. मात्र एक गोष्ट विशेष दिसूं लागली, ती म्हणजे या नवीन राजाच्या गुणांत, वर्तनांत, भाषणांत, विचारांत व आचारांत विलक्षण फरक आढळून येऊ लागला.

हा मृतोत्तर पुनः जीवंत झालेला या अमरुक राजानें दरबारांतील अव्यवस्थित घडी सुधारून राज्यकारभारांत नवीन प्रथा सूरू केली. प्रजेच्या हिताच्या व सुखसोयींच्या अनेक गोष्टी नव्यानें प्रचारांत आणण्यांत आल्या. राज्यकारभारांत व राज्ययंत्रणेंत आमूलाग्र फरक घडवून सर्व गोष्टी प्रगतिपथावर आणण्यांत आल्या. व्यापार उद्योगाला प्रोत्साहन देण्यांत आलें. राज्यांतील विद्वान, कलावंत व गुणीजन यांचा परामर्श घेण्यांत येऊन त्यांना बिदागी देण्यांत आली. गोरगरीबांची दाद घेण्यांत व देशांतील सर्व प्रजाजनांना सुखी व आनंदी करण्यांत आले.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे थोडयाच दिवसांत राज्यांत सगळा रंग पालटून ही नवीन राजाची नवीन कारकीर्द प्रजेस फार समाधानकारक झाली. त्याचप्रमाणे या नवीन राजाच्या स्वभावगुणांत आमूलाग्र थारेपालट दिसूं लागला. लोक म्हणूं लागले कीं हा अमरुक पूर्वींच्या सारखा दिसत नाहीं. त्याच्यांत सगळाच बदल झाला आहे. त्याचें आतां सर्वच काहीं विलक्षण दिसत आहे. सर्व मंगलगुण, मंगलविचार मंगल आचार यांनी तो अलंकृत झाला असून पूर्वींचें त्याच्यांत कांहीच आढळत नाही. तो आतां जवळजवळ धर्मराज बनला आहे. याचकांना व गुणीजनांना सढळ हातानें उदार मदत करतो. असा स्वभाव पूर्वींच्या राजाचा नव्हता. दरबारांत व बाहेर सभेंत बोलू लागला म्हणचे वृहस्पती सारखा बोलूं लागतो. राज्यांत नवीन नवीन प्रथा पाडून प्रजेच्या सुखसोयींत नित्य नवनवीन भर घालतो. एकंदरीत मन, बुद्धि, विद्वत्ता, चातुर्य, भाषण, औदार्य, वर्चस्व इत्यादि गुणांत हा नवीन अमरुक पूर्वींच्य सारखा नसून त्या दोहोंत कोठेंच साम्य राहिलें नाहीं. सर्वच कांहीं विचित्र व विलक्षण !

सृष्टीचें रूपदेखील बदलत चाललें. फलपुष्पादिकांची झाडें फल-पुष्पांनी चिकार बहरूं लागलीं. गायीम्हशी इत्यादि दुभती जनावरें प्रभूत धार देऊं लागलीं. जिकडे तिकडे पर्जन्यवृष्टि होऊन भूमाता सस्यशामलांनी मनोहर शोभूं लागली. प्रजेंत जिकडे तिकडे सुखसमा-धानाचे उग्दार उफाळूं लागले. लोक सुवृत्त व नीतिमान बनत चालले. फार काय या नवीन राजाच्या आमदानीत सर्वच प्रकार बदलत जाऊन, जिकडे तिकडे अभिवृद्धि, संतोष, शांतता, उत्साह, आनंद यांच्या नवीन युगास प्रारंभ झाला आहे, असा भास होऊ लागला. असा हा दिव्य व लोकोत्तर प्रकार पूर्वी आमच्या पाहण्यांत व ऐकण्यांतसुद्धा आला नव्हता.

राज्यकारभारांत व देशांत सर्व प्रकारे नवी घडी बसवीत असता इकडे राजवाड्यांतहि रंग बदलत चालला. येथेंहि नवीन नवीन प्रथा पडत चालल्या. पूर्वींच्या कांही खार्चिक बाबी व अनैतिक रूढी यांची हकालपट्टी करण्यांत येऊन वाड्यातील उधळपट्टीला चांगलाच खो बसला. दुर्वृत्त व अनीतिमान चाकरनोकरांना कायमची रजा दण्यांत आली व त्यांची जागा प्रामाणिक व गुणी लोकांनी भरून काडली गेली. जिकडे तिकडे स्वच्छता, टापटीप व सुव्यवस्था यांच्या नवीन युगास प्रारंभ झाला. राज्याची विसकटलेली घडी नीट सुव्यस्थित बसाविल्यावर राज्यकारभाराची धुरा मंत्रिमंडळावर सोपविण्यांत येऊन त्याचें लक्ष राजवाड्यांत राजविलासाकडे आतां रंगत व रमत चाललें.

बोलून चालून राजवाडाच तो ! तेथें कशाला काय कमी ? पहावें तेथें सुखविलासाच्या साधनांचा सुंदर संग्रह, मधुर पक्वान्ने, रुचकर व स्वादिष्ट भोजन, उत्तमोत्तम खाद्य पेयें, उंचीवस्त्रप्रावरणें, नाना रत्नालंकार,

दासदासी यांचें सर्वप्रकारें सौकर्य असून शिवाय रंगमहालांत मऊमऊ गाद्या, गिरद्या. लोड, तक्के, संगीत वाद्ये, गाणे, नाच, रंग, केवढा तो राजविलासाचा थाट ! त्याच्या सहवासांत व उपभोगांतच त्याचें दिल रमूं लागलें.

अर्थात् त्याला स्त्रियांची ओळख हवी होती. त्यासाठींच आचार्य अमरुक होऊन राहिले होते. तेथील सुंदर सुंदर राजस्त्रियांशीं श्रृंगार चेष्टा, मनोहर संभाषण, विविध प्रणयलीला, मधुर पेयें, केशर, कस्तुरी अत्तरांदिकांचा घमघमाट, सुखशय्या, गाणे बजावणे गप्पागोष्टी यांतच त्याचा आता सगळा वेळ जाऊं लागला. रतिसुख कसें असतें, तें कसें उपभोगावें, श्रृंगार चेष्टा कशा कराव्या, रतिसुखानंद कसा लुटावा याचें प्रत्यक्ष ज्ञान करून घेण्यासाठी वात्सायन सूत्रांचें अवलोकन करून, त्याप्रमाणें प्रत्यक्ष प्रयोग करून पाहण्याचा उद्योग चालविला. सरस्वतीने केलेल्या प्रश्नांचे समर्पक उत्तर देण्यासाठी या गोष्टींची आवश्यकता असल्यामुळें या कार्यांत तो रमूं लागला.

' कलाकियन्त्यो वदपुष्पधन्वनः ' या तिच्या प्रश्नांस चोख व समर्पक उत्तर देण्यासाठीं लक्ष्यपूर्वक या गोष्टींचा अभ्यास करून त्यांतील अनुभव घेणें प्राप्तच होतें. वात्सायन सूत्रांत त्याचा शोध करीत असता हा खालील श्लोक त्यास आढळून आला तो श्लोक हा—

' पम्दे गुल्फे तथौरौच भगे नाभौकुचे हृदि ।
कक्षे कण्ठेतथौष्टेच गण्डे नेत्रे श्रुतावपि ॥
ललाटेच शिरोदेशे वसेत्काम स्तिथिक्रमात् ।
दक्षे पंसः स्त्रिया वामे शुक्ले कृष्णे विपर्यय : ॥

भावार्थः— पाद, मनगट, छाति, योनि, नाभि, स्तन, हृदय, खाका, कंठ, ओठ, नेत्र, कान, कपाळ, मस्तक याप्रमाणे कामाचें वसतिस्थान शरीरांत आहे. शुक्ल पक्षांत हें स्थान पुरुषांमध्ये उजव्या बाजूला व स्त्रियांमध्यें डाव्या बाजूला आणि कृष्णपक्षांत याच्या उलट प्रकार असतो.

हा वरील श्लोक म्हणजे सरस्वतीच्या प्रश्नांचें चोख व ठसठशीत उत्तरच होय. कामशास्त्रांतील रतिक्रीडेचे प्रकार म्हणजे प्रेयसीचे आलिंगन, तिचें चुंबन, मैथुनाच्या विविध तऱ्हा, प्रणयचेष्टा, नखाग्रानें खाजविणें, रतिसुखानुभव, प्रणयकलह, संभोगासनें इत्यादि इत्यादि गोष्टींचें ज्ञान त्यास वात्सायन सूत्रावरून झाले व त्याचा प्रत्यक्ष प्रयोग करून त्यानें गोड अनुभवहि घेतला. सहा महिन्यांच्या अवधींत कामशास्त्रांत त्याने सगळें प्राविण्य मिळविलें. व राजस्त्रियाहि त्याच्यावर बेहद्द खूष झाल्या. व त्याच्याशी प्रेमप्रसंग व प्रणयचेष्टा करण्यासाठी मोठ्या आवडीने व तत्परतेनें धांवून त्याच्याजवळ येऊं लागल्या.

मात्र एक गोष्ट त्यांच्या नजरेंत नवीन अंकुरूं लागली. ती म्हणजे ही कीं पूर्वींच्या व हल्लीच्या अमरुकांत आचारविचार, बोलणें चालणें, खाणें पिणें, उठणें बसणे, खेळणे सवरणें यांत फारच मोठा फरक दिसूं लागला. पूर्वींच्या व हल्लीच्या राजांत कसलेंच साम्य नव्हतें. या नवीन राजाच्या सर्वच नवीन तऱ्हा. व त्या प्रेमळ व अधिक सुखकारक. त्यांच्या मनांत दिवसेदिवस एकप्रकारची साशंक वृत्ति डोकावूं लागली. हा पूर्वींचा अमरुक नसून नवीन कोणीतरी निराळा असावा हा विचार जोराने उसळी मारूं लागला. या नवीन राजाकडे त्यांचें मन अधिक वेधू लागून त्याचा सहवास त्यांना गोड वाटूं लागला. तो सतत आपल्या जवळ असावा, असें त्यांना वाटूं लागलें. पण जसजशा त्या त्याच्याशी लगट करूं लागल्या तसतशी मनांत सांशकवृत्ति बळावत जाऊन मधुनमधुन त्यांचीं मनें

८१३६३ ता. ... १३५८

अस्वस्थ होत चालली. असें असलें तरी मौज ही कीं त्या त्याच्यावर अधिकच अनुरक्त होऊन जात; असो.

इकडे दरबारांत मंत्रिमंडळाची जवळजवळ राजस्त्रियांसारखीच अवस्था झाली. पूर्वींच्या राजाचे राजकारण व हल्लींच्याचें राजकारण यांत जमीन–अस्मानाचा फरक दिसूं लागला. दोघांचें विचार, वर्तन, स्वभाव, कार्यपद्धति, वचक, बोलणे चालणें यांतील महदंतर त्यांच्या नजरेंत भरूं लागले. हल्लीच्या राजाचे सग्दुण, सद्वृत्त, सद्विचार पाहून त्याच्या विषयीं प्रेम, निष्ठा, आदर इत्यादि अधिक बळावून त्याच्याकडे त्यांची अधिक ओढ लागली. प्रजेला तर त्याची देशनिष्ठा, उदार स्वभाव व देशोत्कर्षविषयक कळकळ पाहून त्यांना हा जणु धर्मराजाचा अवतारच भासूं लागला. फार काय सांगावें सर्व राष्ट्र त्याला देवाप्रमाणें मानूं लागलें !

त्यांपैकीं कांही विचारी व चिकित्सकांना मात्र असा दाट संशय येऊं लागला कीं हा पूर्वींचा अमरुक नसून, त्याच्या मृत देहांत कोणीतरी निराळाच महाभाग शिरून बसला असावा. दिने दिने हा संशय वाड्यांत व दरबारांत बळावतच चालला. तेव्हां त्यांनी असा विचार के कीं आंता आला आहे तो ठीक आहे. पण पुनः त्यानें निसटून जाऊं नये. व त्याला जातां येऊं नये. अशी कांहीतरी तोड शोधून काढल्यास आपली चिंता दूर होईल, अशा विचारांत ते असता त्यांना एक विचार सुचला कीं त्याचें पूर्व शरीर कोठेंतरी पडून असलें पाहिजे व तें शोधून काढून ते जाळून भस्मसात् करून टाकलें पाहिजे. हा बेत सर्वांना पटला. याविषयी अधिक गवगव न करतां गुप्तपणे राजदूत पाठवून त्याचा कसून शोध घ्यावा. मग अवकाश कसला? त्याप्रमाणें राजदूतांस बोलावून घेऊन तें शरीर हुडकून काढून भस्मसात् करण्यासाठी गुप्तपणे आज्ञा दिली व त्याप्रमाणें राजदूत बाहेर पडून शरीर शोधार्थ चहूंदिशांस गेलें.

# प्रकरण २६ वें

## पुनश्च पूर्वदेहांत

उद्बोधितः सदसि तैरवलम्ब्य मूर्छां
निर्गत्य राजतनुतो निजमाविवेश।
गात्रं पुरोदितनयेन स देशिकेन्द्रः
संज्ञामवाप्यच पुरेव समुत्थितोऽभूत्॥

(शं. दि. १०-५७)

शंकराचार्य अमरुक राजाच्या मृत शरीरांत प्रवेश करून, राज-वाड्यांत जाऊन, तेथें राजविलास व प्रमदासुखोपभोग यांत यथेच्छ निमग्न असतां सहा महिन्याचा अवधिकाल केव्हांच संपून गेला. पण ते कांही पूर्व स्मृतीवर आले नाहींत. राजैश्वर्य व विपयसुख उपभोगण्यांतच ते पूर्ण गढून गेले! पण त्यांचे जे शिष्य गुहेंत त्यांच्या शरीराचें रक्षण करीत होते, त्यांना त्याची आठवण झाली. अवधि होऊन गेला तरी आचार्यांचा पत्ता नाहीं, हा काय प्रकार आहे? मुदत संपून वर पांच सहा दिवस लोटले, तरी आचार्य पूर्व शरीरांत येत नाहींत, याची त्यांना मोठी विवंचना लागून राहिली. आज येतील उद्या येतील या आशेनें त्यांचे डोळे सारखे मार्गप्रतीक्षा करण्यांत गुंतले होते. पण आचार्यांचा कांहीं पत्ता लागेना. ते आतां घाबरले व मन चिंताग्रस्त झालें!

आतां काय करावें, कोठें जावें, कोणाला पुसावें, कोण त्यांचा ठावठिकाणा सांगेल, हा प्रश्न त्यांना आतां येऊन पडला. आचार्य कधीं शद्बाला चुकणार नाहींत, हा अनुभव यावेळीं फोल ठरला व त्यांचा धीर सुटत चालला. सर्व भूमंडळ धुंडाळून शोध केला तरी ते कोठें आहेत, हें समजावें कसें? त्यांना आतां मोठा पेंच येऊन पडला. ते आता येणार नाहींत, तर आपली धडगत नाहीं, हा विचार त्यांना बेचैन करूं लागला. याप्रमाणें ते भयग्रस्त व चिंताक्रांत होऊन त्यांचा

जीव खालीवर होऊं लागला. ते आपापसांत स्वतःच्या बुद्धीप्रमाणे नवीन नवीन विचार व युक्त्या योजूं लागले. पण कोणतीहि युक्ति सर्वमान्य व प्रभावी ठरेना. दिवसेदिवस त्यांचा जीव विव्हल व भयग्रस्त होऊं लागला.

याप्रमाणें तेथील शिष्यजन खेदांत व चिंतेंत मग्न झाले असतां, आचार्यांचा खरा महिमा ओळखणारा शिष्यवर्य पद्मपाद त्यांचा शोक घालविणेसाठीं त्यांना म्हणालाः— मित्र हो ! असे निराश होऊं नका ! आपण सर्वजण मिळून, धैर्य धरून, सबंध पृथ्वी धुंडाळून त्यांचा शोध करूं. तेथें न मिळतील तर गुहेंत, आणि अखेर पाताळांत—स्वर्गांत जाऊन सुद्धा तेथें तपास करूं. देव—मनुष्यांत गुप्त असलेल्या आत्म्याला शोधावें तसें आपण गुरुदेवांस शोधूं ! तर आतां हें दैन्य व औदासिन्य टाकून देऊन उद्योगास लागूं या, चला ! उठा ! येथें उगीच बसून नुसतें तर्कट लढविण्यांत वेळ घालवूं नका ! आतां ते कोठें गेले असतील, हा प्रश्न असला, तरी ते कांहीं सुखोपभोगासाठीं—चैन करण्यासाठीं— येथून गेले नाहींत. तर कामशास्त्राची माहिती करून घेणेसाठी —ज्ञान मिळ—विणेसाठी— गेले आहेत. ते जेथें गेले असतील, तेथील लोक खास सुखानंदात असणार ! तेथें रोगराई नसणार ! चोरादिकांची पीडा नस—णार ! सर्वत्र आबादी आबाद होऊन, लोक स्वधर्माचरणांत रत असणार !! असा देश जेथें आहे, तेथें आमचे गुरुदेव खास आहेत म्हणून समजावें. चला तर, येथें राहून व्यर्थ कालापव्यय करण्यांत अर्थ नाहीं.' हा पद्मपादाचा विचार तेथील सर्वांना पटला. व पसंत पडला. कांहीं जणांना शरीर रक्षणार्थ तेथें ठेऊन बाकीची शिष्यमंडळी आचार्यांच्या शोधार्थ निघाली.

फिरत फिरत अरण्य तर अरण्य, पर्वत तर पर्वत, गुहा तर गुहा, गांव तर गांव याप्रमाणे शोध करीत करीत अखेर स्वर्गाप्रमाणे शोभ—

णाऱ्या अमरुक राजाच्या राजधानींत येऊन ते दाखल झाले. तेथें आल्यावर तपास करतां त्यांना अशी बातमी लागली कीं, येथील राजा मृत होऊन पुनश्च सजीव झाला असून, तोच आतां राज्य करीत आहे. त्याच्या आमदानींत राज्यांत जिकडे तिकडे आबादी आबाद होऊन, लोक मोठ्या आनंदांत व खुषींत नांदत आहेत. यावरून त्यांनी ताडलें की आचार्य येथेंच असावेत. अधिक चौकशी करतां त्यांना असें समजलें कीं, राजा आतां सर्व कारभार मंत्र्यांवर सोंपवून राजभुवनांतच राहत असतो. अलीकडे म्हणजे पुनः सजीव झाल्यावर तो ऐषआरामांत व सुखविलासांतच कालक्रमणा करीत असतो. या बातमीनें त्यांचा ग्रह अधिकच बळकट झाला, आणि ते राजवाड्याकडे निघाले.

तेथें गेल्यावर त्यांना आढळून आलें कीं, बाहेर खडा पहारा असून परवानगीशिवाय परक्यांस आंत जाण्यास मनाई आहे. आता मोठी पंचाईत पडली. आंत प्रवेश मिळणार कसा? कोणाची ओळख ना देख. तशांत हे पडले संन्यासी! त्या विलासमंदिरांत यांची दाद लागायची कशी नि पुसणार तरी कोण? अशा बैरागी लोकांना राजा भेटेल तरी कसा? सदा सुखविलासांत रंगलेला! ऐषआरामात गढलेला! अर्थात् आता त्यांना मोठा पेंच येऊन पडला. पुनः तेथील लोकांजवळ बारकाईनें अधिक चौकशी करता त्यांस असें समजलें कीं, राजा हा गायनवादनाचा माठो शोकी असून कलावंतांचा मोठा चाहता व पुरस्कर्ता आहे. म्हणून गवयांना मात्र अंतःपुरांत प्रवेश मिळूं शकतो.

या बातमीनें शिष्यांना जरा धीर आला. त्यांना मार्ग दिसला व युक्तीहि सुचली. लगेच ते तेथून निघून गावांत गेले व मृदंग, तंबोरा, वीणा इत्यादि ललित वाद्यें त्यानी मिळविलीं. त्यांत कांहीं जणांनी गवयाचा वेष घेतला व कांहीजण बजवय्ये बनले. त्यांत पद्मपाद हा

मुख्य गवई झाला. इतर त्याचे साथीदार बनले. याप्रमाणें मैफलीची तयारी करून एक दिवस राजवाड्याजवळ येऊन गवई आल्याची वर्दी आंत राजास पोंचविण्याची त्यांनी तेथील द्वारपालाला विनंति केली. त्याप्रमाणे द्वारपालाने आंत जाऊन राजास कोणी गवई आले आहेत, आंत येऊं इच्छितात अशी वर्दी दिली व राजानें त्यांस आंत घेऊन येण्यास सांगितलें.

राजाज्ञेप्रमाणे द्वारपालाने त्यांस आंत रंगमहालांत नेऊन सोडलें. त्या गवयानीं आंत गेल्यावर तेथील दृश्य पाहतात, तो त्यांचे डोळे दिपून गेले! केवढा लखलखाट आणि चकचकाट! काय ऐश्वर्य नि काय सौंदर्य! दृष्टि फेकावी तिकडे राजवैभवाचें दिव्य प्रदर्शन! सोनें, रुपें, हिरे, माणिक, मोतीं यांनी तो रंगमहाल नखशिखांत मढवून काढलेला! जमिनीवर सुंदर गालिचे पसरलेले, वर रुपेरी छताभोंवती मोत्याच्या झालरी लावलेल्या, भिंतीवर सुंदर चित्रें रंगविलेलीं, खिडक्या-दरवाजे यावर भर्जरी पडदे सोडलेले, जागजागीं तक्के लोड, गाद्या वगैरे सुखासने मांडलेलीं, सुवर्ण-कलशांत मधुर पेयें भरून ठेविलेलीं, जिकडे तिकडे सुवासिक फुलांचा व अत्तराचा घमघमाटच घमघमाट! किती वर्णावें त्या रंगमहालाचें सौंदर्य नि ऐश्वर्य!!

अशा रंगमहालांत राजा मधोमध एका सुंदर व उच्च अशा सुखासनावर बसला असून, त्याच्या मागें उभ्या राहून दोन सुंदर युवती पंख्यानें त्यास वारा घालीत होत्या. राजाचा पोषाख भर्जरी असून, गळ्यांत व मनगटांत रत्नालंकार चमकत होते. आजूबाजूस रंभा-उर्वशीप्रमाणे शोभणाऱ्या लावण्यसंपन्न राजस्त्रिया बसल्या होत्या. हा सर्व प्रकार पाहून त्या गवयांचीं मनें क्षणभर भांबावून गेलीं असल्यास त्यांत नवल तें काय! त्यांना वाटलें कीं, राजा आतां पूर्वस्मृतिवर कसचा येतो! त्या राज-

वैभवांत व सुखविलासांतच तो पूर्ण रंगून बसलेला! मग त्याला तेथून निघण्याची बुद्धि कशी होईल! या विचारानें त्यांचें मन जरा साशंकच झालें. पण त्यांनी धीर मात्र सोडला नाहीं. इतक्यांत राजानें त्यांस नेत्रानें खूण करून खाली बसावयास सुचविलें.

त्याप्रमाणें ते खाली बसल्यावर राजानें त्यांची ओझरती विचारपूस करून कार्यास प्रारंभ करण्यास सांगितलें. मग आतां उशीर कसला! लगेच तंबोऱ्याची तार छेडली गेली व मृदंगावर हळुवार हात खेळूं लागला. पद्मपादानें हलका गळा काढून तंबोऱ्याच्या सुराला आपला सूर मिळविला व गायनास प्रारंभ झाला.

पद्मपादास संगीतकला चांगली अवगत होती. म्हणून तो मुख्य गवई झाला. कांहीं शिष्य त्याचे साथीदार झाले. गायनाचा विषय आचार्यांना शुद्धीवर आणणें. ते पूर्वस्मृति विसरले होते. ती करून देणें अवश्य होतें. त्यासाठीं हा गायनाचा बहाणा करण्यांत आला होता. पद्मपाद गाऊं लागला. त्याचें सुस्वर गाणे व मधुरालाप इकडेच इतरे–जनांचें सगळें लक्ष होतें. पदाच्या अर्थाकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं व तो त्यांना समजण्यासारखाहि नव्हता. फक्त राजालाच त्याचें मर्म सम–जण्यासारखें होतें. तेथील गायनाचा तात्पर्यार्थ पुढील प्रमाणें होता.

हे श्रुतिशास्त्र कमलातील ज्ञानमकरंदलुब्ध भ्रमरा! तुझ्या सह–वासाला आम्ही–तुझे शिष्य–अंतरलो असून, पर्वतशिखरावरील गुहेंत तूं सोडून आलेल्या शरीराचें आम्ही आतापर्यंत रक्षण करीत आलो आहो. तुझ्या विरहानें आम्ही फार दुःखी कष्टी झालो असून, तुझ्या दर्शनार्थ आम्ही फार उत्सुक झालो आहो. कामशास्त्राचें ज्ञान करून घेणेसाठीं म्हणून तूं पूर्वशरीर टाकून येथें राजशरीरांत शिरून राहिला आहेस.

विषयदोष दर्शनरूपी चाबकाने फटकारून व वृत्तिलक्षणरूपी लगामानें ओढून धरून ज्ञानीलोक परमात्मतत्त्वाला आणून बांधतात; तेंच परमतत्त्व तूं आहेस ! हे स्वामीन् जाग्रत्स्वप्नसुषुप्ति या उपाधीपासून विलक्षण असें जें परमतत्त्व आहे, तेंच देवा ! तूं आहेस ! हे कृपासागरा ! या शरीरांत जो 'मी' आहे तोच रविमंडलांतहि आहे ! आणि जो रविमंडलांत आहे तोच या शरीरात 'मी' रूपाने आहे ! अशा रीतीने वेदवादी ज्या तत्त्वाचें शिक्षण देतात, तें परमतत्त्वच तूं आहेस ! हे शिष्यवत्सला ! वेदवचन, यज्ञ, दान, तप, उपवास इत्यादिकांच्या योगानें ज्ञानी लोक ज्या परमतत्त्वाला जाणूं इच्छितात, तेंच परमतत्त्व, हे मुनिवर्या ! तूंच आहेस ! ! हे दयानिधे ! किती आळवूं तुला ? अजून तुला स्मृति कशी येत नाहीं ! करुणासागरा ! तुला आमची दया कशी येत नाही ! तू आमच्यावर असा रुष्ट होऊं नकोस ! जागा हो ! जागा हो ! शम,–दम,–शांति,–समाधि,–श्रद्धा लक्षणरूपी साधनांनी आपल्या बुद्धींत शोधून, ज्याचा साक्षात्कार करून घेऊन कृतकृत्य होत्साते पंडितलोक पुनः येथें संसारात येत नाहींत, तें परमतत्त्व, हे आचार्यदेवा ! तूंच आहेस !

याप्रमाणें पद्मपाद गाण्यांतून आचार्यांचा पूर्व वृत्तांत व अद्वैत तत्त्वज्ञान यांचें वर्णन करीत असतां, राजास हळुहळुं पूर्व स्मृति येऊं लागली व तो ताळ्यावर येत चालला. पद्मपादाने वरील शेवटचें पद ह्मणून राजास जागृत केल्यावर त्यास बसल्या बसल्याच समाधि लागली,तो पुनः वर उठला नाहींच ! हा विलक्षण प्रकार पाहून रंगमहालांत एकच गोंधळ माजला. राजस्त्रिया आक्रोश करूं लागल्या व दासदासी इकडे तिकडे, खाली वर, धांवपळ व आरडा ओरड करीत सुटल्या. या गोंधळात ते गवयी आपलें चंबूगवाळें आवरून तेथून पसार झाले. आचार्य तेथून जे निघाले, ते तडक गुहेजवळ येऊन पोंचले.

पण इतक्यांत तेथें एक चमत्कार चालला होता. राजमंत्र्यांनी मागे सांगितल्याप्रमाणें तोतया राजाचें शरीर शोधून काढून ते जाळून टाकण्यास आज्ञापिलेले राजदूत रानावनांत शिरून शोध करीत असतां त्यांना एका घनदाट अरण्यांत असलेल्या एका पर्वत गुहेत त्याचा पत्ता लागला. तेथे जाऊन ते गुहेंत शिरून पाहतात तों त्यांना तें निर्जीव शरीर सांपडलें. क्षणाचाहि विलंब न करतां लागलीच त्यांनी तेथें एक चिता रचिली व तें शरीर बाहेर आणून चितेवर ठेवण्यास ह्मणून आंत गेले.

तेथें आचार्यांचें कांहीं शिष्य त्या शरीराची राखण करीत बसले होते. त्यांनी त्या दूतांस हरकत केली. पण त्या दूतांपुढें त्यांचें कांही चाललें नाहीं. शिष्यांना मारून तेथून पिटाळून लावून, ते निश्चेष्ट शरीर प्रेत ह्मणून समजून तेथून उचलून चितेंवर आणून ठेविलें, आणि त्यास आतां अग्नि लावणार इतक्यांत त्या निर्जीव शरीरांत प्राण खेळू लागला व पुढें हळुहळु हातपायहि हलू लागले ! ! पुढें क्षणार्धातच आचार्य स्वशरीरांत शिरून चटदिशी उठून बसले व तेथील राजदूतांची गडबड व दांडगाई पाहून त्यांनी त्यावेळीं नारसिंहाची प्रार्थना केली.

त्याक्षणीच तेथें सभोवती भयंकर नाद उठला व एक दिव्य पुरुष प्रगट होऊन, त्या सर्व दूतांचा त्याने हां हां ह्मणता फडशा पाडून टाकला. ते राजदूत मरून पडले व आचार्य चितेवरून उठून खाली उतरले ! हा चमत्कार दूरून पाहून लपलेले शिष्य तेथें धावून आले व आचार्यांचे पाय धरून त्यांस त्यांनीं नमस्कार केला. इतक्यांत पद्मपाद वगैरे शोधार्थ गेलेली शिष्य मंडळीहि तेथें येऊन थडकली व सर्वत्र आनंदी आनंद झाला नंतर आचार्यांनी तेथून तळ हलवून महिष्मतीची वाट धरली.

---

# प्रकरण २७ वें

## सरस्वती-सत्यलोक गमन

व्रज जननि तदा त्वं भक्तचूडामणिस्ते,
निजपदमनुदासाम्यभ्यनुज्ञां यदैतु ।
इति निजवचनेऽस्मिंश्छारदा सम्मतेऽसौ,
मुनिरथ मुदितो भून्माणुनं हृब्दुभुत्सु :॥

[शं. दि: ८-१६]

सरस्वतीला वचन दिल्याप्रमाणें सहा महिन्याची मुदत संपल्यावर कर्तव्यपूर्ति करण्यासाठीं आचार्य पुन्हः महिष्मतीस आले. तेथें आल्यावर मंडनमिश्राच्या वाड्यात जाऊन सरस्वतीची त्यानीं भेट घेतली. सरस्वतीने अचार्यांना पाहून त्यांचा योग्य आतिथ्यसत्कार केला. नंतर आचार्य म्हणाले:- सरस्वती !

सरस्वती ( हसून )]- कां आचार्य देव ? काय आज्ञा आहे ?

आचार्य :- आज्ञा कसली ? तुझ्या प्रश्नांचें उत्तर द्यावयास आलो आहे.

सरस्वती :- आचार्य देवांनीं आतां तसदी घेऊ नये. मला क्षमा करावी.

आचार्य :- का, सरस्वती ! असं कां म्हणतेस ?

सरस्वती :- ( हात जोडून ) :- मला आपल्याकडून आतां उत्तर ऐकण्याची इच्छा नाहीं !

आचार्य :- असं म्हणूं नकोस सरस्वती ! तुझें समाधान करणें माझें कतर्व्य आहे. तुझ्या प्रश्नाला मी उत्तर दिले नाहीं, तर मी अल्पज्ञ ठरेन. मी सर्वज्ञ ठरणार नाहीं.

पण इतक्यांत तेथें एक चमत्कार चालला होता. राजमंत्र्यांनी मागे सांगितल्याप्रमाणें तोतया राजाचें शरीर शोधून काढून ते जाळून टाकण्यास आज्ञापिलेले राजदूत रानावनांत शिरून शोध करीत असतां त्यांना एका घनदाट अरण्यांत असलेल्या एका पर्वत गुहेत त्याचा पत्ता लागला. तेथे जाऊन ते गुहेंत शिरून पाहतात तों त्यांना तें निर्जीव शरीर सांपडलें. क्षणाचाहि विलंब न करतां लागलीच त्यांनी तेथें एक चिता रचिली व तें शरीर बाहेर आणून चितेवर ठेवण्यास ह्मणून आंत गेले.

तेथें आचार्यांचें कांहीं शिष्य त्या शरीराची राखण करीत बसले होते. त्यांनी त्या दूतांस हरकत केली. पण त्या दूतांपुढें त्यांचें कांही चाललें नाहीं. शिष्यांना मारून तेथून पिटाळून लावून, ते निश्चेष्ट शरीर प्रेत ह्मणून समजून तेथून उचलून चितेंवर आणून ठेविलें, आणि त्यास आतां अग्नि लावणार इतक्यांत त्या निर्जीव शरीरांत प्राण खेळू लागला व पुढें हळुहळु हातपायहि हलू लागले ! ! पुढें क्षणार्धांतच आचार्य स्वशरीरांत शिरून चटदिशी उठून बसले व तेथील राजदूतांची गडबड व दांडगाई पाहून त्यांनी त्यावेळी नारसिंहाची प्रार्थना केली.

त्याक्षणीच तेथें सभोवती भयंकर नाद उठला व एक दिव्य पुरुष प्रगट होऊन, त्या सर्व दूतांचा त्याने हां हां ह्मणता फडशा पाडून टाकला. ते राजदूत मरून पडले व आचार्य चितेवरून उठून खाली उतरले ! हा चमत्कार दूरून पाहून लपलेले शिष्य तेथें धावून आले व आचार्यांचे पाय धरून त्यांस त्यांनीं नमस्कार केला. इतक्यांत पद्मपाद वगैरे शोधार्थ गेलेली शिष्य मंडळीहि तेथें येऊन थडकली व सर्वत्र आनंदी आनंद झाला नंतर आचार्यांनी तेथून तळ हलवून महिष्मतीची वाट धरली.

---

# प्रकरण २७ वें

## सरस्वती-सत्यलोक गमन

व्रज जननि तदा त्वं भक्तचूडामणिस्ते,
निजपदमनुदासाम्यभ्यनुज्ञां यदैतु ।
इति निजवचनेस्मिंश्छारदा सम्मतेऽसौ,
मुनिरथ मुदितो भून्माणुनं हृब्दुभुत्सु :॥

[ शं. दिः ८-१६ ]

सरस्वतीला वचन दिल्याप्रमाणें सहा महिन्याची मुदत संपल्यावर कर्तव्यपूर्ति करण्यासाठीं आचार्य पुन्हः महिष्मतीस आले. तेथें आल्यावर मंडनमिश्राच्या वाड्यात जाऊन सरस्वतीची त्यानीं भेट घेतली. सरस्वतीनें अचार्यांना. पाहून त्यांचा योग्य आतिथ्यसत्कार केला. नंतर आचार्य म्हणाले:- सरस्वती !

सरस्वती ( हसून )]- कां आचार्य देव ? काय आज्ञा आहे ?

आचार्य :- आज्ञा कसली ? तुझ्या प्रश्नांचें उत्तर द्यावयास आलो आहे.

सरस्वती :- आचार्य देवांनीं आतां तसदी घेऊ नये. मला क्षमा करावी.

आचार्य :- का, सरस्वती ! असं कां म्हणतेस ?

सरस्वती :- ( हात जोडून ) :- मला आपल्याकडून आतां उत्तर ऐकण्याची इच्छा नाहीं !

आचार्य :- असं म्हणूं नकोस सरस्वती ! तुझें समाधान करणें माझें कतर्व्य आहे. तुझ्या प्रश्नाला मी उत्तर दिले नाहीं, तर मी अल्पज्ञ ठरेन. मी सर्वज्ञ ठरणार नाहीं.

सरस्वती :- आपलेकडून उत्तर ऐकण्याची माझी आतां इच्छा नाहीं. माझें पूर्ण समाधान झालें आहे ! मी वादांत पूर्ण हरले ! आपण वादात आम्हा दोघांस पूर्णपणें जिंकून घेतले आहे ! आपण सर्वज्ञ आहा अशी माझी पूर्ण खात्री झाली ! तेव्हां आपण माझ्या पतीस संन्यास दीक्षा देऊन त्यास आपला शिष्य करावा व बरोबर घेऊन जावें ! आचार्य देव ! माझे येथील अवतार कार्य संपलें. मी आतां निजधामास जाते. ऋषींचें भविष्य सत्य ठरलें व पूर्ण झालें.

सरस्वती :- ऐका तर. सांगतें माझी कथा. लहानपणाची गोष्ट. मी अगदी लहान होते. एक दिवस मी आईजवळ बसले होते. आई कांहीं तरी कामांत होती. इतक्यांत एक तपस्वी घरीं आला. तो तपस्वी म्हणजे काय ? विचित्रच प्राणी ! त्याच्या डोक्यावर जटा होत्या. अंगाला सर्व भस्म फासलें होतें. शरीर भरदार होतें. मुखावर कांति झळकत होती.

आचार्य :– कोण होता तो ?

सरस्वती :– कोणी तरी ऋषि असावा. दारासमोर उभा असलेल्या त्या ऋषीला पाहतांच आई उठून उभी राहिली व त्याना नमस्कार करून आंत येण्यास तिने सांगितले. ऋषी आंत आला. त्यास बसावयास आसन दिल्यावर तो त्यावर बसला. नंतर आईने अर्घ्यपाद्य देऊन त्याचा योग्य सत्कार केला. व फळाहारहि अर्पण केला. ऋषी फार संतुष्ट झाला. त्यानें आईला ‘ काय तुझी इच्छा आहे ’ सांग, असे विचारले.

आचार्य :– मग आई काय म्हणाली ?

सरस्वती :– ती मला पुढे करून म्हणाली ही माझी मुलगी आहे. फार लाडकी आहे. मोठी बोलकी आहे. गोड गोड बोलते. हिला नवरा कसा मिळेल, हें आपण सांगण्याची कृपा करावी. ईश कृपेनं मला सर्व

कांहीं अनुकूल आहे. फक्त हिचीच तेवढी काळजी ! हिचा संसार सुखाचा होईल का ?

आचार्य:- मग त्यानं भविष्य काय सांगितलं ?

सरस्वती:- माझा हात पाहून क्षणभर डोळे मिटून मग तो म्हणाला ' देवी ! ही तुझी मुलगी मोठी नशीबवान आहे. चेहऱ्यावरून ती मोठी भाग्यशाली दिसते ! तिच्या तोंडावर विद्येचें तेज चमकतें ! ती मोठी विदुषी होणार ! रूपानें रतिसारखी सुंदर आहे ! तिला नवराहि पण तसाच मिळेल ! तो मोठा विद्वान, कर्मनिष्ठ, शास्त्रकुशल, वादनिपुण असा मोठा लौकिकवान असेल ! तसाच तो मोठा ऐश्वर्यवान असेल ! फार काय सांगू, प्रत्यक्ष ब्रह्माचाच अवतार तो ! त्याचें नांव मंडन ! त्याच्याशीं या मुलीचा विवाह होईल. आणि दोघांचाहि संसार मोठ्या सुखांत व आनंदात जाईल ! तिला पुत्रसंततीहि होईल. सर्व गोष्टी तिच्या मनाप्रमाणें घडून येतील. तुझ्या या लाडक्या मुलीचें हें असें भविष्य आहे. हो आणखी गोष्ट सांगावयास विसरलों. '

आचार्य:- ती काय ?

सरस्वती:- ऋषी किंचित् डोळे मिचकावून म्हणाले, ' तो मंडन मोठा नामांकित पंडित होईल. जगभर त्याचा लौकिक पसरेल ! मात्र एक गोष्ट जरा वाईट घडेल. पुढें त्याचा व एका आचार्यांचा कर्मश्रेष्ठ कां ज्ञान श्रेष्ठ या मुद्यावर मोठा निकराचा वाद होईल व त्यांत मंडनाचा पराभव होऊन, त्याला संन्यास दीक्षा देण्यांत येईल व येथें तुझ्या मुलीचा गृहस्थाश्रम संपेल. मग तिचे जीवित कार्य उरणार नाहीं. तिची इहलोक यात्रा संपेल. हें असे तुझ्या मुलीचें भविष्य आहे ! आचार्य देव। त्या ऋषीची भविष्यवाणी आतांपर्यंत खरी ठरली आहे. माझें येथील कार्य आतां

संपलें आहे. मी निजधामास जाणार ! आपण मंडनास खुशाल संन्यास दीक्षा देऊन, त्यांस बरोबर घेऊन जा !' असें म्हणून ती थांबली.

ही सरस्वतीची हकीकत ऐकून आचार्यांनीं क्षणभर डोळे मिटून सूक्ष्म दृष्टीनें तिच्या पूर्वजन्माचा विचार केला. पुढें त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक ! ते ह्मणाले-'सरस्वती' !

सरस्वतीः- ( हात जोडून ) काय, आचार्य देव ?

आचार्यः- जरा थांब. इतक्यांत निजधामास जाण्याची घाई करूं नकोस !

सरस्वतीः- माझें येथील अवतार कार्य संपलें. मला अडवूं नये ! मला आतां आज्ञा द्यावी ! मी शापमुक्त झालें.

आचार्यः- आं ! शापमुक्त ! हीं काय भानगड आणखी ? कळूं दे मला !

सरस्वतीः- मी मागच्या जन्मी सत्य लोकांत होतें. माझे नांव शारदा सरस्वतीहि मला ह्मणत. माझे पति ब्रह्मदेव ! त्यांची मी भार्या ! दुर्वास ऋषि तेथें वेदाध्ययनास आले होते. एकदा असें झालें कीं, ते वेद पठण करीत असतांना वर्णोच्चार चुकला त्यांचा. तें पाहून मी जरा हंसले. केवढा संताप आला त्यांना ! दुर्वास ऋषीच ते ! मोठे शीघ्रकोपी; मूर्तिमंत रुद्रावतारच ! त्या रागाच्या झटक्यांत त्यांनीं मला शाप दिला !

आचार्यः- नांवाला जागले ते !

सरस्वतीः- आचार्य देव ! काय सांगू माझी स्थिति ! मी घाबरले! फार घाबरले !

आचार्यः- काय दिला शाप त्यांनी ?

सरस्वतीः- ते म्हणाले, तूं फार उन्मत्त झाली आहेस ! तूं येथून भ्रष्ट होऊन, मृत्यु लोकांत जन्म घेशील ! तें ऐकून माझा जीव कासावीस झाला ! ऋषींचा शाप तो ! कधी अन्यथा होणार नाहीं ! मी हात जोडून त्यांना नमस्कार केला. आणि ह्मणाले, ऋषिवर्य ! मी चुकले ! क्षमा करा ! तुम्ही त्रिकालज्ञ आहा ! क्रोध आवरा ! शांत व्हा ! दया करा ! मला ती शिक्षा देऊं नका ! मला कृपाळु होऊन उःशाप द्या !

आचार्यः– मग ऋषी काय म्हणाले ?

सरस्वतीः– त्यांचा कोप झरकन् उतरला. ते शांत झाले. मला ह्मणाले, शारदे ! मी रागाच्या भरांत कांहीं तरी बोलून गेलो. रागाच्या तावडीत गेलें ह्मणजे विचार रहात नाहीं.जें बोललो ते होणार. तें चुकणार नाहीं. पण तुला उःशाप देतो कीं, शंकराचा अवतार पृथ्वीवर होणार आहे. त्याचें दर्शन झाले ह्मणजे तूं शापमुक्त होशील आणि पुनः सत्य लोकाप्रत येशील ! आचार्य देव ! आपणच ते शंकराचे अवतार ! माझी खात्री पटली ! आतां माझें कार्य संपलें. मी आतां परत सत्यलोकाप्रत चालले ! मला अनुज्ञा द्या !

शंकराचार्यांनी अंतर्दृष्टीनें तें जाणलें होतें. ती खरोखर शारदेचा अवतार आहे, ही खूण त्यांना पटली. लगेच त्यांनी हात जोडून तिची प्राथना केली कीं, देवी ! तूं बम्हदेवाची भार्या सरस्वती आहेस, याची मला मनोमन साक्ष पटली. तुला मी ओळखतो. जगन्माउली ! तूं जातेस तर जा! पण कृपा कर ! या भक्तावर अनुगृह करून मग जा !

सरस्वती – काय आचार्यांचें म्हणणे आहे ?

आचार्य – माझी विनंती एवढीच कीं तूं भक्तचूडामणि आहेस ! जगन्माउली आहेस ! विद्याधिदेवता आहेस ! तुला माझी प्रार्थना अशी कीं, तूं येथून गेलीस तरी तुझें विस्मरण मला कधींच होऊं नये. यासाठीं,

हे शारदांबे ! तूं माझ्या सान्निध वास करावास. तुझें दर्शन मला व तुझ्या भक्तांना नित्य व सतत घडत जावें. यास्तव तूं शृंगेरी येथें माझ्या मठांत वास्तव्य करून आम्हां भक्तजनांची सेवा घ्यावी व आमचा उद्धार करावा. मी शृंगेरी येथें मठ स्थापन केला आहे. तेथें तुझें आवाहन करतो. तुझ्यासाठीं मंदीर स्थापून तेथें तुझी प्रतिष्ठा करतो. तर, हे जननी ! हे शारदे ! तूं आतां जा ! मी बोलावीन तेव्हां येऊन तुझ्या दर्शनाचा नित्य लाभ घडेल, असा आशीर्वाद या तुझ्या भक्ताला देऊन तूं स्वस्थानी प्रयाण कर ! तुला माझा नमस्कार असो.

सरस्वती– तथास्तु.

असें म्हणून ती आचार्यांबरोबर शृंगेरीस गेली. तेथें जाऊन तिने तुंगा नदींत जलसमाधि घेतल्यावर तिचा आत्मा सत्यलोकीं गेला, व तिचा पार्थिव देह तेथेंच शिलारूप बनून राहिला. तिच्या इच्छेप्रमाणें तुंगभद्रेच्या डाव्या तिरावर आचार्यांनीं तेथें शिलेवर चक्र कोरून त्यावर चंदनाची शारदांबेची मंगलमूर्ति स्थापन करणेंत आली. पुढें विद्यारण्यांनीं शारदांबेचें सुंदर देऊळ बांधून तेथें तिची सोन्याची नयनमनोहर मूर्ति बसविली; ही सरस्वतीच पुढें शृंगेरी शारदामठाचें शारदांबा या नांवानें उपास्य दैवत झाली. असो.

वादांत पराभव झाल्यावर मंडनमिश्राचा सगळा संसार – पसारा संपुष्टांत आला. संन्यास दीक्षा घेण्याच्या आधी त्याने विश्वजित नांवाचा मोठा यज्ञ करून, त्यांत ब्राम्हणांना उदार हस्ताने मोठी दक्षिणा दिली. उरलेली संपत्ती आपल्या वारसांत व भाऊबंदात वाटून देऊन तो निर्धन बनला. नंतर आचार्यांनीं त्याला संन्यासदीक्षा देऊन आश्रमांतरांत ‘सुरेश्वराचार्य’ हें नांव ठेऊन त्यास आपल्याजवळ ठेवून घेतलें व पुढें शृंगेरी येथें शारदा मठांत त्यांची पीठाधिपति म्हणून नेमणूक केली.

—



श्री शारदांबा ( शृंगेरी ) पान नंबर २०१

## प्रकरण २८ वे.

# तीर्थयात्रा

**अथैकदाऽसौ यतिसार्वभौम-**
**स्तीर्थानि सर्वाणि चरन्सतीर्थ्यः ।**
**घोरात्कलेर्गोपितधर्ममार्गा-**
**द्गोकर्णमभ्यर्णचलार्णवौघम् ॥**

( शं. दि. १२-१ )

मंडनमिश्रावर विजय मिळविल्यावर त्यास प्रतिज्ञेप्रमाणें संन्यास दीक्षा देऊन, सुरेश्वराचार्य असें त्याचें आश्रमांतरातील नामकरण करून दक्षिणेची यात्रा करण्याकरतां महिष्मतीहून आचार्य खाली उतरले. व पुढें येता येता गोकर्ण क्षेत्र गाठलें.

गोकर्ण - हें क्षेत्र पश्चिम किनाऱ्यावर समुद्रकाठीं असून, तें शंकराचें परमपवित्र व जागृत स्थान गणलें जातें. तेथील शंकराचें नांव महाबळेश्वर असें असून तें बाराज्योतिर्लिंगापैकी एक आहे. हें स्थान फार प्राचीन कालापासून - रामायणापासून - प्रसिद्ध तीर्थात गणलें जात असून रावणानें कुबेराचें वैभव प्राप्त करून घेणेंसाठी तपश्चर्या केली ती इथेंच केली. अर्जुन हा तीर्थयात्रेस निघाल्या वेळीं तो इथें आला होता असें भारतांत उल्लेखिले आहे. याठिकाणी दरवर्षी महाशिवरात्रीला फार मोठी यात्रा भरते. या क्षेत्रांत तीन दिवस राहून आचार्यांनी तेथून तळ हलविला.

मूकांबिका - नंतर तेथून निघून मूकांबिका क्षेत्राची वाट धरली. वाटेंत त्यांना एक मोठें हृदयद्रावक दृश्य आढळलें. म्हाताऱ्या

नवराबायकोचा एकुलता एक मुलगा मरण पावला असून, त्या मुलाला मांडीवर घेऊन त्याचे आईबाप मोठ्याने आक्रोश करीत बसले होते. जातांना तें दृश्य आचार्यांना दिसलें. त्या वृद्धमातापितरांचे दुःख शोक पाहून आचार्यांचें कोमल अंतःकरण कळवळलें. त्यांना त्यांचे दुःख पाहवेना. त्यांना त्यांची दया आली व कमंडलूतील पाणी शिंपडून योगबलानें त्या मृतवत् झालेल्या मुलास शुद्धीवर आणलें. गार पाणी शिंपडतांच तो मुलगा झोपेंतून उठल्याप्रमाणें डोळे उघडून चटकन् उठून बसला. केवढा त्या मातापितरांचा आनंद ! त्यांनी उठून आचार्यांस नमस्कार केला व मुलाला त्यांच्या पायावर घातलें. नंतर त्यांचें समाधान करून तेथून निघून मूकांबिकेच्या मंदिरांत येऊन, देवीचें दर्शन घेऊन, तेथें कांही काल राहून नंतर त्यानीं श्रीबलिपुरची वाट धरली.

बलिपूर – मूकांबिकाहुन निघून आचार्य बलिपूर येथें आले. तो गांव अग्रहारांत मोडत असून, तेथें बहुतेक ब्राह्मणांचीच वसति असते. अशा गावांला दक्षिणेंत अग्रहार असें म्हणतात. त्या ठिकाणी विद्वान व कर्मठ ब्राह्मणांची वसति मोठी असून, कमींत कमी म्हणजे तेथें दोन हजार अग्निहोत्री ब्राह्मणांची घरें होतीं. त्यांत प्रभाकर नांवाचा एक सुसंपन्न व संपत्तिमान असा एक ब्राम्हण असून, त्याचा मुलगा मोठा जडबुद्धि होता. तो कांही एक ऐकत नसें व कांही एक बोलत नसें. आपल्या आपल्यांतच कांही तरी विचार करीत कोठें तरी कानाकोपऱ्यांत जाऊन गेंड्याप्रमाणें एकटाच बसायचा. त्याचें उपनयनहि झालें होतें. पण त्याची मूकनायकाची वृत्ति असल्यामुळें तो कोणाशी बोलत नसें, चालत नसें. वेडा म्हणावा तर शहाण्याप्रमाणें

वर्तन असे. आणि शाहाणा म्हणावा तर वेडयासारखें चाळे करी ! असा कांही चमत्कारिक होता तो मुलगा.

आपल्या गांवी शंकराचार्य आले आहेत, ही बातमी प्रभाकरास लागली, तेव्हां तो आपल्या वेडसर मुखस्तंभ मुलाला बरोबर घेऊन आचार्यांच्या दर्शनास आला. आचार्यांची भेट झाल्यावर त्यांच्याशी कांही प्रास्ताविक बोलणें करून, आपल्या मुलाला पुढें करून म्हणाला गुरुदेव ! हा माझा मुलगा पहा ! तो तेरा वर्षांचा झाला आहे. मी त्याचें उपनयनसुद्धां केलें आहे. गायत्री मंत्राचा उपदेशहि दिला. पण काय ? अगदी मौन ! कांहीसुद्धां बोलत नाही ! खाण्यापिण्यामध्यें ताळ नाही, मेळ नाही. कांही शिकत नाहीं, सवरत नाहीं. मनास येईल तसें करतो व मनास येईल तसें वागतो. हा माझा एकुलता एकच मुलगा आहे. घरांत संपत्तिहि तशीच भरली आहे. पण काय करूं ? मुलाकडे पाहून मला फार दुःख होतें. आचार्यदेवांनी कृपा करून यास वळणावर आणण्याचा उपाय सुचविल्यास माझेवर फार उपकार होतील. तेवढी कृपा करावी आचार्य देवांनी ! !

प्रभाकर पंडिताचें हें भाषण ऐकून, त्या मुलास समोर बसवून घेऊन, त्याच्या डोक्यावर कमंडलूतील तीर्थोदक शिंपडून, आचार्य त्यास म्हणाले :--

**' कस्त्वं शिशो कस्य कुतोऽसि गन्ता**
**किं नाम ते त्वं कुत आगतोसि ।**
**एतद् वद त्वं मम सुप्रसिद्धं**
**मत्प्रीतये प्रीतिविवर्धनोऽसि ॥**

[ शं. दि. १३-२८ ]

भावार्थ :— मुला ! तूं कोण आहेस ? कुणाचा आहेस ? कुठें चाललास ? तुझें नांव काय ? कुठून आलास ? तुला पाहून माझें प्रेम वृद्धिंगत होत आहे. तर बाळा ! या प्रश्नाचे उत्तर दे पाहूं !

केवढा चमत्कार ! आचार्यांनी त्याच्यावर सूक्ष्मदृष्टि रोखून प्रश्न करतांच त्या मुलाला एकदम वाचा फुटली ! आणि आचार्यांच्या प्रश्नाला त्याने पुढील उत्तर दिलें.

**नाहं जडः किंतु जडः प्रवर्तते**
**मत्सान्निधानेन न संदिहे गुरो ॥'**

महाराज ! मी जड नाहीं, तर जें जड आहे, तें माझ्यापासूनच उदभवतें. यांत, गुरूदेव ! बिलकुल संदेह नाही.

हें ऐकून तेथें बसलेल्या लोकांना आश्चर्याचा एक मोठा धक्काच बसला ! जो मुलगा जन्मदारभ्य अवाक्षरही बोलत नव्हता, तोच आज बृहस्पतीसारखा बोलूं लागला आहे ! आणि तें तरी काय ? सामान्य बोलणें नव्हे, तर जाडया तत्वज्ञान्याप्रमाणें ! ! मग आश्चर्य वाटणार नाही तर काय होईल ? आचार्यांनाहि तें उत्तर ऐकून मोठें कौतुक वाटलें ! आणि त्याची पूर्ण परिक्षा पहावी, म्हणून ते पुनः त्याला म्हणाले :— मुला ! तूं जड नाहीस तर कोण आहेस ?

मुलगा :— मी ? मी कोण हें आपण विचारता ? तर हें घ्या माझें उत्तर :—

**नाहं मनुष्यो न च देवयक्षौ**
**न ब्राह्मणक्षात्रियवैश्यशूद्रः**
**न ब्रह्मचारी न गृही वनस्थो**
**भिक्षुर्नचाहं निजबोधरूपः**

( हस्तामलक स्तोत्र )

भावार्थ :– आचार्यांनी ! मी मनुष्य नाहीं, यक्ष नाहीं, ब्राह्मण नाहीं, क्षत्रिय नाही, वैश्य नाहीं, शूद्र नाहीं. त्याचप्रमाणें ब्रह्मचारी नाही, गृहस्थ नाही, वानप्रस्थ नाही, भिक्षु नाहीं, तर गुरूदेव ! मी आत्मस्वरूप आहे !!

महदाश्चर्य ! महदाश्चर्य ! काय हें या वेडया मुलाचें शहाण्या पंडितासारखें भाषण किती गोड ! किती सत्य ! किती अर्थपूर्ण ! तें भाषण ऐकून तेथील सर्व लोकांनी तोंडांत बोट घातलें ! आचार्य देवसुद्धां तें ऐकून आनंदाश्चर्यानें क्षणभर स्तिमित झाले !! त्यांनी त्या मुलाला ओळखलें. त्याचा चेहरा पाहिला. नीट न्याहाळून पाहिला. डोळ्यांतील चमकदार तेज पाहिलें. मुखावरील कांति पाहिली व क्षणभर डोळे मिटून अंतर्दृष्टीनें विचार करून अखेर ते प्रभाकर पंडितास म्हणाले– पंडितजी ! हा मुलगा तुमच्या कांहीं कामाचा नाहीं ! तुम्हांला त्याचा उपयोग होणार नाहीं ! त्याचा नाद सोडा ! तो आम्हाला द्या ! आम्ही त्यास बरोबर घेऊन जातो. आम्ही त्याचा सांभाळ करूं. त्याचा आम्हाला उपयोग आहे !

प्रभाकरानें आढेवेढे न घेतां मुकाट्यानें आचार्यांच्या म्हणण्याला रुकार दिला. व त्यानें मुलास आचार्यांच्या स्वाधीन करून जड अंतःकरणानें तेथून निघून गेला. आचार्यांनी त्यास जवळ ठेऊन घेतलें व त्यास संन्यास दीक्षा देऊन, त्याचें नांव 'हस्तामलक' असें ठेविलें. त्या मुलानें आत्म-स्वरूपाचें वर्णन हातांतील आवळ्याप्रमाणें स्पष्ट केलें म्हणून त्यास ते नांव ठेवण्यांत आलें. पुढें हा हस्तमलक आचार्यांबरोबर दिग्विजय यात्रेंत राहत होता.

**शृंगेरी** नंतर आचार्यांनी श्रीबलि येथील मुक्काम हलवून सर्व शिष्यगणांसह **शृंगेरीचा** रस्ता धरला व मजल दर मजल करीत अखेर शृंगेरीस येऊन पोंचले. शृंगेरी हें स्थान म्हणजे दाक्षिणेकडील अत्यंत पुण्यस्थान, तुंगानदीचा पवित्र रम्यकांठ ! येथेंच रामायणांतील सुप्रसिद्ध शृंगऋषीचा मोठा रमणीय आश्रम होता. समीपच तुंगानदीचा पवित्र प्रवाह झुळु झुळुं वाहत असून, प्रगाढ शांततेचें अखंड साम्राज्य उदंड नांदत होतें ! सर्व प्राणिजात आपापला नैसर्गिक वैरभाव विसरून सुखशांतीनें विहार करीत असत !

साप बेडकीच्या लहानशा बचड्याला दुपारच्या उन्हाच्या त्रास होऊं नये म्हणून त्यावर आपला फणा उचलून धरणारें असें पुण्यस्थान तें हेंच ! सभोवती गगनचुंबित वृक्षराजी, त्याला बिलगून सुवासिक फुलांनी बहरलेल्या विविध वेली यांनी सुशोभित झालेला पवित्र देश तो ! एकूण येथील प्रशांत व प्रसन्न वातावरण व विविध वृक्षलतादिकांनी अखंड नटलेली ती निसर्ग रमणीय वनश्री ! पायथ्याशी झुळुझुळु वाहणाऱ्या तुंगानदीचा स्वच्छ व

शीतल प्रवाह ! तेव्हां हें स्थान पाहून आचार्यांचे मन प्रसन्न झालें व तेथें धर्मपीठाची स्थापना करून वेदाध्ययनाची चांगली सोय करावी असें त्यांच्या मनानें घेतलें.

नंतर स्नानार्थ तुंगानदीच्या कांठावर ते गेले व कांठावर उभे राहून आसमंतातील सृष्टिसौंदर्याकडे दृष्टि फिरविली. केवढा त्यांचा आनंद ! पुराणांत या तुंगानदीचा महिमा वर्णन करण्यांत आला होता. त्याची त्यांना आतां आठवण झाली. दोन्ही हात जोडून त्यांनी तिचा महिमा गाण्यास सुरुवात केली. ती येणेप्रमाणें:—

**‘ नमः परमकल्याणि तुंगा मंगलदायिनि ।**
**अवतीर्णासि चात्रैव सर्वलोकहितायच ॥ १ ॥**

**अहोऽद्य तुंगां कृतपापभंगाम्,**
**निस्संगिसंगां मुनिवृंदवंद्याम् ।**
**अंगीकृतांगस्य समस्तपाप—**
**भंगैकदक्षां शरणं प्रव्रजामः ॥ २ ॥**

**तुंगामनंगाधिपसेव्यरूपाम्।**
**तोयैकरूपां परमार्थसाराम् ।**
**रंगोत्तरंगां सुजनैक-सेव्याम्,**
**वयं भजामः सततं व्रतस्थाः ॥ ३ ॥**

जयेति भद्रेति महानुभावे
तीर्थैकनाथेऽखिललोकनाथे ।
त्वमेव भूलोकसमस्ततीर्थ-
वर्येति पुण्येति परेति नित्यम् ॥ ७ ॥

अम्बाम्ब बलशालिनस्मान् पाहि तुंगे दिवानिशम् ।
पुत्रभावेन सर्वांश्च पाहि पाहि नमोऽस्तु ते ॥ ८ ॥

तुंगा नारायणः साक्षात् भद्रा देवो महेश्वरः ।
तुंगभद्रात्मकं विद्धि हरिशंकरयोर्वपुः ॥ ९ ॥

वराहदेहसंभूते तुंगे मंगल-दायिनि ।
नमोऽस्तु ते महादेवि सर्वपापप्रणाशिनि ॥ १० ॥

याप्रमाणें तुंगानदीचा महिमा वर्णन करण्यांत आल्यावर पात्रांत उतरून त्यानीं येथेच्छ स्नान केलें. व कांठावर संध्यावंदनादि उरकून नंतर मग ते मुक्कामाकडे वळले. तेथील नदीकांठचा पुण्य व प्रसन्न देखावा पाहून त्यांचें मन रंगले' व तेथें काही दिवस मुक्काम करण्याचे मनांत भरल्यावरून तेथे तळ दिला. ती जागा प्रशांत व प्रशस्त असून त्यांना फारच आवडली मग आतां विलंब कसला? तेथें मुक्काम करण्याचा निर्णय घेतल्यावर हजार शिष्यांचा समुदाय बरोबर होता. लागलीच तेथें हजार पर्णकुटीं तयार करण्यांत आल्या व शके ७३० साली एक शुभमुहूर्त

पाहून तेथें धर्मपीठाची स्थापना करण्यांत आली. व वेदाध्यान व अध्यापन कार्य चालू रहावें, एतदर्थ श्री शारदाम्बेची प्रतिष्ठाहि करण्यांत आली. तेव्हां पासून शृंगेरीला महत्व प्राप्त होऊन तो आद्यमठ म्हणून सर्व मठांत त्याचा मान व अधिकार आजहि वडीलकीचा म्हणून प्रसिद्ध आहे. पुढें त्याला राजाश्रय व लोकाश्रय चांगला मिळून त्याला संस्थानचें भारदस्त रूप प्राप्त झालें आहे.

शृंगेरीत धर्मपीठ स्थापन केल्यावर आचार्यांचा मुक्काम तेथें बरेच दिवस होता. अद्वैतवेदांताचा प्रचार व प्रसार करण्यांसाठीं ब्रह्मसूत्र व उपनिषदें यांवरील आचार्यकृत भाष्यांचा जोरानें अध्ययनास प्रारंभ झाला. कांहीं दिवस त्या पीठाचें अध्यक्षपद आपणाकडेच ठेवून नंतर सुरेश्वराचार्यांची त्या जागीं पहिले शंकराचार्य म्हणून योजना करण्यांत आली. त्यावेळीं आचार्यदेवांनीं सुरेश्वराचार्यांस चंद्रमोळीश्वराचें स्फटिक लिंग व गणपतीची वज्र खचित स्फटिक मूर्ति दिली. ती अद्यापि मठांत मोठ्या आस्थेने पुजली जाते . पुढें आचार्यांच्या मनांत ब्रह्मसूत्र भाष्यावर वार्तिक लिहिण्याचा विचार घोळूं लागला व ती कामगिरी सुरेश्वरावर सोंपविण्याचें त्यांनीं मनांत ठरविलें. पण इतर शिष्यांचा – विशेषतः पद्मपादाचा विरोध दिसल्यामुळें तें काम पद्मपादावर सोंपविण्यांत आलें. कुमारिल भट्टाने त्यावर वार्तिक लिहावें, असें आचार्यांच्या मनांत पुष्कळ होतें. पण तो योग घडून आला नाहीं. पण त्यावर वार्तिक लिहिण जरूर होतें. कारण वार्तिका-शिवाय भाष्य सामान्य जनांस समजणें दुर्घट असल्यामुळें त्याचा लोकांत प्रसार व्हावा म्हणून सुगम व सरळ अशा बालबोध सोप्या भाषेंत स्पष्टीकरण करणें हें प्रवाहप्राप्तच होतें. म्हणून पद्मपादावर तें काम सोपवून देण्यांत आलें.

पद्मपादांनींहि त्या कामगिरीचा स्वीकार करून शारीरिक भाष्यावर

टीकात्मक वार्तिक लिहिण्यास सुरुवात केली व रात्रंदिवस खपून त्यावर सुंदर वार्तिक तयार केलें. त्याचे दोन भाग असून, त्याच्या पूर्व भागाला 'पंच-पादिका' व उत्तर भागाला 'वृत्ति' हें नांव देण्यांत आलें आहे. पद्म-पादांनीं हा ग्रंथ गुरुदक्षिणा म्हणून आचार्यांना अर्पण केला आहे. हा टीका ग्रंथ पाहून गुरुदेवाना अत्यंत हर्ष झाला. अर्थात् ही ग्रंथरचना प्रत्यक्ष आचार्यांच्या अध्यक्षतेखालीच झाली, हें निराळें सांगणें नकोच.

---

## प्रकरण २९ वें

## पद्मपादाचें तीर्थाटण

गच्छन्गच्छन्मार्गमध्येऽभियातं
गेहं भिक्षुर्मातुलस्याऽऽजगाम ।
दृष्ट्वा शिष्यैस्तं चिरेणाभियातं
मोदं प्रापन्मातुलः शास्त्रवेदी ॥ [ १४–७४ ]

गुरुवर तव या भाष्यवरेण्ये
व्यरचि मया ललिता किल वृत्तिः ।
निरतिशयोज्ज्वलयुक्तियुता सा
पथि किल हा विननाश कृशानौ ॥
[ १४–१६३ ]

( शं. दि. १४, ७४ १६३ )

पद्मपाद हा मूळचा चोल देशचा. सत्यज्ञान संपादनार्थ घराच्या बाहेर पडून गुरूचा शोध करीत करीत अखेर काशी क्षेत्रांत आला व तेथें त्याची व आचार्य देवांची गांठ पडून शेवटीं आचार्यांचें शिष्यत्व पत्करून तो त्यांच्याजवळच राहूं लागला. शृंगेरी येथें त्याचा मुक्काम असता आचार्यांच्या आदेशावरून ब्रह्मसूत्र भाष्यावर 'पंचपादिका' व 'वृत्ति' या नांवाची टीका लिहून संपविल्यावर दक्षिणेकडील तीर्थांचें दर्शन घेण्याची त्याला इच्छा झाली. त्याप्रमाणें तो आचार्यांची अनुज्ञा घेऊन यात्रेस निघाला व बरोबर 'पंचपादिका' हा टीकाग्रंथहि घेतला. प्रथम तो कालहस्तीश्वर क्षेत्रांत येऊन, तेथें त्याने महादेवाचें दर्शन घेतले. नंतर तेथून निघून कांची क्षेत्रावर आला. तेथें त्यानें कामेश्वर व कामाक्षी या नांवाने प्रसिद्ध आसलेल्या शिव–पार्वतीचें दर्शन घेतलें. नंतर तेथून निघून कल्लाल ग्रामांत येऊन विष्णूचें दर्शन घेऊन तेथून पुढें कूच केलें. व येतां येतां शिवगंगा क्षेत्रांत येऊन तेथील दाक्षायणीनाथ शिवलिंगाचें दर्शन घेतलें. यानंतर त्याची दृष्टि रामेश्वराकडे वळली व त्या मार्गानें तो चालूं लागला.

वाटेंत कावेरी नदी लागली. त्या प्रदेशांत त्याच्या मामाचें घर होतें. अर्थात् त्याच नांव दिवाकरध्वरीं होतें, तें मार्गे आलेंच होतें. तो भारी पंडित व मोठा मीमांसक होता. भाचा फार दिवसांनी घरी आला म्हणून त्यास आनंद झाला व त्याचें सुस्वागत करून त्यास सन्मानानें घरीं ठेवून घेतलें. अर्थात् तो आतां पूर्वीचा सनंदन नव्हता. संन्यासी होता. व बरोबर त्याचा शिष्य परिवारहि होता. तो आलेली बातमी ऐकून गांवातील त्याचे स्नेही सोबती व इतर परिचयाचे लोक त्यास भेटावयास आले. त्यांच्याशीं तात्विक चर्चा करून धर्मोपदेशहि करीत तो तेथें कांही दिवस राहिला.

टीकात्मक वार्तिक लिहिण्यास सुरुवात केली व रात्रंदिवस खपून त्यावर सुंदर वार्तिक तयार केलें. त्याचे दोन भाग असून, त्याच्या पूर्व भागाला 'पंचपादिका' व उत्तर भागाला 'वृत्ति' हें नांव देण्यांत आलें आहे. पद्मपादांनीं हा ग्रंथ गुरुदक्षिणा म्हणून आचार्यांना अर्पण केला आहे. हा टीका ग्रंथ पाहून गुरुदेवाना अत्यंत हर्ष झाला. अर्थात् ही ग्रंथरचना प्रत्यक्ष आचार्यांच्या अध्यक्षतेखालीच झाली, हें निराळें सांगणें नकोच.

---

## प्रकरण २९ वें

### पद्मपादाचें तीर्थाटण

गच्छन्गच्छन्मार्गमध्येऽभियातं
गेहं भिक्षुर्मातुलस्याऽऽजगाम ।
दृष्ट्वा शिष्यैस्तं चिरेणाभियातं
मोदं प्रापन्मातुलः शास्त्रवेदी ॥ [ १४–७४ ]

गुरुवर तव या भाष्यवरेण्ये
व्यरचि मया ललिता किल वृत्तिः ।
निरतिशयोज्ज्वलयुक्तियुता सा
पथि किल हा विननाश कृशानौ ॥

[ १४–१६३ ]

( शं. दि. १४, ७४ १६३ )

पद्मपाद हा मूळचा चोल देशचा. सत्यज्ञान संपादनार्थं घराच्या बाहेर पडून गुरूचा शोध करीत करीत अखेर काशी क्षेत्रांत आला व तेथें त्याची व आचार्य देवांची गांठ पडून शेवटीं आचार्यांचें शिष्यत्व पत्करून तो त्यांच्याजवळच राहूं लागला. शृंगेरी येथें त्याचा मुक्काम असता आचार्यांच्या आदेशावरून ब्रह्मसूत्र भाष्यावर 'पंचपादिका' व 'वृत्ति' या नांवाची टीका लिहून संपविल्यावर दक्षिणेकडील तीर्थांचें दर्शन घेण्याची त्याला इच्छा झाली. त्याप्रमाणें तो आचार्यांची अनुज्ञा घेऊन यात्रेस निघाला व बरोबर 'पंचपादिका' हा टीकाग्रंथहि घेतला. प्रथम तो कालहस्तीश्वर क्षेत्रांत येऊन, तेथें त्याने महादेवाचें दर्शन घेतले. नंतर तेथून निघून कांची क्षेत्रावर आला. तेथें त्यानें कामेश्वर व कामाक्षी या नांवाने प्रसिद्ध आसलेल्या शिव-पार्वतीचें दर्शन घेतलें. नंतर तेथून निघून कल्लाल ग्रामांत येऊन विष्णूचें दर्शन घेऊन तेथून पुढें कूच केलें. व येतां येतां शिवगंगा क्षेत्रांत येऊन तेथील दाक्षायणीनाथ शिवलिंगाचें दर्शन घेतलें. यानंतर त्याची दृष्टि रामेश्वराकडे वळली व त्या मार्गानें तो चालूं लागला.

वाटेंत कावेरी नदी लागली. त्या प्रदेशांत त्याच्या मामाचें घर होतें. अर्थात् त्याच नांव दिवाकरध्वरीं होतें, तें मार्गे आलेंच होतें. तो भारी पंडित व मोठा मीमांसक होता. भाचा फार दिवसांनी घरी आला म्हणून त्यास आनंद झाला व त्याचें सुस्वागत करून त्यास सन्मानानें घरीं ठेवून घेतलें. अर्थात् तो आतां पूर्वीचा सनंदन नव्हता. संन्यासी होता. व बरोबर त्याचा शिष्य परिवारहि होता. तो आलेली बातमी ऐकून गांवातील त्याचे स्नेही सोबती व इतर परिचयाचे लोक त्यास भेटावयास आले. त्यांच्याशीं तात्विक चर्चा करून धर्मोपदेशहि करीत तो तेथें कांही दिवस राहिला.

मामाच्या घरीं असतांना त्याचे शिष्य अद्वैत वेदांतपर ग्रंथ वाचीत असलेले पाहून मामानें पद्मपादास कोणते ग्रंथ शिष्य वाचतात, असा प्रश्न केल्यावरून पद्मपादानें सांगितलें कीं, शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्र भाष्य लिहिलें असून, त्यावरची मी लिहिलेली ती टीका आहे. मामानें तो ग्रंथ हातांत घेऊन वाचून पाहिला. त्याला भाच्याचें बुद्धिकौशल्य पाहून आनंद झाला व त्याने त्याची फार शिफारस केली. पण हा आनंद फार वेळ टिकला नाहीं. कारण त्या ग्रंथांत मीमांसा मताचे खणखणीत खंडण करण्यांत आलें होतें. तो होता मीमांसा मताचा कट्टर अभिमानी व मोठा कर्मनिष्ठ. 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या'चें तत्व त्यास आवडले नाहीं व पटलेंहि नाहीं. त्यास तें खंडण पाहून फार खेद झाला व त्यास पद्मपादाविषयीं असूया उत्पन्न झाली. पण हें त्यानें बाहेर दाखविलें नाहीं.

मामाच्या घरीं कांहीं दिवस राहून, पुढें रामेश्वरास जाण्याची त्याची इच्छा झाली. तेव्हां वाटेंत कोणती आपत्ति येईल व ग्रंथावर काय संकट ओढवेल, याचा नेम नसल्यामुळें मामाच्या घरीं ग्रंथ ठेवून गेल्यास तो तेथें सुरक्षित राहील हा विचार करून तो ग्रंथ मामाच्या घरीच ठेवून, पुढील यात्रेची वाट धरली. वाटेंत ठिकठिकाणीं उतरून तेथील देवदेवतांचे दर्शन घेऊन, अखेर रामेश्वर गांठलें व तेथें कांहीं दिवस मुक्काम केला.

इकडे पद्मपाद घरीं ग्रंथ ठेवून यात्रेस निघून गेल्यावर मामाच्या मनांत ग्रंथाविषयीं तिरस्कार बुद्धि उत्पन्न होऊन, त्या ग्रंथाचें अस्तित्व त्यास सहन झालें नाहीं. म्हणून एके दिवशीं तो ग्रंथ जेथें ठेवण्यांत आला होता, त्या खोलीला आग लावून ती पेटवून दिली व त्या आगीच्या भडक्यांत खोली जळून ग्रंथाची राखरांगोळी झाली ! पुढें पद्मपाद यात्रा आटपून परत तेथें आला. तेव्हां मामानें घराला आग लागल्यानें त्या

आगींत ग्रंथ जळून गेला असें सांगितलें. व नक्राश्रु ढाळून आपलें दुःख व्यक्त केलें.ग्रंथाचा अशा रीतीनें शेवट झाला असें पाहून पद्मपादाला मनस्वी दुःख झालें व तो तेथून दुःखितांतःकरणाने आचार्यांकडे जाण्यास निघाला.

वाटेंत त्यास असें कळलें कीं, आचार्य श्रृंगेरी सोडून केरळांत गेले आहेत. तेव्हां तो तिकडे वळला. पंचपादिका जळून गेली, त्याचें त्यास फार हळहळ लागली आणि ही गोष्ट आचार्यांपुढें सांगण्यांस त्याच्या मोठ्या जिवावर आलें. आचार्यांजवळ गेल्यावर पद्मपादानें त्यांना नमस्कार घातला व हात जोडून लहान तोंड करून त्यांच्यापुढें स्तब्ध उभा राहिला. आचार्यांनीं त्याजकडे पाहिलें व त्याचें तोंड चिंताग्रस्त झालेलें पाहून, त्याचें कारण विचारलें. तेव्हां पद्मपादांनी मामाच्या घरची झालेली हकीकत सांगून 'मामानें माझा घात केला वर्षभर रात्रंदिवस खपून तयार केलेल्या ग्रंथाची अग्नींत होळी केली, व आतां पुनः तसा ग्रंथ लिहून काढण्याचें सामर्थ्य व उत्साह राहिला नाहीं, वगैरे सांगून हात जोडून पुतळ्याप्रमाणें स्तब्ध उभा राहिला.

आचार्यांनी त्याचें दुःख व मनस्ताप ओळखून, त्यास धीर देऊन म्हणाले – पद्मपादा! तुला इतकें दुःख व चिंता करण्याचें कारण नाहीं. ग्रंथ जळून गेला तर जाऊ दे! पुनः तयार करता येईल.' असें सांगून, नंतर त्यास ग्रंथांतील मजकूर जशास तसा, सांगून त्याच्याकडून तो ग्रंथ पुनः पूर्ववत् लिहविला! ग्रंथ लिहून पूर्ण झाला व पद्मपादाला तो पाहून जो हर्ष झाला,' त्याचें वर्णन करणें हें दुर्घट आहे.

## प्रकरण ३० वें

# मृत्युशय्येवरील मातृदर्शन

अधिगम्य तदात्मयोगशक्ते
रनुभावन निवेद्य चाश्रवेभ्यः।
अवलम्बिततारकापथोऽसा
वधिरादतिक्रमाससाद मातुः ॥ १४-२९ ॥

तत्राऽऽतुरां मातरमैक्षतासौ
ननाम तस्याश्चरणौ कृतात्मा।
सा चैनमुद्वीक्ष्य शरीरतापं
जहौ निदाघार्त इवाम्बुदेन ॥१४-३० ॥

असावसंगोऽपि तदार्द्रचेता
स्तामाह मोहान्धतमोपहर्ता।
अम्बाऽयमस्त्यत्र शुचं जहीहि
ब्रवीहि किं ते करवाणि कृत्यम् ॥ १४-३१ ॥

(शं. दि. १४-३०, ३१; ३२)

म्हातारपणासारखें जगांत दुसरें कष्टप्रद व दुःखद जीवन नाहीं. त्यावेळीं जीव अगदी हैराण होऊन जातो. काय सांगावे म्हातारपणाचे कष्ट व हाल? सर्व गात्रें शिथिल झालेलीं. इंद्रियांनी आपापली कर्तव्यें पार झुगारून दिलेलीं. धड डोळ्याला दिसत नाहीं, कानाला ऐकू येत नाहीं, पाय लटपटूं लागतात, हात कांपू लागतात, शरीर सर्व जर्जर झालेलें असतें,

बसलें तर उठवत नाहीं, उठलें तर बसवत नाहीं, बुद्धींत भ्रंश झालेला असतो. स्मरणशक्ती ऱ्हास पावलेली असते, केंस पिकून सफेत बनतात, दांत पडून तोंडाचें बोळकें होतें, रात्रीं झोप नाहीं, दिवसा चैन नाहीं, असें हें म्हातारपण आहे ! जवळ जवळ अर्ध मरणच तें ! !

हें येथें सांगण्याचें कारण कीं आर्यांबेची जवळ जवळ अशीच स्थिति झाली होती. म्हातारी अगदी थकली होती. अंथरुणाला खिळून होती. तिला आतां कशाची आशा नव्हती, अगदीच नाहीं म्हणायला एका बाबतींत तिचा जीव घुटमळून राहिला होता. मरणापूर्वी एकवार शंकराचें दर्शन घडावें, एवढी एकच तिची आशा. येथें तिचा जीव घुटमळून राहिला होता. 'शंकरा! शंकरा येरे एकदां येऊन भेटरे ! तुझें दर्शन घडूं दे मला !' असें ती वारंवार म्हणे. पुढें पुढें तिला मुलाचा सारखा ध्यासच लागून राहिला. 'शंकरा येरे ये ! बाळा ! ये, आईला दर्शन दे ! एकदाचें पाहूं दे तुझें मुख ! दिलेल्या वचनाचें विस्मरण झालें कीं काय तुला ! बाळा शंकरा ! ये ना ! भेट दे तुझ्या आईला!

श्रृंगेरीत आचार्यांचा मुक्काम असतांना एक दिवस ते योगासन घालून समाधिस्थ होऊन बसलें असतां, त्यांना आर्यांबेचा आर्त स्वर ऐकूं आला. त्याबरोबर त्यांची स्मृति जागृत झाली. व आईला दिलेल्या वचनाचें स्मरण झालें. त्यांच्या कार्य बाहुल्यामुळें आईला न भेटतां बरेंच दिवस झालें होतें. आतां त्यांना आईला भेटण्याची इच्छा बलवत्तर झाली. तिची आतां वृद्धावस्था झाली होती. त्यांच्या हृदयांत मातृप्रेम जागृत झालें व तिचें दर्शन घेण्यास मन उतावीळ बनलें ! लागलींच पद्मपादाला जवळ बोलावून घेऊन आपण कालटीस जाऊन येईपर्यंत त्या सर्वांना तेथेंच राहण्याची सूचना देऊन कालटीचा रस्ता धरला. मग उशीर कसला ?

पुढें थोड्यांच दिवसांत ते घरीं येऊन पोचले.

घरीं येऊन पोंचल्यावर क्षणाचाहि विलंब न करतां सरळ माऊली-जवळ गेले व तिच्यावर एक प्रेमकटाक्ष टाकला. आर्यांबा मृत्युशय्येवर डोळे मिटून ' शंकरा ! शंकरा ! ' करीत स्वस्थ पडली होती ! शंकरांनी तिच्या शय्येजवळ जाऊन, आर्यांबेंचे घट्ट चरण धरले ! व तिच्या पाया-वर डोकें ठेऊन नमस्कार करून, आई ! आई ! आई ग ! हा बघ ! शंकर तुझ्या पायाजवळ उभा आहे ! आई ! उघड डोळे ! आणि तुझ्या शंकराकडे पहा ! ' असें मृदु स्वरांत बोलून प्रेमळपणानें तिच्या तोंडा-वरून अमृत हस्त फिरविला ! मुलाच्या हाताचा स्पर्श होतांच माऊलीनें तो ओळखला व डोळे उघडून त्याच्याकडे पाहिलें !

चातकावर अमृतवृष्टि झाली ! मोराला मेघदर्शन घडलें ! व आर्यांबेला तिचा लाडका शंकर दिसला ! ! होय, जगाचा जगद्गुरु, अद्वै-ताचा आद्य प्रणेता, आत्मज्ञानाचा प्रमुख उपदेष्टा, श्रेष्ठ वैदिक धर्माचा प्रचारक, भगवान श्री शंकराचार्य, पण आर्याम्बेचा तो शंकरच ! लाडका शंकरच ! एवढा मोठा त्रैलोक्याचा राणा श्री रामचंद्र, पण तो कौशल्या-मातेचा लहानगा रामच ! जगाचा उद्धारकर्ता योगेश्वर श्रीकृष्ण हा यशो-धरेचा बाल कृष्णच ! मुलगा कितीहि मोठा असो, मोठा चक्रवर्ति असो, महा योद्धा असो, महा ज्ञानी अगर महायोगी असो, माउलीला तो ि च राजहंसच ! तेथें मुलाचें वय, हुद्दा, अधिकार, पौरुष, याची तिला जाणीवच नसतें. आईला या सर्व गोष्टी माफ असतात. बापहि पूज्य खरा, पण माउलीची सर त्याला येणे नाहीं. श्रुतीने देखील ही गोष्ट मान्य केली आहे. ' मातृदेवो भव ' असें उद्गारून अग्रपूजेचा मान देऊन तिचा मह-नीय गौरव केला आहे. ' न मातुःपर दैवतम् ' ही महाभारताची दिव्य

घोषणा भारतीयांचें महान् सूत्र होऊन अबाधित गाजत आले आहे. असो.

शंकराची मूर्ति पुढें दिसतांच चैतन्याचा एक किरण तिच्या शरीरांतून चमकून गेला. तिला एकप्रकारची हुशारी वाटली. तेवढयापुरतां तिला स्वर्गसुखाचा भास झाला. आपले दोन्ही हात पुढें करून आपल्या लाडक्या शंकराला उराशी घट्ट कवटाळून धरलें. शंकरांना मातृवात्सल्याचा क्षणभर दिव्य सुखानंद झाला. त्यांनीहि पुत्रप्रेमानें आपलें तोंड तिच्या छातीवर ठेविलें. चुकलेल्या गायीला पाडसाची भेट झाली ! शंकरांना मातृदेवता आर्यांबेचें मंगल दर्शन झालें. त्या महानंदांत दोघेहि आपणास विसरलीं. हा प्रकार क्षणभरच झाला.

' आई आई ' इतक्यांत आचार्यांनी जरा ओरडून म्हटलें ' आई ! आलो, आलो ग आलो, तुझ्या दर्शनाला ! तुझ्या सेवेला ! आई, सांग, मी आतां काय करूं सांग. तुझी काय इच्छा आहे, तीं कळूं दे मला. मीं ती पूर्ण करतो. दुःख करूं नकोस ! शोक करूं नकोस ! तुझा शंकर तयार आहे तुझी सेवा करायला तुझे मनोरथ पुरविण्याला आई ! सांग ! काय करूं सांग ! हळहळ, चिंता कांहीं करूं नकोस. मन मोकळें करून सर्व काहीं सांग. मनांत कांहीं ठेवूं नकोस, तुझ्या सर्व इच्छा हा तुझा बाळ शंकर-लाडका शंकर--पूर्ण करील.

आर्यांबा फारच थकली होती. तिची स्थिती अगदीं नाजूक झाली होती. धड उडतां येत नव्हते, धड बसता येत नव्हते. आवाज खोल पाताळांत गेला होता. डोळ्याला मंद मंद दिसत होते. कानाला धड ऐकूं येत नव्हते. शरीर सगळें वाळून काष्ठवत् बनलें होतें. अंगांत रक्तामांसाचा लवलशही नव्हता. फक्त हाडांचा सांपळा तेवढा शिल्लक राहिला होता. जगाची स्मृति देखील जवळ जवळ बुजून गेली होती. फक्त शंकर तेवढा

तिच्या स्मरणांत राहिला होता.त्याच्या नांवाचा रात्रंदिवस सारखा जप चालला होता. आपल्याला शंकर भेटेल याची तिला आतां फारशी आशा राहिली नव्हती. अशा असाह्य व निराशाजनक स्थितींत जीव धडपडत व घुटमळत असतां तिचा शंकर अवचित येऊन भेटलेला पाहून त्या माउलीला काय वाटले असेल नि काय नसेल, हे फक्त कल्पनेनेच अजमावलेलें बरें.

शंकराचार्यांचें तें वात्सल्यपूर्ण आशादायक भाषण ऐकून ती हळूंच म्हणाली—शंकरा ! कितीरे तुझी आठवण काढूं ? तुझ्या नांवाचा सारखा जप चालला होता. मी अगदी निराश झालें होतें. सर्व कांही संपलें होतें. फक्त जीव तेवढा घुटमळत होता. लाडक्या ! आलास. बरें झालें. माझा लाडका शंकर मला विसरला. अशीच माझी समजूत झाली होती. तुझी भेट झाली. दर्शन झालें. आता माझा जीव खाली पडला ! माझी इच्छा पूर्ण झाली. मला आतां कशाचीहि इच्छा नाहीं. आतां इतकेंच कीं मी मेल्यावर मला सद्गति मिळेल असें कर म्हणजे झालें. मी आतां सुखानें प्राण सोडते. एवढी इच्छा तूं पूर्ण कर ?

आईची ती अखेरची इच्छा—मृत्युशय्येवरील शरपंजरी पडलेल्या माय माऊलीची ती शेवटची इच्छा ! कोणता सुपूत्र ती पूर्ण करणार नाहीं ? तशांत अनन्य मातृभक्त—मातृवत्सल—श्रीशंकराचार्यासारखे सुपुत्र काय करणार नाहींत ? आईचें तें भाषण ऐकून ती पूर्ण करण्याच्या इराद्यानें गोड व सोप्या भाषेंत अद्वैत तत्त्वज्ञानाचा ब्रम्होपदेश करण्यास प्रारंभ केला. चार पांच वाक्यें पूर्ण होतात न होतात, इतक्यांत ती म्हणाली—शंकरा ! मला तें तुझें ब्रह्मज्ञान समजत नाहीं. मला तें नको. तर सगुण, साकार अशा दयाळूं ईश्वराच्या मला गोड गोष्टी सांग. आणखी हें पहा, मी मेल्यावर देवाजवळ जाऊन राहीन असें कांहीं तरी कर !


आईची ती अंतकालची शेवटची इच्छा ! मग आचार्यांकडून गप्प कसें बसवेल ? लागलीच त्यांनी हात जोडून भुजंगप्रयात छंदांत श्री शंकराची प्रार्थना करण्यास प्रारंभ केला. किती झालें तरी भक्तवत्सल भोलानाथ शंकर ते ! आचार्यांच्या हाकेला ओ देऊन आपल्या गणाबरोबर विमान देऊन तिकडे पाठविलें. शंकराचें गण म्हणजे काय ? विचित्र ध्यान ! डोकीवर जटा, हातांत त्रिशूल, आंग भरून भस्मलेपन, कमरेंत व्याघ्रांबर गळ्यांत रुद्राक्ष माळा असें हें शिवदूतांचें तमोगुणी अभद्र व विचित्र ध्यान पाहून आर्यांबा भेदरल्यासारखी झाली व त्यांच्याबरोबर कैलासास जाऊन शंकराचें दर्शन घेण्यास नकार तिने दिला. ती म्हणाली–शंकरा ! या दूतांना पाहून मला भय वाटतें. कैलासाकडे जाण्यास माझें मन घेत नाहीं. आचार्य म्हणाले–आई मग काय आवडतें तुला ! काय करूं मी !

'मला' ती म्हणाली 'सुंदर, सात्विक, मोहक, सुप्रसन्न अशा वैकुंठवासी भगवान विष्णुदेवाचें गोजिरवाणें दर्शन फार आवडतें. तें झालें तर माझें भाग्य.' आईची ही मनीषा ऐकून आचार्यांनी हात जोडून विष्णूचें प्रार्थना करण्यास सुरुवात केली. आचार्यांच्या प्रार्थनेला मान देऊन वैकुंठनाथ विष्णुदेव आपल्या पार्षद गणांसह विमानांत बसून कालटीस आचार्याजवळ आले. त्यांना पाहून आचार्यांनी प्रभूला साष्टांग नमस्कार घातला व आर्यांबेकडे वळून 'आई भगवान श्री विष्णुदेव आले आहेत ! बघ ! डोळे उघड ! त्यांचें दर्शन घे ! आणि मुक्त हो !' असें ओरडून तिच्या कानाजवळ म्हणतांच आर्यांबेने डोळे उघडले, तो काय चमत्कार खरोखर शंख, चक्र, गदा, पद्मधारी श्री विष्णूची मूर्ति साक्षात् पुढें उभी !! तिने हात जोडून देवाला नमस्कार केला ! व

पुनः डोळे मिटले. तिची इच्छा पूर्ण झाली ! व अंतरात्मा थंडावला ! विष्णु देवानी देहपातानंतर वैकुंठास नेण्याचें आश्वासन देऊन, परत वैकुंठाची वाट धरली.

शेवटीं ती अधिक न बोलतां आचार्यास म्हणाली–शंकरा ! माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या ! मला कशाची आतां आस उरली नाहीं ! आतां मी सुखानें प्राण सोडते. मात्र इतकें कर कीं, मी गेल्यावर माझ्या शवाला तूंच अग्निसंस्कार कर ! आणि माझें अखेरचें और्ध्वदेहिक क्रिया कर्मांतरहि पण तुझ्याच हातून होऊं दे ! ही अखेरची माझी इच्छा, तेवढी पूर्ण कर म्हणजे झाले ! करशील ना शंकरा ?

आचार्य उत्तरले–आई ! कांही चिंता करूं नकोस ! तुझ्या इच्छे-प्रमाण हा शंकर सर्व कांहीं करील. त्यांत बिलकूल अंतर करणार नाहीं. हयगय करणार नाहीं. सर्व कांहीं यथास्थित करीन मी ! आई ! तूं स्वस्थ रहा ! कसलीहि काळजी करूं नकोस !' असें म्हणून आचार्यांनी आईच्या तोंडावरून व अंगावरून आपला अमृत हस्त फिरविला ! धन्य झाली आर्यांबा ! धन्य तिचा जन्म ! पुढें थोड्यांच दिवसांत तिने देह सोडला व ती देवाधीन झाली ! !



आर्यांबा समाधी, पान नंबर २२०

## प्रकरण ३१ वें

## मृतमातृ-संस्कार

**संचित्य काष्ठानि सुशुष्कवन्ति**
**गृहोपकंडे घृततोयपात्रः ।**
**स दक्षिणे दोष्णि ममन्थ वन्हि,**
**ददाह तां तेन च संयतात्मा ॥**

(शं. दि. १४-४८ )

आर्यांबा वैकुंठवासी झाली, ही बातमी गांवांत हां हां म्हणतां वायुगतीनें पसरली. संबंधिक आप्तइष्ट व गांवातील इतर लहान थोर लोक हळुहळू आर्यांबेच्या घराकडे येऊं लागले. तशांत शंकराचार्य आल्याची बातमी अगोदरच सर्वत्र पसरून राहिली होती. पुढें थोड्याच वेळांत गावांतील प्रमुख प्रमुख मंडळी व आप्तेष्ट मंडळी सगळी येऊन जमली. गांव लहान असल्यामुळें आणि आर्यांबेचें निधन तेथील प्रमुख घराण्यांतील असल्यामुळें मंडळी जमावयास फार वेळ लागला नाहीं. त्यांत आप्त-इष्ट, स्नेही-सोबती, भटभटजी, शास्त्री-पंडित, शेजारीपाजारी व इतर प्रतिष्ठित लोक हजर होते. शंकराचार्य हे संन्यासी असल्यामुळें प्रेतकार्य कोणी करावें, हा विचार तेथील कांहीं नातेवाईक व शास्त्रीपंडित लोकांत निघुन त्याविषयीं आपापसांत चर्चा चालली होती. इतक्यांत शंकराचार्य तेथें आले. त्यांच्या कानावर चर्चेतील कांहीं शब्द आले. तेव्हां ते म्हणालेः- आपण कोणीही या और्ध्वदेहिक कार्य निस्तरण्याच्या विचारांत पडूं नये. ते मी स्वतःच करणार आहे.

त्यांतला एक पंडित म्हणालाः— आपणास हें कसें शक्य आहे ! आपण संन्यासी ना !

शंकरः— म्हणून काय झालें !

दुसराः— संन्याशाला कर्माचा अधिकार आहे कोठें ! त्याचें सर्व नातेगोते संबध तुटून जातात ना !

शंकरः— तुम्ही म्हणतां हें खरें. पण एक संबंध मात्र तुटत नाहीं.

तिसराः— म्हणजे ! संन्याशामागें संसार आहेच का ?

शंकरः— अगदींच नाहीं म्हणायला थोडासा आहे.

पहिलाः— तो काय !

शंकरः— तो मातृसंबंध. तो संन्याशाला देखील सुटत नाहीं ! शिवाय आणखी असें की वचनबद्ध झालेलें कार्य संन्याशाला पूर्ण केलेंच पाहिजे. ती जबाबदारी त्याला टाळतां येत नाहीं.

तिसराः— हें आपलें कांहीं तरीच बोलणें आहे. संन्याशाला नातेगोते कांहीं नाहीं. शिवाय त्याला कर्माचा कसलाच अधिकार नाहीं. तेव्हां आपण या भानगडींत पडूं नये. आम्ही सर्व पाहून घेतो.

शंकरः— तुमच्या भाषणांत अर्ध सत्य आहे, पूर्ण नाहीं. संन्याशाश्रमांत सर्व नात्यागोत्याचा संबंध सुटतो हें कबूल. पण आईचा तेवढा सुटत नाहीं, हा त्याला अपवाद आहे.

पहिलाः— बापाचा देखील तुटतो. मग आईचा कां नाहीं ?

शंकरः– आईची गोष्ट निराळी आहे. ती जन्मदात्री मायमाऊली आहे ! आईची सर बापाला येत नाहीं ! ' न मातुः परदैवतम् ' माते–हून श्रेष्ठ दैवत नाहीं. असें शास्त्रवचन आहे. तसें बापाला उद्देशून नाहीं. आईसारखे जगांत मनुष्याला–मग तो गृहस्थ असो वा ब्रह्मचारी असो वा संन्यासी असो–दुसरे श्रेष्ठ दैवत नाहीं. तुम्ही माना अगर मानूं नका. तें मातृनाते यावज्जन्म मनुष्याला बंधनकारक असतें. संन्याशानें कोणाची भेट घ्यावयाची नाहीं, पण आईची मात्र चुकवावयाची नाहीं ; तो शास्त्र–नियम आहे, संन्याशाला जगांत कोणी वंद्य नाहीं. तो कोणापुढेंहि मान वाकवीत नाहीं: पण माता मात्र वंद्य व नमस्करणीय आहे. तिच्या पूज्य-पादाला संन्याशानें देखील वंदना ही केलीच पाहिजे ! तिचें पवित्र दर्शन संन्याशानें अवश्य घ्यावें, असा संकेतच ठरून गेला आहे. ही मिरास–दारी फक्त आईचींच आहे ! इतरांचा तेथें समावेश नाहीं. शिवाय मी तिच्या वचनांत बद्ध झालो आहे. आपला प्रेतसंस्कार व क्रियाकर्मांतर सर्व माच करावें, अशी इच्छा तिने मला बोलून दाखविली व ती मी मान्य केली. तिला मी वचन दिलें आहे. आता त्यापासून मी चळणार नाहीं. तुम्ही या प्रश्नांत अधिक खोल शिरूं नये. सर्व कांही मी पाहून घेतो.

दुसराः– पण तुम्हांला अधिकारच नाहीं, असें आम्ही समजतो. जर तुम्ही तो मान्य करीत नसाल, तर तुमची वाट मोकळी व आमचा रस्ता मोकळा ! आम्ही स्पष्ट बजावून सांगतो की, येथील एकहि ब्राह्मण तुमच्या मदतीस येणार नाहीं व कार्यांत भाग घेणार नाहीं. शास्त्राविरुद्ध वागणें आम्हांस मान्य नाहीं. नसाल आमचे ऐकत तर हे आम्ही उठलो ' अस म्हणून सर्व ब्राह्मण मंडळी उठून उभी राहिली. शंकराचार्यांनी तिकडे लक्ष दिलें नाहीं. ते आपल्यापुढील तयारीस लागले. जमलेले लोकही उठून हळहळू आपापल्या घराकडे परतले.

झाले! सर्वजण निघून गेले. नांवाला माशी देखील राहिली नाही! आतां फक्त आचार्यच आचार्य आणि प्रेतच प्रेत! पुढील विधि आटपावयाचा कसा? प्रेत स्मशानांत न्यावयाचें कसें? मोठी पंचाइत येऊन पडली. पण आचार्य कांही डगमगलें नाहीत. कोणी नाही तरी नाहीं. स्वतःच त्यांनी कम्मर कसली आणि पुढील उद्योगाला लागले. आईला दिलेले वचन पूर्ण करणेसाठी संन्यास धर्म बाजूस ठेवला व घरासमीपच काष्ठे जमवून त्याची चिता रचली. घृत व जलपात्र घेतलें. आईच्या उजव्या हातावर मंथन करून अग्नि उत्पन्न केला व सर्व प्रेतसंस्कार यथाविधि करून मातेचे प्रेत चितेवर ठेविलें व त्यास अग्नि दिला! चिता पेटली, अग्नि नारायण भडकला, व मातेचे प्रेत पुढें लवकरच भस्मसात झाले!! पुढील सर्व विधि यथाशास्त्र पार पाडले हा सर्व विधि शंकराचार्यांनी स्वतः जातिनिशी करून मातृ इच्छा पूर्ण केली! 'मम देह पाते संस्कारमेत्य विधिवत्कुरु शंकर (तम्) या आईच्या इच्छेला मान देऊन 'एष्यामि तंत्र समयं, सकलं विहाय विश्वासमाप्नुहि मृतावपि संस्करिष्ये' असें आईला वचन दिल्याप्रमाणें आचार्य देवांनी तें पुढें कृतींत उतरवून मातृवचनांतून व मातृऋणांतून मुक्त झाले!! नंतर ते पुनः शृंगेरीस आले.

# प्रकरण ३२ वें

## दिग्विजय

अथ शिष्यवरैर्युतः सहस्रैरनुयातः
स सुधन्वना च राज्ञा ।
ककुभो विजिगीषुरेषु सर्वाः
प्रथमं सेतुमुदारधीः प्रतस्थे ॥

( शं. दि. १५-१ )

पंचपादी ग्रंथ पुनः जशाचा तसा लिहून तयार झाल्यावर पद्मपादाला तो वाचून पाहून जो आनंद झाला तो खरोखर अवर्णनीय आहे. हे झाल्यावर केरळांतच वास्तव्य करीत असता मातृसंस्कार पूर्ण झाल्यावर पुढें कांहीं दिवसानीं केरळनृपति राजशेखर हा आचार्यांच्या दर्शनास आला. आचार्यांनी राजाचा यथोचित आदरसत्कार केल्यावर त्याचे कुशल प्रश्न विचारतां राजा म्हणाला–स्वामी ! आपल्या आशिर्वादानें सर्व कांहीं ठीक आहे. पण एका गोष्टींत मात्र मी दुर्दैवी आहे. ती गोष्ट मला फार लागून राहिली आहे. मी तीन नाटकें लिहिली होती. ती आपणांस मागें वाचून सुद्धां दाखविलीं होती. पण गुरुदेव ! ती अग्निस्थानी पडून जळून गेलीं. म्हणून मला मोठें दुःख झालें आहें.

त्यावर आचार्य म्हणालें–राजा ! दुःख करूं नकोस. तूं वाचून दाखवलेली नाटकें मला आठवतात. मी तीं सांगतों, तसें पुनः लिहून काढ ' असें म्हणून आचार्यांनीं त्याला पूर्वींची तीन नाटकें जशींच्या

तर्शी पुनः अक्षरशः सांगून लिहवून काढलीं ! राजास तें पाहून मोठा आनंद झाला. व गुरुदेवांची अलौकिक व अद्भुत स्मरणशक्ती पाहून आश्चर्यचकित होत्साता. गुरुदेवांचे कौतुक करून, त्यांचा निरोप घेऊन, तो आपल्या राजधानीकडे परतला.

नंतर आचार्यांच्या मनांत आतां तीर्थयात्रा करण्याचे भरल्यावरून त्या उद्योगास ते लागले. आतांपर्यंत त्यांनी देशांत अद्वैत मताचा उपदेश करून प्रसार करण्याचा फारसा प्रयत्न केला नव्हता. फक्त शिष्यांना तेवढा पाठ देऊन, अद्वैत मतांत त्यांना तरबेज केलें होतें. आतां ठिक-ठिकाणीं जाऊन, प्रसिद्ध प्रसिद्ध क्षेत्रें व गांवें हिंडून अद्वैतमताची विजयी पताका जगभर मिरविण्याचा त्यानी संकल्प केला. व जेथें जेथें विरोध येईल तेथें तेथें वादविवाद करून, प्रतिपक्ष्यांचें खंडण करून, अद्वैत-तत्त्वाची सत्यता व महत्व पटवून देण्याचा चंग बांधून ते कार्यास लागले. बरोबर पद्मपाद, हस्तामलक, चिद्विलास, सुरेश्वराचार्य, त्रोटकाचार्य, विश्व-गुप्त, ज्ञानकंद, श्वेतब्रम्हपाद इत्यादि प्रमुख शिष्यमंडळी व इतर हजारो अनुयायी घेऊन, दिग्विजय करण्यास ते बाहेर पडले. त्यांच्या संरक्षणार्थ सुधन्वा राजा हाहि कांही निवडक सैन्य घेऊन त्यांच्याबरोबर निघाला. या क्षेत्रयात्रेचा मुख्य उद्देश दिग्विजय करण्याचा होता, हें निराळें सांगावयास नकोच. ते केरळांतून निघाले तो रामेश्वराची वाट धरली.

१) **मध्यार्जुनः**– रामेश्वराला जाताना वाटेंत मध्यार्जुन नांवाचें एक प्रसिद्ध शिवस्थान लागलें. तेथें उतरून मध्यार्जुनेश लिंगाची विधिवत् पूजा करून, त्यास हात जोडून प्रार्थना केली कीं, हे प्रभो ! मी अद्वैतपर भाष्य लिहिलें आहे. व त्याचा जगांत प्रसार करण्याकरितां बाहेर पडलो आहे. कोणी कोणी विद्वानांनी त्याच ग्रंथावर द्वैतपर

भाष्यहि लिहिलें आहे. तेव्हा मला आपण कौल द्या कीं, अद्वैत खरें कीं द्वैत खरें ,असें म्हणून आचार्यांनी देवास साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां लिंगातून ‘ हे आचार्य ! अद्वैत हेंच खरें ! अद्वैतच खरें ! अद्वैतच खरें !! असा त्या गर्भ देवालयांत गंभीर नाद उमटला. या महादेवाच्या कौलानें आचार्यांस महानंद झाला. त्यांना त्या पासून मोठी स्फूर्ति मिळून पुढें ते तेथून निघून रामेश्वराच्या रस्त्यास लागले.

२) **रामेश्वर :–** रामेश्वर हे क्षेत्र मोठें पवित्र असून तें चार धामांपैकीं एक आहे. व त्याचें महत्त्व आजमितीसहि श्रेष्ठ प्रतीचें आहे. हें भारताचें दक्षिणेकडचें अगदी शेवटचें टोक असून, समुद्रकिनाऱ्यावर तें वसलेलें आहे. येथेंच रामचंद्राने लंकेस जाण्याकरतां सेतु बांधून रामेश्वर नांवाच्या भगवान श्री शंकराची स्थापना केली. हें रामेश्वर मंदीर अत्यंत विशाल असून, सुंदर नक्षीकला कृतींनें तें नखशिखांत मढवून काढिलेलें आहे. त्याच्या मंडपाला एक हजार खांब असून, त्यांचे वैभव आजहि मन मुग्ध करून टाकतें.

येथें शंकराचार्य आले, त्यावेळीं शाक्ताचें मोठें प्राबल्य होतें. तेथें गुरुशेखर या नांवाचा एक मोठा शाक्तपंथी यति होता. तो शक्तीचा परमभक्त असे. शक्ति हीच सर्व श्रेष्ठ देवता असून, तिच्याहून श्रेष्ठ असे कोणीच नाहीं. सर्व देव व जगत् हें तिच्या पासूनच उत्पन्न झालें आहे. तिचें वर्णन आलें आहे, तें असें:–

**‘ आद्या शक्तिरशेषकार्यजननी**

**शंभोर्गुणेभ्यः परा ।**

**यन्मायावशतो महाप्रमुस्ततरं**

**सर्वं जगज्जायते ॥ १ ॥**

**तस्या वागाद्यगम्यत्वा-**

**त्सेवायोग्यत्व हेतुतः ।**

**तदंशाया भवान्यास्तु**

**पादसेवापरा व यम् ॥ २ ॥**

याप्रमाणें त्या महाशक्तीचा महिमा व प्रभाव गाऊन शंकरादि-देवाना गौणस्थान देण्यांत आलें आहे. या शाक्त पंडिताबरोबर आचार्यांचा वाद होऊन, त्यांत आचार्यांनी त्या गुरुशेखर पंडिताचा भेदभाव खंडून काढून अखेर अद्वैतमत स्वीकारण्यास त्यास भाग पाडलें. आपल्या शाक्तगुरूचा पराभव होऊन त्यांनी अद्वैत दीक्षा घेतली हें पाहून, इतर सर्व शाक्तपंथी लोक भेदवादाला मूठमाती देऊन अद्वैतपंथी बनले. याच-प्रमाणें तेथें शारदोपासक, विद्योपासक, लक्ष्मी-उपासक असे अनेक निर-निराळे पंथी लोक होते. त्या सर्वांबरोबर वाद करून, त्यांना अद्वैतमत पटवून, त्यांस आपल्या पंथांत सामावून घेतलें. याप्रमाणें तेथील सर्व पंथांतील लोकांस वादांत जिंकून, त्यांना अद्वैत पंथाची दीक्षा दिली.

**३) कांची :-** वरीलप्रमाणें रामेश्वरांत दिग्विजयाची मुहूर्तमेढ रोवून रामनाथाचें पूजन करून आचार्यांचा मुक्काम तेथून हलला व वाटेंत पांड्य, द्राविड, चोल इत्यादि देशातील लोकांना उपदेश करून, त्यांना आपल्या पंथांत घेऊन, पुढें कूच करीत करीत हस्तगिरीनें वेष्टित अशा कांची नगरींत येऊन ते दाखल झाले. ही कांचीपुरी सप्त पुरींतील एक असून, तेथें त्यांनी दोन महिने मुक्काम केला. या मुक्कामांत शंकराची शिव-

कांची येथें व वरदराज नामक विष्णूची विष्णुकांची येथें स्थापना करून त्यांची पूजा-अर्चा नित्यनियमाने निर्विघ्न व सुसूत्र पार पडावी म्हणून विद्वान ब्राह्मणांची तेथें सेवेकरी म्हणून नेमणूक करण्यांत आली. त्याच-प्रमाणे कामाक्षी देवीची व श्रीचक्र यांचीहि एकाच मंदिरांत प्रतिष्ठापना केली गेली. व कामकोटि येथें अद्वैत पीठाची नवीन शाखा स्थापन करून तेथें चैतन्य आचार्यांची नेमणूक केली. ही मठ-स्थापना मुख्य चतुर्मठ स्थापनेनंतर शेवटी करण्यांत आली, असा सांप्रदायिक इतिहास आहे.

येथें आचार्यांचा मुक्काम असतां तेथील राजा राजसेन हा गादी-वर असून आचार्यांच्या दर्शनास आल्यावेळीं श्रींच्या आदेशानुसार त्याने तेथें अनेक देवमंदिर बांधून, तेथील देवांच्या पूजेसाठीं योग्य ब्राह्म-णांना नेमून, त्यांचा योगक्षेम बिनधोक चालेल अशी व्यवस्था करण्यांत आली. तेव्हां पासून जे कांचीक्षेत्राला धार्मिक महत्व व वैभव प्राप्त झालें तें आजतागायत तसेंच असून, वैदिक विद्येचें तें दाक्षिणेतील एक महापीठ आहे असा त्याचा लौकिक आहे.

शंकराचार्यांच्या वेळीं येथें शैवलोकांचें मोठें प्राबल्य होतें. शिव हाच श्रेष्ठ देव असून त्याच्या तोडीचा दुसरा देव नाहीं. इतर देव त्याच्या खालीच. त्याचीच उपासना ही मानवमात्रांना परम श्रेयस्कर असून मोक्षदाता तोच एक आहे, असा या शैवपंथी जंगमांचा युक्तिवाद होता. हे जंगम शिवभक्त आचार्यांच्या अद्वैतमताला कसून विरोध कर-णारे होते. अंगावर लिंग, त्रिशूल, डमरू इत्यादि रुद्राचिन्हे हे लोक धारण करीत असत. येथें आल्यावर आचार्यांची व या शैव-पंडितांची गांठ पडून दोघांत श्रेष्ठ मत कोणाचे याविषयीं कडाक्याचा

वाद जुंपून अखेर त्यांत शैवाना हार खावी लागली. याचा परिणाम असा झाला कीं त्यांना आपलें मत सोडून देऊन अद्वैत मत मान्य करणें भाग पडलें. तेव्हांपासून कांची हें क्षेत्र अद्वैत मताचें एक महत्वाचे पीठ व केंद्र असें मानण्यांत येतें. असो.

(४) **अनंतशयन** :– जंगमांचा व शैवांचा पाडाव केल्यावर कांचीहून निघुन आचार्य अनंतशयनास आले. तेथें त्यांचा महिनाभर मुक्काम होता. हें अनंतशयन हें आज त्रिवेंद्रम या नांवानें ओळखलें जाऊन, तें त्रावणकोर राजाचें राजधानी शहर आहे. येथें शेषशायी भगवान विष्णु–देवाची दर्शनीय अशी सुंदर मूर्ति आहे. आचार्य येथें आले, त्यावेळीं विष्णुभक्तांचें फार मोठें प्राबल्य होतें. त्या वैष्णव पंथांचें पांच निर–निराळे उपपंथ असून, ते सर्व 'विष्णुर्वै देवानां श्रेष्ठः' असें मानणारे कट्टर विष्णु–उपासक होते. भक्त, भागवत, वैष्णव, पांचरात्रि, वैखानस आणि कर्महीन, ही त्या उपपंथांचीं नांवे असून, ते शिवाला मानीत नसत.

आचार्य तेथें गेल्यावर ते शिवभक्त आहेत असें पाहून विष्णु हाच सर्वोत्तम आहे असें आचार्यांजवळ येऊन वाद करूं लागले. त्यांचें म्हणणें असें कीं वासुदेव हाच सर्वज्ञ व श्रेष्ठ देव असून, जो त्याची अनन्यभावें भक्ति करील, त्याच्यावर कृपा करण्यासाठीं तो भक्तवत्सल परमात्मा अवतार धारण करतो. त्याची उपासना केल्यानें भक्ताला वैकुंठलोक प्राप्त होतो. कौंडिन्य ऋषीने त्याची उपासना केली. त्यास याच लोकी मुक्ति प्राप्त झाली. त्या ऋषीचें अनुसरण करून आम्ही त्याप्रमाणें वागतो.

या पंथांत विष्णुशर्मा या नांवाचा एक मोठा कट्टर व कर्मठ विष्णुभक्त होता. तो वैदिक कर्ममार्गी असून विष्णूचा परमभक्त होता. आचार्यांनीं त्याच्या तोंडून वैष्णवपंथाचें तत्त्वज्ञान समजाऊन घेऊन, तें कसें चुकीचें आहे व अद्वैतमत वैष्णव मतापेक्षां कसें श्रेष्ठ आहे याची त्या वैष्णव भक्ताची वेदांतदर्शनानें खात्री पटवून देऊन अखेर त्यास अद्वैतमत स्वीकारण्यास लावलें. त्याच्या मागोमाग इतर वैष्णवाभिमानीहि अद्वैतपंथाचे अनुयायी झाले. नंतर तेथून निघून आचार्य कर्नाटकाकडे वळले.

(५) **श्रीशैल** :– श्रीशैल हा कर्नाटकाचाच भाग म्हणवितो. कांची येथें शैव व जंगम आणि अनंतशयन येथें वैष्णव, भागवत, पांचरात्र, वैखानस इत्यादि पंथापंथांचा पराभव करून, अद्वैत तत्त्वज्ञानाचा सदुपदेश देऊन, त्यांना आपल्या अनुयायांत अंतर्भूत करून घेतल्यावर, आचार्योनीं आपला मुक्काम हलवून वेंकटगिरीकडे प्रयाण केलें व तेथें गेल्यावर वेंकटेशाचें दर्शन घेऊन, तेथून पुढें श्रीशैव येथें ते आले. वाटेंत त्यांना बातमी लागली की कर्नाटकांत–विशेषतः श्रीशैल येथें–कापलिकांचा फार उपद्रव आहे. तें हिंदूना भारी छळतात.

हे कापालिक लोक म्हणजे भैरवाचे एकनिष्ठ उपासक. ही मोठी दुष्ट व क्रूर जमात असून, त्यांची राहणी जवळ जवळ रानटी लोकांसारखी होती. ते नग्न स्थितींत राहत असून सर्वांगाला भस्मलेपन करात असत. डोक्यावर जटा वाढवून गळ्यांत नररूंडमाळा धारण करीत. मनुष्याच्या कवटीमध्यें मासान्न भोजन व यथेच्छ वारुणीपान करण्याचा त्यांचा परिपाठ असें. भैरवापुढें मनुष्याचा बळी देऊन, तेथें यथेच्छ नाचगाणें यांत दंग होत असत. स्त्रियांबरोबर दारू पिऊन, त्यांच्याशी मनमुराद

रतिविलासांत रममाण होण्याची त्यांची तऱ्हा अजब असे. हिंदूना पळवून नेऊन जबरीने त्यांना कापालिकांची दीक्षा देत व तो ती घेण्यास नाखूष असल्यास त्यास ठार मारून त्याचें मांसान्न मोठ्या आवडीनें सेवन करीत. कर्नाटकांत त्यावेळीं त्यांचा मोठा सुळसुळाट चालला होता.

या कापालिकांचा पुढारी ककच नांवाचा एक मोठा दांडगेश्वर असून त्याच्याजवळ सैन्यहि होतें. त्यांच्या सहाय्यानें देशांत त्यानें मोठी पुंडाई माजविली होती, त्याचें ध्यान पाहतांच लोक गर्भगाळितच होत असत. सर्वांगाला चिताभस्म फासून, एका हातांत नरकपाल व एका हातांत त्रिशूल घेऊन थै थै नाचत देशांत धिंगाणा घालीत असे.

कपालिकांचा पुढारी ककच आचार्यांवर धावून आला. आचार्य शिष्यांनी मधें पडून त्यांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण ते पडले दुष्ट व क्रूर ! त्यांनी शिष्यांना दाद न देतां, झोंबा झोंबी करून दांडगाई करण्यास सुरुवात केली. त्यांच्या दुष्टपणामुळें शिष्यांचा निभाव लागेना. शिष्यांची गाळण उडण्याचा प्रसंग आला. पण इतक्यांत सुधन्वाराजा सैन्य घेऊन तेथें आला व कापालिकांवर तुटून पडून त्या सर्वांस तलवारीचें पाणी पाजून जमिनीवर लोळाविलें.

आपले लोक मरून पडलेले पाहून ककच अधिकच चिडला व खवळला. त्या आवेशांत नरकपालांत मद्य ओतून, त्यांतलें अर्धें पिवून बाकीचे तसेंच खाली ठेऊन, आपल्या इष्ट देवतेचें – म्हणजे भैरवाचें त्यानें स्मरण केलें.तेव्हां गळ्यांत नररूंडमाळा घातलेला व अग्नीप्रमाणें झळकणारा महाकपाली भैरव तेथें प्रगट झाला. तेव्हां ककचानें आपल्या

लोकांची झालेली कत्तल त्यांस सांगून त्या दुष्टांचा निःपात करण्याची विनंति केली.

तो भैरव शंकराचार्यांची केलेली निंदाव्यंजक निर्भत्सना ऐकून रागाने संतापून त्यास म्हणाला—'मूर्खा ! माझा देव जो शंकर त्याचाच आचार्य हे अवतार आहेत ! ते माझा आत्मा आहेत ! त्यांचा तू द्रोह करून त्याना मारण्यास सांगतोस ! तर तू माझाच द्रोही आहेस ! आणि या पापाबद्दल तुलाच देहांत प्रायश्चित देतो !' असें म्हणून भैरवाने त्या दुष्ट ककचाचा शिरच्छेद करून त्यास ठार मारले ! ! हा विपरीत व विलक्षण प्रकार पाहून इतर कपाली घाबरले व ते आचार्यांस शरण आले. आचार्यांनीं त्यास कृपाळु होऊन, अभय-दान देऊन, ती क्रूर उपासना टाकून देण्यास उपदेश करून त्यांना अद्वैतपंथात समाविष्ट करून घेतलें. त्याप्रमाणें कर्नाटकांतील दौरा आटपून गोकर्ण क्षेत्राची वाट धरली.

(६) **गोकर्ण** :— गोकर्ण हें पश्चिमेस समुद्रकिनाऱ्यावर कारवार जिल्ह्यांत असून, तें पुराणप्रसिद्ध तीर्थ आहे. कुबेराची संपत्ति प्राप्त करून घेणेसाठी लंकाधीश रावणाने तपश्चर्या करून इष्टसिद्धि प्राप्त करून घेतली, ती येथेंच. हें शिवक्षेत्र असून बारा जोतिर्लिंगापैकी एक असल्या-मुळे याला स्थानमहात्म्य फार मोठे प्राप्त झालें आहे. येथील शिव-लिंगाचें महाबळेश्वर असें नांव असून शिवरात्रीस फार मोठी यात्रा भरते व त्यावेळीं हिंदुस्थानांतील सर्व भागांतून यात्रेकरू येथें येऊन जमतात.

आचार्य कर्नाटकांतील दौरा आटपून येथें येऊन उतरले. येथें आल्यावर समुद्रस्नान करून पार्वतीरमण श्री महादेवाची — महाबळेश्वर

लिंगाची – पूजा करून, भुजंगप्रयातवृत्तांत सुंदर शिवस्तोत्राची रम्य रचना केली आणि मग तेथें जमलेल्या लोकांना वेदांत विद्येचा उपदेश करण्यास प्रारंभ केला. याप्रमाणें वेदांत विद्येचा श्रोतृवृंदाना उपदेश करीत असतां, तेथील प्रख्यात नीलकंठ गुरुचा शिष्य शिवाचार्य नांवाचा होता. तो कट्टर शिवभक्त होता. तो ज्वलज्जहाल वीरशैव होता. इतकेंच नव्हे, तर मोठा विद्वान व जाडा पंडितहि होता. त्यानें व्याससूत्रावर टीका लिहून त्याला नकुलीश सिद्धांत असें नांव दिलें होतें. त्याचा एक पट्टशिष्य हरदत्त नांवाचा असून, तो शुद्ध शैवतत्वाचा मोठा अभिमानी व अनुयायी होता 'तो एके दिवशीं आचार्यांचें प्रवचन ऐकावयास येऊन ती वर्दी त्यानें आपल्या गुरूस येऊन दिली. तो म्हणाला– 'गुरुजी ! येथें शंकर नांवाचा कोणी एक यति आला असून, तो आपल्या शिष्यां-सहित देवळांत येऊन उतरला आहे. तो मोठा पंडित असून, भट्टपाद–मंडनमिश्र अशांना वश करून घेता झाला असें म्हणतात. कदाचित् आपणाशी देखील वाद करण्यास तो आला तर येईल. तो अद्वैतवादाचा उपदेश करीत असतो. तेव्हा जरा सांभाळून असा. प्रस्थ मोठें जाडे दिसतें !'

शिष्याचें हें भाषण ऐकून नीलकंठ गुरुजी म्हणाले– 'ऊं :! आला तर येऊं दे ! मी थोडाच भीक घालतो त्यांना ! मी कांहीं डरणारा नव्हे ! तो मोठा पंडित असेल, तो एकवार समुद्र शोषून काढील, सूर्याला खाली पाडील, आकाशाला गवसणी घालील ! या सर्व अशक्य गोष्टी तो एकवार शक्य करून दाखवील ! पण मी तुला स्पष्ट सांगतो कीं, माझा बालाग्रही तो वांकविणार नाहीं ! मला चीत करण्याची गोष्टच नको ! असें म्हणून त्याने मिशीवर हात फिरविला.

हा नीलकंठ शास्त्री होताच तसा. तो सर्व शास्त्रांत निपुण असून ब्रह्मसूत्रावर त्याने भाष्यहि लिहिलें होतें. पण तें द्वैतपर होतें. अर्थात् हा नीलकंठ झाला तरी भारी विद्वान व सर्वशास्त्र-कोविद असें जाडें प्रस्थ होतें, तो मोठा शिवभक्त होता. शिव हेंच श्रेष्ठ दैवत अशी त्याची भावना होती. वरील प्रमाणें शिष्यास तो सांगत असतां काषाय-वस्त्र धारण केलेली, शुभ्र भस्मलेपनाने विभूषित झालेली, रुद्राक्षमाळा धारण केलेली श्रीमच्छंकराचार्यांची तेजस्वी मंगलमूर्ती तेथें येऊन दाखल झाली.

तेथें आल्यावर दोघांच्या समोपचाराच्या कांही प्राथमिक गोष्टी झाल्यावर नीलकंठानें प्रश्न उपस्थित करून आपल्या पक्षाचें - द्वैताचें- समर्थन करण्यास सुरुवात केली. तेव्हां साहाजिकच वादास तोंड फुटून दोघांमध्येंहि शास्त्रीय चर्चा कडाक्यानें चालू झाली. दोघेहि वेदांत-विद्येंत तुल्यबल्य पंडित ! ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहिणारे पट्टीचे विद्वान ! दोघांमध्यें प्रश्न-प्रतिप्रश्न व उत्तर-प्रत्युत्तर यांची सारखी सरबत्ती सुरू झाली. कोणी कोणास हार जाण्याचे लक्षण दिसेना. दिवसेंदिवस वाद रंगतच चालला. पण ही भरती फार दिवस टिकली नाही. पुढें हळुहळू नीळकंठाची बाजू घसरणीस लागली. आणि अखेरीस त्यास मौन धारण करणें भाग पडलें ! ! शंकराचार्यांनी आपल्या अद्वैतमताचा हुकमी मोहरा पुढें ढकलून नीलकंठावर मात केली ! शैवमत फिक्कें पडलें आणि अद्वैत मताचा विजय झाला.

तेव्हां नीलकंठाने आपल्या मताचा दुरभिमान टाकून देऊन, अद्वैता पुढें मान वाकवून, आपल्या सर्व शिष्यवृंदासह अद्वैतमताचा स्वीकार करून तो आचार्यांचा एकनिष्ठ भक्त व आनुयायी झाला !! हा आचार्यांचा मोठा विजयच होय. यानंतर आचार्यांनी आपला मुक्काम हालवून

सौराष्ट्रांत जाऊन तेथें तेथें मुक्काम करीत करीत अखेर द्वारकेस येऊन पोंचलें.

(७) **द्वारका**:- द्वारका ही नगरी श्रीकृष्णाची सुवर्णनगरी म्हणून इतिहासप्रसिद्ध आहे. ही काठेवाडांत समुद्र किनाऱ्यावर अगदी पश्चिमेच्या टोकांवर वसलेली आहे. येथें शंकराचार्य आले त्यावेळीं पांचरात्र वैष्णव मताचें मोठें प्राबल्य होतें. हे लोक दंडावर व छाती-वर शंखचक्रांकित तप्तमुद्रे धारण करून कपाळावर ऊर्ध्वपुंड लावून, कानांत तुळशीपत्र ठेवून विष्णूची अनन्यभक्ति करणारे असे होते. हे मोठे भेदवादी असून, 'न विष्णोः पर दैवतम्' असे अट्टाहासाने सांगणारे परम विष्णुभक्त होते. हें कट्टर द्वतवादी असून, जीव व ईश्वर यांचा परस्पर भेद, जीवाजीवांमधील भेद, जीव व जड यांतील भेद, ईश्वर व जड यांतील भेद, आणि जड व जड यांतील परस्पर भेद, असे पांच प्रकारचे भेद मानणारे हे द्वैतोपासक असून या त्यांच्या मताला उद्देशून त्यांना पांचरात्र ही संज्ञा प्राप्त झाली होती. याशिवाय शैव, शाक्त, सौर पंथांच्या लोकांची वस्तीहि तुरळक तुरळक होती. या सर्व मताचें आचार्यांनी वैफल्य दाखवून त्यांना अद्वैत मतांचें सत्यत्व व श्रेष्ठत्व पटवून, अद्वैतमतवादी बनविलें. नंतर तेथें अद्वैतमठाची स्थापना करून त्यावर हस्तामलकाचार्य यांची नेमणूक केली. व अद्वैतमताचा प्रचार व प्रसार करण्याची त्याभागांत शाश्वत व्यवस्था करून नंतर तेथून मुक्काम हलविला व उज्जनीस प्रयाण केलें.

(८) **उज्जनी**:-उज्जनी हें पुराणप्रसिद्ध शहर असून, त्याची गणना सप्तपुरींत करण्यांत येते. हें शिवस्थान असून तेथील लिंगाला चंद्रशेखर महाकालेश्वर असें म्हणतात. येथेंच या शिवमंदिरांतच आचार्यांनी आपलें

प्रस्थान ठेवून तेथें दोन महिने मुक्काम केला. येथे प्रसिद्ध पूर्व मीमां-सक भट्टभास्कर रहात होता. तो जाडा वेदांती पंडिताहि होता. इतकेंच नव्हे, तर ब्रम्हसूत्रावर त्यांने भाष्यहि लिहिलें होतें. पण ते द्वैतपर होतें. या भट्टभास्कराची बातमी आचार्यांस लागतांच त्यांनी पद्मपादास त्याज-कडे पाठविलें. पद्मपादानें आचार्यांचा निरोप त्यास कळविला. तो भट्ट भास्करास म्हणाला- हे पंडितवर्या ! दिगंतकीर्ति भगवान श्रीशंकराचार्य येथें आले आहेत. अद्वैतमताचा - जीवशिवेश ऐक्याचा — प्रसार करण्या-करता ते संचारास निघाले असून, ज्यांना तें मत पटत नाहीं, त्यांच्याशी शास्त्रीय चर्चा करून त्यांना ते पटवून देऊन अद्वैतमताची दीक्षा देतात. आपणास तें पटवून द्यावें, म्हणून त्यांनी आपणाला मंदिरांत बोलाविलें आहे. आपण अद्वैतमताचा स्वीकार करावा, असें त्यांना वाटतें.

तेव्हां तो स्वाभिमानी कट्टर मीमांसक त्या भाषणाने रोषयुक्त होऊन त्यास म्हणाला, हे यतींद्र शिष्या ! तुझ्या गुरूला माझा वृत्तांत ठाऊक नाहींसा दिसतो. मी रचलेल्या ब्रम्हसूत्रावरील भाष्य ग्रंथांत कणादाच्या तत्त्वज्ञानाला सुरुंग लावला आहे. व कपिलाचें शास्त्र म्हणजे भाकडकथा ठरविलें आहे ! तुझ्या गुरूला मी थोडाच दाद देणार !

याला पद्मपाद म्हणाला :- अशी अवहेलना करणे पंडिताला शोभत नाहीं. पाषाण जरी पर्वतप्राय असला तरी, त्याला फोडून ठिकऱ्या करायला वज्र हें समर्थ आहे. हें तूं विसरलास काय ? असे म्हणून अधिक न बोलता तो तेथून परतला.

नंतर आचार्यांजवळ येऊन घडलेली हकीकत त्यांस निवेदन केली. इतक्यांत तो भट्टभास्कर मागोमाग आलाच. आचार्यांनी त्याचा

योग्य परामर्श घेऊन आपल्या अद्वैतमताची प्रस्तावना त्याच्यापुढें केली. पण ती भट्ट भास्कराला तितकीशी पटली नाहीं. उलट तो आपल्या बाजूचें – जींव शिव भेदाचें– समर्थन करूं लागला. जसें शंकराचार्य तसाच भट्टभास्करहि वेद वेदांतांत पूर्ण तरबेज होता. पूर्व मीमांसा शास्त्रांत त्याचा हातखंडा व त्या दृष्टीनें ब्रम्हसूत्रावर भाष्य रचण्याचीहि त्याची योग्यता. तेव्हां तो आचार्यांना सहज हार जाईल, हें शक्य नव्हतें. तेव्हा त्यांनी वाद करून या प्रश्नाची वासलात लावावी असें ठरून, त्याप्रमाणें वादास प्रारंभ झाला.

दोघेहि वेदवेदांतांत पूर्ण रूढलेले घन पंडित. प्रत्येकजण स्वपक्षसम– र्थनार्थ शास्त्राचा बिनतोड आधार देऊन आपली बाजू बळकट करूं लागला. वाद फार दिवस चालला. मंडनमिश्राच्या वेळीं आचार्यांना विजय संपादनार्थ जे श्रम करावे लागले, तसेच व तेवढेंच परिश्रम या वेळेला करणेहि भाग पडलें. दोन मोठ्या ज्ञानविरांची ही मोठी लढत होती. तो शास्त्रीय वाद येथें न देतां फक्त इतकेंच सांगतो कीं अखेर भट्ट भास्करानें पुढें वादांत आपटी खाल्ली व आचार्यांच्या मताला मान्यता देऊन अखेर तो त्यांचा अनुयायी बनला ! याप्रमाणें भट्ट– भास्कराला स्ववश करून घेतल्यावर आचार्यांचें तेथील कार्य संपल्यासारखें झालें व ते तेथून निघून बाल्हिक देशाच्या रस्त्यास लागले.

९) **बाल्हिक :–** हा बाल्हिक देश भरतखंडाच्या बाहेर असून तो पुढें ब्याक्टिरिया या नांवाने प्रसिद्ध झाला. येथें आल्यावर तेथें बौद्ध व जैन यांचें प्राबल्य असल्याचें त्यांस दिसून आलें. ते शिष्यास उपदेश करीत बसले असतां एक जैन साधु तेथें आला. तो अर्हत् म्हणवीत होता. मोठा जैन पंडित होता. त्याचा व आचार्यांचा जैन

धर्मावर मोठा कडाक्याच्या वादविवाद झाला. तेथें जैन अर्हताने जीवास्तिकाय, पुद्गलास्तिकाय, धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय व आकाशास्तिकाय या पांच आस्तिकायांचें व जीव व जड यांचें सूक्ष्म वर्णन करून, तदनुषंगाने आपल्या धर्माचें महत्व व रहस्य याचा महिमा व सत्यत्व इत्यादि गोष्टी मोठ्या आवडीनें व शिताफीनें विशद करून सांगू लागला. शंकराचार्यांनी मधुन मधुन पुष्कळ शंका घेऊन त्यास त्याचें समाधान करण्यास आव्हान केलें. तो सर्व संवाद शंकर दिग्विजयांतील टीकेंत सविस्तर देण्यांत आला असून, त्याचा अनुवाद येथें करून हें प्रकरण अधिक लांबविणे आम्हांस प्रशस्त न दिसल्यामुळें त्या भरीस आम्ही पडूं इच्छित नाहीं. तात्पर्य इतकेंच कीं पुढें तो अर्हत् आचार्यांपुढें निर्बुद्ध होऊन त्यास त्यांने शरण चिठ्ठी दिली. बौद्धांचाहि येथे पराभव करण्यांत आला.

१०) **कामरूप :–** वरीलप्रमाणें बाल्हिक देशांतील जैन व बौद्ध ( माध्यमिक ) यांचा वादांत पराभव करून, त्यांना अद्वैत पंथांत समाविष्ट करून, तेथून मुक्काम हालवून आचार्यांपुढें संचार करीत करीत कामरुपांत येऊन पोंचलें. कामरुप म्हणजे हल्लीचा आसामप्रांत. तेथें त्यावेळीं शाक्तमत फार बोकाळलें होतें. तेथील बहुतेक जनता शाक्तपंथी होती. त्यांच्यांत अभिनवगुप्त हा नामांकित पंडित असून त्यानें शाक्तपंथाला धरून ब्रह्मसूत्रावर भाष्य रचना केली होती. एवढा जाडा विद्वान महापंडित होता तो. तो अभिनव गुप्त ! तेथें गेल्यावर त्याची व आचार्यांची गांठ पडली. त्या दोघामध्यें अद्वैत का द्वैत याविषयीं चर्चा चालून अखेर अभिनव गुप्ताला आचार्यांच्या युक्तिवादापुढें पड खावी लागली. पण तो मत्सरी स्वभावाचा असल्यामुळें आचार्यांवर त्याचा दांत बसला. पण वरकरणी त्यानें तसे

न दाखवितां आचार्यांचा तो शिष्य बनला. याप्रमाणें कामरूपांत अद्वैत पताका फडकावून आचार्य नंतर विदेहांत आले. तेथून कौशल, अंग, वंग, कालिंग हे देश घेऊन शेवटी गौड देशांत उतरले.

११ ) **गौड :–** गौड देशांत आल्यावर तेथें त्यांना मुरारि–मिश्र व धर्मगुप्त या पंडितांची गांठ पडली. त्यांना चीत करावयास आचार्यांस फार श्रम पडले नाहींत.त्याना वादांत हां हां म्हणतां त्यांनी खालीं पहावयास लावलें.

याप्रमाणे भरत खंडभर फिरून बौद्ध, शाक्त, वैशेषिक, लोकायत म्हणजे चार्वाक, काणादे, सांख्य, पातंजल, ' शैव ' वैष्णव, अद्वैत विरोधी इत्यादि अद्वैतविरोधि पंडितांबरोबर वाद करून, सर्वांची तोंडे बंद केली. आचार्यां-पुढें त्या सर्वांना अखेर निरुत्तर व्हावें लागले. याप्रमाणें आसेतु हिमा-चल प्रवास करून ठिकठिकाणीं अद्वैत विरोधी असंख्य द्वैतवादी पंडि–तांचें खंडण करून, अद्वैत तत्त्वज्ञानाची विजयी पताका सर्व भरतखंडभर मिरवीत नेली. श्रीमच्छंकराचार्यांचा हा असा अलौकिक दिग्वि–जयाचा संक्षिप्त रूपांतला हा मोठा श्रवणीय व बोधप्रद इतिहास आहे. हें सर्व थोडक्यांत सांगावयाचें म्हणजें या पुढील श्लोकापुढें बोट दाख-वून प्रकरणाला पूर्ण विराम देतो म्हणजे झालें.

**' इति सकलदिशासु द्वैतवार्तानिवृत्तौ**
**स्वयमथ परितस्तारायमद्वैतवर्त्म ।**
**प्रतिदिनमपि कुर्वन्सर्वसंदेहमोक्षं**
**रविरिव तिमिरौघे सम्प्रशान्ते महः स्वम् ॥**

( शं. दि. १५–१७४ )

---

# प्रकरण ३३ वें

## गौडपाद–संदर्शन

**स्वस्थः सोऽयं ब्रम्ह सायं कदाचि–**
**द्ध्यायन्गङ्गापूरसङ्गार्द्रवातैः ।**
**आगच्छन्तं सैकते प्रत्यगच्छत्**
**योगीशानं गौडपादाभिधानम् ॥**

( शं. दि. १६–३३ )

मागच्या प्रकरणांत आचार्यांनी कामरूपांत अभिनवगुप्ताचा वादांत पराभव केला, हा मजकूर सांगण्यांत आलाच आहे. पण तेवढ्या वरच ती कथा थांबली नाहीं. पुढें तिला शेपूट फुटलें. अभिनवगुप्त हा जसा विद्वान होता, तसाच तो स्वभावानें मोठा मत्सरी व सूडबुद्धी होता. आचार्यांकडून झालेला पराभव त्याच्या काळजाला झोंबून राहिला व त्याचें उट्टें काढण्याची दुष्टबुद्धि त्यास रात्रंदिवस डिवचूं लागली. तो पंडित होता. तसा मांत्रिकहि होता. जारणमारण कला त्याला चांगली अवगत होती. अभिचार कृत्यांत तो पटाईत असून, त्याचा प्रयोग आचार्यांवर करून सूड उगविणेचे त्यानें मनांत ठरविलें व त्याप्रमाणें अभिचार प्रयोग करून, त्यांस ठार मारणेचा महारोग त्यांच्यावर घातला. त्यापासून आचार्यांना भगंदर रोगाची बाधा झाली.

तो रोग इतका भयंकर होता कीं त्याची चिकित्सा वैद्यकशास्त्रा– लाहि कठीण होऊन बसली रोग भयंकर होता. तसाच तो मोठा जबरहि

होता थोड्याच दिवसांत वेगाने उचल खाऊन त्याने आचार्यांस मोठ्या जेरीस आणलें. शरीरांतून रक्तस्राव सारखा चालू राहून कपडे सगळे रक्तानें भिजून चिंब होऊन जात. त्रोटकाचार्य सेवेस होता. म्हणून बरें. त्याने त्यावेळीं आचार्यांची अंग मोडून रात्रंदिवस मोठ्या निष्ठेनें सेवा केली. गुदाजवळ पाठीच्या कण्याखाली जखमेचे भगदाड पडून त्यांतून रक्त सारखे वाहत असल्यामुळें गुरुदेवांची प्रकृति दिवसेंदिवस झिजत व क्षीण होत चालली. त्याचप्रमाणें रोगाची बाधाहि जोरावत जाऊन असह्य बनत चालली. घरगुती उपायानें निभाव लागण्याचें लक्षण दिसेना. शिष्यवृंद घाबरत चालला. आता कांहींतरी वैद्यकीय उपचार केल्याशिवाय घडगत नाहीं असें त्यांच्या मनानें घेऊन पद्म–पादाला पुढें करून आचार्यांजवळ येऊन हात जोडून त्यांस नम्रतेनें म्हणाले – गुरुदेव ! आम्हा भावड्या शिष्यांची एक नम्र विनंति आहे.

आचार्यः– ( पद्मपादास उद्देशून ) ती काय पद्मपादा ?

पद्मपादः–आतां रोगाची उपेक्षा करणे हें आम्हांस नीट दिसत नाहीं. त्याची गय करणें आम्हांस भयप्रद वाटतें. कारण शत्रूचा काय, रोगाचा काय वेळींच बंदोबस्त केला नाही तर तो जसा शिरजोर होत जातो, तद्वतच या आजाराची उपेक्षा केल्यास तो मागेंपुढें प्राणावर बेतण्यास कमी करणार नाहीं. तेव्हा वेळींच औषधोपचार करून त्याचा बंदोबस्त करावा असें आम्हांस वाटतें.

आचार्य :– तुमचें म्हणणें बरोबर आहे. मग काय करावे म्हणता तुम्ही ?

पद्मपाद :– शरीरावर आपलें प्रेम व ममत्व नाही, हें आम्ही

जाणतो. म्हणून रोगाकडे आपण लक्ष देत नाही, हे योग्यच आहे. पण आम्हांला आपली व्यथा पाहून फार दुःख होते व काळजी वाटते. म्हणून विनंती कीं चांगल्या वैद्याकडून गुरुदेवांनी उपचार करून घ्यावा. आपणास त्याची गरज वाटत नसली तरी गुरुदेवांचे दुःख व कष्ट कमी करणें हें शिष्यांचें कर्तव्यच आहे. अतएव आपणास स्वास्थ्य मिळ-वून द्यावें असें आमचें मन आम्हास सांगते.

आचार्य :- पद्मपादा ! हें पहा, रोग हा जन्मांतरी केलेल्या पापाचा विपाक आहे. तो भोगूनच घालविला पाहिजे. त्या शिवाय गत्यंतर नाहीं. कर्म भोगल्याशिवाय नष्ट होत नाहीं. म्हणून शास्त्र-चिकित्सा तेथें कामास येंत नाहीं. व्याधीचे दोन प्रकार आहेत. एक कर्मोद्भव व दुसरा वातादि धातुकृत. पहिला प्रकार भोगानेंच क्षय पावतो. दुसरा मात्र चिकित्सेनें घालविता येतो. माझा हा रोग चिकि-त्सेचा विषय नाही. तो भोगूनच नष्ट केला पाहिजे आता रोगातच मृत्यु आला तर खुशाल येऊ दे ! मी त्यालाहि भीत नाही ! मला त्याचे दुःख नाहीं !

पद्मपाद :- गुरुदेव ! आपलें म्हणणे सत्य आहे. कारण आप-णास शरीरलोभ नाहीं पण आमची गोष्ट निराळी आहे. मासा जसा पाण्यावर जगतो, तद्वत आपल्या जीवावर आमचें जगणें आहे. आपण सुखी तर आम्ही सुखी. आपण दुःखी तर आम्ही दुःखी ! तर कृपा करून आमच्या समाधानासाठीं गुरुदेवांनी आमच्या विनंतीला सम्मति द्यावी.

याप्रमाणें शिष्यांचा आग्रह फार झाल्यामुळें त्यांच्या समाधाना-

साठीं म्हणून आचार्यांनीं अखेर त्यांच्या विनंतीस मान्यता दिली. आचार्य देवाकडून होकार मिळतांच शिष्यांना मोठा आनंद झाला व लगेच इकडे तिकडे फिरून ते चांगल्या नामांकित भिषग्वरांना शोधून घेऊन आले. वैद्यानी रोग पाहिला व औषधोपचारहि केले. पण कशानेहि गुण येईना. व रोग हटेना. त्यानी आपल्या विद्येची शिकस्त करून पाहिली, पण सगळे व्यर्थ ! त्यांनी शेवटी हात टेकले व हा 'रोग असाध्य असून आमच्याकडून बरा होत नाही' असें सांगून ते निघून गेले.

नंतर आचार्यांनीं महादेवाचें ध्यान केलें. तेव्हा त्या देवाधिदेवानें भिषक् आश्विनी कुमारांना तिकडे पाठविलें. त्यांनी येऊन रोगचिकित्सा केली. पण त्यांनाहि ती साधली नाहीं. तेहि आले तसे परत निघुन गेले,

नंतर शिष्यांना विचार पडला. इतक्यांत सुदैवाने यांना एक युक्ति सुचली. पद्मपादासहि मंत्रविद्या अवगत होती. शेवटीं त्यानें त्याचा प्रयोग करून पाहण्याचें ठरविलें. आचार्यांनीं शत्रूवरदेखील सूड घेऊं नये, या दयार्द्र बुद्धीने तसें न करण्यास सांगितलें. तरी दुष्टाला दंड केलाच पाहिजे, हें शास्त्रवचन लक्षांत घेऊन, त्यानें मंत्राचा जप केला. त्याचा परिणाम असा झाला कीं आचार्यांचा रोग हटत चालला व तो अभिनवगुप्ताला जडत चालला. शेवटीं परिणाम असा झाला कीं तो दुष्ट क्रूरबुद्धि अखेर त्या रोगानेच मरण पावला ! व आचार्यांची प्रकृति सुधारून पूर्वींप्रमाणें निकोप झाली ! !

यानंतर आचार्यांची प्रकृति दिने दिने सुधारत जाऊन, पुढें

लवकरच ते पूर्वस्थितीवर आले. नंतर ते दररोज गंगेच्या वाळवंटात जाऊन संध्याकाळच्या प्रशांत वेळीं ब्रम्हचिंतन करूं लागले. अशाच एका दिवशीं ते वाळवंटात बसून ब्रम्हचिंतन करीत बसले होते. ती संध्याकाळची वेळ होती. गंगेच्या प्रवाहावरून मंद मारुत वाहत येत असून त्याचा सुशीतल मधुर स्पर्श मनाला सुखवीत व आल्हादवीत होता. अशा समयीं आचार्यांना एक योगिराज गंगेच्या कांठावरून आपल्याकडेच चालत येत असलेला दूरून दिसला. येतां येतां तो आचार्यांजवळ येऊन तेथें त्यांच्यासमोर उभा राहिला.

त्या योगिराजाची मूर्ति अत्यंत तेजःपुंज होती. मस्तकावर स्फटिकाप्रमाणे शुभ्र झालेल्या जटा शोभत असून अंगावर भस्माचे पट्टे ओढले होते. एका हातांत कमंडलु व दुसऱ्या हातांत रुद्राक्षमाळ असून ती बोटावरून हळुहळु रुळत होती. त्या दिव्य मूर्तीला पाहतांच आचार्य आदराने चटकन् उठले व साष्टांग नमस्कार घालून हात जोडून उभे राहिले ते योगिराज म्हणजे गौडपाद गोविंद पादाचे गुरुदेव ! गौडपादांनी त्यांच्याकडे प्रसन्न मुद्रेनें पाहून, त्यांना आशीर्वाद दिला. नंतर आचार्यांचा हात धरून त्यांना जवळ घेऊन गौडपाद म्हणाले ' आचार्य ! मला तूं ओळखिलें नाहींस काय ? मी गौडपाद ! तुझ्या गुरुचा गुरुं ! गोविंदपादाने मला तुझी कीर्ति सांगितली व शारीर-सूत्रावर भाष्य लिहिल्याचेंहि सांगितलें. तें कसें काय आहे, हें पहावें असें मनांत येऊन व तुला भेटावें या इराद्याने मी आज येथें आलो आहे. तर मला तें तुझें भाष्य पहावयाचें आहे. दाखवशील तर बरें !

' मी गौडपाद ' म्हणतांच आचार्यांना सकौतुक आनंदानें भरतें

आलें आणि न येऊन काय करील? जी गोष्ट ध्यानीमनीहि नव्हती, ती अचानकपणें प्रत्यक्ष घडून आली, तर कोणाला आनंद नि विस्मय वाटणार नाहीं? कोण आश्चर्यचकित होणार नाहीं? तशांत गुरूच्या गुरूदेवांचें – परात्पर गुरूचें – दर्शन झालेले पाहून आचार्यांचें अंतः–करण भक्तियुक्त हर्षानें उचंबळूं लागलें, यांत नवल तें काय!

लगेच ते मुक्कामास जाऊन आपले सर्व ग्रंथ घेऊन आल्यावर सूत्रभाष्य उघडून गौडपादांना वाचून दाखविते झाले. प्रगुरु देवांना तें भाष्य पाहून मोठा हर्ष झाला व लगेच आचार्यांना – याचप्रमाणें माझ्या कारिकांवरहि भाष्य लिहिलें आहेस, असें गोविंदपादानी सांगितलें. 'तें कुठें आहे? मला पाहूं दे तें!' नंतर आचार्यांनी तें भाष्यहि उघडून वाचून दाखविलें व इतर ग्रंथ लेखनहि पुढें ठेविलें. गौडपादास तो सगळा ग्रंथभांडार पाहून परमानंद झाला. ते म्हणाले– आचार्य! आपण लिहिलेल्या मांडूक्य भाष्य श्रवणानें मी अत्यंत हर्षित झालो आहे. तुजवर मी पसन्न झालो आहे! हवा तो वर माग!'

तेव्हां शंकर हात जोडून म्हणाले-गुरुदेव! आपण प्रत्यक्ष शुकमुनीचे अवतार आहा! आपल्या दर्शनाने मी धन्य व कृतार्थ झालो! आपण स्वतः विष्णूदेव आहात! आपल्या दर्शनापेक्षा श्रेष्ठ वर आणखी दुसरा काय आहे? आणि मी काय मागणार? पण मागायचेंच्च झालें तर हे परात्पर गुरुदेवा! माझें मन सदैव ब्रम्हचिंतनांत रत असावें, हा वर द्या! ('संततमात्मचिंतनमेवास्तु। नान्यं वरं याचें') गौडपाद 'तथास्तु' म्हणून तेथून अंतर्धान पावले. ही गोष्ट आचार्यांनी दुसरे दिवशीं सकाळीं आपल्या शिष्यवृंदास कळविली. तेव्हां सर्वत्र तेंथे आनंदी–आनंद बहरला!!

## पंचलिंग स्थापना

आतां जातां जातां आणखी एक गोष्ट सांगावयाची राहिली ती सांगून पुढें चालूं लागतो. ती म्हणजे पंचलिंग स्थापना. बदरींत असतांना त्यांना स्वयंभू सुंदर स्फटिकाचे लिंग मिळाले होते त्यांची स्थापना त्यांनी पुढीलप्रमाणें केली. त्यांतील, भोगलिंगाची स्थापना श्रृंगेरी येथील शारदा मठांत, योगलिंगाची स्थापना कुंभ–कोणम् येथें, मोक्षलिंगाची स्थापना चिदंबर येथें, वरलिंगाची स्थापना नेपाळांत व मुक्तिलिंगाची स्थापना बदरी येथें करण्यांत आली. अर्थात् हें सर्व त्यांच्या दिग्विजय यात्रेंत अगर–मागे पुढें घडून आलें. असो.

---

## प्रकरण ३४ वें

## पीठारोहण

**सर्वज्ञतैकैव भवेन्न हेतुः पीठाधिरोहे परिशुद्धताच ।**
**सातेऽस्ति वा नेति विचार्यमेतात्तिष्ठ क्षणं त्वं कुरु साहसंमा ॥**

( शं. दि. १६–८४ )

**त्वं चाङ्गनाः समुपभुज्य कलारहस्य**
**प्राविण्यभाजनमभूर्यतिधर्मनिष्ठः ।**

**आरोढुमीदृशपदं कथमर्हता ते**
**सर्वज्ञतेव विमलत्वमपीह हेतुः ॥ ( १६-८६ )**

( शं. दि. १६, ८४-८५. )

**शुद्धाः कुलीना विदिताखिलार्थाः**
**पीठं समारोढुमिदं प्रशस्तम् ।**
**योग्या न योग्या इतरेऽप्रशस्ता -**
**स्तिष्ठ क्षण त्वं कुरु साहसंमा ॥**

( व्यासाचलकृत शंकर विजय, १२-७९ )

१२) काश्मीरदेश हा भूलोकीचें नंदनवन म्हणून प्राचीन कालापासून त्याची ख्याति आहे. तेथील नैसर्गिक सौंदर्य मनाला वेड लावतें, हें कांहीं खोटें नाहीं. त्याचप्रमाणे तो देश विद्या व कला यांतहि चांगला लौकिक मिळवून आहे. तेथील प्राचीन पंडितांनी संस्कृत साहित्याच्या विविध क्षेत्रांत विद्वत्ताप्रचुर अशी अलोट ग्रंथसंपत्ति निर्माण करून संस्कृत वाङमयाची भरघोस सेवा केली आहे, हें भारतीय विद्वानांना नव्याने सांगण्याची जरुरी नाहीं. दर्शन, काव्य, व्याकरण इत्यादि विविध शास्त्रांचे काश्मीर हें प्राचीन काळीं मोहरघरच बनल होतें, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. भगवती शारदांबेचें ते निवासस्थान असून, तेथील सर्वज्ञपाठाची ती अधिष्ठात्री देवता होती. ज्यानें सकलविद्या व कला यांत नैपुण्य प्राप्त करून घेतलें आहे, त्यालाच त्या पवित्र पीठावर अधिरोहण करणेचा अधिकार होता.

या शारदामंदिराला चार दिशांस चार महाद्वारें असून मंदिरांत साक्षात् शारदांबेचा निवास होता. जो सर्वज्ञ आहे, तोच या देवीचें दर्शन घेऊन त्या सर्वज्ञ पीठावर आरोहण करण्यास सत्पात्र आहे, असें गणले जाई. इतरांस तेथें मज्जाव असे. या मंदिराचे शंकराचार्यांच्या काळीं पूर्व, पश्चिम व उत्तर दरवाजे खुले असून दक्षिणेकडचा मात्र बंद होता. याचे कारण असें सांगण्यांत येते कीं पूर्व, पश्चिम, उत्तर दिशांकडचे विद्वान पंडित येथें येऊन सर्वज्ञ ठरल्यामुळें ते दरवाजे त्यांना उघडण्यांत आले. दक्षिणेकडील तसा प्रथितयश सर्वज्ञ पंडित तेथें न आल्यामुळें तो दरवाजा बंद करून ठेवण्यांत आला होता.

ही बातमी शंकराचार्यांना काशी येथें असतांना लागल्यावरून दाक्षिणात्यांच्या नांवाला लागलेला हा कलंक धुवून काढण्याचें त्यांच्या मनानें घेतलें. यावेळपर्यंत सर्व भरतखंड फिरून, तेथें तेथें अनेक विद्वान पंडितांशी वादविवाद करून दिग्विजय करण्याचें महाकार्य आतां समाप्त झाले होतें. व वयोमानहि बत्तीशीच्या घराजवळ येऊन पोचलें होतें. तेव्हां काश्मीरास जाऊन तेवढें सर्वज्ञ पीठ अधिरोहण करावें व दाक्षिणात्यांच्या नांवाला लागलेला डाग तेवढा पुसून काढावा, या इराद्यानें त्यांनी काश्मीरास जाण्याचें ठरविलें व शिष्यमंडळी बरोबर घेऊन तिकडे कूच केलें.

पुढें शारदामंदिरांत आल्यावर ऐकल्याप्रमाणें दक्षिणेकडचा दरवाजा बंद होता. बाकीचे तीन दरवाजे उघडे होते. आचार्यांनीं मंदिराच्या दक्षिण दरवाजाकडे जाऊन, जोराचा धक्का देऊन तो उघडला व आंत जाण्याचा प्रयत्न केला. तो इतक्यांत आंतली पंडित मंडळी चौबाजूंनी त्यांच्यावर धावून आली. आणि म्हणूं लागली कीं

प्रथम सर्वज्ञतेची साक्ष पटवून देऊन मग आंत प्रवेश करावा. तो-पर्यंत त्या दरवाजांतून येण्याची बंदी आहे. आचार्यांना तरी काय, तेंच पाहिजे होतें. वाद म्हणजे त्यांच्या तळहाताचा मळ. अनायासे ही सुवर्णसंधि चालून आलेली पाहून त्यांना मोठा हुरूप आला आणि त्या पंडितांबरोबर वाद करण्यास ते सिद्ध झाले.

तेथें प्रत्येक शास्त्रांत निष्णात असलेल्या पंडितांचा मोठा मेळावा होता. प्रत्येक शास्त्रांत वाग्युद्ध करणारे असे अतिरथी, महारथी ज्ञान-वीर तेथें जमले होते. त्यांनी प्रत्येक शास्त्रांत अत्यंत निपुण व वादकुशल असलेल्या अशा एकेका ख्यातनाम पंडिताची आपल्यातून निवड करून, शंकराचार्यांशीं सामना देण्याची तयारी केली. प्रत्येक पंडितानें आपापल्या शास्त्रांतील सूक्ष्म व कठीण प्रश्नांचा भडिमार करून, त्यांना रंजीस आणण्याचे विश्वप्रयत्न केले. त्यांत कणाद, पांचरात्र, कापालिक, नैयायिक, शाक्त, बौद्ध, वैष्णव, पशुपत गाणपत्य इत्यादींचे महान् महान् पट्टीचे पंडित होते. पण सर्वज्ञ आचार्यांनीं त्या सर्वांना धैर्यानें तोंड देऊन, प्रतिपक्ष्यांच्या प्रश्नाला सरळ व समर्पक उत्तरें देऊन त्यांना चकित करून सोडलें. वादक्षेत्रांत सर्व पंडितांचा पराभव झाला आणि आचार्यांना विजयश्रीनें माळ घातली आपल्या सर्वज्ञतेची अचार्यांनीं त्यांना संपूर्ण साक्ष पटवून दिली. गुरूदेवांचे विविध शास्त्रांतील व पंथांतील नैपुण्य, पारंगतता व जय्यत तयारी पाहून तेथील पंडितांना आश्चर्याचा धक्का बसला व त्याच-वेळेस त्यांचें ज्ञानभांडार व वादकौशल्य पाहून परम संतोषहि झाला! आचार्यांना त्यांनी सर्वज्ञतेचे प्रशस्तिपत्र देऊन दक्षिणद्वारानें मंदिरांत प्रवेश करण्यास अनुमति दिली.

याप्रमाणें आचार्य दक्षिणद्वारानें शिष्यांसहित मोठ्या उत्साहानें प्रवेश करून शारदांबेच्या सर्वज्ञपीठावर आरोहण करण्याचा प्रयत्न करीत असतां, एकदम शारदादेवी प्रगट होऊन म्हणाली-हां आचार्यजी ! जरा सबूर करा ! असें साहस एकदम करूं नका ! तुम्ही सर्वज्ञ आहां याविषयीं आतां संदेह नाहीं. पूर्वी ब्रह्माचा अवतार म्हणविणाऱ्या पंडित कुलशेखर मंडनमिश्राबरोबर दणदणीत वाग्युद्ध करून, सखोल ज्ञानाची मार्मिक चमक दाखवून त्यास तुम्ही खालीं पाडलें, हें खरें. त्याचप्रमाणे त्याची सुविद्य पत्नी उभयभारती इच्याशीहि सरस व सफाईदार वादविवाद करून तिलाहि अखेर निरुत्तर केलें,हेंहि खरें. अनेक भल्याभल्या पंडितांशी विविध शास्त्रांवर चौरस चर्चा करून त्यांनाहि खडे चारले, हें सर्व मला कबूल आपण सर्वज्ञ आहां हें मी नाकारीत नाहीं. पण आचार्य ! हें माझें सर्वज्ञपीठ आरोहण करण्यास फक्त सर्वज्ञता हें एवढेंच कारण पुरेसें नाहीं तो अधिकार व ती लायखी केवळ सर्वज्ञतेवरच अवलंबून नाहीं.

शंकर– तर मग कशावर आहे ?

शारदा– सर्वज्ञतेबरोबर शुद्ध व निर्मल चारित्र्यहि लागतें.

शंकर– मग माझें नाहीं कीं काय ?

शारदा– त्याचा आपणच विचार करा. क्षणभर थांबा ! आणि आपलें चारित्र्य निर्मल व निर्दोष आहे काय, हें विचार करून आपणच सांगा !

शंकर– देवि ! माझें चारित्र्य निर्दोष आहे.

शारदा– काय ? निष्कलंक ! काय बोलतां आचार्य हें तुम्ही ! केवढें हें साहस ! आचार्यजी ! आपण वस्तुस्थिति लपवून ठेवीत

आहा. पण मजजवळ तें लपणार नाहीं. आपण उघड उघड सत्यापलाप करीत आहा.

शंकर– नाहीं, देवि ! नाहीं, मी सत्यापलाप करीत नाहीं. पुनः सांगतो, मी निष्कलंक आहे. शुद्ध आहे. पवित्र आहे. निर्मल आहे. निर्दोष आहे. देवीस माझ्यांत कांहीं वावगें दिसल्यास तसें स्पष्ट सांगावें.

शारदा– सांगू ? ऐका तर, सांगते. आपण संन्याशी ना ?

शंकर– होय, देवि ! मी संन्याशी. बाल संन्याशी.

देवि– प्रपंच सुखाचा–विषय सुखाचा–त्याग करून.

शंकर– अर्थात् ! यात शंका कसली ?

शारदा– अमरुक नामक मृत राजाच्या शरीरांत चोरून प्रवेश करून परभार्या गमन केलें, हे कसें काय ? हें व्यभिचारकर्म संन्याशाला कसें शोभतें ? संन्याशाला सर्वथैव निषिद्ध सांगितलेल्या शृंगारकला-कामकला–शिकून राजस्त्रीशी यथेच्छ रतिविलासांत मग्न झाला. हें काय संन्यासधर्माला धरून झालें ? अशा प्रकारचा देहतर्पणरत विलासी संन्याशी पवित्र आचरणाचा कसा होतो ? सांगा, यतिराज, सांगा, आपण सर्वज्ञ असला तरी आचारभ्रष्ट नाहीं का ? तेव्हां या पीठावर आरोहण करण्यास आपण अनर्ह आहा ! अपात्र आहा ! आता ते पाप करूं नका ! स्पष्ट सांगते, तें पाप करूं नका !

शंकर [हात जोडून]:– हे जगन्माउली ! हे देवि शारदांम्बे ! मी खरेंखुरें सांगतो कीं, जन्मदारभ्य या घटकेपर्यंत मी कसलेंच पातक

कसलेंच निषिद्धकर्म–केलें नाहीं. आता रतिविलास केला, स्त्रीसुख अनुभविलें असें आपण म्हणता हें खरें. पण देवि ! तें शरीर हें नव्हें. तें दुसरें होतें, निराळेंच होतें. दुसऱ्या देहानें केलेल्या कर्मानें हें माझें प्रस्तुतचें शरीर कोणत्याहि प्रकारें लिप्त–दूषित–होत नाहीं ! [' नास्तिनू शरीरे कृतकिल्बिषोऽहम् । जन्मप्रभृत्यम्ब न संदिहे ॥ व्यधायि देहान्तर–संश्रयद्यत् । न तेन लिप्येताहि कर्मणाऽन्य ॥' शं. दि. १६–८६ ']

शारदाम्बेला आचार्यांचा हा सरस व प्रौढ युक्तिवाद पटला व तिनें तो मान्य केला ! त्यांस पीठावर जाऊन अधिरूढ होण्यास आनंदानें अखेर अनुमति देऊन ती देवता अंतर्धान पावली.

तेथील लोकांना हा सर्व अनपेक्षित प्रकार व आचार्यांचा समयोचित युक्तिवाद पाहून महदाश्चर्य वाटलें. व आनंदहि झाला. त्यांनीं आचार्यदेवांस त्यांची विद्या व प्रभाव पाहून साष्टांग नमस्कार घातला. सर्वज्ञ शंकराचार्यांनी पद्मपाद व हस्तमलक यांचें हात धरून जयघोषांत त्यापूज्य व पवित्र सर्वज्ञपीठावर आरूढ होऊन जगद्गुरूचा श्रेष्ठ मान पटकावला ! ! कारण जगद्गुरु म्हणविणेस तोच पात्र होतो कीं ज्यानें या शारदापीठावर चढण्याचा अपूर्व मान प्राप्त करून घेतला ! इतरांस ती पदवी लावून घेणेचा अधिकार पोंचत नाहीं, असा सनातनी परिपाठ आहे.

---

# प्रकरण ३५ वें

## कैलासाधिरोहण

एवं प्रकारैः कालिकल्मषघ्नैः
शिवावतारस्य शुभैश्चरित्रैः ।
द्वात्रिंशदत्युज्ज्वलकीर्तिराशेः
समाव्यतीयुः किल शंकरस्य ॥


(१६-९६)

इन्द्रोपेन्द्रप्रधानैस्त्रिदशपरिवृढैः स्तूयमानः प्रसूनै-
र्दिव्यैरभ्यर्चमानः सरसिरुहभुवा दत्तहस्तावलम्बः ।
आरुह्योक्षाणमग्र्यं प्रकटितभुजगजाजूट चन्द्रावतंसः
शृण्वन्नालोकशब्दं समुदितमृषिभिर्धाम नैज प्रतस्थे ॥

(शं. दि. १६-९६ व १०७)

गुहाप्रवेशः कल्यब्दे चन्द्रनेत्रांकवन्हिगे ।
वैशाखे पूर्णयां तु शंकरः शिवतामगात् ॥

प्रथम कैलासाधिरोहणाच्या पूर्वीचा थोडासा वृत्तांत देऊन मग कैलासाधिरोहणाची माहिती देऊन भागलेल्या लेखणीला विश्रांति देतो. काश्मीर येथील सर्वपीठावर अधिरोहण करून दाक्षिणात्यांस लागलेला कलंक धुवून काढून आचार्यदेवांनी दिग्विजयाच्या तत्वज्ञानमंदिरावर



आद्य श्री शंकराचार्य समाधी ( हिमालय )

दिगंतकीर्तीचा सुंदर सुवर्णकळस चढविला. येथें श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य पूज्यपादाचें जीवनध्येय व जीवित कार्य आता परिपूर्ण झालें. पुढें काहीं करण्याचें शिल्लक राहिलें नाहीं. आतांपर्यंत त्यांनी केलेलें कार्य व गाजविलेला पराक्रम काय थोडा आहे ? अस्खलीन भारतातील सर्व प्रसिद्ध प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांचे व प्रसिद्ध शहरांची पदयात्रा करून पवित्र दर्शन घेत घेत तत्कालीन पट्टीच्या नामवंत पंडितांबरोबर विविध शास्त्रीय व धार्मिक विषयांवर खणखणीत वादविवाद करून त्यांच्यावर आपला हुकमी विद्वत् - प्रभाव गाजविला. प्रस्थान त्रयीवर अद्वैत-भाष्यांचे चमकदार पैलू पाडून त्यांना सरस्वतीच्या पवित्र मंदिरांत शाश्वत नि अढळ असें दर्शनीय अग्रस्थान प्राप्त करून दिलें. जातील तेथें लोकांना वेदांतप्रणीत अद्वैत तत्त्वज्ञानाचा अर्थसुंदर व बोधमधुर असा ठसठशीत उपदेश करून त्यांच्या जिज्ञासु अंतःकरणावर हर्ष-निर्भर तृप्तीची अमृतवृष्टि केली. आपण उजळलेल्या तत्वज्ञानाची दिव्य ज्योत अखंड तेवत रहावी म्हणून चारहि दिशांत धर्मपीठाची शाश्वत स्थापना करून धर्मशिक्षणाची उदंड सोय करून ठेविली. पाखंडमत-मतांतरांचें खडसून खंडण करून, स्मृत्युक्त षण्मतांची प्राणप्रतिष्ठा केली. हिमालयातून पांच सुंदर स्फटिक लिंगे आणून, त्यांची शृंगेरी, चिदम्बरम्, बदरी, नीलकंठ व कामकोटि येथें मोठ्या समारंभा स्थापना केली. आपल्या दिव्य ज्ञानानें व मधुर वाणीनें अपूर्व असा लोकोत्तर तत्त्वोपदेश करून हजारो शिष्यांचा व लाखो भक्तांचा भव्य परिवार सभोवती जमविला, व याप्रमाणें अद्वैत तत्त्वज्ञानाचा विजयी झेंडा भरतखंडभर फिरवून व नाचवून तो चिरकाल फडफडत राहील अशी चक्क व चोख व्यवस्था करून ठेविली ! हें काय थोडें झालें ? आतां स्पष्टच सांगावयाचें म्हणजे जगद्गुरूची सार्थ व जगद्वंद्य पदवी मिळविणारे एकमेव आचार्यदेव म्हणजे हे आमचे परमपूज्य चारित्रनायक

श्री शंकराचार्यच ! धन्य झालें आचार्यदेव ! जगमान्य झाली त्यांची सारस्वत सेवा ! आणि अशा तेजस्वी ज्ञानभास्करानें पवित्र झाली भारतमाता, तीहि पण धन्य धन्यच झाली.

काश्मीरातील सर्वज्ञपीठावर आरोहण केल्यावर गुरुदेव पुढें कांही दिवस तेथेंच शंकर टेकडी येथें मुक्काम करून राहिले व तेथील पंडितांना व जनतेला अद्वैततत्त्वज्ञानाचा सुंदर व ठसठशीत उपदेश करून त्यांचें समाधान व समजूत केली. तेथील लोकांना त्यांचा नवा पण शास्त्रशुद्ध उपदेश ऐकून परमानंद झाला व ते त्यांचे भराभर अनुयायी बनले. याप्रमाणें तेथें राहून अद्वैतमताचें बीजारोपण करून त्यांनी तेथून आपला तळ हलविला व बदरीची वाट धरली. तत्पूर्वी आपण स्थापिलेल्या शृंगेरीपीठावर सुरेश्वराचार्यांची अध्यक्षपदी नेमणूक करून ठेवलीच होती. त्याचप्रमाणें द्वारकेच्या शारदा पीठावर पद्मपाद यांस व पुरीच्या गोवर्धन पीठावर हस्तामलक यांस नेमून त्यांची तिकडे रवानगी केली व कांहीं निवडक शिष्यमंडळी बरोबर घेऊन बदरीचा रस्ता धरिला.

**नेपाळ:**— मजल दर मजल करीत करीत ते नेपाळांत शिरले. तेथें त्यांस बातमी लागली कीं तेथील सुप्रसिद्ध पशुपतिनाथाची पूजाअर्चा सगळी उपेक्षित झाली असून बौद्धधर्माचें वेड व बंड देशांत फार माजून राहिलें आहे. तेथील पशुपतिनाथाचें देवालय हें फार प्राचीन असून, त्याची त्या प्रांतांत फार मोठी ख्याति होती. पण बौद्धधर्माचा वरचष्मा झाल्यामुळें हिंदु देवोपासनेला फार मोठें शैथिल्य व अवकळा प्राप्त झाली होती. त्यावेळीं तेथें राजा होता तो रजपूत वंशीय शिवदेव नांवाचा अर्थात् तो हिंदु होता. पण तेथील जनतेवर बौद्ध-

पंथाचा पगडा होता. बौद्ध आचार्यांचें वर्चस्व तेथें फार माजलें होतें. हिंदुपंडितांचें तेज मंदावलें होतें व त्यांची पकड खिळखिळित झाली होती. हिंदुधर्म लोपत चालला होता. देवालयें ओस पडत चालली होतीं. असा तो धर्मग्लानीचा व हिंदुवर्चस्वाचा हतप्रभ पडता काळ होता.

अशा धर्मऱ्हासाच्या वेळीं आचार्यांची स्वारी तेथें उपस्थित झाली. आचार्यांच्या आगमनाची राजास वर्दी लागतांच त्यास मोठा आनंद झाला व त्यांच्या दर्शनासाठीं त्यानें तिकडे धांव घेतली. राजा आल्याचें कळतांच आचार्यांनी त्याचा यथायोग्य आदरसत्कार करून संभाषणांत देशाची हकीकत विचारली. राजानें सर्व परिस्थितीची त्यांस जाणीव करून दिल्यावर आचार्यांनी त्यास अद्वैतमताचा सुंदर बोध करून त्यास हर्षित केलें. उपदेशानंतर राजानें अद्वैतमताचा स्वीकार करून त्यांचें शिष्यत्व पत्करलें. नंतर पशुपतिनाथाचा जीर्णोद्धार करून, त्यांची वैदिकपद्धतीनें पूजा-अर्चा करण्याची प्रथा घालून देऊन, ती चिरकाल अबाधित चालू राहण्याची योग्य व्यवस्था करून, तेथें आपल्या शिष्यांपैकीं एका नंबुद्री ब्राह्मणास पूजारी नेमून देवालयास राजाकडून योग्य वेतनहि मिळवून दिलें. आणि आजहि तेथील पूजारी हे नंबुद्रीपाद ब्राम्हणच आहेत. हे देवालय काटमांडू राजधानीपासून चार मैलांवर असून तेथें महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते. याप्रमाणें नेपाळांत पुनः हिंदुधर्माचा पुनरुद्धार करून, तेथें कांही काळ राहिल्यावर जाताना वरलिंगाची स्थापना करून तेथून त्यांनी आपला तळ हालविला व बदरीची वाट धरली

यावेळीं त्यांचे आयुष्य बत्तीसीच्या घरांत आलें होतें. बदरींत आल्यावर तेथें कांहीं काल बदरीनारायणाच्या सेवेंत व ब्रम्हचिंतनांत घालविण्याचा उपक्रम चालविण्यांत आला. पुढें तेथें मठस्थापना करून

त्याची देखरेख व व्यवस्था पाहण्यासाठीं त्रोटकाचार्योंची नेमणूक करून, तेथील मुक्काम हलवून केदाराची वाट धरली. अर्थात् आतां त्यांच्या आयुष्याची घडी भरत आली होती. केदारक्षेत्र म्हणजे थंडीचे माहेर-घर! तेथे थंडी मी मी म्हणत होती. तेथील गारठा बर्फालाहि लाजविणारा. त्यामुळें स्नानाच्या वेळीं शिष्यवृंदाची फारच तारांबळ उडे. नदीचें पाणी हिमगार असून, त्यांत बुडी मारली कीं सर्वांगात कापरें भरून शरीर सगळें कुडकुडून अगदी गारठून जाई. ही शिष्याची कष्टप्रद स्थिति पाहून आचार्यांस फार दया आली व त्यांनी महादेवाची प्रार्थना करून तेथें एक 'संतप्तवारीलहरी,' नांवाचें उष्णोदकाचें कुंड निर्माण केलें. तें आज 'नारायण कुंड' म्हणून प्रसिद्ध आहे. याप्रमाणें केदारांत भक्तगणांची व यात्रेकरूंची मोठी गैरसोय दूर करून केदारयात्रेंतील एक मोठी अडचण निरस्त केली !

आतां आचार्यांची बत्तीस वर्षांची जीवनयात्रा अगदी संतुष्टांत आली. पुढें लवकरच तो क्षणहि समीपला. तेव्हां त्यांनी शिष्यवृंदाना जवळ बोलावून, त्यांना शेवटचा उपदेश करून, त्यांना तेथून परत जाण्यास सांगून आपण आपण एकटेच तेथून कैलासपर्वताची वाट धरली. कैलास पर्वताजवळ येतांच ब्रम्हा त्यांच्या स्वागतास सामोरा आला त्याचा हात धरून आचार्य हळु हळूं पर्वत चढूं लागले. कांही चढण चढून वर गेल्यावर शंकराचा नंदी त्यांस पुढें वर नेण्यासाठीं तेथें हजर झाला. तेव्हां ब्रम्हाला तेथें सोडून आचार्य नंदीवर आरोहण करते झाले. पुढें पार्थिव देह घेऊन जाणे अशक्य झाल्यामुळें त्याला तेथेंच रजा देऊन, सूक्ष्म लिंगदेह धारण करून गुरुदेव आपल्या मूलस्थानाकडे प्रयाण करते झाले. येथें गुरुदेवांच अवतार कार्य संपलें !! पृथ्वीवर ज्ञान तेजाने सुतरां चमकणारा मानवरूपधारी हा दिव्य तारा

पार्थिव दृष्टीला अदृश्य होऊन, शाश्वत आत्मतेजांत विलीन झाला ! याविषयीं श्रीमच्चिद्विलास यतींद्र स्वामीकृत शंकरविजयावलातांत पुढील श्लोक आढळतो तो असा–

पश्चात्तत्रैको मठनिर्मितः ।
शिष्य संस्थाप्य यत्नतः ॥
तत्रैन सुचिरं स्थित्वा दत्तात्रेयस्य दर्शनम् ।
भाष्यार्थबोधतुष्टस्य विष्णोः साक्षात्कृतिस्ततः ॥
दत्तात्रेय गुहाद्वारात् कैलास :।
एतत्सर्वं समासेन वक्ष्यामि निश्चल ॥

( शंकर विजय विलास )

याच अर्थाचा श्लोक शंकरदिग्विजयांतहि आढळत असून, तो आम्ही मथळ्यांत दिला आहे. त्याच्याच आधारावर आम्ही वर कैलास रोहणाचा सारांश दिला आहे.

याविषयीं चिद्विलासीय शंकरविजयांत माहिती देण्यांत आली आहे. ती अशी--

'इत्युक्त्वा शंकराचार्यकरपल्लवमादरात् ।
अवलंब्य कराग्रेण दत्तात्रेयः सतापसः ॥ ४८ ॥
प्रविवेश गुहाद्वारं दत्वाशां जनसंततेः ।
क्रमाज्जगाम कैलासं प्रमथैः परिवेष्टितः ॥ ४९ ॥

( चिद्विलासीय शंकर-विजय )

येथें आचार्यदेव श्री शंकराचार्यांचें येथील अवतारकार्य परिसमाप्त झालें. तथापि इतकें सांगणें जरूर आहे की या गुरुदेवांचा पार्थिव देह इहलोकांतून अदृश्य झाला असला तरी त्यांचा मधुर कीर्तिपरिमल शारदांबेच्या पवित्र ज्ञानमंदिरांत. उदंड दरवळतच राहिला आहे. व त्यांची पुण्स्मृति जिज्ञासु जगास यावच्चंद्रदिवाकरौ उत्साहित व प्रोत्साहित करीत राहून मुमुक्षु जीवांस अखंड व उदंड उत्साह नि आनंद देत राहील ! ! इति शिवं भवतु ॥

शंकरस्य चरितं भुवि ये पठन्ति ।
शृण्वन्ति देशिकवरस्य नराः सुभक्त्या ॥
निर्धूषकल्पषधियः सुधियः क्षणेन ।
प्रान्ते यान्ति सत्परपदं शिवविष्णुसंदम् ॥

[ रामशर्माविरचित शंकरकथासुनिधि ]

ग्रंथ ... क्र. 11280

' दुष्टाचारविनाशाय प्रादुर्भुतो महीतले ।
स एव शंकराचार्यः साक्षात्कैवल्यनायकः ॥
निधिनागेभवन्ह्यब्दे विभवे शंकरोदयः ।
अष्टवर्षे चतुर्वेदान् द्वादशे सर्वशास्त्रकृत् ॥
षोडशे कृतवान्भाष्यं द्वात्रिंशे मुनिरभ्यगात्
कल्यब्दे चंद्रनेत्राङ्कवह्न्यब्दे गुहाप्रवेशः ॥
वैशाखे पूर्णिमायांतु शंकरः शिवतामगात् ' ॥

मंगलमस्तु

# शुद्धी पत्रक

| पृष्ठ नं. | ओळ नं. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७ | ५१ | आलला | आलेला. |
| ८ | २ | भटीला | भेटीचा |
| २० | १२ | शृगारण्यात | शृंगारण्यात. |
| २१ | ८ | बोलोवून | बोलावून |
| २२ | -- | प्रकरण चौथे | प्रकरण पाचवे |
| २९ | २१ | यज्ञोपवात | यज्ञोपवीत |
| ३७ | ८ | वविता. | वदविता. |
| ३७ | १८ | ाचा | त्याचा |
| ३७ | १९ | ी | झाली- |
| ३८ | १९ | अतिशयाक्ती | आतिशयोक्ती |
| ४० | २२ | अलाकिक | अलौकिक |
| ४१ | २२ | यईल | येईल. |
| ४१ | २२ | वदामध्ये | वेदांमध्ये |
| ५६ | १ | ष | ऋषी |
| ६८ | ८ | संदशर | संदर्शन |
| ८३ | ४ | तोही | तोंडी |
| ८७ | १४ | लोळे | डोळे |
| ९३ | २३ | तथे | तेथे |
| ९७ | ८ | पहिल्या | पहिला |
| १०० | १७ | अंतरग | अंतरंग |
| १२१ | | वैदि | वैदिक. |
| १२९ | ४ | येतले | घेतले. |
| १२९ | ६ | गी | मी |
| १४१ | ३ | कमारिल | कुमारिल |
| १४२ | १ | एकला | ऐकला |
| १४२ | ३ | झालू | चालू |

| | | | |
|---|---|---|---|
| १४२ | १५ | मी | आम्ही |
| १४४ | १५ | टेऊन | ठेऊन. |
| १६७ | १७ | आत्यंत | अत्यंतर. |
| १८१ | ११ | जात | जाता. |
| १८४ | १६ | काडली | काढली |
| १८७ | १० | धमराजाचा | धर्मराजाचा |
| १९ | १५ | बरागी | बैरागी |
| १९१ | १७ | ऐ | ऐश्वर्य |
| १९३ | ९ | मरमतत्व | अमरतत्व |
| १९५ | १६ | क्षमा | क्षमा |
| १९५ | २१ | कतर्व्य | कर्तव्य |
| १९७ | १९ | हाईल | होईल. |
| १९९ | ८ | झरकन | झटकन |
| १९९ | १८ | प्राथना | प्रार्थना |
| २०३ | १९ | कुतोऽसि | कुत्रोऽसि |
| २०५ | १२ | भाषणे | भाषण |
| २०७ | ९ | तुगा | तुंग |
| २०८ | ५ | बालशालिनस्मान | बलशालिऽस्माव |
| २१६ | १६ | मातचा | मातेचा |
| २१६ | १८ | ि चा | तिचा |
| २१७ | २२ | लवलशही | लवलेशही |
| २१८ | ३ | असाहय | असहाय्य |
| २१९ | २० | च | चमत्कार |
| २२१ | ६ | – | एका |
| २२३ | १४ | माच | मीच |
| २२७ | २२ | मह | महा |
| २३० | १० | गोठे | मोठे |
| ३२० | २० | त्या | त्याला |

REFBK-0015249